
शत्रूच्या
शिबीरात
वि.दा.सावरकर

# शत्रूच्या शिबिरात

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प समन्वयक: रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# शत्रूच्या शिबिरात

प्रकरण पहिले

## आगनावेवर

इंग्लंडला जाण्यासाठी मुंबईचा सिंधुतट सोडून "परशिया" ह्या आगनावेवर (आगबोटीवर) ९/६/१९०६ ह्या दिनांकाला मी चढलो.

मुंबईचा सिंधुतट सोडून मला विलायतेस घेऊन जाणारी ती आगनाव (स्टीमर) समुद्राचे पाणी दुभंगताना बसणारे पहिले धक्के नि हेलकावे खात खात चालू लागली. मला प्रेमाचा उत्साहप्रद निरोप देण्यासाठी सिंधुतटावर जमलेले माझे बंधुबांधव नि इष्टमित्र बोलता बोलता दिसेनासे झाले. दुरावत चाललेल्या त्या सिंधुतटावरून मला निरोप देत असताना, त्या सुहृद बांधवांचे माझ्या मनःपटावर जे छायाचित्र उमटले होते ते काय ते, जणु डोळ्यांतून बाहेर येऊन, आता माझ्या दृष्टीसमोर तरलत होते. ते पहात वियोगाने दुखावलेले माझे मन मनासच आकुलपणे विचारू लागले, "तीन वर्षांनी का होईना पण मी सुखरूपपणे मातृभूमीस परत येईन का? हे सारे माझे बंधुबांधव मला भेटतील ना?"

आगनाव समुद्राचे पाणी सरासर कापीत भरवेग चालू लागली. अवती भोवती क्षितिजावाचून काहीही दिसेनासे झाले. तरीही त्या आगनावेच्या कठड्यास धरून जिकडे मुंबईचा सिंधुतट होता त्या दिशेस सुन्नपणे टक लावून पहात मी उभाच होतो.

परंतु आगनावेवरील जे इतर प्रवासी मुंबई सुटताना सिंधुतटावर दाटलेल्या त्यांच्या त्यांच्या इष्टमित्रांचा निरोप घेण्यासाठी माझ्यासारखेच त्या नावेच्या कठड्याशी दाटून उभे होते ते बहुतेक तेथून परतून, आपापल्या राखीव खोल्या हुडकून, आपापले सामान त्यांत व्यवस्थित लावण्यात आधीच गुंतून गेले होते. त्या प्रवाशांतील बहुतेक लोक युरोपियन किंवा अँग्लोइंडियन होते. कोणी सहकुटुंब स्वदेशी परत जात होते. त्यातील बहुतेकांना आगनावेच्या जलप्रवासाचा अनुभव अंगवळणी पडलेला.

जे प्रथमच जलप्रवास करीत होते, त्यांच्या समवेत प्रवासाचा अनुभव असलेले स्नेहीसोबती होते. त्यामुळे ते सारेजण एकमेकांशी हसत खिदळत रमून गेलेले. पण मला इतक्या दूरच्या जलप्रवासाचा हा पहिलाच प्रसंग, समवेत सोबतीही कोणी नाही. त्या काळी समुद्रप्रवासास जाणारा हिंदू असा तुरळक. त्यातही गोऱ्या लोकांना आपण ह्या 'इंडियन' लोकांवरील राज्यकर्ते, अर्थातच इंडियन म्हणजे 'नेटिव्ह' म्हणजे एक हीनतर व्यक्ती, अशा दर्पाने साधारणतः भारलेले असे. त्यांच्या ह्या गजबजलेल्या समाजात मी तसा सुन्नपणे समुद्राकडे पहात उभा असताना त्यांच्यातील कित्येकजण "हा एकटा, कानांत भिकबाळी असलेला, कुठला अडाणी 'नेटिव्ह' मुलगा उभा आहे बुवा!" असे काहीसे विचारणारी एक तिरस्काराची चोरटी दृष्टी मजकडे टाकीत जात येत आहेत याचीही मला जाणीव होत होती.

माझे असे कोणीही स्वजन मजजवळ नसता त्या गोऱ्या परकीयच नव्हे तर परशत्रूंच्या समाजात अगदी एकटा उभे राहण्याचा असा माझ्या आयुष्यातला तो पहिलाच प्रसंग!

काही वेळाने प्रथम आपल्याला आपली राखीव खोली कुठे आहे ते आता हुडकून काढलेच पाहिजे असे वाटून कोणास विचारावे ते बघू लागलो. आगनावेवरील गोरा किंवा निमगोरा किंवा काळा नोकरवर्गसुद्धा त्या युरोपियनादिकांच्या सामानसुमानाच्या सोयी पाहण्यातच गर्क झालेला दिसला. होऊन येऊन मला कोणीच विचारीना. शेवटी अधिकाराच्या कोणत्या तरी प्रकारच्या फिती कोटावर असणाऱ्या एका गोऱ्या गृहस्थास हटकून माझी दर्शिका (टिकिट) दाखवून विनविले की, ह्या क्रमांकाची खोली कुठे सापडेल? योगायोगाने ज्या 'थॉमस कुक अँड सन्स कंपनी' च्या वतीने मी हे दर्शिक काढलेले होते त्याच कंपनीचा तो अधिकारी होता; नि त्याचे काम त्यांच्या वतीने आलेल्या प्रवाशांच्या सोयी पहाण्याचेच होतेसे दिसले. माझ्या प्रश्नावरून त्याने तत्काळ ओळखलेले दिसले की, मी अगदीच नवखा प्रवासी आहे. त्याने किंचित् हसरे तोंड करून मला सांगितले, "हा पहा माझा हस्तक, हा तुम्हाला तुमची खोली दाखवील. अवश्य ती माहिती देईल," असे सांगून तो पुढे गेला. त्याने दिलेला हस्तक एक गोवेकर हिंदी मनुष्य होता. त्याने मला नेऊन माझी राखीव जागा जीत होती, ती खोली दाखविली.

मी त्या खोलीत डोकावतो तो सुरेख फेटा बांधलेला पाणीदार, गोरापान, माझ्याहूनही दोनतीन वर्षांनी लहान दिसणारा एक कोवळासा शीख मुलगा त्याच्या पेट्या इत्यादी सामान लावण्यात गुंतलेला दिसला. मला पहाताच तो इंग्रजीत म्हणाला, "आपणच का मिस्टर सावरकर?" मी होय म्हणताच त्याचा आनंद त्याच्या मनात सामावेनासा होऊन तो म्हणाला, "मी तुमची वाटच पाहात होतो. ह्या खोलीत दोन जागा. ही माझी नि त्या दुसरीच्या क्रमांकावर हे तुमचे नाव. मला सोबती इंडियनच मिळालेला पाहून किती आनंद झाला. पण तुम्ही येण्याची वेळ गेली तेव्हा मला चिंता वाटली की, तुमचा येण्याचा बेत रद्द झाला की काय? मी पहिल्यानेच समुद्र प्रवास करीत आहे. दोनतीन पंजाबी गृहस्थांची मला निघताना सोबत मिळाली; पण त्यांच्या खोल्या दुसऱ्या बाजूस आहेत. तुम्हीच ते सावरकर हे पहाताच, मला किती समाधान होत आहे म्हणून सांगू?"

प्रियजनविरहाने खिन्न झालेल्या मनास परदेशामध्ये एकाकी भटकताना आपल्या देशातील कोणी अनोळखी मनुष्य जरी भेटला तरी किती आपुलकी वाटते; याची मला तिथे पहिली जाणीव झाली!! मीही त्या प्रेमळ युवकाला म्हटले, "आपल्या परिचयाने मलाही संतोष वाटत आहे. आपले नाव काय?"

"हरनामसिंग" तो उत्तरला.

दोन तीन दिवसांतच त्या आगनावेवर प्रवासात असलेल्या मूठभर हिंदी गृहस्थांपैकी हरनामसिंगांच्या ओळखीचे ते पंजाबी विद्यार्थी आणि इतर काही दोनचारजण मिळून नऊदहा हिंदी प्रवाशांचा नि माझा परिचय झाला. साहजिकच आमचा एक हिंदी गट बनला. त्याच नौकेच्या पहिल्या वर्गाने बंगालचे प्रख्यात विद्वान रमेशचंद्र दत्त हे जात होत हे मला त्यावेळी माहीत नव्हते. ह्या 'हिंदी गटा' पैकी माझ्या ह्या 'आत्मवृत्ता' मध्ये पुढे अनेक महत्वाच्या प्रसंगी, ज्यांचा वारंवार उल्लेख करावा लागणार आहे, त्या हरनामसिंगांच्या, त्यांनीच मला त्या दिवसांत सांगितलेल्या पूर्वपीठिकेचा आता आठवतो तो आशय इथेच सांगून टाकणे उचित होय.

हरनामसिंग यांचा जन्म अमृतसरकडच्या एका प्रतिष्ठित शीख घराण्यात झाला. त्यांचे वडील लहानपणीच वारले. मागे उरलेली त्यांची आई तिच्या ह्या एकुलत्या एका मुलाला जीव की प्राण करी. त्यांचे लग्न

अठराव्या वर्षाच्या आतच झाले. त्यांचा अभ्यास चांगला असल्यामुळे ते कुठेही न अडखळता बी. ए. झाले. तेव्हा त्यांची बुद्धिमत्ता पाहून शीखांच्या नाभा संस्थानच्या महाराजांनी त्यांना बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठी इंग्लंडला धाडण्याचे ठरविले आणि त्यासाठी पुरेशी शिष्यवृत्ती नेमून दिली. शीख समाजात त्या काळी बॅरिस्टर तुरळकच; तेव्हा असा तरतरीत युवक बॅरिस्टर होऊन आला असता स्वतः तर अलोट संपत्ती मिळवीलच पण शीख समाजाचेही एक भूषण होऊन बसेल अशा भावनेने शीख समाजातील त्यांच्या बंधुबांधवांनीही त्यांना विलायतेस जाण्यास चांगला पाठिंबा दिला. पण त्यांची आई? आपला एकुलता एक मुलगा, अवघ्या एकोणीसाव्या किंवा विसाव्या वर्षाचे वयात, आता आपल्याला निदान तीनचार वर्षे तरी अंतरणार नि कुठल्या दूरवरच्या परदेशात एकटा जाऊन पडणार, त्याचे कसे होईल, काय होईल, अशा मायेपायी तिला तिच्या ह्या मुलाला विलायतेस धाडण्यास काही धीर होईना. "तुझ्या भेटीवाचून इतकी वर्षं मी कशी राहू शकेन? तू इथेच वकील हो. घरी बसलास तरी तुला पैशाची कसली उणीव आहे? अगदी समुद्रपार जाण्याचे काय कारण?" अशी गळ ती मायेचे पोटी घालू लागली. आणि त्या काळात समुद्रपार जाणे म्हणजे सर्वसामान्य समाजात एक निषिद्ध, जातिबहिष्कार्य, भलतेच धाडस वाटे खरेच! शेवटी चार शिष्ठांनी सांगितले, की "प्रत्येकवर्षी हरनामसिंगाने आईस भेटण्यास विलायतेहून एकदा घरी यावे आणि त्या प्रवासाचा व्यय त्याला शिष्यवृत्तीत भर म्हणून देण्यात यावा अशी व्यवस्था आम्ही केली आहे." तेव्हा शेवटी सर्वांच्या आग्रहास तिने मानले आणि आपल्या मुलास विलायतेस जाऊ दिले. या त्यांच्या मनोराज्याचा पुढे काय शेवट झाला ते या कथेत यथाप्रसंगी दिसेलच.

त्या माझ्या सहप्रवासी 'हिंदी गटा'तील आणखी एका व्यक्तीचा उल्लेख करावयास हवा. हे पंजाबी गृहस्थ, वय तीसच्याजवळ, अनेकवेळा युरोपात जाऊन आलेले, घरचे श्रीमंत; त्यामुळे युरोपियन राहणी साहणी, वेष, बारीक सारीक शिष्टाचार त्यांच्या अगदी अंगवळणी पडलेले असत. इतकेच नव्हे तर त्या काळी जे थोडे लोक 'इंग्लंड रिटर्न्ड' म्हणून समाजात एकप्रकारची आढ्यता बाळगून असत त्यांना त्या परकीय राज्यकर्त्यांच्या मांडीस मांडी लावून बसण्याच्या योग्यतेचे आपण झालो असे काहीसे वाटत असे. तशी ह्या गृहस्थांचीही थोडीशी समजूत झालेली असल्यामुळे ते स्वतःच्या घरीही अगदी इंग्रजी पद्धतीने रहात असत. त्याकाळी शिंदेमहाराजांनी आपल्या मुलाचे नावसुद्धा जॉर्ज म्हणून ठेवले आणि अशा वृत्तीच्या इतर सटरफटर लोकांनी मद्रास-बंगालकडे आपली नावे इंग्रजी वळणावर चट्टोपाध्यायचे 'चटर्जी', 'बानर्जी', 'रे' अशी पालटून टाकली. किंवा प्रत्यक्ष वडिलांस 'पपा' आणि आईस 'ममी' म्हणावयास आपल्या मुलांना शिकविले. तितका बाष्कळपणा जरी ह्या गृहस्थास आवडत नसे तरी ते आम्हांस नेहमी म्हणत आपल्या हिंदी लोकांनी नि विद्यार्थ्यांनी इंग्लंड प्रभृती सुधारलेल्या देशांत जाताना आपली सर्व अडाणी नि गबाळ राहणी सोडून वेष, वर्तन, जेवणखाण, उठणे-बसणे अशा प्रत्येक गोष्टीत त्यांच्या सुधारलेल्या पद्धतींचे अनुकरण 'बाटली पाईप चिरूट' पर्यंत अगदी यथावत् केले पाहिजे. आपण तसे करीत नाही म्हणून ते लोक आपणांस अडाणी नि हीनजात समजतात नि त्यायोगेच युरोपमध्ये आज आपल्या राष्ट्राची पत म्हणून उरलेली नाही. स्वराज्यास आपणासारखे गबाळ राहणीचे लोक अपात्र होत- असे त्यांना साहजिकच वाटते.

त्याकाळी नि विशेषतः त्या काळापूर्वी स्वराज्याच्या योग्यतेविषयी अशा भोंगळ कल्पना असलेले अनेक लोक नि तेही इंग्लिश शिक्षितांत, 'इंग्लंड रिटर्न्डीं'ते नि प्रामाणिक देशभक्तांतही पुष्कळ असत. तो देशोन्नती

इच्छिणाऱ्या अनेक पंथांतील एक होता म्हणाना. इंग्लंडमध्ये अगदी पहिल्यापहिल्याने गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांमध्ये बहुसंख्य तरुण याच पंथाचे असत.

कै. देशभक्त सुरेंद्रनाथ बानर्जी आपल्या आत्मवृत्तात त्यांच्या लहानपणी परदेशात जाणे किती कठीण असे आणि इंग्लंडहून जाऊन आलेल्या तुरळक हिंदी शिक्षित गृहस्थांची काय मनःस्थिती असे याविषयी लिहिताना म्हणतात :"As I have observed I started for England on March 3rd 1868. Romesh Chandra Dutt and Beharilal Gupta were with me. We were all young in our teens and visit to England in those days was a more serious affair than it is now. It did not only mean absence from home but the grim prospect of social ostracism. We all three had to make arrangements in secret, as if we were engaged in some nefarious plot of which the world should know nothing. My father was helping me everyway but the fact had to be carefully concealed from my mother and when at last on the eve of my departure the news had to be broken to her she fainted away under the shock of what to her was terrible news. (page 10). . . A visit to England, however, was a new form of heterodoxy to which our country had not yet become accustomed. The Anglicized habits of some of these who had come back from England added to the general alarm. (page 26). . . Some of our best men had fallen victims to the curse of drink. It was considered to be an inseparable part of English culture. A man who did not drink was hardly entitled to be called educated. The saintly Raj Narayan tells us how he himself meeting other friends called for a drink and how they were found all lying on the floor in a state of more or less inebriety (page 7)". (After Mr. Surendra Nath returned from England) "Although I was taken back into the old home by the members of my family the whole attitude of Hindu Society, of the rank and file was one of unqualified disapproval. My family was practically outcasted. We were among the highest of Brahmans; but those who used to eat and drink with us on ceremonial occasions stopped all intercourse and refused to invite us. (page 26)" Mr. Surendra Nath also mentions how many of the 'England Returned' leading gentlemen took to the European style of eating and drinking at home and some of them went to the length of throwing the refuse of their meals, bones and flesh and all over their wall into the compounds of their orthodox neighbours just to spite their religious feelings."

तथापि, स्वराज्याच्या पात्रतेचा नि साहेबी सोंग घेण्याचा हा बादरायण संबंध जर सोडला तर त्या मित्राचे मतांत पुष्कळ तथ्यांश होता. जेव्हा इंग्लंडसारख्या परदेशात अनेक वर्षे राहण्याचा प्रसंग येतो तेव्हा आपल्या राष्ट्रास अपमानास्पद नसतील, अवश्य असतील नि उचित असतील त्या त्या त्यांच्या चालीरीती, शिष्टाचार शिकून नि पाळून त्या परकी समाजात मिळून मिसळून राहणे हे इष्टच. कारण त्या योगे ज्या कार्याकरिता आपण त्या परदेशात जातो ते कार्य अधिक सुलभतेने पार पाडता येते. इतकेच नव्हे तर, त्यांच्या चालीरीतीत नि आचारविचारात जे आपल्या समाजापेक्षा चांगले, आपल्याच समाजास हितकर असेल, ते ते आत्मसात करून आपल्या इकडे त्याचा प्रचार करणेही एक कर्तव्य आहे.

माझी मते जरी हीच होती तरी माझा इंग्लंडमध्ये जायचा बेत इतका अकस्मात ठरला होता नि इतक्या घाईने मला निघावे लागले की इंग्रजी पद्धतीच्या खाण्यापिण्याची सवय तर दूरच; पण इंग्रजी वायुमानात अवश्य तसे भरपूर कपडे शिवून घेण्यासही मला वेळ मिळाला नाही. स्वदेशात असता इंग्रजी कॉलर, विजार, बूटसुटाचा वेष

वापरतात कसा ते सुद्धा मला शिकण्याचा कधी प्रसंग आला नाही. हौस तर मुळीच नसे. माझ्या वरील सहप्रवासी मित्राच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे मी स्वराज्य मिळविण्यास पूर्णपणे अपात्र होतो; म्हणून, त्या सुस्वभावी मित्रासच शेवटी त्या विद्येपुरता शरण गेलो आणि एकेक धडा घेऊ लागलो. धोतरास रामराम ठोकून, कानातील भिकबाळी काढून टाकून, कोट पाटलून, हॅटबूट नि विशेषतः, तो 'टाय' कॉलरवर बांधण्यास दहादा चुकून, शेवटी ठीकठाक घालावयास अगदी म्हणतात तसे 'शिकलो'. युरोपियन पद्धतीने टेबलावरून सुरीकाटा हाती घेऊन मासे, मांस, अंडी सशास्त्रपणे खाण्यास शिकण्याचा धडा तर फारच कठीण गेला. तो इतका की दोनतीन वेळा त्यापायी अगदी जिवावरच्या प्रसंगास नसले तरी जिभेवरच्या प्रसंगास तोंड द्यावे लागल. त्याचे असे झाले. लहानपणापासूनच मांसाहाराचा जरी मी मताने समर्थक होतो तरी कृतीने शाकाहारीच होतो. कारण आगनावेवर चढेतो मला जातिवंत ब्राह्मणाला, मांसाहाराचा कधी प्रसंगच आला नाही. पण त्याकाळी आगनावेवर मांसाहारच मुख्य नि सामान्य आहार असे. टेबलावर जेवण्यास जाण्याचे आधी मला माझ्या या मित्राने चांगले बजावले होते की, सुरी उजव्या हातात धरावी; नि काटा डाव्या हातात. मांस मत्स्याचे तुकडे सुरीने कापले म्हणजे डाव्या हातात धरलेल्या काट्याने ते उचलून खावयाचे असल्यामुळे डाव्या हातानेच जेवावयाचे असते. हा धडा मी पाठही केला होता; पण दोनतीन दिवसांनी एकदा मांस कापण्यात सारे लक्ष गुंतल्यामुळे 'तो' धडा विसरून घास घ्यायचा म्हणून जन्मजात सवयीने तो सुरी धरलेला उजवा हातच पटकन तोंडाशी गेला. घास म्हणून सुरीच तोंडात घुसणार तोच सुरीचे टोक ओठांच्या कोपऱ्यात लागून, हात आखडला गेला नि मी सावध झालो. ओठाच्या कोपऱ्यात चुरचुर होऊ लागली म्हणून बोटाने चाचपले, तो रक्ताचे थेंब आलेले. लगेच हातरुमाल घेऊन ओठाशी दाबून धरला. मान अगदी खाली घातली. नाहीतर कोणी साहेब माझी ती अडाणी तारांबळ पाहून हसायचा एखादा. लगेच जेवण तसेच ठेवून हळूच उठून गेलो. हेतू हा की, इतरांना वाटावे की बिचाऱ्याला नाव लागली म्हणून मळमळून आले; नि म्हणून जेवण टाकून जावे लागले. ही झाली मांस खाण्याची मौज. पण प्रथम मासे खाताना माझी जी तिरपीट उडे ती तर विचारावयास नको. कोणत्या माशात काटे (हाडके) कुठे असतात नि ते अलगद काढून त्यातील मांस तेवढे कसे गट्ट करावे हा धडा बी. ए. पर्यंतच्या कोणत्याही शालेय पुस्तकात मी वाचलेला नसल्यामुळे त्या नावेवरील जेवणात प्रथम प्रथम मासा पानात घेतला की, मी कुठे तरी कापावा नि मोठे हाड दिसल्यास तेवढे काढून तो तुकडा तसाचे तसाच तोंडात टाकावा; पण चावू लागताना काटेरी झुडपात पाय पडताच त्याची जी गत व्हावी तीच तोंडाची व्हावी. त्या माशाच्या तुकड्यातील बारीक बारीक काटे बोचून बोचून, शेवटी तो घासाचा लगदा हळूच चमच्यात थुंकून टाकण्यावाचून गत्यंतर उरू नये. दोनदा तीनदा असे झाल्यावर टेबलावरच्या इतर प्रवाशांच्या ते लक्षात येऊ नये म्हणून नि माझे मलाच ओशाळल्यासारखे होऊन मी मासे म्हणून खायचे नाहीत अशी प्रतिज्ञा करण्याच्या बेतात होतो; पण आमच्या हिंदी गटात आणखी दोघे जे मूळचे शाकाहारी होते त्यांचीही हीच तारांबळ उडत होती. त्यांनी आमच्या त्या 'शिष्टाचारी' मित्राला ते सांगितले होते. त्यामुळे त्या मित्राने चारपाच प्रकारचे मासे शिजवून आमच्या खोलीत आणून, त्यांचे सशास्त्र शवविच्छेदन कसे करावे, निरनिराळ्या माशांत लहान काटे कुठे असतात; नि ते टाळून मासे इंग्रजी सुरी काट्याने कसे खावे, ते आम्हांस शिकविले. मासे कापण्यासाठी एक निराळीच सुरी पानापाशी ठेवलेली असते हे सुद्धा मला तेव्हा काय ते कळले.

आम्हांस, युरोपियन शिष्टाचार शिकवून ‘सुधारण्या’साठी मनःपूर्वक झटणाऱ्या मित्राला मी विनोदाने ‘शिष्टाचारी’ हेच नाव तिथे ठेवले होते. आणि या प्रकरणातही त्यांना त्याच नावाने उल्लेखिणार आहे. कारण पुढे जेव्हा त्यांची मते पालटून ‘अभिनव भारता’च्या गुप्त संस्थेत ते आले तेव्हा त्यांनी मला निक्षून सांगितले होते की, त्यांच्या नावाचा उल्लेख कुठेही केला जाऊ नये. आजही ते कुठे आहेत किंवा आहेत की नाहीतच, तेही मला ठाऊक नाही.

हरनामसिंग हे केशधारी शीखपंथाचे. त्यांच्या पंथाप्रमाणे अंगावरील वा डोक्यावरील केस केव्हाही कापावयाचे नसतात. पूर्वीच्या ऋषीप्रमाणे डोक्यावरील केसांना वर गाठ मारावयाची; अर्थात त्यावर टोपी बसणे कठीण. यामुळेच की काय त्यांच्या पंथात टोपी घालणे निषिद्ध. फेटा हेच त्यांचे शिरोभूषण. त्या कारणाने, अंगावर जरी कॉलर नेकटायसुद्धा साग्रसंगीत युरोपियन वेष ते घालीत तरी डोक्यावर युरोपियन टोपी न घालता फेटा बांधीत. त्याकाळी इंग्लंडमध्ये शीख फारच तुरळक गेलेले. त्यामुळे युरोपियन समाजास नि विशेषतः बायकामुलांना युरोपियन वेषावर त्याला साजेशी टोपी न घालता असा फेटा बांधलेला शीख गृहस्थ पहाताच मोठे विक्षिप्त वाटे, हसू येई.

त्या आगनावेच्या माथ्यावर (डेकवर) आमचा हिंदी गट अधूनमधून इतर गोऱ्या प्रवाशांप्रमाणे हिंडावयास जाई किंवा मोकळा वारा खात बोलत बसे. त्यात हरनामसिंगही असत. युरोपियन प्रवासी जाता येता त्यांच्या फेट्यास पाहून गालातल्या गालात हसत, मुले दुरून बोट दाखवून टिंगल करीत. प्रथम आम्ही तिकडे लक्ष दिले नाही. पण एक दिवस काही शेफारलेली गोरी मुले हरनामसिंगाच्या फेट्याकडे बोट दाखवून ‘What a funny cap!’ म्हणून ओरडत आमच्या अगदी अंगलट येऊन टिंगल करू लागली. आणि त्यांच्या मोठ्या बायका नि पुरुषही त्यांना निवारण्याचे सोडून दुरून फिदीफिदी हसू लागले. ते पाहताच आमच्यातील सगळ्यांच्या आधी जर कोणी रागावले असेल तर ते ‘शिष्टाचारीच’ होत. हरनामसिंग पुढेच निघून गेले; पण शिष्टाचारी यांनी मागे वळून त्यातील एका गोऱ्या मुलाचा हात हिसडून त्याला मागे लोटले. त्या सरशी ती मुले पळून गेली. त्यांची मोठी माणसेही कोणी मधे पडली नाहीत. आम्ही पुढे चाललो. ती गोष्ट तिथेच संपली; पण परत खाली आल्यानंतर ‘शिष्टाचारी’ यांनी मला एकट्याला त्यांच्या खोलीत नेऊन अगदी दुःखित मनाने सांगितले : “सावरकर, तुम्ही हरनामसिंगांना सांगा, ते तुमचे ऐकतील, की त्यांनी फेटा घालण्याचा अडाणीपणा पुन्हा करू नये. ज्या योगे आपल्याला ते युरोपियन लोक बावळट म्हणून हसतात तसे आम्ही का वागावे? मला तरी ते लोक तसे तिरस्काराने उपहासले म्हणजे माझा जातीय पाणउतारा झाल्यासारखे वाटते. जर हरनामसिंग पुन्हा फेटा घालूनच माथ्यावर हिंडावयास येणार असतील, तर मी तरी पुन्हा त्यांच्या समवेत युरोपियन लोकांसमक्ष जाणार नाही.” मी ठासून उत्तरलो “मित्रा, मी हरनामसिंगांना तसे कधीही सांगणार नाही. आपल्या काही चालीरीती मुळातच अहिताच्या वा टाकावू आहेत असे वाटेल आपणा स्वतःला, तर त्या आम्ही होऊन सोडाव्या. त्यात मी तुमच्याहून सुधारक आहे. परंतु तसे काही नसता केवळ युरोपियन आम्हांला अमुक रीतीसाठी हसतात म्हणून ती सोडणे हेच आपल्या मनोदौर्बल्याचे खरे लक्षण. प्रासंगिक सोयीचा प्रश्न सोडल्यास शिरोभूषण जर कोणते असेल तर ती गोऱ्यांची शिपतरे नसून आपले नारंगी फेटेच होत. किती शोभिवंत, भव्य, भरदार! युरोपियन टोप्या सोय असेल तर नि तिथे अवश्य वापराव्या; पण टोपी न घालणे नि फेटा बांधणे हा शीखांचा एक धर्माचार, एक त्या पंथाचा सैनिक रणवेष!

काही युरोपियनांना ते अडाणीपणाचे किंवा हास्यास्पद वाटते, येवढ्याचसाठी काय ते आपण फेटा बांधण्यास इतके लाजावे, तो बांधणेच सोडून द्यावे, ह्यातच आपला खरा जातीय पाणउतारा होणारा आहे. मी तर असे म्हणेन की, फेटा घालू नये असे हरनामसिंगास सांगण्यापेक्षा उद्यापासून आपण सर्वांनीच फेटे बांधून माथ्यावर हिंडण्यास जावे. अशी एकजुटीची तोडीस तोड मिळालेली पाहून उद्या त्या गोऱ्यांना त्यांचाच पाणउतारा झाल्यासारखे वाटेल."

त्यांच्या सुप्त स्वाभिमानावर ठिणगी पडल्यासारखे होऊन 'शिष्टाचारी' उसळून म्हणाले "अगदी ठीक बोललात! उद्यापासून मी स्वतः फेटा बांधून हरनामसिंगासमवेत जाणार!"

माझ्या त्या हिंदी मित्रांमध्ये ज्यांच्यात असा राष्ट्रीय न्यूनगंड असे त्यांच्यात, स्वाभिमानाची ज्योत पेटविण्यासाठी आणि त्या अनुरोधे राजकारणाची ओढ त्यांना लागावी म्हणून मी अशा प्रसंगाचे निमित्ताने वरचेवर चर्चा करीत राही. त्या वेळच्या शब्दात जरी नसला तरी त्या चर्चेचा आशय जो आज आठवतो तो असाः

"आज इंग्लंडचे राज्य आपल्यावर आहे म्हणून उठण्याबसण्यात, वेषभूषेत, खाण्यापिण्यात आपल्याला त्यांच्या रीतीभाती शिकाव्या लागतात. त्या शिकताना आपली तिरपीट उडाली, हास्यास्पद चुका झाल्या म्हणजे तो आपलाच अडाणीपणा आहे, असे आपल्यातील काही जणांना वाटून ते उगीच ओशाळे होतात. मीही चटकन तसाच ओशाळतो; पण ती चूक आहे. आम्ही हे लक्षात ठेवावे की जेव्हा आपल्या देशात आपले राज्य होते आणि आपल्या राज्यात युरोपियन लोक व्यापारादिक मिषाने पहिल्याने येऊ लागले तेव्हा त्यांनाही आपल्या चालीरीती शिकणे भाग पडे. तेव्हा तेव्हा त्यांचीही अशीच तिरपीट उडे, त्यांच्या हातूनही अशाच हास्यास्पद चुका घडत, त्यापायी त्यांचीही यथेच्छ टिंगल उडे. आज त्यांच्या लंडनसारख्या राजधान्यांतून आपली हिंदी माणसे पाहिली की त्यांचे लोक 'ब्लॅकी' (काळ्या) म्हणून खिजवितात. पण पुण्यासारख्या आमच्या राजधान्यांतून आमचे राज्य असता जेव्हा इंग्रज पहिल्यानेच येऊ जाऊ लागले तेव्हा आमचे लोक त्यांनाही 'ताम्रमुख', 'तांबडतोंड्या' असेच म्हणून टिंगल करीत. इंग्रजांना बूट काढून अनवाणी चालण्याची सवय नसते पण आमच्या त्यावेळच्या राजसभांतून जेव्हा त्यांचे गोरे राजदूत येत तेव्हा आमच्याकडील शिष्टाचाराप्रमाणे पेशव्यांसमोर जाताना बूट बाहेर काढून ठेवूनच राजसभेत जावे लागे. पँट-कोट-हॅट-स्टॉकिंगसह साग्रसंगीत युरोपियन वेष अंगावर पण बूट मात्र नाही. तसे अनवाणी पायी चालताना त्या इंग्रजांना अगदी बावचळल्यासारखे होई. दुसरी गंमत तशीच. इंग्रज लोकांना त्यांच्या देशातील थंड वायुमानामुळे नुसत्या भुईवर टाकलेल्या बैठकीवर बसण्याची सवय नसते. लहानपणापासून बसणे कशातरी खुर्चीवर पण आमच्या राजसभांतून बैठकीवर वीरासन किंवा मांडी घालून बसण्याचा सर्वसाधारणतः प्रघात. त्यामुळे इंग्रजी राजदूत कोणी आला, की बाहेर बूट काढून आत येताच बैठकीवर बसावे लागे. त्याला जन्मात मांडी घालून खाली बैठकीवर बसण्याची सवय नसल्याने, त्याच बसल्यावर सारखी चुळबुळ चाले. त्याच्या त्या 'अडाणीपणास' पाहून कोणी मराठी लेखक किंवा सरदार जर उपरण्याचा वा शेल्याचा पदर तोंडास लावून हसले असतील तर त्यात काहीच अस्वाभाविक नव्हते. अशी एक दंतकथा अजून सांगतात की, एकदा नाना फडणवीसांनी इंग्रजादिक युरोपियन दूतांची या पेचातून सुटका करण्यासाठी एक खुर्ची कुठून तरी आणविली. पण लगेच दुसरी अडचण आली की मराठी साम्राज्याचे जे श्रीकरणाधिप (फडणीस) नाना त्यांनी राजसभेत बैठकीवर बसावे नि ह्या एका परकी राजकीय याचकाने खुर्चीसारख्या उच्चासनावर विराजमान व्हावे येवढे हे टिक्कोजी कोण? त्यावर कोणीशी तोड काढून नाना फडणवीसांशी इंग्रजी राजदूत बोलण्याचा प्रसंग एई तेव्हा नानांसाठीही दुसरी एक खुर्ची

www.savarkarsmarak.com

आणवावी. परंतु साम्राज्याच्या श्रीकरणाधिपत्वावर-फडणीशीवर-मांड ठेवून बसण्याची ज्यांना जन्माची सवय, त्या नानांना खुर्चीवर पाय लोंबकळत सोडून बसणेही अवघडच जावे. क्वचित तो इंग्रजी राजदूत मनातल्या मनात नानांना अडाणी समजला असेल. म्हणाला असेल, "ह्या लोकांना खुर्चीवरसुद्धा बसता येत नाही!" युरोपियन लोकांची आमच्या पद्धतीने जेवताना कशी त्रेधा उडे, त्या विषयीही त्यावेळच्या काही दंतकथा अशाच गमतीच्या आहेत. एकदा पुण्यास एका सरदाराने इंग्रजांच्या एका अधिकाऱ्यास जेवावयास बोलाविले. आमच्या राज्यात भोजनाचा राजविलासी शिष्टाचार म्हणजे आमच्या 'पंगती'चाच. तशी पंगत थाटली गेली. बेटावरील इंग्रज अधिकारी आत येऊन पाहातात तो न टेबल न खुर्ची, न काटा, न सुरी. दूर एका बाजूस एक चंदनी पाट मांडलेला, रांगोळ्यांच्या वेलबुट्टीमध्ये सोन्याच्या ताटवाट्यांतून नाना पदार्थ वाढलेले. "इथे बसावे" म्हणून सांगितले जाताच मोठ्या कष्टाने साहेबाची स्वारी कशीतरी मांडी मोडून पाटावर बसली. सगळे जेवू लागलेले पाहताच साहेबही जेवू लागला. पण उजव्या हाताने भातवरण कालवून जेवावयास आरंभ करावयाचा ते सोडून त्यातल्या त्यात इंग्रजी 'केक'सारखी दिसणारी एक करंजी त्याने उचलली. ती दोन्ही हातांनी वाकवून मोडली. तो त्यातील खोबऱ्याचे पुरण बाहेर पडले. ते पाहून त्याला अचंबा वाटला. त्याने दुसरी करंजी उचलली नि वरखाली नीट न्याहाळून, त्याला आधीच हसू लागलेल्या मंडळींना विचारले "अहो, हे (करंजी) बाहेरून तर चारी बाजूंनी असे पक्के बंद असता हे (पुरण) त्याच्या आत कसे जाऊन बसले?" तेव्हा मोठा हशा पिकला.

परंतु अशा साहजिक चुकांमुळे त्यावेळचे इंग्रज लोक हे जातितःच अडाणी रानवट किंवा 'स्वराज्यास अपात्र' समजता येतील का? कोणत्याही नवख्या विदेशी मनुष्याच्या आपल्याहून भिन्न चालीरीती पाहिल्या की, त्यातल्या विसंगतीमुळे कोणासही स्वाभाविकतःच गंमत वाटते. हसू येते, त्यामुळे चिडण्याचे किंवा लाजण्याचे काहीच कारण नसते.

पण आज इंग्लिश लोकांचे आमच्यावर राज्य आहे. त्यामुळे त्यांच्या सगळ्याच चालीरीती तेवढ्या काय त्या श्रेष्ठ सभ्य नि सुधारलेल्या आहेत असा त्यांच्या मनात एक दर्प उपजलेला आहे आणि त्यामुळे त्याच्याशी विसंगत असणाऱ्या आमच्या चालीरीती पाहाताच ते सहजी वाटणाऱ्या गंमतीने हसत नाहीत तर त्यांच्या हास्यात तिरस्काराची छटा असते. आम्हाला पहाताच ब्रिटिशांना किंवा एकंदरीत बोलावयाचे म्हणजे युरोपियनांना अशी खुमखुमी वाटते की हे जित, 'नेटिव्ह' आहेत आणि म्हणूनच यांच्या साऱ्या चालीरीती अडाणी नि रानटीपणाच्या असल्याच पाहिजेत असा दुर्विनीत भाव त्यांच्या रोमरोमांत खिळलेला आहे. ज्या लोकांना वाटते की इंग्रजांच्या चालीरीती उचलल्या की, ते आपणास सुधारलेले मानतील नि स्वराज्यास पात्र समजतील नाहीतर नाही; त्यांनी हे लक्षात घ्यावे की आपल्या देशातील लक्षावधी लोक जे विश्वभर झालेले आहेत त्यांनी इंग्रजांच्या रीतीभातीच नव्हेत तर त्यांचा धर्म सुद्धा स्वीकारला. हे जे गोवेकर 'बटलर' लोक ह्या आगनावेवर सैपाकी वाढप्याची कामे करता आहेत ते थेट इंग्रजासारखे दिसता आहेत बघा. एक काळा रंग सोडला तर! मग ह्या लक्षावधी हिंदी ख्रिश्चनांना तरी सुधारलेले समजून इंग्रज स्वराज्याचा अधिकार का देऊन टाकीत नाहीत? त्यातही जिथे काळ्या रंगाची सुद्धा अडचण नाही आणि ज्यांच्याशी मुली देण्याघेण्यापर्यंत इंग्रजांना संकोच वाटू नये इतके जे गोरेपान नि जन्मतःच युरोपियन आहेत त्या आयरिश लोकांना नुसते 'होमरूल'सुद्धा इंग्रज लोक देऊन टाकीत नाहीत? बेयोनेटी खुपसून खुपसून त्या आयरिश लोकांच्या चळवळीला इंग्लंड बुटाच्या टाचेखाली का दडपून धरीत आहे!

रीतीभाती, रंगबिंग हे सुधारलेले असल्याचे किंवा स्वराज्याच्या पात्रतेचे खरे लक्षण वा साधन नसते. परवाचीच सन १९०४-५ ची गोष्ट घ्या, त्या बेरंग नि बुटक्या जपान्यांनी गोऱ्या नि युरोपियन रशियास रणांगणात चारीमुंड्या चीत करताच जपान हे सुधारलेले नि इंग्रजादिकांच्या समकक्ष राष्ट्र ठरले बघा! एक चार महिन्यांचे आत! रीतीभाती प्रभृती सटर फटर उपाय केवळ दुय्यम तिय्यम महत्वाचे; पण स्वराज्याच्या पात्रतेचा निर्णायक, अमोघ नि रामबाण उपाय म्हटला म्हणजे 'राम-बाण' हाच!"

अशा प्रकारे अनेक साध्या विषयांच्या चर्चेचा ओघही मी माझ्या धोरणाच्या राजकारणाकडे वळवी. त्या संदर्भाने त्या मंडळीत राजकीय जागृती नि राजकीय चर्चा वाढत्या प्रमाणावर होऊ लागली. कारण प्रथम जेव्हा मी तसा विषय त्यांच्यात काढून पाहिला तेव्हा त्यांना त्या विषयासंबंधी लवलेश ज्ञान किंवा आस्था असल्याचे दिसले नाही. इतकेच काय, पण जे एक दोघे जण सरकारी वा संस्थानी शिष्यवृत्त्या घेऊन शिक्षणास चाललेले होते त्यांनी स्पष्ट सांगितले, की आम्हांला शिष्यवृत्ती देताना अशी एक अटच घातलेली आहे की आम्ही कोणत्याही राजकीय चळवळीत भाग घेता कामा नये. मी त्यावर गंमतीने म्हणे, "तर मग राजकीय चळवळीत भाग घेऊ नका. पण राजकीय चर्चेत भाग घेऊ नका असे काही ती अट सांगत नसल्यामुळे या चर्चेत भाग घेण्यास काय प्रत्यवाय आहे?" अशा प्राथमिक राजकीय नि ऐतिहासिक संवादाची परिणती कशात झाली ते पुढे दिसेलच.

दूरवरच्या समुद्र प्रवासास प्रथम निघालेल्या आमच्यासारख्या एकाकी व्यक्तींना बहुधा आगनावेवरील पहिल्या पायीच दोन दुःखांना तोंड द्यावे लागते- एक Sea sickness नि दुसरे Home sickness. नाव लागणे नी घर लागणे, गृहविरह! पैकी ज्यांना नाव लागते त्यांना उलट्यांवर उलट्या होऊ लागतात. माझा हा पहिलाच जलप्रवास असताही सुदैवाने मला हे पहिले दुःख सोसावे लागले नाही. नाव लागली नाही; पण त्याची कसर गृहविरहाचे दुःखाने काढली. कुटुंबातील साऱ्या प्रियजनांची नि इष्टमित्रांची अशी निर्दय ताटातूट होण्याचा प्रसंग माझ्यावर त्यापूर्वी कधी गुदरला नव्हता. मायाळूपणात माझे मन मुळचेच हळवे. लहानपणापासून माझ्या दोन्ही भावांचा मला अतिशय लळा लागलेला. कुटुंबातील किंवा स्नेहयांतील ज्यांच्या ज्यांच्याशी माझा लोभ जडे त्यांच्यापासून जरा दूर होताच मला घरीही करमेनासे होई. आज तर ती सारी मायेची माणसे मला चिरकाल अंतरली! त्यांची आठवण येऊन मी मनातल्या मनात झुरत राही. तथापि, जे धकाधकीचे कठोर कर्तव्य माझ्या वाट्याला आले होते त्यात उणेपणा येऊ नये म्हणून माझ्या अंतःकरणातले अश्रू मी अंतःकरणातच गोठवून टाकी; चारचौघांत त्यांना डोळ्यांत उतरू देत नसे. नाहीतर मी त्यांच्यापुढे जे ध्येय ठेवणार होतो ते अनुसरण्याच्या कठोर कार्यात त्यांचा तेजोभंग व्हावयाचा!

माझ्या समवेत असलेल्या हिंदी मित्रांना नाव लागण्याचे दुःख जरी सोसावे लागले, उलट्यांच्या त्रासाने दोनतीन दिवस जरी काहीजण अंथरुणावर पडून होते, तथापि त्यांना गृहविरहाचे दुःख काही झालेले मला दिसले नाही. प्रवासाच्या आनंदात ते मग्न असत. आपण बॅरिस्टर किंवा सिविलसर्व्हंट होऊन मोठमोठ्या अधिकारावर नेमले जाणार ह्या निश्चितीने जणु काय ते अधिकार त्यांना त्यावेळीच मिळालेले होते, अशा ऐटीत नि आनंदात ते मग्न होते. ह्याला अपवाद एकच, हरनामसिंगांचा.

त्यांना नावही फार लागली. सारख्या कोरड्या उलट्या, पोटात अन्नाचा लेश नाही, अंथरुणावर तीनचार दिवस कासावीस अवस्थेत पडून होते. शरीराच्या ह्या दुर्बळ स्थितीतच घरच्या मायेच्या माणसाची आठवण येऊन

त्यांचे मनही व्याकूळ होऊ लागले. त्यांच्या आजारात मी त्यांची शक्य ती शुश्रूषा केली. पण त्यांना धीर निघेना. शेवटी ते कळवळून मला म्हणाले, "तुम्हीच आता माझे जिवलग स्नेही आहात. मला दोषही द्याल. पण मला आता हा प्रवास झेपत नाही. माझ्या घरी मला पैशाची काही उणीव नाही. मागे सोडलेल्या प्रियजनांना केव्हा भेटेन असे मला होत आहे. जेथे नुसते कुशल पत्र येण्यासही पंधरा पंधरा दिवस लागतात अशा दूरदेशी काळ कंठावयाचा! मला ती बॅरिस्टरी नको. मी पुढचे एडनचे बंदर येताच खाली उतरणार नी परत तिकीट काढून मागते हिंदुस्थानास जाणार. एका अर्थी मला माझ्या मनाच्या हळवेपणाची, मायाळूपणाची लाज वाटते पण. . ." मी त्यांना मध्येच हटकून म्हटले, "छे, छे. त्यात लाज कसची? मायाळूपणा म्हणजेच माणुसकी, मायेच्या माणसांचा, प्रियजनांचा वियोग होताना ज्यांचे हृदय कासावीस होत नाही त्यांचे त्या माणसांवर खरे प्रेम नव्हतेच असे म्हटले पाहिजे. परंतु जर आपल्या प्रियजनांवर आपले नितांत प्रेम असेल, तर त्यांच्या हितासाठी, पडेल ते दुःख सहण्यास सिद्ध असणे हीच त्यांची खरी कसोटी आहे, नाही का? ते प्रियजनांचे हित साधण्यासाठी केव्हा केव्हा त्यांच्याच वियोगाचे दुःखही सोसावे लागते. माझेही मन मायेची माणसे अंतरल्याने तुमच्यासारखेच हळहळत आहे. मी माझ्या व्याकुळ मनास ज्या विवेकाने कर्तव्य कठोर करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्याच विवेकाने क्वचित आपलेही मन स्थिर होईल. यासाठीच मी हे आपणास सांगितले. आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक, राष्ट्रीय आणि धार्मिक हिताच्या, कल्याणाच्या आड जी प्रीती येते ती प्रीती नसून लंपटता होय. तसा मायाळूपणा म्हणजेच मोह. त्यांची माझी अशी चर्चा पुढे दोनतीन दिवस चालू होती. केव्हा केव्हा एखादा इतर स्नेहीही उपस्थित असे. त्या चर्चेचा आशय असाः "आपण हिंदू. त्यातही शीख. श्री गुरुगोविंदाचे शिष्य. जसा मीही आहे. त्या आपल्या वीरगुरूचे हृदय म्हणजे काय एक अश्रुशून्य लोखंडी दगड होता? नव्हे, ते प्रीतीच्या, वात्सल्याच्या, अश्रूंनी काठोकाठ भरलेले 'अमृतसर' होते. म्हणून सोळा सतरा वर्षांच्या आत असलेल्या दोघा कोवळ्या तनयांना पंगुतेच्या पाळण्यातच जन्मभर निजवून न ठेवता, सशस्त्र धर्मयुद्धात त्यांनी झुंजावयास धाडले : त्या रणात ते कुमार बळी पडताना पाहून ते जयघोष करू लागले. आणि उरलेल्या दोघा अगदी लहान लेकरांना ते हिंदुधर्म सोडीनात म्हणून जेव्हा मुसलमानांनी भिंतीत जिवंत चिणून मारले तेव्हा ती अघोर वार्ता ऐकताना गुरुगोविंदांनी धन्य! धन्य!! म्हणून मान डोलविली!

पण समजा जर ते कुमार आपल्या मातापित्यावरील वैयक्तिक मायेने विव्हळ होऊन लढाईवर न जाता गोविंदसिंहाच्या गळ्यासच मिठी मारून बसते किंवा उलटपक्षी आपल्या तनयांच्या वियोगाचे भीतीने मायेचे पायी स्वतः गोविंदसिंहच सहकुटुंब सहपरिवार हिंदुधर्माचा त्याग करून मुसलमान झाले असते तर? तर आज आपण त्यांना वीरगुरू मानले असते का? जी हिंदू कुटुंबे अशा भीतीने किंवा जहागिरीच्या मोहाने बाटली त्यांच्याचपैकी गोविंदसिंहाचे कुटुंबही एक बाटगे कुटुंब म्हणूनच धिक्कारले जाते. बाटल्यामुळे ते काही अधिक वर्षे जगते; पण वीरगुरु किंवा वीरकुमार म्हणून हिंदु इतिहासात अमर होते ना?

आपण जर त्यांचे शिष्य म्हणवितो तर जे आपल्या वैयक्तिक प्रियजनाचे, राष्ट्राचे, धर्माचे नि मानवाचे परम कल्याण साधणारे आहे त्या ध्येयासाठी तो प्रियजनवियोग सोसूनही सज्ज झाले पाहिजे, पाउल मागे घेता कामा नये. प्रियजनांच्या विरहाने डोळे भरून आलेल्या आसवांच्या सिंचनात धर्माचे, कर्तव्याचे बीज पाणवते, रुजते, वाढते तीच आसवे शुद्ध प्रीतीची होत, ती वीराची विभूषणे असतात, त्यांनी कर्तव्याचा मार्ग अंधारत नाही तर उलट उजळला जातो! तर मग आपले ते ध्येय कोणते? स्वतःला पैसा मिळावा म्हणून बॅरिस्टर किंवा आय. सी. एस.

होण्यासाठी आपण विदेशात जात आहो, असा तुच्छ नि क्षुद्र हेतू, हा काही आपल्या जीवनाचे ध्येय होऊ शकत नाही. आजचे आपणां सर्व भारतीय तरुणांचे ध्येय हेच की आपल्या स्वदेशाच्या नि स्वधर्माच्या पायात ब्रिटिशांनी ज्या गुलामगिरीच्या शृंखला ठोकलेल्या आहेत त्या तोडून टाकून आपल्या मातृभूमीला, आपल्या राष्ट्राला, स्वतंत्र करण्यासाठी "मरू तरी वा जिंकू तरी" अशा प्रतिज्ञेने त्या परकीय शत्रूंशी झुंज घ्यावी! त्यासाठी देशात जी आज नाहीत अशी काही महत्वाची कार्ये विदेशात जाऊन साधावयाची आहेत. विदेशी जाण्याचा आपला मुख्य हेतू हाच असला पाहिजे. इतर हेतू केवळ निमित्तमात्र!

आपल्याप्रमाणेच मलाही हुरहुर वाटते की आता घरी पत्र टाकून, त्यांचे उत्तर आपणास येऊन, घरचे कुशल कळण्याससुद्धा पुरेपूर महिना लागणार! पण विवेक माझ्या मनास लगेच हटकतो की जेव्हा आगनावा नि तारयंत्रही नव्हते तेव्हा इंग्लंडमधून हिंदुस्थानात तारवाने येण्यास सहा-सहा महीने लागत. त्यावेळी आईबापांना इंग्लंड-मध्ये सोडून गेलेला त्यांचा मुलगा हिंदुस्थानात सुखरूप पोचला ही बातमी कळण्यास पुरेपूर एक वर्ष लागे! आणि तरीही त्या काळी घर अंतरेल म्हणून मुळूमुळू रडत न बसता शतावधी इंग्लिश तरुण हिंदुस्थानात येत राहिले, लढत राहिले आणि आमची राज्ये पालथी घालून, त्यावर त्यांनी साम्राज्य उभारिले! आज त्यांचे ते ब्रिटिश साम्राज्य पालथे पाडून, जर आम्हा हिंदुस्थानी तरुणांना स्वदेश स्वतंत्र करावयाचा असेल तर आम्हांस आमची हृदये त्यांच्याहूनही शतपटीने कर्तव्यकठोर केली पाहिजेत. पण ह्या इंग्रजांचेच उदाहरण कशाला हवे? आमच्या स्वतःच्या हिंदू पूर्वजांनी महासागरातून आपल्या रणनौकांचे तांडे बेधडक सोडून तिकडे जावा सुमात्रा हिंदू-चीन ते मेक्सिकोपर्यंत आणि इकडे मिसरपर्यंत आपली हिंदुराज्ये स्थापिली होती. संस्कृती विस्तारिली, शतावधी हिंदू कुटुंबे स्त्रीपुत्रांसुद्धा नौदलातून समुद्रांना ओलांडून तिकडे आपल्या हिंदू उपनिवेशांचा (वसाहतीचा) पाया घातला. मध्यंतरी काय ते काही कारणांमुळे हिंदूंनी समुद्रगमन निषिद्ध मानले, म्हणून समुद्राचा एवढा बाऊ वाटू लागला. पण आता त्या कारणावर मात करून, ते मनोदौर्बल्य झटकून टाकून, सातीसमुद्रावर इतर राष्ट्रांचे ध्वज फडकत आहेत, तसेच हिंदुस्थानचेही ध्वज फडकावले पाहिजेत; अशा भव्य राष्ट्रीय ईर्ष्यांनी आमची मने भारली गेली, तर आपल्या मनास दुर्बळविणारी ही आजची वैयक्तिक क्षुद्र दुःखे धुक्यासारखी नाहीशी होतील.

अशा सतत संवादाचा परिणाम त्या स्नेह्यांपैकी हरनामसिंग नि 'शिष्टाचारी' ह्यांच्या मनावर अपेक्षेप्रमाणेच झाला. एडनहून हिंदुस्थानास परत येण्याचा बेत हरनामसिंगांनी रद्द केला, त्यांच्या जीवनाचा दृष्टीकोनच पालटला. "माझ्या स्थितीत मी आपल्या मातृभूमीसाठी काय करू शकेन ते सांगा," असे प्रश्न ते वारंवार विचारू लागले. त्यावेळी माझ्याजवळ जोसेफ मॅझिनीचे एक इंग्लिश चरित्र होते. त्याच्या लेखकाचे नाव आता नक्की आठवत नाही. पण बहुधा 'Bolton King' असे असावे. ते पुस्तक मी त्यांना वाचावयास दिले. त्यातील तरुण इटली ह्या गुप्तसंस्थेच्या घटनेवर नि कार्यक्रमावर मी लाल अधोरेखा हेतुतःच काढलेल्या होत्या. चारपाच जणांनी ते वाचले पण त्यांची इच्छा त्यांचे खरे नाव मी या संबंधी अजूनही इथे लिहू नये अशी असल्यामुळे ज्यांना मी 'केशवानन्द' या टोपणनावानेच उल्लेखित आहे त्या 'केशवानन्दाने' नि शिष्टाचारी ह्या दोघांनी ते तन्मय होऊन वाचले हे माझ्या ध्यानात आले. त्यानंतर संभाषणाच्या ओघात मी त्या दोघांना सरळ प्रश्न टाकला की आपल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीही मॅझिनीच्याच यंग इटलीसारखी गुप्तसंस्था स्थापणे हेच अवश्य आहे नाही का?

"अगदी अवश्य! प्रथम कर्तव्य तेच," 'शिष्टाचारी' निर्धारपूर्वक म्हणाले, "पण अशी संस्था आपल्यासारख्या मूठभर अख्यात तरुणांनी स्थापून काय उपयोग? टिळक, लजपतराय किवा बडोद्याच्या सयाजीरावांसारख्या महाराजाने तशी संस्था स्थापली तर काही उपयोग. आपण तिलाच मिळावे हे अधिक इष्ट. तशी निघाली नाही तोवर थांबावे."

"मूठभर अख्यात तरुण? पण मग 'यंग इटली' तरी स्थापली तेव्हा कोणी स्थापली? हे पहा, मॅझिनीने अगदी तुमचे तेच शब्द योजून काय म्हटले आहेः यंग इटलीत आम्ही मूठभर अख्यात तरुण तेवढे आरंभी होतो, पण पुढे त्याच "यंग इटली'चे नाव घेताच युरोपातील सिंहासने थरकापून उठू लागली." मजजवेळच्या त्या मॅझिनीच्या इंग्लिश चरित्रातील ही मॅझिनीची वाक्ये वाचून दाखविली, आणि पुढे म्हणालो की "प्रथमतः असे पहा की तशा विख्यात पुढाऱ्यांनी काढलेल्या नि सबळ झालेल्या गुप्तसंस्था हिंदुस्थानात निघालेल्या नसतील कशावरून? जी 'गुप्त' ती संस्था वृत्तपत्रातून आपली प्रसिद्धके छापीत असते काय? पण समजा आज हिंदुस्थानातील कोणीही प्रख्यात पुढारी वा राजामहाराजा हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी 'Absolute Political Independence' साठी प्रयत्न करण्यास प्रकटपणे वा गुप्तपणे धजत नाही, तशी एकही गुप्तसंस्था आज अस्तित्वात नाही, हे गृहीत धरले तरीही जर आपल्याला तेच आपले प्रथम कर्तव्य वाटते तर आपण आपल्यापुरते तरी ते पार पाडावयास नको काय? कोणी करीत नाही म्हणून तर आपण ते प्रथम केले पाहिजे. मरणासन्न शय्येवर माता पडली असता नि तिला वाचविण्याची दिव्यौषधी ठाऊक असता ती घेऊन येण्यास इतर बंधुबांधव अज्ञानाने, आळसाने वा भीतीने तडकाफडकी जात नाहीत म्हणून जर आपणही ती आणण्यासाठी जाण्याची टंगळमंगळ करीत राहिलो तर आपणही त्या इतरांच्या पापाचे नि दोषाचे अंशभागी ठरू! आपण, समजा, तिघेच आपल्या प्रतिज्ञेवर अढळ राहिलो तरी जिवावर उदार झालेले तिघेही काय करू शकतात याचे अगदी अलीकडचे प्रत्यंतर हवे असल तर तिघां चाफेकर बंधूंचे पहा!"

मी त्यांना चाफेकरबंधूंची ती वीर-कथा सांगितली. आणि म्हटले, "अत्याचारी इंग्रजी अधिकाऱ्याला दंड देईल असा साऱ्या समाजात कोणीच पुढे येत नाही असे पाहून त्या तिघांनी आपले शिर हाती घेतले नि त्या अत्याचारी छळकाचे शिर छाटून टाकले! राष्ट्राचा सूड उगवला. त्या चाफेकरांच्याच पराक्रमाने मला स्फूर्ती मिळाली. आपल्या एका प्राणाचा विनिमय देश शत्रूचा एक प्राणः ह्या प्रमाणात तरी शत्रूची हानी करू शकूच शकू. मग कोणी मागे येवो वा न येवो! पण बहुधा आगीने आग जशी पेटत जाते तसेच अशा देशवीरांच्या शौर्याने शौर्य भडकत जाते, कधीकधी ठिणगीने वणवा पेटतो.

"तुम्ही स्वतः अशा गुप्त संस्थेची शपथ घेण्यास सिद्ध आहात ना?" 'केशवानन्दाने' निर्णायक प्रश्न विचारला.

"अर्थात पहिल्याने!" मी उत्तरलो.

"तर मग मीही सिद्ध आहे." 'केशवानन्द' आवेशाने म्हणाले.

मी शिष्टाचाऱ्यांकडे पाहिले. ते म्हणाले, उद्या नक्की काय ते सांगेन. मी म्हटले एक सोडून दोन दिवस घ्या. अशा प्रश्नी आपण सर्वांनी जे करणे ते पूर्ण विचाराने आणि स्वतःची अनिवार्य इच्छा होईल तरच करावे.

त्या रात्री मी विचारण्याचे आधीच शिष्टाचारी यांनी मला त्यांच्या खोलीत बोलावले. काही ठराविक शंका विचारल्या. त्याची ठराविक उत्तरे मी दिली. 'तर मग आत्ताच्या आत्ता ही गुप्तसंस्था स्थापावयाचीच. पण तिचे नाव काय ठेवायचे?' त्यांनी विचारले. 'अभिनव भारत!' मी म्हटले, 'केशवानंदा'लाही हे आवडले आहे. ' 'छान', असे म्हणून त्याने केशवानंदालाही तिथे बोलावून घेतले. मी शपथेचा तो इंग्लिश कागद काढला नि त्यांना सांगितले, "ही शपथ पहिल्याने नुसती स्वतःशीच वाचून पाहा. तिच्या रम्याद्भुततेने तेवढे दिपून न जाता उत्क्षुब्ध न होता, तिच्यापायी होणारे भयंकर परिणामही ध्यानी घ्या हे आमरण व्रत धरले नाही तरी चालेल पण धरले की सुटका नाही आमरण!" त्यांनी तो कागद मनाशी वाचला.

"घ्यायची ही शपथ? ठीक तर. ही पहा ती प्रतिज्ञा पहिल्याने मी करीत आहे. " मी उठून उभा राहिलो नि ती शपथ वाचू लागलो.

"परमेश्वराला स्मरून, माझी मातृभूमी नि पितृभूमी हिंदुस्थानला स्मरून आमचे राष्ट्र ज्यांनी वैभवशाली आणि विख्यात केले, जे आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्य नि सन्मान रक्षणासाठी यशस्वी युद्धे लढले त्या सर्व संतांना, महंतांना, वीरांना आणि हुतात्म्यांना स्मरून मला निश्चितपणे वाटते की, माझे आयुष्यातील पहिले कर्तव्य म्हणजे माझ्या मातृभूमीला अत्याचारी ब्रिटिशांच्या शस्त्रबलाच्या शृंखलांतून मुक्त करणे. आमच्या राष्ट्राचे राजकीय स्वातंत्र्य पुन्हा प्राप्त करणे, हे माझे पवित्र मानवी कर्तव्य आहे. हे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी, हे ध्येय साध्य करण्यासाठी संधी साधून गुप्त आणि प्रकट आपल्या लोकांनी चालविलेल्या राजकारणासमवेत सशस्त्र नि सुसंघटित प्रतिकार केल्यावाचून आणि शेवटी एखाद्या जागतिक महायुद्धांत आपल्या शत्रूला गाठून संगीनीच्या बळाने त्याला रुधिरस्नान घालून घालवून लावणे हाच खरा परिणामकारक मार्ग आहे. ह्या पायावर उभ्या असलेल्या अभिनव भारत या अखिल भारतीय क्रांतिकारक संस्थेच्या ध्वजाखाली मी अत्याचारी ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्राणपणाने विजयी होईतो लढेन. यासाठी हे परमेश्वरा मला सामर्थ्य दे!"

माझ्या मागोमाग आवेशाने तरवारल्यासारखे होऊन 'केशवानन्दा'ने ती शपथ घेतली. नंतर शिष्टाचारी ह्यांनी ती घेतली.

त्यांच्या विश्वासपात्रतेची अशी शक्य ती परीक्षा झाल्यावर मी त्यांना सांगितले, "तुम्ही पूर्वी म्हणत होता की जर हिदुस्थानात एखादी प्रबळ गुप्त संस्था असेल तर तिलाच मिळणे इष्ट. पण कोणी सहाय्यक नसले तरी आपण प्रत्येकी आपले कर्तव्य केलेच पाहिजे असा निर्धार आपल्यात उत्पन्न व्हावा म्हणून मी त्यावेळी त्याविषयी अधिक काही बोललो नाही. पण आता आपला तसा शपथबद्ध निर्धार झालेला आहे. आता आपणास हे ऐकून दुप्पट उत्साह वाटेल की हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजी राज्यसत्तेचा सशस्त्र प्रतिकार करण्यास सिद्ध असलेले आणि तुम्ही आताच घेतलीत तशीच शपथ घेतलेले शतावधी देशबंधू जीत संघटित झालेले आहेत, नगर, ग्रामांतून, विद्यालयांतून, कॉलेजातून, सरकारी नोकरांतून सुद्धा जिच्या शाखा पसरलेल्या आहेत अशी एक क्रांतिकारक गुप्त संस्था महाराष्ट्रात आधीच अस्तित्वात आहे. तिचे नाव 'अभिनव भारत'! हो, आपण जे आत्ताच मान्य केलेत ते तिचेच नाव. म्हणूनच मी ते सुचविले. आपणही आता झाले आहात तिचेच शपथबद्ध सभासद!"

"त्या संस्थेच्या वतीनेच मी वस्तुतः इंग्लंडला चाललो आहे. बॅरिस्टर होण्यास जात आहे, हेही खोटे नसले तरी निमित्त आहे. इंग्लंडमध्ये हिंदुस्थानातील उच्च श्रेणीची, बुद्धीची नि ते इकडील I. C. S. : I. M. S. Bar at

Law प्रभृती परीक्षा देऊन हिंदुस्थानात परतताच ज्यांच्या हाती तिकडील पुढारीपणा नि मोठे मोठे अधिकार बहुधा चालून येतात अशी मंडळी एका गटाने सापडते. जर त्यांच्यात इंग्लंडमध्ये क्रांतिकारक प्रचार झाला तर त्याचा प्रभाव हिंदुस्थानभर तत्काळ फैलावू शकतो. दुसरी गोष्ट म्हणजे हिंदुस्थानात सहस्र सभांनी जो परिणाम इंग्लिश जनतेवर होत नाही तो इंग्लंडात क्रांतीचा उघड उघड प्रचार एका सभेत केल्याने घडतो. भर लंडनमध्ये शत्रूच्या राजधानीतच एक क्रांतिकारक साहसी कृत्य केल्याने युरोपभर त्याची प्रसिद्धी होते. आमच्या नेमस्तादिक सर्व पुढाऱ्यांची भाषा नेहमी जोखलेली. आमच्यातील जहाल देखील इंग्लंडमध्ये येऊनसुद्धा म्हणताना म्हणतील 'आम्ही राजनिष्ठच आहोत. इंग्रजी राज्य आम्हास हवे आहे. आम्हास राजकारभारातील सुधारणा काय त्या हव्यात. ' त्यामुळे साऱ्या युरोप-अमेरिकेत, हिदुस्थानास ब्रिटिशांचे राज्य हवे आहे नव्हे ते हिंदी लोक ब्रिटिश शासनाखालीच राहण्यास योग्य आहेत! अशी प्रामाणिक समज झाली आहे. म्हणून आम्ही आता ह्या क्रांतिकारक संस्थेचे मुखे इंग्लंड-युरोपमध्येच उद्‌घोषिणार की, ब्रिटिश राज्यकारभारातील सुधारणांचा हा प्रश्न नाही. आम्हास ब्रिटिश राज्यच नको आहे! सोनेरी घातल्या तरी ब्रिटिशांच्या बेड्या त्या बेड्याच. आम्हांस ब्रिटिशांच्या बेड्या तोडून हिंदुस्थानास स्वतंत्र करावयाचे आहे! तिसरी गोष्ट जी तत्काळ हाती घेण्याचे आम्ही ठरविले आहे ती ही की क्रांतिकारकांच्या भयद्‌वादी पक्षाला (Terrorism) जी स्वस्त, सुटसुटीत नि अत्यंत परिणामकारक हँडबाँब प्रभृती शस्त्रे इकडे रशियात निघाल्याचे आम्ही वाचतो आहो, ती शिकून स्वदेशात त्यांच्या प्रचार करावयाचा. प्रयोग करीत असले तरी आमच्या तिकडे कोणास ही कला सहजसाध्य होत नाही. इकडे ती आयती सिद्ध नि पारंगत. म्हणून ते बाँबचे शास्त्रही शिकण्याचा आमचा हेतू आहे. अशी अनेक कामे विदेशातूनच आम्हास साधता येतील. सर्वांत महत्वाचे कार्य म्हणजे हळूहळू इंग्रजांच्या शत्रूंशी संधाने बांधून, एखाद्‌या महायुद्धात परवडेल तितके त्यांचे सहाय्य घेऊन, स्वदेशात बंड उभारणे! हे खरे आहे की हे नि इतर हेतू आज आहेत निव्वळ एक मनोराज्य! पण हेही खोटे नाही की जे जे राज्य वा राष्ट्र पुढे प्रस्थापित झाले ते ते आरंभी बहुधा होते एक निव्वळ मनोराज्यच!"

अशा आशयाचे संभाषण झाल्यावर आम्ही तिघांनी आमच्या हिंदी गटात असलेल्या इतर हिंदी प्रवाशांनाही चाचपून पाहिले. त्यात आणखी एक दोघे एकनिष्ठ जे वाटले त्यांनाही गुप्तसंस्थेची वरील शपथ मी दिली.

ज्या मराठी केंद्रसंस्थेच्या इंग्रजी शपथेच भाषांतर मी वर दिलेले आहे त्याविषयीही हे ध्यानात ठेवले पाहिजे की त्या मूळ इंग्रजी भाषांतराची निर्भेळ प्रत आज म्हणजे उण्यापुऱ्या पन्नास वर्षांनी माझ्यासमोर असणे अशक्यच आहे. ती किती वेळा तरी फाडून टाकलेली असेल. पुन्हा शाखाशाखांच्या सोयीप्रमाणे नि योग्यते-प्रमाणे मूळ उद्देशांना बाध न आणता त्या शपथेच्या सोप्या वा संक्षिप्त आवृत्त्याही कित्येकदा कित्येकांना काढाव्या लागल्या. तथापि, हे अपवाद कितीही असले तरी माझ्या पाठांतरात आज पक्की आठवते त्याप्रमाणे अभिनव भारताच्या प्रतिज्ञेच्या त्या मूळ इंग्रजी भाषांतराचा गाभा, आकृती, आशय, उद्देश नि भाषा ह्या सर्व महत्वाच्या प्रकरणी ती प्रतिज्ञा जवळ जवळ अशीच असे, ह्यात आजही माझ्या स्मृतीला विशेष शंका वाटत नाही.

त्या दिवशी अभिनव भारताच्या ज्या इंग्रजीत भाषांतरिलेल्या प्रतिज्ञेवर पहिले सभासद म्हणून 'केशवानन्द' ह्यानी स्वाक्षरी केली त्याच ह्या शपथेने, पुढे जे शतावधी भारतीय ह्या गुप्त संघटनेत प्रवेशते झाले आणि ज्यांच्यातून अनेक ज्ञानी नि त्यागी, कारस्थानी नि कर्मवीर, वाक्झुंजार नि रणझुंजार, वीरात्मे नि हुतात्मे निघाले त्यांच्या त्यांच्या हृदयात स्वदेश स्वातंत्र्याची ज्योत पेटविली. एखाद्‌या दिव्य मंत्राप्रमाणे हीच प्रतिज्ञा

उच्चारीत भारतभूमीच्या स्वातंत्र्यार्थ त्यांनी अत्याचारी परकीय देशशत्रूचे बळी घेतले किंवा पंचाग्नीतून नि रणाग्नीतून आपल्या सर्वस्वाचे नि प्राणांचे बळी दिले!

अभिनव भारताची युरोपीय शाखा प्रस्थापिण्याचे कार्य हाती घेऊन मी इंग्लंडच्या प्रवासास निघालो होतो. त्याचे हे सूतोवाच मी आगनावेवर पाय टाकताच असे केले गेले. ह्यामुळे माझ्या मनाला बरेच समाधान वाटू लागले. ह्या युरोपीय शाखेला पुढे जे जागतिक महत्व प्राप्त झाले त्यामुळे तिचा आरंभ कुठे नि कसा झाला हे इथे थोडे सविस्तरपणे सांगणे अवश्यच होते. त्यातही ज्या क्रांतिकारक गुप्त संस्थेचे दुसऱ्यास नुसते सभासद करून घेणे हाही एक उग्र दंडार्ह राजद्रोही अपराध गणला जात होता अशा भयंकर गुप्त संस्थेचा एकेक सभासद करताना त्याच्या ज्ञानानुसार किंवा अज्ञानानुसार त्याची समज पाडण्यासाठी किती कोटीक्रम नि कष्ट करावे लागत, स्वतःस प्रतिपावली धोक्यात टाकावे लागे, त्या प्रत्येकाचे हृदयास त्यागाची नि वीरवृत्तीची आग लागावी म्हणून स्वतः कसे सदोदीत पेटत रहावे लागे ह्याची एक वानगी म्हणूनही या युरोपियन शाखेच्या पहिल्या दोनतीन सभासदांच्या मतपरिवर्तनाविषयी जरा विस्तार केला आहे. आता यापुढे ज्या शतावधी स्वदेशबांधवांना सशस्त्र क्रांतीची दीक्षा मी देत गेलो त्यांची ती शतशत नावेही सांगू म्हटले तरी या ग्रंथात अवकाश नाही, तिथे स्फुट विवरणाची (तपशीलाची) गोष्टच दूर. या प्रकरणात दिलेल्या वरील वानगीवरून त्या शतावधी प्रकरणी प्रत्येकी प्रचारार्थ किती साहस करावे लागले असेल नि रक्त आटवावे लागले असेल त्याची सर्वसामान्य कल्पना वाचकांना जी येईल ती येईल. प्रतीकात्मक अशा विशेष व्यक्तींचा तेवढा स्फुट उल्लेख केला जाईल.

वर निर्देशिलेल्या पहिल्या दोन सभासदांपैकी श्री. ‘केशवानन्द’ यांचा उल्लेख निराळ्या नावाने या ग्रंथातून शेवटपर्यंत अधूनमधून येणार आहे. परंतु श्री. शिष्टाचारी यांचा निरोप इथेच घेणे सुसंगत होणारे आहे. आम्ही दोघेही इंग्लंडात होतो तोवर त्यांच्या इच्छेप्रमाणे कोणतेही प्रकट कार्य असे मी त्यांच्यावर सोपविले नाही म्हणून त्यांचे मूळ नाव राजकीय चळवळीच्या प्रकाशात केव्हाही झळकले नाही. परंतु त्यांनी आतून केलेले कार्य नि स्वार्थत्याग कट्टर क्रांतिकारक देशभक्ताला साजेसाच होता. क्रांतिकारक वाङ्मय छापण्याच्या नि फुकट वाटण्याच्या व्ययापासून तो शस्त्रास्त्रे विकत घेण्यास लागणाऱ्या मोठमोठ्या गुप्त निधीपर्यंत त्यांच्या नावावर मी जो जो वर्गणीचा आकडा टाकला तो तो बिनबोभाटपणे नि निनावीपणे देऊन टाकण्यास त्यांनी केव्हाही मागे घेतले नाही. दंगल होण्याचा संभव असलेली सभा म्हटली की न सांगता न सवरता श्री. शिष्टाचारी, जीवास जीव देणारी त्यांची दहावीस मंडळी घेऊन माझ्या संरक्षणासाठी कोणाच्या डोळ्यांत न भरता माझ्या आवतीभोवती सज्जनतने बसलेले असावयाचेच. हिंदी व्यापारी वर्गात त्यांचा बराच प्रभाव असे. ह्या व्यापाऱ्यांचे कापड, यंत्रे प्रभृती सामान मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानात इंग्लंडहून धाडले जाई त्या सामानांतून आमच्या क्रांतिकारक पत्रकांचे नि पुस्तकांचे गठ्ठेचे गठ्ठे इंग्लंडहून मुंबई ते पंजाबपर्यंतच्या दहापंधरा केंद्रस्थानी पोचविण्याची व्यवस्था श्री. शिष्टाचारी यांनी करविली होती. गुरुमुखीमध्ये नि पंजाबीमध्ये माझ्या इंग्रजी लेखांचे भाषांतर करवून “शस्त्रे कुठे आहेत म्हणून काय विचारता? ब्रिटिशांचे राज्य शस्त्रबळाने उलथून पाडण्यासाठी, सैनिक बंधूंनो! तुमच्या हातांतील शस्त्रेच मातृभूमीचे शस्त्रागार आहे” अशा अर्थाच्या मथळ्याखाली हिंदुस्थानातील सैनिकांना उद्देशून जी सहस्रावधी क्रांतिकारक पत्रके पंजाब प्रांतातील बहुतेक शिबिरातून पुढे गुप्तपणे वाटली गेली आणि काही महिन्यानंतर ज्यांचा पत्ता सरकारला लागून मोठी खळबळ उडाली होती ती पत्रके श्री. शिष्टाचारी यांच्या याच योजनेच्या द्वारे आम्ही

लंडनहून हिंदुस्थानात थेट सैन्याच्या छावण्यांतून धाडू शकलो. त्यावेळी आमच्या हस्तक असलेल्या काही सेनाधिकाऱ्यांनी निरोप धाडला की या योजनेची कुणकुण सरकारला लागण्याचा उत्कट संभव आहे. तेव्हा वेळीच तो मार्ग आम्ही सोडून दिला. त्यामुळे सरकारचा कोणताही त्रास त्या व्यापाऱ्यांना किंवा श्री. शिष्टाचारी ह्यांना झाला नाही. शेवटपर्यंत इंग्लंडमधील पोलिसांचेही त्यांच्यावर कोणी राज्यक्रांतिकारक म्हणून लक्ष गेलेलेच नव्हते. पुढे जेव्हा मी आजारी पडून, पॅरिसला सन १९१० च्या जानेवारीत गेलो तेव्हा उडत बातमी ऐकली की ते हिंदुस्थानात परत गेले आहेत. थोड्याच दिवसांत मी पकडलो गेल्यानंतर जी चहुकडे राजकीय प्रकोपाची धामधूम उडाली त्यात किंवा त्यानंतर त्यांचे नाव कुठेच ऐकू आले नाही. बहुधा ते सुरक्षित राहिले असावेत. क्वचित नसावेतही! काही असले तरी त्या आगनावेवर अभिनव भारताची जी क्रांतिकारक दीक्षा त्यांनी घेतली ती मी इंग्लंडमध्ये असेतो तरी यथाशक्य तो त्याग नि साहस करून त्यांनी चरितार्थ केली खरी. माझ्यावर एकनिष्ठ लोभ करणारे एक स्नेही आणि राज्यक्रांतीच्या अगदी पहिल्या पहिल्या झुंजार पथकातील एक राष्ट्रीय सैनिक म्हणून श्री. शिष्टाचारी ह्यांच्या आणि त्यासमवेत ह्या ग्रंथात कारणपरत्वे किंवा स्थलाभावी ज्यांची कार्ये किंवा नावेही सांगता येणारी नाहीत अशा शिष्टाचारी यांच्यासारख्या लौकिकात माहीत नसलेल्या पण मला माहीत असलेल्या अनेक अज्ञात क्रांतिकारकांच्या आणि माझ्यावर लोभ करणाऱ्या इष्टमित्रांच्या पुण्यस्मृतीला मी माझ्यापुरती ही श्रद्धांजली कृतज्ञपणे वाहण्याची संधी इथेच साधून घेत आहे!

दिवसभर ह्या चळवळी करीत असताना माझी कर्मतृष्णा, अंगीकृत कार्य करण्याची जी क्रियाशील मनाची तळमळ ती काहीतरी शमत असे. पण माझ्या चिंतनशील मनाची ओढही पुरविण्यासाठी मी आगनावेवर चढल्यापासूनच रात्र पडली, की कोणालाही सांगाती न घेता नावेच्या माथ्यावर (डेकवर) जाऊन कुठल्या तरी कोपऱ्यात तासनतास एकान्तात बसे. महासागराची नि आकाशातील ताऱ्यांची वर्णने मी पुस्तकातून पुष्कळ वाचली होती. परंतु त्या महद्भूतांचा प्रत्यक्ष परिचय असा तेव्हा प्रथमच होत होता. त्या मुक्त वायूत बसून त्यांची जी शोभा दिसे ती तर रमणीय होतीच; पण माझ्या मनावर त्यांच्या दर्शनी शोभेपेक्षा त्यांच्या भव्यतेचाच पगडा अधिक बसला. खाली तो तटशून्य अथांग महासागर, वर ते तलशून्य अथांग आकाश! आणि त्या रम्यभीषण महाभूतांचे मध्ये ती मनुष्याची क्षुद्रातील क्षुद्र नौका वेडगळ निर्भयपणे आपली वाट सरासर कापीत चालली होती. त्या मकरार्णव महासागराचे छातीवर त्या आकाशातील सूर्यमालिकांचे नाकावर टिचून आपले अवलाले दिवे पाजळीत! हिमालयाच्या वक्षस्थळावर जसा एखादा काजवा ऐटीत उडत चालावा तसे ते ह्या क्षणभर मनुष्याचे मणभर धाडस त्या महासागराची एखादीच रागीट लाट चापटीसरशी त्या ऐटीत आलेल्या आगनावेला होती की नव्हतीशी करून टाकती. त्या आकाशातील पेटलेल्या दारूच्या कोठारातून एखाद्या लहानातील लहान धुमकेतूचा छरा जरी खाली उडाला असता तरी सगळ्या मनुष्यजातीसह या पृथ्वीच्याही चिंधड्या उडविता. तथापि तसे जोवर झाले नाही तोवर गवसणाऱ्या क्षणाची संधी साधून त्या महद्भूतावर प्रभुत्व गाजविल्याची ऐट आपली आपल्यापुरती तरी मिरविणाऱ्या ह्या मनुष्याचे हे बेडर साहसही काही थोडे कौतुकास्पद नाही.

त्या सातआठ रात्री अनेक तत्वप्रवण प्रश्नांच्या चिंतनात मी मग्न होऊन बसे. या प्रळयप्रभावाच्या अखड आवर्तनांचा हेतू काय, साध्य काय? का यांना काही साध्यच नाही? ही विश्वाची अवाढव्य घडामोड कशासाठी चालली आहे? का हा केवळ आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आहे? -ज्याला साखरेचे पुट दिलेल्या भाषेत 'भगवंताची

www.savarkarsmarak.com

लीला’ म्हणावयाचे? या महासागराचे उदरात शंभर शंभर हात लांबीचे प्रचंड अजगर, त्याहून प्रचंड मत्स्य, त्याहून प्रचंड मकर लक्ष लक्ष वावरतात. तीच स्थिती ह्या पृथ्वीच्या पाठीवरील निबिड अरण्याअरण्यांतून! ज्या ‘लीले’ पायी हे लक्षावधी जीव लक्षावधी जीवांना जिवे मारूनच काय ते जगू शकतात; प्रलयकाली पृथ्व्याच्या पृथ्व्या पेटून उठतात; रेड्याच्या टकरीप्रमाणे सूर्यासूर्यांच्या टकरी जुंपून ब्रम्हांडे चूर्ण होतात; धरणीकंप, धुमकेतू, जलप्रलय, हिमप्रलय अशी ज्या ‘लीले’तील सौम्यातील सौम्य खेळणी आहेत तिला मनुष्यभाषेत तरी भगवंताची लीला म्हणावयाचे की पैशाच्चिक उत्पात! आणि ही लीला किंवा हे लळीत चालावयाचे तरी किती वेळ? लीला म्हटली की एक दिवस, एक वर्ष, एक युग, एक कल्प खेळल्यानंतर तरी तिचा कंटाळा ‘भगवंताला’ सुद्धा नको का यायला? पण ब्रह्मांडे मांडण्याचा नि मोडून टाकण्याचा हा महामायेच्या भातुकलीचा खेळ अनादिकालाच्या आरंभापासून तो अनंतकाळाच्या अंतानंतरही चाललाच आहे, चालणारच आहे! त्या भगवंताला नि महामायेला प्रत्यक्ष काळाचासुद्धा कंटाळा येत नाही!

आणि ह्या ब्रह्मांडाच्या घडामोडीत ह्या बापड्या बिचाऱ्या श्रमजीवी मनुष्याचे स्थान कोणते? त्याचेकडे कोणी ढुंकून तरी बघणारा आहे का? किंवा मनुष्य, मन, हेच काय ते मुख्य असून, असते असे तेच काय ते असून हे सारे ब्रह्मांड हेच नसते आहे? मनाला होणारा केवळ आभास आहे? मन सुषुप्तीत लीन होताच हा सगळा ब्रह्मांडाचा पसारा पार नाहीसा होतो आणि आचार्य म्हणतात त्याप्रमाणे “जागरिते तस्मिन्नेव अग्निस्फुल्लिंगवत् तस्य प्रतिभासः!”

अशा उलट सुलट, खऱ्या खोट्या, नकोशा वाटत असताही नाकारता न येणाऱ्या, हव्याश्या वाटत असताही पुरावा नसलेल्या अनेक शंकाकुशंकांनी, प्रश्नोत्तरांनी, माझे मनात थैमान घालावे. मला हेही आठवते, की मग मी पद्धतशीर विचार करण्यासाठी त्या काळच्या माझ्या ज्ञानानुसार अगदी शून्यापासून निरनिराळ्या दर्शनांचा क्रम लावला : शून्यवाद, स्याद्वाद, अज्ञेयवाद, जडवाद, मायावाद, ब्रह्मवाद, त्यावेळी नवीनच पुढे आलेला, मानवतेलाच एकमेव देवता मानून तिची पूजा बांधणारा फ्रेंच तत्वज्ञ कॉंत ह्याचा Positivism (प्रत्यक्षवादी?) नि हेकेलचा ‘Substance’ जडाद्वैतवाद अशा त्यावेळी ज्यांना ज्यांना मला विचारात घ्यावेसे वाटले नि ज्याविषयी मला न्यूनाधिक ज्ञान होते त्यांना अशा क्रमाने मांडून त्यातून काय काय पटते, काय समजते, काय समजत नाही त्यांची चिकित्सा करण्यात प्रतिरात्र तासतास घालवावे.

परंतु त्या तात्त्विक चिकित्सेचे विवरण हे ह्या ‘आत्मचरित्रा’च्या कक्षेबाहेरचे आहे. त्या त्या वेळी माझे मनोव्यापारही कसे चालले होते, माझ्या जीवनाची तात्त्विक घडणही कशी घडत गेली, याची स्थूल रूपरेखा तेवढी अशा आत्मचरित्रात्मक ग्रंथात देणे उचित होय. पुन्हा, त्यावेळेची ती चिकित्सा त्या वेळच्या शब्दात नि स्वरूपात समग्रपणे आठवणेही अशक्यच. तिचा आशय, तिची रूपरेखा सुद्धा जी वर दिली आहे ती त्यावेळच्या प्रमेयांचे त्या वेळच्या शब्दातच बव्हंशी दिग्दर्शन करणारी आहे, अशी आठवण असल्यामुळे नि तिला उपोद्बलक असे काही तत्कालीन लेख हाताशी मिळाले म्हणून देणे योग्य वाटले. त्या लेखांपैकी पहिला लेख म्हणजे त्या पाचसहा वर्षांतच मी रचलेली आणि मी जन्मठेपेच्या बंदीवासातून सुटण्याचे आधीच छापली गेलेली माझी ‘महासागर’ ही कविता. आगनावेवरील तत्वचिंतनातील काही मनात टिपून ठेवलेल्या विधेयांचेच (Points चेच) त्या कवितेच्या आरंभीच्या स्तबकांतून पद्यमय प्रतिबिब पडलेले आहे. पुढे जे वैनायक वृत्त मी निश्चित स्वरूपात प्रचलविले

तशाच एका धाटणीच्या वृत्तात ही कविता रचलेली आहे. तिचे इथे संबंधित असे काही स्तबक वानगी म्हणून खाली देऊ.

**'महासागर'**

(ह्या कवितेतील काही तुरळक उतारे)

१

विहितकर्म पुण्यपूत ब्राह्मणांचिया
अंतिम अर्घ्यांसि समादरूनि गभस्ति
भगवान, आताचि कुठे पश्चिमेचिया
अंतःपुरचत्वरि सत्वर प्रवेशती;
चुंबुनिया देत मधुर चंचलता ती
विरहोत्सुक दयिते त्या! लालि गुलाबी
गालातुनि थरथरते! थरथरे हृदी
नवजीवन : नखशिखांत चेतना नवी!
म्लान मुखी प्राची घे पदर तमाचा
तिचिया सांजेसि दिवस ये प्रतीचिचा!!

२

स्वच्छ शांत गगनशील; शांतवृत्ति हा
सांध्य समाधिस्त तेवि नील जलनिधि
नौका परि एक मात्र शांत जली ह्या
ही प्रवास पटु अशांत गतियुता किती!
'कळत काय हे नौके, की प्रवास हा
कोठुनि तव आणि कुठे ते तुला बरे!'
"हो, हो, कविराज, जिथुनि आणि की अहा
जेथ तुझा तू प्रवास करिसि, हे खरे
जाणतसा जितुके की मनुज हो तुम्ही-
तितुके ते नौकाहि जाणतो अम्ही!"

३

प्रश्न चरम तो युगांसि विगत युगांचा
केंद्र कुठे भुवनाचा! नाभि नभाचा!
केंद्र जगच्चक्राचा 'मी' चि आमुचा!
शून्याच्या गगनी निरवयवि निश्चली
चल मध्यद चांदणि 'मी' हीच उदेली!

४

'मी' मध्ये तरि या संभवति दशदिशा
ही प्राची प्रतीचीही. चलित मी तरी
प्राच्य होय ते प्रतीच्य! आणि त्या तशा
संज्ञाची की विलुप्त लुप्त 'मी' तरी

५

वदती जे की "पूजा मनुज जातिची
भक्ति परा ही, हाची धर्म मानवा.
किंबहुना देवालय कधि न उदितची
हो मग ते प्रेत, भूत देवनिष्ठ वा
मनुज हिताहितची की ज्या अनन्यसा,
कळुनी अथवा न कळत परि, न जाहला
हा पाया, कळस आणि! स्वर्ग ही तसा!
मनुज हिताहित पुण्यापुण्य ईश्वरा.
ये सापेक्षेची निरपेक्ष भाविता,
देव नराचा प्रतिमा अधि नरी कृता!"

६

ते न बघति का वरती : ती फुले तशी
ओवुनिया सुत्रांतुनि गतिगतीचिया
ह्या अनंत ताऱ्यांची माळ ही अशी
कंठि विराट पुरूषाच्या विलसते जया
त्यापुढती सास्थि न है लौहहि जरी
असते नर जानू नमतेच तत्पली!

७

न कळे वदताची जे लव तरी कळे
कळते वदताचि कळत ते न कळविते
लाभ काय बसुनि निरुत्तरहि वा बळे
प्रतिस्पंदनात हृदय हाक दे जिथे
"विश्वंभर! विश्वकार! धन्य धन्य हे!
सिंधु धर्म-बिंदु तुझा! आणि तुझीया
चंडकारखान्यामधि सूर्य शतहि ते
उडत्या ठिणग्याचि मात्र विझत-चमकत्या!

ऐरणीवरी स्थलाचिया किती अशी
कालघणे घडशि जगे आणि विघडिशी!!”

८

तू करता करविताहि कार्य तू क्रतु;
निरपेक्षहि तूची सापेक्ष पुरविते
सांख्य पुरुष, पुरुषोत्तम योगयुक्त तू
स्यात् तू, तू शून्य आणि सत्हि तूचि ते
हे अणोरणीयान्, महतोपि महीयान्!
वदुं न शके वाक् न मौन धरुहि मानवी
तरिही विश्वगीत त्वत्स्तोत्र हे महान्
प्राणाची तार तार थरथरारवी!
गातो तरि गीत तेचि समजता न का
प्रभु प्रवृत्तिने तुझ्याचि अवश हा मुका!

९

समजता न परि! का हा प्रभव होतसे
सफल प्रलयात मात्र! धर्मि का जडे
ग्लानीची प्रथम जरी पुनरपी असे
तुज अभ्युत्थाना अवतारणे पडे?
मातीचे का महाल? हाल होउनी
होऊ मातीच पुन्हा? लाविली कधी
दौड अशी गगनरंगणात, का कुणी
या सहस्र सूर्यांची? खेळण्यामधी?
--कालाचा कंटाळा का न ये तुला!
मांडुनिया मोडण्यात जन्म गमविला!!

१०

समजशील ‘तू’ ही वा केवि? हा जिथे
क्षुद्र ‘मी’च समजेना मज जनार्दना!
मुरलीसी मुरलीधर वाजविशिल ते
वाजविल्यावीण गीत राहवेच ना
म्हणुनीची धर्मवीर हे रणांगणी
‘माना’स्तव मरती; रणगर्ज तो अणी
गुंजत शतकांमधूनि आजि या क्षणी

रक्त बिंदुबिंदूतुनी दे प्रतिध्वनी
--दे प्रतिध्वनीचि मात्र - समजता न का
प्रभु, प्रवृत्तिसी तुझ्याचि अवश हा मुका!

वर संगितल्याप्रमाणे त्या सागराच्या नि त्या आकाशाच्या प्रत्यक्ष सान्निध्यात यद्यपि त्यांच्या भव्यतेचाच परिणाम माझ्या चिंतनशील मनावर अधिक उत्कटपणे होत होता तथापि त्यांची अनुपम शोभा पहाण्यातही मी अनेकवेळा गुंगून जाई. तो महासागर जेव्हा एखाद्या सरोवरासारखा शांत नि ते आकाश निरभ्र असे आणि तो मुक्त वायु झुळझुळ वहात असे तेव्हा तेव्हा दिवाळीत मुले जशी फुलबाजी पेटवून तिच्यातून टपकणाऱ्या रंगीबेरंगी तेजाच्या फुल्या, फुले, टिंबे, चक्रे यांची गंमत पहाण्यात दंग होऊन जातात तसा मीही चिंतनशील विचारांचा किंवा विवेकांचा पायबंद कापून टाकलेल्या माझ्या कल्पकतेची फुलबाजी पेटवून देई नि तिच्यातील दारूकामाची गंमत केवळ करमणूक म्हणून पहात बसे. माझ्या कवितेच्या तशा स्वच्छंद शैलीची एक वानगी म्हणून नि त्या प्रवासातील बाह्य दृश्यांचे नि मनोव्यापारांचे त्यावेळेसच घेतलेले दुसरे एक छायाचित्र म्हणून ह्या समुद्र प्रवासातच रचलेली आणखी एक कविता खाली देत आहे.

समुद्र आणि आकाश ह्यांच्या संपुटातील चांदणी रात्र

सुनील नभ हे, सुंदर नभ हे, नभ हे अतल अहा;
सुनील सागर सुंदर सागर सागर अतलचि हा.
नक्षत्रांही तारांकित हे नभ चमचम हासे
प्रतिबिंबाही तसा सागरही तारांकित भासे.
नुमजे लागे कुठे नभ कुठे जलसीमा होई;
नभात जल ते, जलात नभ ते संगमुनी जाई.
खरा कोणता सागर यातुनि वरती की खाली?
खरे तस आकाश कोणत, गुंग मती झाली!
आकाशीचे तारे सागरि प्रतिबिंबित होती
किंवा आकाशी हे बिंबति सागरिचे मोती!
किंवा आकाशचि हे सगळे की सागर सगळा
भवसागर बोलती पुराणी प्रथित ऋषी ज्याला!

* * *

हे चांदणि! सुखशीतल गमसी तशीच असशीना?
आगचि लागो लोळ आगिचा तुजसी वदत्यांना![1]
विमल विरल मेघांची दुलई ओढुनि निजलीसे
अशा अप्सरेचिया अनावृत वदनासम विलसे

---

[1] ह्या चिमुकल्या चांदण्या नसून हे मोठेमोठे ज्वालागोल-आगीचे डोंब- आहेत असे जे ज्योतिषशास्त्रज्ञ सांगतात त्यांच्या त्या शोधाला आग लागो.

आल्हादक किती चंद्रबिंब हे नंदसुधा झरते!
फुटो भिंग ते भिकार त्या जे मसणासम करते![2]

* * *

चंद्र चांदण्या असेच अंतर मापुनि देवाने
खचल्या नभी नि नयनी काचा सुललित बेताने
त्यांचे रिझवो रूप जना की आल्हादक कोळेः
फुटोत ते त्या विद्रुप करिते दुर्बिणिचे डोळे!!

* * *

कथिति ज्योतिषी तसे आगिचे लोळ कुणी तारे
असतिल दुसरे, नव्हेत हे, हे अमृत-बिंदु सारे!
की जै असुरां-सुरांमध्ये क्षीराब्धि-मंथन काली
अमृत-कलश वरि येता ओढाताण सबळ झाली
ओढाताणित अतस्ततः त्या अमृत-बिंदु गळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!

* * *

की बघुनी अप्सरों - गणें ही वसुधेवरि खाली
चमेलि, जाई, जुई, मोगरी, मालतिही फुलली;
त्यांच्या नंदन -वनिहि असावी ऐशी काम्य फुले
यास्तव पेरुनि देति अप्सरा हास्य नभी अपुले;
हास्य-लते सुरसुहासिनींच्या आली ऋतुंत फुले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!

* * *

थवे काजव्यांचे की नंदनवनिच्या चकचकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!

* * *

सुनील शालूवरि मायेच्या[3] लकलकती टिकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!

* * *

सुवर्ण - गौरा - गौरीशी हर लीलारत झाले
थाप पडे तो द्वारी श्रीहरि भेटाया आलेः

---

[2] दुर्बिणीचे भिंगः कारण दुर्बिणीने चंद्र हा अेक ओसाड, रूक्ष नि निर्जीव अुपग्रह आहे असे दिसते.

[3] माया म्हणजे प्रकृती देवी.

नग्ना लगबग गिरिजा धावे सावरू शालूला
हिसका बसुनि हार गळ्यांतिल तट्कन तो तुटला :
त्या हारातील मोती सैरावैरा ओघळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!

* * *

दशानने पळवूनि जानकी नभःपथे नेली
अश्रुबिंदु जे देवी टपटप ढाळित त्या काळी
तेचि राहिले असे चकाकत जाणो दिव्य बले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!

* * *

आकाशाच्या ग्रंथ-संग्रहालयासि अर्पियला
काले ग्रंथ प्रचंड विश्वेतिहास जो लिहिला
रौप्यमुद्रिकांकित तद्भागा अनुक्रमे रचिलेः
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भलेभले चकले![4]

* * *

परी सागरा, सांग काय ही लटपट? ही कुठली
चटक चांदणी कवण? नभातुनि निसटुनिया विपली
रात्री ऐशा अशी एकटी लगबगीने घुसली
तुझिया जलमंदिरी सवेचि दिसेनाशी झाली?
लाजु नको, जा भोग विलासा कामोत्सुक तू तीः
तुझिया शत जलतरंग[5] मंजुल सुखा साथ देती!
प्रेमाची चांदणी परंतु ज्यांची दूर वसे

---

[4] विश्वेतिहासाचा प्रचंड ग्रंथ काळाने लिहिला. कारण विश्वाच्या अितिहासाची माहिती काळापेक्षा कुणाला जास्त असणार? त्या विश्वेतिहासाचे भाग म्हणजे अेकेक तारा. विश्वाचा विकास कसा कसा होत आला ते सांगणारा अेकेक तारा म्हणजे अेकेक ग्रंथच होय. आणि त्या विश्वेतिहासाच्या प्रचंड ग्रंथमालेला पुरेसे ग्रंथालय म्हणजे अेकच,आकाश!

[5] श्लेषाने ‘जलतरंग’ वाद्ये.

किती प्रवासी तळमळती बा, तुझ्या निकट ऐसे!

तुझा तुझ्या चांदणिशी पाहुनि प्रिय संगम साचा

तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा!

हे ताऱ्यांनो, जाणतसा का कुठुनि तुम्ही आलां?

कुठे चाललां कवण हेतु ह्या असे प्रवासाला?

कवण हेतु तो ज्यास्तव तुम्ही गगनगामि व्हावे;

सूर्यापासुनि अतुके दूरचि भूने विचरावे

गजराजाहुनि फुलपाखरुची सुरंग शोभावे

बीज फुलावे, फुलुनि सुकावे, सुकुनि बीज व्हावे;

लहानमोठी घटिका-यंत्री बहुविध यंत्रे ती

स्वस्वगतीने परि एक्याची साध्यास्तव फिरतीः

-असा कोणता हेतु जयाच्या सिद्धिस्तव साची

विश्वाच्या या चक्रे फिरती भव्य घड्याळाची?

अम्हा कळेना म्हणूनि पुसतो तुम्हां कळे का तेः

का न कळत वर्तावे जाणति अतुकेचि ज्ञाते!

* * *

मध्यंतरी आमच बाष्पनौका पश्चिम समुद्र (Arabian sea) ओलांडून वाटेतील एडन प्रभृती सिंधुद्वारांना भेट देऊन सुवेझच्या कालव्यातून जाताना सुवेझला थांबली असता तिथे जे दृश्य मला दिसले ते त्यावेळी मला अपूर्वच वाटले. आणि किती अर्थवाहक! त्या आगनावेवर आपापल्या देशातील विशिष्ट पदार्थांची विक्री करण्यासाठी आणि इतरही अनेक कारणांनी माणसे सारखी येतजात होती. ते सिंधुद्वार म्हणजे तीन खण्डांचे संगमस्थान आहे. आशिया, आफ्रिका नि युरोप ह्या तिन्ही खंण्डातील लोकांच्या रंगांचे, रूपाचे नि भाषांचे एक लहानसे प्रदर्शनच तेथे भरले होते. आफ्रिकेतील काळ्याकभिन्न नीग्रो लोकांपासून तो चीनजपानच्या पिवळ्याधमक रंगामधील अनेक छटांच्या रंगांची माणसे तेथे सरमिसळ झालेली होती. त्यांचा नाना भाषांतून आपापले व्यवहार कसेतरी पार पाडण्यासाठी नीग्रो भाषांपासून तो जपानी भाषेपर्यंत बहुतेक जगातील भाषांमधील शब्द मिळून एक कामचलाऊ मानुषी भाषाच तेथे त्या क्षणापुरती तरी निर्मिली जाई. त्यावेळी मनुष्य जातीच्या मूलभूत एकजीवीपणाच्या प्रत्यक्ष दर्शनाने माझ्या मनावर इतका उत्कट ठसा उमटला की त्या रात्री मी त्या

प्रसंगावर आणि विचारावर आर्यावृत्तात एक कविताही रचली. ती आता समग्र अशी आठवत नाही. काही दोनचार तुरळक आर्या अजूनही आठवतात. पण त्या तशा देणे प्रशस्त नि उद्बोधक ठरणार नाही म्हणून देत नाही.

सुवेझनतर ती नौका भूमध्य समुद्रातून फ्रान्सचे सिंधुद्वार मार्सेलिसला येताच आम्ही इंग्लंडला जाणारे प्रवासी त्या आगनावेवरून खाली उतरलो. तेथून इंग्लंडकडे आम्हांस घेऊन जाणारी आगगाडी येण्याच्या आधी जो बराच वेळ जावयाचा होता तेवढ्यात मार्सेलिस नगर पाहून घेण्याची मला विशेष उत्कंठा लागली होती. सन १७८९ च्या विख्यात फ्रेंच राज्यक्रांतीवरची पुस्तके जी माझ्या त्या वेळेपर्यंतच्या वाचनात आली होती त्यावरून मला हे ठाऊक होते की त्या क्रांतीतील प्रलयंकर काळात ज्या रणगीताने साऱ्या फ्रान्सचे अंतःकरण चेतवून दिले, ज्या रणगीताला गाताना चढलेल्या रणावेशात फ्रेंच क्रांतिकारकांची चतुरंग सैन्येची सैन्ये बेभान होऊन, जगात मृत्यू म्हणून काही पदार्थ असतो हे विसरून जाऊन, इंग्लिश, प्रशिया, स्पेन, आस्ट्रीया प्रभृती देशांच्या परकीय सेनांचा चक्काचूर उडविती झाली आणि जे रणगीत पुढे शंभर वर्षे फ्रान्सचे वस्तुतः खरे खरे राष्ट्रगीतच होऊन राहिले ते 'मार्सेलेझ' हे रणगीत त्या क्रांतीच्या आवेशात ह्या मार्सेलिस नगरातच कोण्या Rouget De Lisle नावाच्या कवीने रचले आणि मार्सेलिसमधील मूठभर क्रांतिकारक स्वयंसैनिकांची जी पहिली तुकडी पॅरिसच्या नव्या राष्ट्रीय सैन्याला जाऊन मिळण्यासाठी पायी निघाली तिनेच ते रणगीत वाटेने गातगात साऱ्या फ्रान्सभर एखाद्या आगीच्या वणव्यासारखे पसरवून दिले.

मला आकर्षिणारा या नगराचा दुसरा विशेष हा की स्वदेश- स्वातंत्र्यास्तव सशस्त्र चळवळ करण्याच्या 'अपराधा'स्तव इटलीला दास्यात डांबून ठेवणाऱ्या सत्ताधिकाऱ्यांनी माझिनीला जेव्हा अगदी तरुण वयात देशपारीची शिक्षा दिली तेव्हा तो निर्वासित माझिनी फ्रेंच राष्ट्राच्या आश्रयास येऊन प्रथम ह्याच मार्सेलिसला राहिला. कोणाची ओळख ना देख, धड अन्न ना वस्त्र, अशा आपत्तीतच त्याने धीर न सोडता आपली 'तरुण इटली' ही गुप्त संस्था ह्याच नगरात स्थापिली. पुढे इटलीचा परकीय सत्ताधीश जो आस्ट्रीया त्याने त्याला मृत्युदंडाची शिक्षा दिली पण तिची बजावणी फ्रान्समध्ये करणे शक्य नव्हते म्हणून माझिनीने हे नगर सोडले नाही. शेवटी आस्ट्रीयन सरकारच्या दडपणामुळे फ्रेंच सरकारनेही माझिनीला फ्रान्स सोडून जाण्याची आज्ञा दिली; पण तीही धाब्यावर बसवून माझिनी भूमिगत झाला नि मार्सेलिसलाच राहिला. पुढे इटालियन क्रांतिकारकांची जी एक चढाई होणार होती तीत स्वतः भाग घेण्यासाठी त्याने आपण होऊन जेव्हा मार्सेलिस सोडले तेव्हाच काय तो माझिनीचा नि मार्सेलिसचा संबंध तुटला. जोसेफ माझिनीसारख्या थोर देशभक्ताचे त्याच्या अगदी अज्ञात नि अडचणीच्या काळातले ते कर्मक्षेत्र असल्यामुळे आणि 'तरुण इटली' ह्या क्रांतिकारक गुप्तसंस्थेचे ते जन्मस्थान असल्यामुळे मार्सेलिस हे मला तेव्हा एखाद्या धर्मक्षेत्राप्रमाणे वाटत असे.

अशा भावनेने मी मार्सेलिसला उतरताच त्या नगरातले काही महत्वाचे भाग पहावे म्हणून एक धंदेवाईक तत्रस्थ वाटाड्या घेऊन गावात गेलो. तो वाटाड्या मला स्थानिक कीर्तीच्या संस्था, उद्याने, पुरातन अवशेष इत्यादी गोष्टी दाखवू लागताच मी म्हटले, "इटलीच्या स्वातंत्र्य दात्यांतील थोर पुढारी जो माझिनी तो या नगरात जिथे राहात होता ते घर मला दाखीव. " हे ऐकून तो वाटाड्या क्षणभर खाली भुईकडे पहात उभा राहिला आणि मग तोंड वर करून संथपणे म्हणाला, "माझिनी? कोण ते? त्यांच्या घराचा पत्ताबित्ता काही तुमच्याजवळ असेल तर करतो शोध. इथे कोणालाच नाही माहीत तसा पत्ताबित्ता. मी येथील पट्टीचा वाटाड्या पण मी तर ते नावसुद्धा आत्ताच

ऐकतो आहे!" या त्याच्या भकास उत्तराने माझ्या जिज्ञासेचे तोंड खर्रकन उतरले; पण वाटले हा बोलूनचालून एक पोटभरू अनभिज्ञ वाटाड्या; याला कुठली एवढी इतिहासाची माहिती. संपादक वा शिक्षक वर्गासारख्या बहुश्रुत नि सभ्य वर्गातील कोणा नागरिकाला विचारून पहावे. तसे करण्यास वाटाड्यास सांगितले. मार्गाने थोडे पुढे गेल्यावर कोण्या वृत्तपत्राचे कार्यालय लागताच वाटाड्या आत गेला. थोड्याच वेळात परतून मला म्हणाला, ते म्हणतात "इटलीच्या जोसेफ माझिनीच्या घराचा पत्ता आम्हा मार्सेलिससच्या नागरिकाना तरी ठाऊक नाही. त्या प्रवाशांना म्हणावे की इटलीत जाऊन त्या घराचा पत्ता विचारा. मिळाला तर तिकडेच मिळेल!" त्या वृत्तपत्राच्या संपादक वर्गाच्या या उत्तरातील विनोदाची खोच बोचताच माझ्या जिज्ञासेतील उरलासुरला दमही निघून गेला नि माझे मलाच हसू आले. मनात म्हटले की साठसत्तर वर्षांपूर्वी जेव्हा माझिनी प्रथम मार्सेलिसला आला तेव्हा तोही त्या वेळच्या फ्रेंच पिढीतील कोणाचीही ओळखदेख नसलेला एक परदेशीय दुर्लक्षित तरुण म्हणूनच इथे हिंडत होता. अशा नाना देशांच्या शेकडो प्रवाशांची आवकजावक समुद्र मार्गे या नगरातून प्रत्यही चाललेली. आजही मी एक भारतीय क्रांतिकारक या मार्सेलिसच्या मार्गातून जसा हिडत आहे पण माझ्याकडे कोणी ढुंकूनही पहात नाही तसाच तो इटालियन क्रांतिकारक तरुण या नगरात त्यावेळी हिडत असता त्याच्याकडे कोणी ढुंकूनही पहात नव्हते. माझिनीने तरुण इटली ही गुप्त संस्था जेव्हा इथे काढली तेव्हा तिची प्राथमिक स्थिती नि शक्तीही आज आमच्या 'अभिनव भारता'ची आहे तशीच होती. तिच्या अंगणाबाहेर तिची माहिती वा महत्व साहजिकपणेच कोणासही ठाऊक नव्हते. फ्रेंचांना तर या इटालियन संस्थेचे काहीच सोयरसुतक नव्हते. माझिनीला जो पुढे जागतिक मोठेपणा आला तो तो मार्सेलिस नगर सोडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी आला. तेव्हा, जसे मला आज मार्सेलिसला कोणीही या बसा करीत नाही हा त्यांचा अनभिज्ञपणा वा दोष म्हणता येत नाही; तसेच मार्सेलिसच्या त्या पिढीच्या फ्रेंच नागरिकांनी त्या अज्ञात तरुण, परकीय नी भटकत्या माझिनीच्या घराची वास्तपुस्त केली नाही, ठेवली नाही हे अगदी सहाजिकच होते. हो बरी आठवण झाली! माझिनीला ठराविक घर तरी होते कुठे तेव्हा! सारा भूमिगत, गुप्त, भटकता कारभार होता त्या देशभक्त निर्वासिताचा! एवीतेवी ते घर मला दाखविता आले नाही हा त्या वाटाड्याचा वा नागरिकांचा अनभिज्ञपणा नव्हता; तर तो होता पृच्छकाचा अप्रयोजकपणा!

शेवटी मार्सेलिसचा जो विशेष मी पाहिला तो म्हणजे ज्या मार्गाने त्या वाटाड्याने मला ज्या कोणच्या एका भागात नेले होते तो भाग नि ती वाट. तो भाग त्या नगराचा जुनाट भाग असावा. आमच्या जुन्या नाशिकच्या भागासारखाच अरुंद आळींनी नि बोळांनी गजबजलेला. आणि आश्चर्य हे की त्यातील वाटा नाशिकच्या जुन्या भागातील वाटांसारख्याच लहानमोठ्या, तिरप्या शिरप्या दगड गोट्यांनी कधी शंभर दोनशे वर्षांपूर्वी चिणलेल्या नि तरीही अजून भरभक्कम!

मी तिकडून परततो तो इंग्लंडची गाडी सुटण्याची वेळ झाली होती. आगनावेत माझ्यासमवेत असलेल्या हिंदी गटातील मंडळींसह मी त्या गाडीत बसलो. गाडी सुटताच 'मार्सेलेझ' या रणगीताचे स्फूर्तिस्थान, माझिनीचे निवासस्थान, नि 'तरुण इटली'चे जन्मस्थान असणाऱ्या त्या नगराला एक ऐतिहासिक क्षेत्र म्हणून मनोमन पुन्हा एकदा नमस्कार केला आणि इंग्लंडची वाट धरली.

त्या वेळेस कल्पनासुद्धा नव्हती की अवघ्या चार वर्षांच्या आतच ज्या ह्या मार्सिलिसच्या नागरिकांमध्ये कुणाला माझे नावही माहीत नाही, अगदी सहाजिकपणे आज मजकडे कुणी ढुंकूनही पाहिले नाही त्यांच्यातील

शेकडो नागरिक अवघ्या चार वर्षांच्या आतच माझ्याभोवती गोळा होतील, आश्चर्याने तोंडात बोट घालून एकमकांस विचारतील 'याचे नाव काय?' येथील वृत्तपत्राचे विशेषांक निघून त्यात भडक अक्षरातून माझे नाव फडकेल नि त्या निमित्ते हिंदुस्थानला ब्रिटिशांच्या राजकीय दास्यातून मुक्त करण्यासाठी त्या देशात सशस्त्रक्रांतीची प्रबळ उठावणी होत आहे या सणसणीदार वृत्ताकडे साऱ्या राजकीय जगाचे लक्ष पूर्वी कधीही वेधले गेले नव्हते इतक्या व्यापकपणे नि प्रबळपणे वेधिले जाईल! इतकेच नव्हे तर माझ्या संबंधामुळे या मार्सेलिसचेच नाव वर्षभर का होईना पण जगात गाजत राहील! कल्पनासुद्धा नव्हती त्याची तेव्हा!

प्रकरण दुसरे

# मी लंडनला पोचलो तेव्हा

गेल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे मार्सेलिसहून मी जो निघालो तो वाटेत फ्रान्समधून जात असता पॅरिस प्रभृती कोणतीही नामांकित स्थळे पाहावयास न थांबता सरळ लंडनला गेलो. म्हणजे दि. ९ जून १९०६ ला मुंबईहून जो निघालो तो दिनांक २ किंवा ३ जुलैला लंडनला येऊन पोचलो. लंडनच्या स्थानकावर मला न्यावयास पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांच्या "इंडिया हाउस"ची काही प्रमुख मंडळी आली होती. माझ्यासमवेत एकत्र राहावयास मिळेल म्हणून माझे स्नेही हरनामसिंह ह्यांनीही दुसरीकडे जाण्याचा त्यांचा पूर्वीचा बेत सोडून इंडिया हाउसमध्येच राहावयाचे ठरविले आणि तेही माझ्यासहच तिकडे उतरावयास आले. माझ्यासमवेत आलेले इतर हिंदी स्नेही ज्यांच्या त्यांच्या पूर्व नियोजित बेताप्रमाणे इतर ठिकाणी निघून गेले.

'इंडिया हाउस'मध्ये असलेल्या मंडळींपैकी कोणाशीही माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता. इंग्लंडसारख्या आमूलात् निराळ्या संस्कृतीच्या परदेशात अनोळखीपणे एकटे गेले असता तेथील अगदी शौचमुखमार्जनाच्या, स्नान करण्याच्या, जेवणाखाण्याच्या, उठण्या बसण्याच्या अशा आन्हिक आचारांपासून तो वेष, भाषा, कौटुंबिक वा सामाजिक शिष्टाचारापर्यंतच्या पद्धतीत जी आपल्या पद्धतीहून विभिन्नताच नव्हे, तर काही प्रकरणी अगदी विरोध असतो त्यामुळे प्रथम प्रथम त्या आपल्याकडील नवागताला अगदी कुचंबल्यासारखे होते. बुजल्यासारखे होते. त्या परकीयांकडून नसता अडाणीपणा आपल्या पदरी बांधला जातो. आणि ते निदान मनोमन तरी आपली हेटाळणी करीत राहतात. परंतु मला प्रथम अगदी जातिवंत इंग्रजांचे घरी किंवा इंग्रजी निवासालयात उतरावे लागले नाही आणि जिथे साधारणतः हिंदी वातावरणात नि स्वदेशीयांचा सहानुभूतिपूर्ण सहवास लाभणारा होता त्या 'इंडिया हाऊस' मध्येच राहणे अवश्य झाले. त्यामुळे मला परदेशात पाउल टाकताच एकदम तितके प्रतिपदी कुचंबल्यासारखे न होता तिकडील वायुमानाप्रमाणे तिकडील राहणीही हळूहळू अंगवळणी पडत गेली. 'इंडिया हाऊस'मध्ये माझे आधीच येऊन राहिलेल्या हिंदी विद्यार्थ्यांचा नि आवतीभोवतीच्या हिंदी गृहस्थांचा परिचयही मी लवकरच करून घेतला. आणि उण्यापुऱ्या एका आठवड्याच्या आतच मी माझ्या राजकीय प्रचाराचा आरंभ केला.

ह्या राजकीय प्रचाराची आखणी भारतात असतानाच मनात मी केलेली होती. त्यासाठीच इंग्लंडला निघण्याचे आधी महाराष्ट्रातील आमच्या स्थानिक क्रांतिकारक संस्थांची 'राष्ट्रभक्त समूह', 'मित्रमेळा' इत्यादी पहिली नावे दुय्यम ठरवून त्या सर्व शाखांना; आणि जाणूनबुजून विलग ठेवलेल्या, ठिकठिकाणच्या स्थानिक गुप्त मंडळ्यांना एकत्र आणून आम्ही त्यांचे एकत्रीकरण केले आणि नाशिकला मोठ्या समारंभाने नि संस्कारपूर्वक त्या एकात्म नि एकसंघ संस्थेचे मी योजलेले 'अभिनव भारत' हे साऱ्या हिंदुस्थानच्या क्रांतिकारकांना सामावू शकेल असे नामकरण केले. हे अभिनव भारत नाव ठेवण्यात माझा जो मुख्य उद्देश होता की त्या गुप्त क्रांतिकारक संस्थेचा प्रचार सर्व भारतभर करता यावा, तो उद्देश मोठ्या प्रमाणावर नि सापेक्षतः अल्पश्रमात साध्य होण्याची संधी मी पुढे लवकरच इंग्लंडमध्ये गेलो त्यामुळे लगोलग प्राप्त झाली. त्याचे कारण असे की त्या 'अभिनव भारत' संस्थेचा भारतव्यापी कार्यक्रम मी इंग्लंडला जाऊन पोचल्यानंतरच मला प्रत्यक्षपणे नि परिणामकारक रीतीने

आचरणे हे अधिक सोपे जाणारे होते. इंग्लंडमध्ये त्याच वेळी जाण्यात माझा हाही एक प्रमुख हेतू होता. कारण लंडनसारख्या नगरात अखिल भारतीय अशा राजकीय नि सामाजिक संस्थांचे प्रांतोप्रांतीचे हिंदी पुढारी, मोठमोठे राजेमहाराजे, हिंदी व्यापार नि वाणिज्य (commerce) यांचे कोट्याधीश श्रेष्ठी आणि साऱ्या भारतातील निवडक निवडक असे एकत्र आलेले शतावधी होतकरू हिंदी तरुण सहजासहजी एका हाकेच्या अंतरावर भेटू शकत. एकत्र मिळू शकत. त्यांच्याशी समभूमिकेवरून सहवास, संवाद नि सहकार्य हिंदुस्थानात राहून घडू शकते त्यापेक्षा इंग्लंडमध्ये नि विशेषतः लंडनमध्ये घडणे शतपटीने सोपे होते.

परकीय देशात जिकडे तिकडे पसरलेल्या परकीय समाजात आपण एकटे पडलो असता तेथे अगदी तुरळक आढळणारा अनोळखीही स्वदेशीय दिसताच चटकन आपलासा वाटतो. त्याचा परिचयही सहजासहजी होतो. परस्परातील मूळची जाती-प्रांत-प्रतिष्ठा प्रभृती विभिन्नतेची जाणीव उणावून एकदेशीयत्वाच्या नात्याची उत्कटतम जाणीव होऊ लागते. आपुलकीची प्रेमळ भावना बळावते. आणि देशबंधू म्हणून निवास सभा संमेलनांतून ते समान भूमिकेवरून एकत्र आकर्षिले जातात. लंडनसारख्या त्या वेळच्या भारतीय प्रवाशांच्या केंद्रात कोणा भारतीयाने नुसता चहापानाचा घरगुती समारंभ जरी केला तरी इतक्या प्रांतांचे, श्रेणीचे, प्रतिष्ठेचे, जातींचे निवडक देशबंधू एका हाकेने एकत्र होऊ शकत; खेळीमेळीने चहापान सहभोजनात मिसळत की तसे त्यांना एकत्र आणण्यास हिंदुस्थानच्या दूरवरच्या प्रवासापायी शेकडो रुपये व्यय करून एखादी अखिल भारतीय परिषदच भरवावी लागती पण लंडनमध्ये वर सांगितल्याप्रमाणे ते काम सोपे होते आणि तेथे पोचल्यावर पहिल्याच आठवड्यात मी अभिनव भारताच्या ध्येय-धोरणाच्या प्रचारास प्रारंभ केला.

तथापि त्या प्रचाराचे वृत्त सांगावयाचे आधी, मी लंडनला पोचलो तेव्हा ब्रिटनमध्ये हिंदी राजकारणात कोणकोणत्या संस्था नि प्रमुख व्यक्ती काम करीत आल्या होत्या, त्यांची उद्दिष्टे काय होती, कार्यक्रम कोणते होते; आणि ब्रिटिश साम्राज्याची शक्ती नि ब्रिटिश जनतेची हिंदुस्थानविषयक मनोवृत्ती कशी होती ह्याचा आढावा प्रथमच घेतला असता कोणत्या परिस्थितीत आणि तिकडील हिंदी राजकीय आंदोलनाच्या कोणत्या बिंदूपासून राजकारणाचे सूत्र मी हाती घेतले ते यथावत्पणे निर्देशिले जाणार असल्यामुळे मी लंडनला जाण्याच्या आधीच्या ब्रिटनमधील हिंदी राजकीय चळवळीचा स्थूल परिचय माझ्या दृष्टिकोनातून अवश्य वाटतो तितका वाचकांना खाली करून देत आहे.

## राष्ट्रीय पितामह दादाभाई नवरोजी

ब्रिटनमध्ये हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीने सत्तावनच्या क्रांतियुद्धात संघटित नि सतत अशा राजकीय चळवळीचा सूत्रपात करण्याचा मान देशभक्त दादाभाई नवरोजी यांनाच दिला पाहिजे. त्यांचा जन्म मुंबईत सन १८२५ ते झाला. पारशी समाजात त्या काळी चालू असलेल्या रूढीप्रमाणे त्यांचे वयाचे पंधराव्या वर्षाच्या आतच त्यांचे लग्न झाले. प्रशाळेमध्ये (High school) मध्ये त्यांच्या बुद्धीची तरतरी पाहून बॅरिस्टरीचे परीक्षेसाठी विलायतेत धाडण्याचा बेत चालला होता. परंतु त्यांच्या मातेने नि आप्तेष्टांनी तो मोडून काढला. कारण जे तुरळक पारशी तरुण त्यापूर्वी ब्रिटनमध्ये गेले होते, त्यातील काहीजणांनी मिशनऱ्यांच्या नि मोहाच्या पाशात सापडल्यामुळे पारशी धर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. त्यामुळे पारशी समाजात मुलांना विलायतेत धाडण्याविरुद्ध मोठी खळबळ उडाली होती. हळूहळू दादाभाई पारश्यांच्या सामाजिक सुधारणेच्या नि शिक्षणाच्या

सामाजिक चळवळीत सार्वजनिकपणे भाग घेऊ लागले. सन १८५२ मध्ये मुंबईस ‘बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन’ ही मुंबईची पहिलीच राजकीय संस्था स्थापिली गेली. त्यावेळी एक तरतरीत पारशी गृहस्थ म्हणून दादाभाईंनी एक भाषण दिले. तेच त्यांचे पहिले राजकीय भाषण! त्यात ते म्हणाले- “Under the British Govt. we do not suffer any great zulum. We are comparatively happier under this kind Govt. than we are likely to be under any other Govt. Whatever evil we have to complain originates from one cause alone viz the ignorance of European officers coming fresh from home.” (Life of Dadabhai Navroji by R. P. Masani :Page ५५).

सारांश-- “ ब्रिटिशांच्या राज्याखाली आमच्यावर म्हणण्यासारखा ‘जुलूम’ होत नाही. या दयाळू राज्यात इतर कोणाच्याही राज्यात असतो त्याहून आम्ही अधिक सुखी आहो. जो थोडाफार त्रास होतो त्याचे एवढेच कारण आहे की ब्रिटनमधून येणाऱ्या नवख्या अधिकाऱ्यांना आमच्या परिस्थितीचे फारसे ज्ञान नसते.”

डलहौसीसारखे बिलंदर ब्रिटिश गव्हर्नर जनरल ज्यावेळी हिंदुस्थानला पारतंत्र्याच्या चरकात पिचवून पिळून काढीत होते, त्यावेळच्या ब्रिटिश अंतरंगाविषयीची ही चिकित्सा, ही भक्ती! -- किती खुळी, किती भोळी पण प्रामाणिक.

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या त्या वेळच्या आमच्या बहुतेक लोकांच्या राजकीय निष्ठेचे स्वरूप दादाभाईंच्या या पहिल्याच भाषणात प्रतिबिंबित झाले आहे ह्यात शंका नाही. दादाभाईंनी हे भाषण केले तोवर किंवा त्यापुढेही अनेक वर्षे ते प्रत्यक्ष राजकारणात पडलेले नव्हते. परंतु आश्चर्य हे की पुढे जेव्हा ते प्रकट राजकारणात अग्रेसरत्व पावले तेव्हाही अगदी सन १९१७ ते ते मृत्यू पावले त्या वर्षातील त्यांच्या शेवटच्या राजकीय संदेशाच्या बुडाशीही त्यांच्या या पहिल्या नवथर भाषणाच्या ओळीतील भावनाच मूळ धरून होती! त्या शेवटच्या ठरलेल्या संदेशात ते म्हणतात : “Let us appeal to British sense of justice and fairplay and take it for granted that England would do justice when she understands.” त्या भाषणानंतर लवकरच सन १८५५ मध्ये, म्हणजे ज्याकाली नानासाहेबांचे राजदूत अझीमुल्ला नि साताऱ्याचे रंगो बापूजी सशस्त्र क्रांतीचे बेत रचीत इंग्लंड सोडून हिंदुस्थानात परतत होते त्या काळी, दादाभाई प्रथमतः इंग्लंडला गेले, पण केवळ स्वतःच्या व्यापारासाठी. पुढे आपणास राजकारणात पडावे लागेल याची त्यांना कल्पनाही नव्हती. न्यूनाधिक दहा वर्षे त्यांचे लक्ष मुख्यत्वे त्या व्यापारातच गुंतलेले होते. परंतु अनेक सांपत्तिक अडचणी येऊन शेवटी सन १८६६ ते त्यांनी त्यांची व्यापारपेढी बंद केली. तथापि इंग्लंडमध्ये स्वतंत्रपणे सहकुटुंब स्थायिक होता येईल इतका धनसंग्रह त्यांनी केलेला असल्यामुळे ते लंडनमध्येच राहू लागले आणि हळूहळू राजकरणात सक्रिय भाग घेऊ लागले.

### ‘लंडन इंडियन सोसायटी’

प्रथमतः त्या वेळेस तिकडेच रहात असलेल्या डब्ल्यू. सी. बानर्जी या हिंदी पुढाऱ्याचे सहकार्याने ‘लंडन इंडियन सोसायटी’ ही संस्था दादाभाईंनी काढली. तिचे अध्यक्ष दादाभाई हेच होते. ब्रिटनमध्ये हिंदी राजकारण संघटितपणे चालविणारी त्यावेळच्या हिंदी लोकांची अशी हीच पहिली संस्था होय. तिच्या सभासदांना ब्रिटिश अधिशासनाशी राजनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करावी लागे. तिच्या मार्गदर्शनार्थ दादाभाई वारंवार सांगत “We must strive for the diffusion of know- ledge about Indian affairs in England. The British people are not kept well informed regarding the fact that the Indian govt. did not act up to the British ideal. If you succeed in dispelling this ignorance of the British people regarding misgovernment in India and convince John Bull

that it is right to do a certain thing you may be quite sure that it will be done. Our battles are to be fought in the British Parliament in the last resort."

सारांश- ब्रिटिश जनतेला हे माहीत नाही की तिचे हिंदुस्थानातील प्रशासक ब्रिटिश ध्येयाला नि ब्रिटिश ब्रीदाला सोडून वागत आहेत. म्हणून आपले मुख्य कर्तव्य हे की हिंदुस्थानात होत असलेला राजकीय अन्याय ब्रिटिश जनतेला व्याख्यानांनी नि आवेदनांनी पटवून दिला पाहिजे. एकदा का तो तिला पटला की तो दूर केल्यावाचून ती राहणार नाही. ती ब्रिटिश जनताच पार्लमेंट निवडून देते. अर्थात आपल्याला शेवटी जी लढाई द्यावी लागणार ती ब्रिटिश पार्लमेंटातच द्यावी लागणारी असल्यामुळे प्रथम ब्रिटिश जनतेला हिंदुस्थानचा पक्ष न्याय्य आहे हे पटविले पाहिजे. ही नि अशीच वाक्ये दादाभाईंच्या शतावधी भाषणांची नि लिखाणांची पालुपदेच असत. जिज्ञासूंनी 'नाटेसन् नि मंडळी' मद्रास, यांनी प्रसिद्धिलेल्या दादाभाईंच्या भाषणांचा नि लिखाणांचा संग्रह अवश्य पहावा.

या धोरणाप्रमाणे ह्या लंडन इंडियन सोसायटीने उणीपुरी तीस एक वर्षे तरी ब्रिटनमध्ये हिंदुस्थानविषयक चळवळ चालविली होती. हिंदी विद्यार्थी, इंग्लंडमध्ये स्थायिक झालेले हिंदी व्यापारी, बॅरिस्टर, डॉक्टर यांच्यातील बहुतेक लोक तिचे सभासद तरी झालेले असत किंवा तिच्या कार्यक्रमात प्रासंगिक भाग घेत असत. शेवटी प्रकृती बिघडून देशभक्त दादाभाई जेव्हा सन १९०७ मध्ये इंग्लंड सोडून हिंदुस्थानात नित्याचे परत जावयाचा बेत करू लागले त्याच संधीस 'अभिनव भारताच्या' ज्वालाग्राही क्रांतीकार्याची झळ या संस्थेसही कशी लागली नि तीतच ती कशी होरपळून गेली ते वृत्त पुढे यथाप्रसंगी सांगण्यात येईलच.

**'ईस्ट इंडियन असोसिएशन'**

वर उल्लेखिलेली 'लंडन इंडियन सोसायटी' ही दादाभाईंनी काढलेली संस्था मुख्यतः हिंदी लोकांची आणि प्रचारकी स्वरूपाची संस्था होती. परंतु हिंदुस्थानात मोठमोठे अधिकार गाजवून आलेल्या आणि हिंदुस्थानच्या तिजोरीतील सहस्रावधी रुपयांची निवृत्तिवेतने प्रतिवर्षी उपभोगीत असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांचे- ज्यांना अँग्लो इंडियन म्हणत त्यांचे सहकार्याने, हिंदुस्थानातील राज्य-कारभारात काय सुधारणा हव्यात त्यांची अधिकृत चर्चा करणारी, त्यांचेकडून ब्रिटिश पार्लमेंटमध्ये प्रश्न विचारणारी, आवेदने करणारी अशी एक उच्च प्रतीची ब्रिटिश नि हिंदी पुढाऱ्यांची संमिश्र संस्थाही असली पाहिजे असे वाटून तशा काही मोठमोठ्या अँग्लो-इंडियनांच्या सहकार्याने दादाभाईंनी "ईस्ट इंडिया असोसिएशन" नावाची दुसरी संस्था काढली. लॉर्ड लिव्हडन हे तिचे पहिले अध्यक्ष होते. भूतपूर्व गव्हर्नर, कमिशनर, पार्लमेंटचे सभासद, प्रख्यात राजकारणी नेते इत्यादी वर्गातील काही ब्रिटिश मंडळी त्या संस्थेच्या कार्यकारिणीत झळकू लागली. दादाभाई हे प्रथम तिचे साधे सभासद होते. पुढे तिचे ते कार्यवाहही झाले. हिंदुस्थानविषयक राजकारणात ह्या संस्थेच्या मताला ब्रिटिश शासनाधिकारीही ऐकून घेण्याइतके महत्व देत. ह्या संस्थेच्या शाखा हिंदुस्थानातही निघाव्या म्हणून दादाभाई हिंदुस्थानातही येऊन गेले. त्यांनी मुंबईत तिची मुख्य शाखा काढली. त्याचप्रमाणे त्या संस्थेचा लंडनमधील निधी वाढविण्यासाठी त्यांनी हिंदुस्थानातील काही राजेरजवाड्यांकडून सहस्रावधी रुपयांचे सहाय्य मिळविले. अर्थात ते द्रव्यही ह्या संस्थेतील ह्या अँग्लो-इंडियन गोटाच्याच खिशात जाई.

ह्या संस्थेच्या लंडनमधील केंद्रात दादाभाई अनेक अधिशासनीय (सरकारी) कागदपत्रांच्या आधारेच वारंवार सांगत की "हिंदुस्थानातून प्रतिवर्षी दीडशे कोटी रुपये नानारूपाने ब्रिटनच्या खिशात पडत आहेत; परंतु

त्यातील एक कवडीही हिंदुस्थानात परत जात नाही. आणि हिंदुस्थानच्या संपत्तीची ही अशी लूट उणीपुरी शंभर वर्षे चाललेली आहे! यामुळेच हिंदुस्थान भिकारी झाला आहे. हिंदुस्थानात वारंवार पडणाऱ्या भयंकर दुष्काळांचे आणि त्यात बळी पडणाऱ्या लक्षावधी प्रजेच्या प्राणहानीचे मूळ कारण ब्रिटनने चालविलेला हा हिंदुस्थानचा धनशोष, हा रक्तशोषच होय!" त्याचप्रमाणे "ब्रिटनमध्येच काय ती घेतली जाणारी I. C. S. ही परीक्षा उतरलेले मोठमोठे ब्रिटिश 'सनदी सिव्हिलियन' (अधिपत्रांकित राजसेवक) हिंदुस्थानात धाडले जातात. गव्हर्नर-जनरलपासून तो कलेक्टरपर्यंतच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना मोठमोठे पगार द्यावे लागतात. त्यांची निवृत्तीवेतनेही (पेन्शन्सही), प्रत्येकी सहस्रावधी रुपयांची असतात. तीही पौंडांत द्यावी लागतात. त्यांच्या हुंडणावळीचा बोजा हिंदुस्थानचे तिजोरीवरच पडतो. आणि त्यापायी, हिंदुस्थानचे कोटीकोटी रुपये ब्रिटनच्या खिशात पडतात. पण जर ह्या 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस'ची परीक्षा ब्रिटनप्रमाणेच हिंदुस्थानातही घेतली जाईल तर अनेक हिंदी तरुण घरबसल्या ती परीक्षा उतरू शकतीलः आणि राज्यातील उच्च अधिकारी होऊ शकतील. तितक्या पगाराचे नि निवृत्तीवेतनाचे धन हिंदुस्थानातच राहील. यासाठी, 'भारतीय नागर सेवेची' (इंडियन सिव्हिल सर्व्हिसची) परीक्षा ब्रिटनप्रमाणेच भारतातही घेतली जावी."

दादाभाईंनी, त्यांना महत्वाच्या वाटणाऱ्या वरील दोन मुख्य विधेयांवर ब्रिटिश जनतेचे मन वळविण्यासाठी उणीपुरी तीस वर्षे तरी ब्रिटनमधील नाना स्थली शतावधी व्याख्याने दिली; शतावधी लेख लिहिले. हिंदुस्थानच्या हितार्थ तो देशभक्त जो जो कळकळून 'ब्रिटिश औदार्य', 'ब्रिटिश न्यायबुद्धी', 'ब्रिटिश माणुसकी' ह्यांना उद्देशून प्रार्थू लागे तो तो ब्रिटिशांना पाझर फुटण्याचे ठायी, त्या त्यांच्या 'ईस्ट इंडियन असोसिएशन'च्या कित्येक अँग्लो-इंडियन सभासदांनासुद्धा दादाभाईंच्या ब्रिटिश राजनिष्ठतेचीच शंका येऊ लागे! त्यास दादाभाई काय उत्तरे देत त्याचा एक ठराविक प्रकार पहाः अशाच एका प्रसंगी 'ईस्ट इंडियन असोसिएशन' मधील भाषणात ते तळमळून म्हणाले : "No native from one end of India to the other is more Loyal than myself to British Rule. Because I am convinced that the salvation of India, its future prosperity, civilization, political elevation all depend on the continuance of the British Rule in India. It is because I wish that British Rule should long continue in India and that it is good for the rulers that they should know native feelings and opinions that I come forward and speak my mind freely and boldly." Dadabhai's Life by Masani: page १२५).

सारांश : "सगळ्या हिंदुस्थानात माझ्याहून ब्रिटिश सत्तेशी अधिक राजनिष्ठ असणारा नेटिव्ह (हिंदी) मनुष्य सापडणार नाही. कारण, हिंदुस्थानावर ब्रिटिश सत्तेचे राज्यछत्र सतत राहील तरच त्या देशाची उन्नती, संपन्नता नि राजकीय प्रगती होत राहील ही माझी निश्चिती झालेली आहे. हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्याचे स्थैर्यासाठीच, तुम्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांना आम्हा नेटिव्ह लोकांच्या (हिंदी लोकांच्या) भावभावना काय आहेत त्या मी मोकळ्या मनाने नि धीटपणे सांगत आहे."

परंतु दादाभाईंच्या मागण्यांना पाठिंबा देणे, म्हणजे स्वतःच्या पोटावर पाय देणे होय हे न समजण्या-इतका काही तो अँग्लो-इंडियन वर्ग दुधखुळा नव्हता. त्या ईस्ट इंडियन असोसिएशनमध्ये, अशा ब्रिटिशांचाच मोठा भरणा असल्यामुळे हिंदुस्थानच्या हिताची म्हणून जी जी गोष्ट दादाभाईंना वाटे तिचा तिचा ते विरोध करीत

चालले. शेवटी, हिंदुस्थानचे लक्षावधी रुपये खर्चून पोसलेल्या ह्या संस्थेची सत्ता हिंदुस्थान विरोधक ब्रिटिशांचे हाती गेली आणि दादाभाईंना तिचा नाद सोडून द्यावा लागला.

## दादाभाईंचा पार्लमेंट निवडणुकीत पराभव

मध्यंतरी, मागच्या पृष्ठभूमी विभागात सांगितल्याप्रमाणे सन १८८५ मध्ये हिंदुस्थानात काँग्रेसची स्थापना झाली. तीत दादाभाईंनीही प्रमुख भाग घेतला होता. "Our battle must be fought in the British Parliament and we must therefore educate the British public" ह्या त्यांच्या सूत्राचा त्यांनी काँग्रेसमंडळात मोठ्या हिरीरीने पुरस्कार केला. लगेच ह्यूम वेडर्बर्न प्रभृती लिबरल पक्षातील अँग्लो-इंडियनांच्या नि काँग्रेसमधील हिंदी पुढाऱ्यांच्या उत्साही पाठिंब्याचे बळावर, पुढच्याच वर्षी (सन १८८६) दादाभाई, इंग्लंडमधील होल्बर्न (Holborn) मतदार संघाचे वतीने, पार्लमेंटच्या निवडणुकीसाठी इच्छुक म्हणून उभे राहिले. हिंदुस्थानातून द्रव्याचे सहाय्यही त्यांना मिळाले. परंतु तेथील कॉनझर्व्हेटिव्ह ब्रिटिश मतदारांनी दादाभाईंना निवडून दिले नाही. दुसरे हिंदी पुढारी लाल मोहन बोस हेही पार्लमेंटसाठी दुसऱ्या एका ब्रिटिश मतदारसंघातून उभे राहिले होते. तेही पडले.

तथापि त्याच १८८६ सनाचे शेवटी काँग्रेसचे जे दुसरे अधिवेशन कलकत्त्याला भरणार होते त्याचे अध्यक्षपद दादाभाईंनाच देऊन हिंदीजनतेने त्यांच्या देशभक्तीचा नि ब्रिटनमधील कार्याचा मोठा गौरव केला. काँग्रेसविषयी ब्रिटिशांच्या मनात कोणताही किंतु उरू नये म्हणून आपले हृदयाविष्करण करीत असता, त्या भाषणाच्या भरात, काँग्रेससभेतील श्रोतृवंदास उद्देशून दादाभाई विचारते झाले- "What is it for which we are now met? Is this Congress a nursery for sedition or rebellion against the British Govt. ? (Cries of No! No!) or is it another stone in the foundation of the stability of that Govt. (Cries of yes! Yes!) Let us speak out like man and proclaim that we are loyal to the backbone!" (Dadabhai's Life: by Masani) "आम्ही कशासाठी येथे जमलो आहोत? काँग्रेस म्हणजे काय ब्रिटिशद्रोहाची जोपासना करणारा किंवा ब्रिटिश अधिशासनाविरुद्ध बंड उभारणारा एखादा कट आहे? (नाही! नाही! असे आवाज) का ती हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्याचा पाया अधिक टिकाऊ करण्यासाठी त्यात भर पडलेली एक बळकट शिळा आहे? (होय! होय! चे आवाज) तर मग निधड्या छातीने पुढे येऊन गर्जून सांगू या की आम्ही आहोत राजनिष्ठ, कट्टर ब्रिटिश राजनिष्ठ!!"

दादाभाईंची जी मुख्य मागणी असे की, I. C. S. ची (भारतीय नागर सेवेची) परीक्षा, इंग्लंडप्रमाणेच हिंदुस्थानातही घेता यावी. म्हणजे अनेक हिंदी तरुणांना तीत उतरून राजसेवेतील मोठमोठ्या चाकऱ्या पटकावता येतील; त्या मागणीवर त्यांनी या काँग्रेसमध्ये खूप भर दिला. पार्लमेंटमध्ये ब्राईटप्रभृती काही ब्रिटिश सभासदांनी तसे विधेयक (Bill) मांडण्याचे मान्य केले आहे असेही त्यांनी आश्वासिले. परंतु, या प्रश्नीही त्या सन १८८६ व्या वर्षीच,

## मुसलमानांचा संघटित विरोध,

दादाभाईंच्या मार्गात आडवा आला. काँग्रेस ही 'हिंदुराज्य' स्थापू पाहणारी संस्था. ती मुस्लिमांची प्रतिनिधी नाही. आणि म्हणूनच अवघ्या इंडियाच्या नावाने बोलण्याचा तिला अधिकार नाही! असा तीव्र प्रतिवाद करणारी सर सय्यद अहमदांची मुस्लिम संस्था The Patriotic Association -मुस्लिमांनी कशी स्थापली होती, ते सर्व वृत्त 'पृष्ठभूमी' ह्या खण्डामध्ये दिलेलेच आहे. त्या आणि इतर 'इस्लामिय अंजुमान' ह्या सारख्या मुस्लिम

संस्थांनी दादाभाईंच्या या योजनेविरुद्धही एकच हाकाटी केली कीं, I. C. S. ची परीक्षा जर इंग्लंडप्रमाणे, हिंदुस्थानातही घेतली जाईल तर तीत हिंदूच हिंदू उतरतील. आम्ही मुसलमान मागासलेले असल्यामुळे आमचे मूठभर तरुणही तीत उतरणार नाहीत. अर्थात मोठमोठ्या चाकऱ्यांवर नि अधिकाऱ्यांवर त्या परीक्षेत उतरणाऱ्या हिंदूंच्याच नेमणुका होणार! ब्रिटिश I. C. S. आफिसरांच्या हाताखाली नांदण्यास आम्ही राजनिष्ठ मुसलमान मान्य आहोत; पण हिंदू I. C. S. अधिकाऱ्यांच्या सत्तेपुढे आम्ही मान वाकविणार नाही! त्यायोगे आमचे हितसंबंध धोक्यात येतील! या मुस्लिम विरोधास हैद्राबादच्या निजामानेही उघडपणे पाठिंबा दिला होता.

मुस्लिमांनी या अर्थाची विरोधी पत्रके नि आवेदने पार्लमेंटच्या सभासदांनाही पाठविली. हा प्रकार पाहून दादाभाईंसारखा राजकारणातील शांतिब्रम्ह पुरुषही मनातल्या मनात चिडून गेला. ते स्वतः पारशी होते, हिंदू नव्हते. पण तरीही ते खरेखुरे राष्ट्रीय होते. त्या विषण्ण मनःस्थितीतच त्यांना बातमी मिळाली की ज्या त्यांच्या एका सहकारी मुस्लिम पुढाऱ्याला ते 'हा तरी पक्का राष्ट्रीय आहे' म्हणून गौरवीत असत तोच मुस्लीम पुढारी, काजी शहाबुद्दीन, हाही काँग्रेसच्या मुस्लिम विरोधकांना जाऊन मिळाला आहे! तेव्हा त्यांनी शहाबुद्दीनला त्याची कानउघाडणी करण्याकरिता जे वैयक्तिक पत्र दिनांक १५ जुलै सन १८८७ ते लिहिले ते वाचण्यासारखे आहे. I. C. S. परीक्षा हिंदुस्थानातही व्हावी या त्यांच्या मागणीस विरोधताना मुस्लिमांनी वर निर्दिशिलेली जी कारणे पुढे आणली त्याविषयी त्या पत्रात दादाभाई लिहितात :--"How your action has paralysed not only our own efforts, but the hands of the English friends and how keenly I feel this, more so because you have based your action on selfish interests that because the moslems are backwards you would not allow the Hindus and all India to go forward. How you have retarded our progress for a long time!" (Dadabhai's Life by Masani)

याचा सारांश असा : "तुमच्या कृत्याने आपल्या राष्ट्रीय कार्यात केवढा अडथळा आणला आहात! त्यातही मला विशेष दुःख वाटते ते तुम्ही मुसलमान तुमच्या ह्या कृत्याच्या समर्थनार्थ जी आप्पलपोटेपणाची कारणे सांगता आहा त्याचे! काय म्हणे, आम्ही मुसलमान मागासलेले आहोत. हिंदूंना नि सबंध हिंदी राष्ट्रालाही आम्ही पुढे जाऊ देणार नाही!!"

हे झणझणीत पत्र अंतस्थपणे व्यक्तिशः म्हणून दादाभाईंनी जरी लिहिले तरी सार्वजनिकपणे मात्र मुसलमानांवर तशी टीका त्यांनी केली नाही. कारण मुस्लिमांनी डोळे वटारताच त्यांच्यापुढे गुडघे टेकून नमते घ्यावे हा काँग्रेसचा प्रथमपासूनचाच 'राष्ट्रीय' खाक्या होता.

### दादाभाईंचा नवा ग्रंथ

### Poverty and Unbritish Rule in India

मध्यंतरी दादाभाईंनी पाचशे-सहाशे पानांचा एक इंग्रजी ग्रंथ इंग्लंडमध्ये प्रसिद्धिला. त्यात वर दर्शविलेल्या प्रकारची त्यांची राजकीय भाषणे नि लेख संकलिले होते. ज्या ब्रिटिश जनतेला 'सज्ञान करण्यासाठी' ते पुस्तक त्यांनी लिहिले तिच्यातील लक्षापोटी एकाने या प्रमाणात तरी ते पुस्तक चाळले होते की नाही याची जरी वानवाच होती तरी सहस्रावधी शिक्षित हिंदी लोकांना मात्र त्या पुस्तकाने स्वदेशातील धनाची ब्रिटिश राजकर्त्यांकडून कशी लूट चालली आहे, राज्यकारभारात हिंदी लोकांना परिणामकारक होईल असा लवलेशही अधिकार कसा दिला जात नाही आणि ब्रिटिश राज्यात असण्याचे सौभाग्य लाभले असताही आपला देश दुष्काळ, दारिद्र्य नि दुःख यांनी कसा

गांजला गेला आहे, याची संख्यागत (Statistical) नि साधार माहिती देऊन अस्वस्थ नि उत्तेजित करून सोडले. त्या काळाच्या मानाने त्याचा असा पुष्कळ उपयोग झाला. तथापि या पुस्तकाचे वैशिष्ट्य नि तात्पर्य त्याच्या पाचशे-सहाशे पानांतील विस्तृत लिखाणापेक्षाही अधिक ठळकपणे व्यक्त होत होते त्याच्या टीचभर नावात! कारण त्याचे नाव होते "Poverty and Unbritish Rule in India" "ब्रिटिश शीलाला न शोभेल असा हिंदुस्थानातील कारभार नि दारिद्र्य!"

**'ब्रिटिश' आणि 'अब्रिटिश'**

सशस्त्र क्रांतिकारकांचा तुरळक गट सोडला तर 'ब्रिटिश' हा शब्द त्यावेळी 'ब्रिटिशनिष्ठ ' काय किंवा 'स्वदेशनिष्ठ' काय बहुतेक पक्षांचे हिंदी पुढारी, लेखक, वक्ते हे 'सद्गुणांचा समुच्चय' या अर्थी कसे वापरीत हे त्या नावावरूनच स्पष्ट होईल. आपल्या इकडे "।।दैवी संपद्विमोक्षाय निबंधाया सुरीमता।।" अशा श्लोकामधून जसा 'दैवी' नि तद्विरुद्ध म्हणजे 'आसुरी' हे शब्द वापरले जातात त्याचप्रमाणे नि त्याच अर्थी हिंदी राजकारणात त्या काळी ब्रिटिश नि अब्रिटिश हे शब्द रुळलेले होते. British म्हणजे दैवी, न्याय्य, उदार! Unbritish म्हणजे आसुरी, अन्याय्य, अनुदार! ब्रिटिश राज्य म्हणजे दैवी संपद्, धर्मराज्य. त्याविरुद्ध काही आक्षेप नव्हता. उलट तेच आम्हां हिंदवासीयांवर चिरंतन टिकावे हीच आमची मूलभूत राजकीय निष्ठा. परंतु हिंदुस्थानातील राज्यकारभारात जे काही अन्- ब्रिटिश म्हणजे ब्रिटिश शीलाला न शोभणारे फुटकळ अन्याय चुकून घडतात, ब्रिटिश जनतेस नकळत घडतात, तेवढे निवारले जावे की हिंदुस्थानची 'Poverty' दारिद्र्य, दुष्काळ, दुर्दशा ही विलयाला गेलीच म्हणून समजावे. 'ब्रिटिश ' राज्य हे काही त्या दारिद्र्य, दुष्काळ, दुर्दशेचे कारण नव्हे. त्याचे कारण राज्यकारभाराची अब्रिटिश पद्धत एवढेच!

**लिबरल नि कॉँझर्व्हेटिव्ह**

ब्रिटिश लोकांतील त्यावेळच्या कॉँझर्व्हेटिव्ह आणि लिबरल ह्या दोन प्रमुख राजकीय पक्षांपैकी हिंदी लोकांच्या वरील भोळ्या भावनेचा उपयोग आपली तुंबडी भरण्यासाठी जर कोणी पुरापुरा करून घेतला असेल तर तो लिबरल पक्षानेच होय. माझ्या आत्मचरित्राच्या 'पूर्वपिठिका ' खंडात हिंदुस्थानविषयक राजकारणात ब्रिटिश लोकांमध्ये जे दोन पक्ष असत त्या 'दंडनैतिक ' नि 'कूटनैतिक ' पक्षाच्या धोरणातील विभेद नि त्याचे स्वरूप ही आम्ही विशदिली आहेतच. त्यापैकी कान्झर्व्हेटिव्ह पक्ष हा दंडनैतिक वृत्तीचा आणि लिबरल हा कूटनैतिक वृत्तीचा होता. दोघेही कट्टर ब्रिटिश साम्राज्यवादीच. पण लार्ड सालिसबरीसारखे कान्झर्व्हेटिव्ह पक्षाचे नेतृत्व करणारे पुरुष उघडपणे म्हणत, "हिंदी प्रजेला नि ब्रिटिश प्रजेला सर्वांशी समान अधिकार आहेत असे जे लिबरल म्हणतात ते राजकीय ढोंग आहे." "It is political hypocricy!" TIMES (लंडन) सारखी कान्झर्व्हेटिव्ह वृत्तपत्रे उघड उघड लिहीत की "ज्या राणीच्या घोषणेचा आधार हिंदी पुढारी घेतात त्यात इतकेच वचनिले आहे की ब्रिटिश साम्राज्यातील सर्व प्रजाजनांना आम्ही शक्यतो समानतेने वागवू. हिंदी पुढारी या वाक्यातील 'शक्यतो ' so far as it may be - हे शब्द सोयिस्करपणे विसरतात! आम्ही ब्रिटिश लोक राज्यकर्ते, तुम्ही हिंदी लोक प्रजाजन हे तुमचे आमचे खरे नाते. मग तुम्ही राजनिष्ठ रहा किंवा राहू नका! आम्ही खड्गाने साम्राज्य मिळविले आणि खड्गानेच ते चालविणार!" वस्तुतः हीच भाषा खरी होती; पण ती भीतीप्रद होती आणि म्हणूनच हिंदी पुढाऱ्यांना नावडती होती. यास्तव तशी उद्दंड, 'अब्रिटिश ' म्हणजेच आसुरी भाषा बोलणाऱ्या कान्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या तोंडी न लागता

आंजारूनगोंजारून बोलणाऱ्या लिबरल पक्षालाच सर्वसामान्य हिंदी जनतेने आपले त्राते मानले, ‘जातिवंत ब्रिटिश ‘ ते हेच म्हणून गौरविले. त्यांतही पक्षातील मोर्लेप्रभृती पुढाऱ्यांच्या ग्रंथात व्यक्तीस्वातंत्र्याची, मानव्याची, समतेची, स्वातंत्र्याची कोण हृदयगम गद्यकाव्ये गायलेली होती! हिंदी काँग्रेसचे सूत्रधार जे ह्यूम, वेडर्बर्न प्रभृती अँग्लो-इंडियन होते तेही याच लिबरल पक्षाचे अनुयायी. त्या पक्षाचे नावसुद्धा किती आश्वासक!- ‘लिबरल ‘, ‘उदार’! जर आणि जेव्हा केव्हा हे मोर्ले प्रभृती ‘जातिवंत ‘ ब्रिटिश ह्या लिबरल पक्षाच्या निवडणुकीत विजयी होऊन, हिंदुस्थानचा राज्यकारभार हाती घेतील तर नि तेव्हा ब्रिटिश प्रजाजनांच्या समतेनेच आम्हा हिंदी प्रजाजनानांही आमच्या या समाइक ब्रिटिश साम्राज्यातील सर्वाधिकार महाराणीच्या ‘म्याग्नाचार्टा ‘ प्रमाणे उपभोगिता येतीलच येतील! अशा दृढ श्रद्धेने हिंदी काँग्रेस ही लिबरल पक्ष म्हणेल ते प्रमाण मानू लागली.

**दादाभाई नवरोजींचा पार्लमेंटात प्रवेश**

आणि कोण आश्चर्य! काँग्रेसी देशभक्तांच्या ह्या वरील दृढश्रद्धेच्या नवसाला एका प्रकरणात तरी देव अकस्मात खरोखरीच पावला असे ‘ब्रिटिशनिष्ठ ‘ आणि ‘स्वदेशनिष्ठ ‘ अशा दोन्हीही हिंदी पक्षांना वाटावे अशी एक घटना लगेच घडून आली. सन १८९३ ह्या वर्षाच्या ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकीत लिबरल पक्ष बहुसंख्येने निवडून आला. इतकेच नव्हे, तर लिबरल पक्षाच्या दर्शिकेवर (टिकिटावर) उभे राहिलेले दादाभाई नवरोजी हे सुद्धा फिन्सबेरीच्या मतदारसंघातून ब्रिटिश पार्लमेंटात निवडून आले! हिंदी काँग्रेसचे ख्यातनाम पुढारी दादाभाई नवरोजी M. P. झाले! कान्झर्व्हेटिव्ह पक्षाचे अध्वर्यु, जे लॉर्ड सालिसबरी त्यांनी तेथे स्वतः येऊन निवडणुकीचे वेळी कसून विरोध केला होता आणि ब्रिटिश मतदारांना निक्षून सांगितले होते की त्या काळ्या माणसाला, That Black Man ला, केव्हाही मत दऊ नका. परंतु लिबरल पक्षाचे प्रख्यात पुढारी जे ग्ल्याडसनसाहेब त्यांनी लार्ड सालिसबरीच्या ह्या अपशब्दास निषेधून दादाभाईंनाच मते द्यावी असे मत लगोलग प्रसिद्धिले. त्यामुळे बहुतेक लिबरल पक्षियांनी दादाभाईंनाच मते दिली. हिंदी लोकांनीही ह्या निवडणुकीचे महत्व जाणून पाण्यासारखा पैसा व्यय केला. दादाभाई हे पूर्वी मल्हारराव गायकवाडांचे वेळी काही काळ बडोद्याचे प्रधान होते. त्या ऋणानुबंधाने नि स्वदेशाभिमानाने प्रेरित होऊन, त्यावेळी विलायतेतच वास्तव्य करीत असलेल्या बडोद्याच्या तरुण महाराजांनी, श्रीमंत सयाजीरावांनी, दादाभाईंना इतर साहाय्य दिलेच; पण निवडणुकीच्या मतदानदिवशी वाहनांची अडचण पडलेली पाहाताच आपल्या संस्थानी थाटाच्या नि शोभिवंत घोड्यांच्या दहाबारा गाड्यांचा संचचा-संच दादाभाईंच्याकडे धाडून दिला. त्यावेळी ब्रिटनमध्ये असलेल्या बहुतेक हिंदी गृहस्थांनी नि विद्यार्थ्यांनीही स्वतः स्वयंसेवक बनून दादाभाईंच्या निवडणूकप्रश्नी, तो एक राष्ट्रीय प्रश्नच समजून बहुत परिश्रम केले. शेवटी पाचएक मतेच अधिक पडून का होईना दादाभाईंनी निवडणूक जिंकली खरी! लार्ड सालिस्बरीनी हेटाळलेल्या काळ्या माणसाने That Black Man ने लार्ड सालिस्बरीच्या गोऱ्या इच्छुकाला धूळ चारली!

ही बातमी हिंदुस्थानात येताच जिकडे तिकडे एखादे महायुद्ध जिंकल्याप्रमाणे आनंदीआनंद झाला. अनेक नगरांतून मिरवणुकी निघाल्या. मोठमोठ्या सभा झाल्या. काही प्रमाणात त्या परिस्थितीमध्ये ते सहाजिकही होते. कारण त्या काळी हिंदी जनतेत लक्षावधी लोक असे होते की त्यांना स्वतःच वाटे की राज्यकारभार चालविण्यास आम्ही अपात्र आहो हे जे ब्रिटिशलोक आमच्याविषयी म्हणतात ते काही खोटे नाही. ब्रिटिशांसारख्या प्रातिनिधिक नि अद्यावत राज्यसंस्था आम्हांस कुठल्या चालविता येणार! अशा हिंदी लोकांच्या आत्मनिष्ठेवर ही जी ग्लानी

आलेली होती ती झटकून टाकण्यास पार्लमेंटमध्ये निवडून येण्यात दादाभाईंनी जे यश मिळविले त्याचा आणि त्यायोगे देशभर जी उत्साहाची लाट उसळली तिचा बराच उपयोग झाला. ब्रिटिश मतदारही जर प्रत्यक्ष ब्रिटनचा राज्यकारभार हाकणाऱ्या पार्लमेंटमध्ये मोठमोठ्या ब्रिटिश पुढाऱ्यांच्या समकक्षतेने मतामत देण्यास आमच्या दादाभाईंना पात्र समजतात तर आमच्या देशातील राज्यकारभार हाकण्याची पात्रता, त्या दादाभाईंना आणि त्यांच्या समकक्ष असणाऱ्या सुरेंद्रनाथप्रभृती प्रांतोप्रांतीच्या आमच्या अनेक देशभक्त पुढाऱ्यांना नि प्रतिनिधींना ती पात्रता असलीच पाहिजे असा हिंदी जनतेतील ह्या लक्षावधी हतश्रद्ध लोकांमध्ये आत्मविश्वास संचरू लागला. इतक्यापर्यंत ठीक होते.

**ब्रिटिशनिष्ठेची लाटची लाट**

पण ज्यांना स्वतःला ब्रिटिश साम्राज्याचे राजनिष्ठ प्रजाजन म्हणवून घेण्यात परमावधीचा आत्मसन्मान वाटत असे अशा काँग्रेसमधील लक्षावधी हिंदी लोकांनी हिंदुस्थानात दादाभाईंच्या पार्लमेंटप्रवेशाची बातमी पोचताच ब्रिटिशनिष्ठतेचा जो जयघोष चालविला तो मात्र दुबळ्या आशावादाचा उच्चांक होता. शतावधी सभांतून नि वृत्तपत्रांतून एकसूत्राने जो तो सांगत सुटला- आज एक हिंदी नागरिक M. P. झाले. उद्या दहा होतील, दहाचे वीस होतील. त्यांची भाषणे भरपार्लमेंटात ऐकता ऐकता, होता होता, हिंदुस्थानच्या राज्यकारभारात ज्या सुधारणा व्हाव्यात म्हणून काँग्रेस म्हणते आहे (आणि 'काही सुधारणा' पलीकडचे दुसरे काही त्यांना नकोच होते!) त्या सर्वच्या सर्व मान्य करण्यास प्रत्यक्ष ब्रिटिश पार्लमेंटचेच मन वळल्यावाचून राहणार नाही! आपण 'लिबरल' पक्षाची कास मात्र सोडता कामा नये!

परंतु कान्झर्व्हेटिव्हही चलाखीत काही उणे नव्हते. लिबरल पक्षाची हिंदुस्थानात वाढलेली ही पत नि ही शेखी उतरविण्यासाठी आणि स्वतःला इंडियन नॅशनल, हिंदी राष्ट्रीय, असे म्हणविणारी काँग्रेस ही हिंदी जनतेची एकमेव प्रतिनिधी नाही हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी काँग्रेसला अनेक प्रसंगी विरोधिणाऱ्या श्रीयुत भावनगरी नावाच्या एका भारी हिंदी (पारशी) गृहस्थाला लिबरल पक्षाविरुद्ध एका दुसऱ्या ठिकाणच्या निवडणुकीत मागेच उभे केले होते; आणि कान्झर्व्हेटिव्हांच्या पाठिंब्यावर पार्लमेंटमध्ये निवडूनही दिले होते. त्यामुळे दादाभाईंच्या, काँग्रेसच्या आणि लिबरल पक्षाच्या नाकास मिरच्या झोंबल्यावाचून राहिल्या नाहीत हे काय सांगावयास हवे? म्हणूनच भावनगरी हे हिंदुस्थानचे प्रतिनिधी नव्हते, पार्लमेंटातली त्यांची निवड आम्ही खिसगणतीत सुद्धा धरली नाही, दादाभाईंची निवड हीच हिंदी देशभक्तांची अशी पहिली पार्लमेंटची निवड होय असे हिंदी काँग्रेसचे म्हणणे होते. म्हणूनच तिचा एवढा गाजावाजा.

**एक निरुपद्रवी टूम**

वास्तविक पाहता दादाभाईंना पार्लमेंटात निवडून देणे ही लिबरल पक्षाने काढलेली एक निरुपद्रवी टूम होती. एक राजकारणी ढंग (political stunt) होता इतकेच काय ते. "आशा कालवतीम् कुर्यात कालो विघ्नेन योजयेत" हा कुटिल राजनीतीचा मूलमंत्रच आहे! आश्चर्य इतकेच की अशा भोळ्या आशेपायी हिंदी जनता नि तिचे पुढारी इतके हुरळून गेले तरी कसे!

## आयर्लंडचे उदाहरण

त्यातही पार्लमेंटमध्ये निवडून गेल्याने ब्रिटिशांची मगरमिठी लवलेशही ढिली करता येत नाही हे आधीच सिद्ध करून दाखविणारा आयर्लंडचा अगदी ताजा अनुभव दादाभाई प्रभृतींच्या डोळ्यांसमोर होता. पुन्हा आयरिश लोक गोरे होते, ब्रिटिशांप्रमाणेच ख्रिश्चन होते. युरोपियन होते. ब्रिटिश राज्यघटनेनेच त्यांना अनेक आयरिश प्रतिनिधी ब्रिटिश पार्लमेंटात धाडण्याचा अधिकार दिलेला होता. आयरिश मतदारसंघातून आयरिश मागण्यांना पुरस्कारिण्याच्या प्रतिज्ञेवर त्यांची निवडणूक होई. इतक्या गोष्टी अनुकूल असूनही त्या आयरिश प्रतिनिधींना ब्रिटिश पार्लमेंटात वर्षानुवर्षे धडपडता धडपडता नाकी नव आले. पण आयर्लंडच्या खऱ्या हिताच्या अशा कोणत्याही सुधारणा त्यांना त्या ब्रिटिश पार्लमेंटमध्ये घडवून आणता आल्या नाहीत. पार्नेलसारखे त्यांचे धुरंधर पुढारीही थकून गेले. विटून गेले. शेवटी बहुतेक आयरिश पक्षांनी ब्रिटिश पार्लमेंटवर बहिष्कार घातला. प्रतिनिधी धाडण्याचा घटनात्मक अधिकार असताही पार्लमेंटचे तोंड पहाण्याचे सोडून दिले. कित्येकांनी 'होमरूल', 'सीनफिन' सारख्या स्वदेशी संघटनांच्या नि निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळी काढल्या. तर जे प्राणावर उदार झाले ते सशस्त्र क्रांतीच्या गुप्त गुहांत गडप झाले. हिंदुस्थानात इंग्लंडमध्ये हिंदी काँग्रेसची चळवळ चालली असता हातभर अंतरावर आयर्लंडात ह्या गोष्टी अगदी त्याच वेळी घडत होत्या.

आयर्लंडला पार्लमेंटरी चळवळीत आलेले हे अपयश नि वाटलेला हा वीट त्या हिंदी जनतेच्या नि हिंदी पुढाऱ्यांच्या अगदी डोळ्यांपुढे होता. पण तरीही त्यांचे डोळे उघडले नाहीत. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' अशी म्हण आहे पण ती शहाण्यांच्या प्रकरणी लागू असते. पुढच्यास ठेच लागली असताही न थांबता स्वतःला ठेच लागेतो त्याच वाटेने ठेचाळत जाणाऱ्यांच्या प्रकरणी नव्हे!

## देशभक्त दादाभाईंचे प्रभावी व्यक्तिमत्व

तथापि त्यामुळे देशभक्त दादाभाईंच्या वैयक्तिक थोरपणाला काहीच बाध येत नाही. त्यांचे प्रयत्न, सातत्य नि व्यक्तिमत्व दांडगे होते. थोडक्यात सांगावयाचे तर त्यांची ही निवडणूक हा त्यांच्या भोंगळसुती राजकारणाचा विजय नव्हता तर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा काय तो तो विजय होता. पार्लमेंटमध्येही त्यांच्या वैयक्तिक वर्तनाचा डौल नि वक्तृत्वाची शैली मोठ्यामोठ्या ब्रिटिश मंत्र्यांच्या तोलाची होती. हिंदुस्थानची 'पार्लमेंटरी आघाडी' आता उभारावयाची अशा हिरिरीने त्यांनी हिंदुस्थानचा प्रश्न पार्लमेंटमध्ये येता जाता पुढे आणण्याचा आटोकाट यत्न चालविला. परंतु लवकरच त्यांना आढळून आले की हिंदी राज्यकारभारात कोणतीही सुधारणा करण्याचा प्रश्न त्यांनी काढला की, त्यांचे लिबरल पक्षीय सभासदही अंगचोरपणा करतात. लिबरलपक्षाच्या हाती राज्यसत्ता आली असताही वर्षांमागून वर्षे चालली पण ब्रिटिश शासनाकडून चाललेल्या हिंदुस्थानच्या प्रतिवार्षिक कोट्यवधी रुपयांच्या लुटीपैकी एक कवडीही त्यांना थांबविता आली नाही. राज्यकारभारात नवे असे तसुभर स्थानसुद्धा हिंदी लोकांना देवविता आले नाही. अधिकांत अधिक म्हणजे दादाभाईंची मागे सांगितल्याप्रमाणे एक किरकोळ मागणी जी असे की हिंदुस्थानातही इंग्लंडप्रमाणेच I. C. S. ची परीक्षा घेतली जावी ती काय ती मान्य करणारा एक ठराव पार्लमेंटात संमत करून घेता आला. तेवढ्याने सुद्धा त्यांच्या नि काँग्रेसच्या करपलेल्या आशेला नवी पालवीही फुटली. परंतु प्रत्यक्ष पार्लमेंटचा ठराव झाला असताही त्याचा वर्तावं करण्यास ब्रिटिशांच्या हिंदी निर्वाहक विभागाने (Indian Executive ने) चक्क नाकारले! 'प्रस्तुत

अव्यवहार्य ' म्हणून चिठ्ठी लावून तो ठराव निर्वाहाधिकाऱ्यांनी जो एकदा खुंटीवर टांगून ठेवला तो पुन्हा काही खाली काढला नाही! इतर प्रकरणी जर पार्लमेंटरी ठरावाची अशी हेटाळणी होती तर निर्वाहक विभागाधिकाऱ्यांना (Ececutive officers ना) पदच्युत केले जाते! पण त्याचा वर्तावा होऊ नये ह्याच गुप्त मनोगताने जो ठराव केला गेला त्याची कोण कशाला विचारपूस करणार! शेवटी जसे हात हलवीत ते पार्लमेंटमध्ये गेले तसेच हाती कोणताही लभ्यांश न लागल्यामुळे, काही वर्षांनी ती पार्लमेंट नि ते लिबरलपक्षीय अधिशासन विसर्जन पावले तेव्हा दादाभाई तसेच हात हलवीत पार्लमेंटातून बाहेर पडले.

अशा ठेचावर ठेचा बसत गेल्यामुळे दादाभाईही मनात वरचेवर जळफळू लागले. अधूनमधून ब्रिटिशांना उद्देशून काहीशी धमकीची भाषाही बोलू लागले की, " Do not invite a catastrophe by being too obdurate. The Government should recollect how such obdurate conduct on the part of the British govt. led to 1857" (See Dadabhai's speeches: by Natesan) म्हणजे "असा अगदीच दुराग्रह धरू नका! तुमच्या अशाच दुराग्रहापायी सन १८५७ चे संकट कोसळले हे ब्रिटिश सरकारने विसरू नये!" दादाभाईंच्या देखोदेखी अनेक ब्रिटिशनिष्ठ म्हणविणारे हिंदुस्थानातील काँग्रेसपुढारीही सन १८५७ च्या 'शिपायांच्या बंडाचे' नावे ब्रिटनला अशा धमक्या केव्हा केव्हा देत.

## सशस्त्र क्रांति पक्षाला दादाभाईप्रभृतींची नकळत श्रद्धांजली!!!

पण ब्रिटिशांना अशा धमक्या देण्यापुरता तरी सन १८५७ च्या सशस्त्र क्रांतियुद्धाचा पाठिंबा ब्रिटिशनिष्ठांच्या 'पार्लमेंटरी आघाडीला' घ्यावा लागे यात केवढा अर्थ भरलेला होता हे त्यांच्या ध्यानी आले होते का? जर ते ५७ चे सशस्त्र क्रांतियुद्ध घडले नसते तर ही काँग्रेसची पार्लमेंटरी आघाडी "दुराग्रहाने आमचे न ऐकाल तर सत्तावनचे संकट गुदरेल" अशी दुसरी कशाची धमकी ब्रिटिशांना देऊ शकती? अर्थात त्यांची ब्रिटिशनिष्ठ पार्लमेंटरी आघाडीसुद्धा यशस्वी होण्यासाठी कोणती तरी ब्रिटिशविद्रोही अशी क्रांतिकारकांची सशस्त्र आघाडी देशात हवी होती हेच अशा धमक्यांवरून सिद्ध होत नव्हते का?

## ब्रिटिश कमेटी ऑफ दी इंडियन नॅशनल काँग्रेस

मध्यंतरी हिंदी काँग्रेसने आपली एक समिती लंडनमध्ये स्थापली होती. काँग्रेसच्या ध्येयाची, ब्रिटिश निष्ठतेची, ठरावांची माहिती ब्रिटिश जनतेत प्रचारविण्यासाठी ही समिती झटत असे. तिचे 'इंडिया' नावाचे एक स्वतःचे नियतकालिक पत्रही निघे. दादाभाई तर तिच्यात होतेच पण तिचे खरे सूत्रधार जे ह्यूम, वेडर्बर्न काटनप्रभृती अँग्लो-इंडियन पुढारी हिंदी काँग्रेसचे आद्य सूत्रधार होते तेच असत. तिचा सहस्रावधी रुपयांचा सारा व्यय हिंदुस्थानच्या पैशातून चाले आणि तिचे ब्रिटनमधील प्रचारक, संपादक, चाकर सर्व ब्रिटिशच असल्यामुळे त्या पैशानेही ब्रिटनच्याच खिशांची भर होई. ही ब्रिटनमधील काँग्रेस कमेटी स्वतःस जरी हिंदुस्थानची राजकीय प्रतिनिधी समजे तरी ब्रिटिश शासनाने तिचा तसा प्रातिनिधिकपणा केव्हाही मानला नाही. तिच्या तशा प्रातिनिधिक नात्याने धाडलेल्या लांबलांब आवेदनांची किंवा वक्तव्यांची पोच सुद्धा ब्रिटिश शासनाकडून अधिकृतपणे देण्यात येत नसे. बेल्बी कमिशन सारखे 'हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची पाहणी' करणारे एखादे दिखाऊ कमिशन किंवा कमेटी जर दादाभाईप्रभृती काँग्रेस पुढाऱ्यांच्या आग्रहावरून ब्रिटिश शासनाकडून नेमली गेली तर त्याविषयी ब्रिटिशांना अभिनंदिण्यासाठी, त्यांच्यापुढे काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या साक्षी देवविण्यासाठी किंवा

हिंदुस्थानचे विषयात ब्रिटिश जनतेस ‘सज्ञान’ करण्यासाठी ह्या ब्रिटिश काँग्रेस कमेटीकडून सुरेंद्रनाथ बानर्जी, वाच्छा, गोपाळराव गोखले प्रभृती काँग्रेसच्या हिंदी पुढाऱ्यांना ब्रिटनमध्ये आणण्यात येई. त्या शिष्टमंडळाकडून ब्रिटनमधील काही नगरातून सभा घेऊन हिंदुस्थानच्या राज्यकारभारातील उणिवांविषयी वा अन्यायाविषयी भाषणे करविण्यात येत.

तथापि ब्रिटनमधील बहुतेक वृत्तपत्रे काँग्रेसच्या अशा ब्रिटनमधील भाषणाविषयी नि ठरावांविषयीच काय पण हिंदुस्थानातील अधिवेशनांविषयीही दोन ओळीसुद्धा बहुधा लिहीत नसत. त्यांनी आपल्या चळवळींना काहीतरी प्रसिद्धी द्यावी म्हणून ब्रिटनमधील काँग्रेस कमेटीने एका इंग्रजी दैनिकाचे काही भाग (shares) सुद्धा विकत घेवविले होते. आमची बातमीपत्रे छापा, आम्ही पैसे देतो अशी गळ घालून काही वेळा काही इंग्रजी वृत्तपत्रातून काँग्रेसची बातमी छापविली जाई. पण पैसे देऊन छापविली तरी ती बातमी ब्रिटिश जनतेने वाचली पाहिजे ना? लाखात एखादा ब्रिटिश वाचक ती वाचीत असेल नसेल.

## इतक्यात सन १८९७ चे वर्ष उजाडले

ह्या वर्षी ब्रिटिश साम्राज्याची त्यावेळी राणी असलेली नि हिंदुस्थानची सम्राज्ञी म्हणविणारी क्वीन व्हिक्टोरिया हिच्या राज्यारोहणाला साठ वर्षे पुरी होत होती या निमित्ते साऱ्या ब्रिटिश साम्राज्यभर तिच्या ‘ज्युबिली’चा मोठा महोत्सव साजरा करण्याची आटोकाट सिद्धता चालू झाली. याच संधीस ब्रिटिश काँग्रेस कमिटीने हिंदी पुढाऱ्यांचे एक शिष्टमंडळ ब्रिटनमध्ये आणविले. कित्येक ब्रिटिश नगरांतून त्यांची हिंदुस्थानविषयक व्याख्याने झाल्यानंतर त्या दौऱ्याच्या समारोपासाठी शेवटी दादाभाई, वाच्छा, गोखले प्रभृती ब्रिटिशनिष्ठ पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटनमधल्या हिंदवासीयांची एक परिषद भरविण्यात आली. तीत एकमताने जो ठराव संमत झाला त्यात म्हटले होते :“Unless the present unrighteous unBritish system of Govt. is reformed into a truly righteous and truly British system destruction of India and disaster to the British Empire are inevitable. . . We Indians believe that our highest patriotism and best interests demand the continuance of the British Rule.” (Dadabhai’s Life by Masani page ३९६). सारांश : “सध्याची अन्याय्य नि अब्रिटिश राज्यपद्धती पालटून खरीखरी न्यायी नि ‘जातिवंत ब्रिटिश’ राज्यपद्धती चालू केली नाही तर हिंदुस्थानचा घात झाल्यावाचून नि ब्रिटिश साम्राज्यावर अनिष्ट कोसळल्यावाचून रहाणार नाही!. . . आम्हा हिंदी लोकांची मात्र हीच निष्ठा आहे की आमच्या उदात्त देशभक्तीच्या नि उत्कृष्ट हितलाभाच्या दृष्टीनेही हिंदुस्थानवर ब्रिटिशांचे राज्य सतत चालू रहाणे अवश्य आहे!”

परंतु ज्या ‘सद्प्रवृत्त ब्रिटिश जनतेला’ उद्देशून तो ठराव केला होता त्या ब्रिटिश जनतेने एक भुक्कड भविष्य म्हणून त्याची हेटाळणी करण्याइतके सुद्धा त्यास महत्व दिले नाही. त्यांच्या राणीच्या हीरक महोत्सवाच्या, डायमंड ज्युबिलीच्या, नगाऱ्यांच्या घाईत ही आमच्या पोकळ ठरावाची टिमकी लंडनच्या लंडनलासुद्धा ऐकू गेली नाही.

## परंतु तिकडे सुदूर पुण्यास

त्या ब्रिटिशांच्या राणीचा तो डायमंड ज्युबिलीचा महोत्सव रंगात आला असता त्याच रात्री तिकडे पुण्यास ब्रिटिश अत्याचाराचा सूड घेण्यासाठी चाफेकरांनी रँड नि आयर्स्ट साहेबांना गोळी घालून जेव्हा ठार मारले नि

रंगाचा भंग केला तेव्हा मात्र त्या नगाऱ्यांच्या घाईतही त्या पुण्याच्या टीचभर पिस्तुलाचा बार लंडनपर्यंत ध्वनत प्रतिध्वनत जाऊन ब्रिटिश जनतेला आपण होऊन दणकन् ऐकू गेला! सारी ब्रिटिश पत्रे पुण्याच्या बातम्या आपण होऊन छापू लागली, आणि चवताळून संत्रस्तपणे विचारू लागली कोणी झाडला हा बार? कोण आहे तो चाफेकर? त्याच्या बारास मंगल पांड्याच्या बारातील दारूचा उग्र दर्प येत आहे!

हिंदुस्थानांतील नि विशेषतः मुंबई प्रांतातील ब्रिटिश अधिकारी तर नुसते पिसाळून गेले. त्यांच्या त्या वेळच्या वृत्तीचे वर्णन पुण्यास त्याकाळी नावाजलेल्या 'सन्मित्र समाज' ह्या मेळ्याच्या त्या वेळच्या एका पदात यथावत् असताही मोठे चटकदारपणे केले होते. त्यातील खालील दोन ओळी तर लोकांच्या तोंडी घरोघर रुळलेल्या असत. रँडसाहेबाला गोळी घालून ठार केले जाताच मुंबई शासनाने टिळक, नातू, प्रभृतींच्या धरपकडीच्या ज्या पिसाट आज्ञा सोडल्या, त्या अरेरावीची टिंगल करीत ह्या ओळी म्हणतात :-

*प्रथम पुणेकर, त्यामधी ब्राह्मण, त्यातहि कोकणस्थांसिं धरा।।*
*ह्यांनी गोरा ठार मारिला! कोणाला तरी कैद करा।।*

### काँग्रेसचे ठराव नि क्रांतिकारकांच्या ठिणग्या

ह्या प्रकरणात मी तिकडे जाईतोपर्यंतचा ब्रिटनमधल्या हिंदी आंदोलनाचा सारांश देण्याचा काय तो उद्देश असल्यामुळे चाफेकर-रानडे प्रकरणाचा ब्रिटनमध्ये काय प्रतिध्वनी उमटला तेवढाच काय तो संदर्भ इथे दिला आहे. त्यावरूनही हे स्पष्ट होत आहे की ब्रिटिश जनतेचे लक्ष हिंदुस्थानकडे खेचून घेण्याच्या प्रश्नापुरते पाहिले तरीही काँग्रेसच्या ठरावापेक्षा क्रांतिकारकांच्या ठिणग्याच अधिक प्रभावी ठरत! चाफेकर-रानड्यांचे क्रांतिकारक स्फोटानंतर महाराष्ट्रभर जी धरपकड झाली तिचे समर्थन करून कान्झर्व्हेटिव्ह तर काय पण लिबरल पत्रेही ह्या बंडखोरांचा बीमोड केलाच पाहिजे म्हणून लेखावर लेख लिहू लागली. इतकेच नव्हे, तर त्यांनी बिचाऱ्या ब्रिटिशनिष्ठ काँग्रेसी पुढाऱ्यांवरही त्या ब्रिटिश विद्रोहाचे खापर फोडण्यास मागेपुढे पाहिले नाही.

### हाइंडमन

त्यांना ठणठणीत प्रत्युत्तर देणारा ठळक अपवाद असा एकच आढळला. तो म्हणजे कोणा काँग्रेसी पुढाऱ्याचा नव्हे तर हाइंडमन ह्यांच्या लंडनमध्ये निघणाऱ्या 'जस्टिस' पत्राचा होय. 'चाफेकरांच्या कृत्यास आम्ही निषेधितोच' अशी त्यावेळची ठराविक अथश्री केल्यानंतर ब्रिटिश जनतेला खडसावून हाइंडमन लिहितात, "हिंदुस्थानात बंडाची वृत्ती फोफावते आहे म्हणता? तुमच्या ब्रिटिश शासनाधिकाऱ्यांनी हिंदुस्थानावर जी प्रपीडक राज्यसत्ता लादलेली आहे तिला उलथून पाडण्यासाठी हिंदी लोकांपैकी जर कोणी आज खरोखरीच सशस्त्र बंड करू निघाले असतील तर त्यात काहीच आश्चर्य नाही. आश्चर्य असेल तर ह्याचे की अशा छळक परकीय सत्तेविरुद्ध त्या हिंदी लोकांनी ह्याचे पूर्वीच सशस्त्र बंड कसे उभारले नाही!" हाइंडमन हे सोशल डेमोक्रॅट नावाचा जो पक्ष तिकडे नव्यानेच वाढीस लागला होता त्याचे ब्रिटिश पुढारी असत. त्या पक्षाचे मूलसूत्रच साम्राज्यविरोध हे असे. त्यांच्या ब्रिटिश साम्राज्याच्या मनःपूर्वक विरोधामुळे लिबरल प्रभृती पक्ष तर त्यांच्यावर चिडलेलेच असत, पण ब्रिटनमधला त्यावेळी हळूहळू संघटित होत चाललेला कामगारपक्ष (Labour Party) ही त्यांना 'अतिरेकी समाजवादी' (Extreme Socialist) म्हणे नि त्यांच्या पक्षाशी फटकून राही. कारण की कामगारांचे कल्याणासाठीच साम्राज्यप्रथा बुडविली पाहिजे असे त्या समाजवाद्यांचे जे पुस्तकी मत असे त्याला ब्रिटिश कामगारांचा प्रत्यक्ष

अनुभव मुळीच जुळत नसे. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानावरील साम्राज्यसत्तेमुळे जी कोट्यांनुकोटी रुपयांची लूट ब्रिटनने चालविलेली असे तिच्यामुळे सैनिक, नाविक, श्रमजीवी प्रभृती झाडून साऱ्या सामान्य ब्रिटिशवर्गाचेही उखळ उच्च वर्गाप्रमाणेच पांढरे होत असे. ह्या रोखठोक लाभामुळे काँग्रेस जिला 'ब्रिटिश जनता' असे म्हणत असे तीही आर्थिक दृष्टीने सुद्धा हिंदुस्थानावरील ब्रिटिशसत्तेला पूर्ण पाठिंबाच देणारी होती. यास्तव 'सोशल डेमोक्रॅट' पक्षाला ब्रिटनमध्ये सक्रिय पाठिंबा असा नव्हताच म्हटले तरी चालेल. तथापि हाइंडमन ह्यांच्या व्यक्तिमत्वाचा पगडा मात्र सार्वजनिक जीवनात पडल्याविना राहात नसे. सोशालिस्टांचा प्रभाव त्यावेळी ब्रिटनपेक्षा युरोपातच अधिक असल्यामुळे युरोपियन पुढारी म्हणूनही हाइंडमन ह्यांना राजकारणात मान्यता मिळाली होती. ते ब्रिटिश शासनावर इतकी कडक टीका करीत की तिला आमचे हिंदी पुढारी मनातून ती आवडली तरी उघडपणे वाखाणण्यास भीत.

दादाभाईंचाही हाइंडमनकडे मनोमन ओढा असे. त्यांचे परस्परांचे घरी जाणेयेणेही असे. त्यांनी भरविलेल्या प्रकट सभांतून हाइंडमनची भाषणे हिंदुस्थानचे विषयावर ते केव्हा केव्हा करवीत. अलीकडेच गोखल्यांनीही दादाभाईंसह हाइंडमनसमवेत एकाच वाक्पीठावरून भाषणे केली होती. ब्रिटिश काँग्रेस कमिटीतील वेडर्बर्न कॉटन प्रभृती ब्रिटिश लिबरलांनी वरील हिंदी पुढाऱ्यांची कानउघाडणीही केली होती. उलटपक्षी 'हे हिंदी पुढारी ब्रिटिश लिबरलांचा हा सासुरवास सोसण्यात जी भीरुता दाखवीत आहेत तीच त्यांच्या पारतंत्र्याचे कारण आहे' असा हाइंडमन त्यांचा यथेच्छ उपहास करीत. पण जेव्हा चाफेकर रानड्यांच्या प्रकरणामुळे नि हाइंडमनच्या 'जस्टिस' पत्रातील वरील लेखामुळे लिबरल पक्ष अगदीच पिसाळून उठला आणि ब्रिटिश काँग्रेस कमिटीतही विशेषतः दादाभाई नि गोखले ह्यांना त्यांनी अगदी धारेवर धरले तेव्हा पार्लमेंटच्या निवडणुकांत मागे निवडून येण्यात नि नव्या निवडणुकीत पुन्हा उभे रहाण्याच्या कार्यात त्यांना ज्या लिबरल पक्षाचा एकमेव आधार होता त्याला प्रसन्नविण्यासाठी आणि आपल्या ब्रिटिशनिष्ठतेचे चारित्र्य संशयातीत आहे हे सिद्ध करण्यासाठी देशभक्त दादाभाईंनी खालील पत्र हाइंडमनना लिहिले नि त्यांच्याशी प्रकटपणे काडीमोड करून टाकली. त्या पत्रात दादाभाई लिहितात : "I remain of the same view that after reading your article in 'Justice', I cannot any more work with you and the Social Democratic Federation on Indian matters. My desire and aim have been not to encourage a rebellion but to prevent it and to make the British connection with India a blessing to both. Unfortunately it is not the case as yet in so far as India is concerned but it is owing to evil system of the Government by the executive authority inspite of the wishes of the sovereign, the people and the parliament of England to govern righteously."

सारांश : "तुमच्या 'जस्टिस' पत्रातील लेख वाचल्यानंतर माझा ठाम निश्चय झाला की मला आपल्यासह किंवा सोशल डेमोक्रेटिक फेडरेशनससह हिंदुस्थानचे प्रकरणी काम करणे यापुढे अशक्य आहे. माझा उद्देश नि इच्छा (हिंदुस्थानांत) बंड घडवून आणण्याची नाही तर बंड घडूच नये आणि हिंदुस्थानचा नि इंग्लंडचा जुळलेला संबंध उभयतांनाही हितप्रद व्हावा अशीच रहात आलेली आहे. दुर्दैवाने अद्याप हिंदुस्थानच्या प्रकरणी तशी वस्तुस्थिती नाही खरी, परंतु तो दोष प्रत्यक्ष ब्रिटिश सार्वभौमाची, ब्रिटिश जनतेची नि ब्रिटिश पार्लमेंटची न्यायाने राज्य चालविण्याची 'इच्छा असताही तिला डावलणाऱ्या कार्यकारी वर्गाचे हाती राज्यकारभार सोपवून देणाऱ्या सदोष राज्यपद्धतीचा आहे!"

तिकडे ब्रिटनमध्ये असताना हिंदुस्थानात ब्रिटिश सैनिक नि अधिकारी प्लेगप्रकरणी प्रजेवर अनन्वित छळ करीत आहेत अशा अर्थाची जी विधाने गोखले यांनी केली होती त्याविषयी विनाअट क्षमा मागून गोखल्यांनीही ब्रिटिश कोपापासून आपली सुटका करून घेतली.

येथपर्यंत मी लंडनला पोचलो त्या काळच्या कित्येक वर्षांपूर्वीपासून ज्या लंडन इंडियन सोसायटी, ईस्ट इंडिया असोसिएशन आणि ब्रिटिश कमेटी ऑफ दी इंडियन काँग्रेस, ह्या तीन प्रमुख संस्था नि निरनिराळे प्रमुख पुढारी हिंदी राजकारण करीत आले होते नि करीत होते त्यांचा अवश्य तो वृत्तांत सांगितला. आता त्या वाचून मी लंडनला जाण्याचे केवळ दीड दोन वर्षे आधी, ह्या जुन्या सर्व संस्थांना, पुढाऱ्यांना नि त्यांच्या ब्रिटिशनिष्ठ कार्यक्रमांना मागे रेटून ब्रिटनमधल्या हिंदी राजकारणाच्या क्षेत्रात जी चौथी नवी संस्था झपाट्याने पुढे घुसत होती ती ‘इंडियन होमरूल सोसायटी’ नि तिचे संस्थापक पंडित शामजी कृष्णवर्मा ह्यांचीही तोंडओळख वाचकांना इथेच करून दिली पाहिजे. कारण त्या संस्थेच्या नि त्या संस्थापकांच्या वृत्तांताचा माझ्या आत्मचरित्राशी अगदी निकटचा संबंध पोचतो.

## पंडित शामजी कृष्णवर्मा यांचा परिचय

श्री. इंदुलाल याज्ञिक यांनी लिहिलेले पंडित शामजी कृष्णवर्मांचे एक इंग्रजी चरित्र अलीकडेच सन १९५० मध्ये प्रकाशिले गेले आहे. हे चरित्र इतके सविस्तर नि साधार, मर्मज्ञ आहे की ज्यांना पंडित शामजींच्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंपादनासाठी केलेल्या महनीय कार्याचे यथावत मूल्यमापन करावयाचे असेल त्यांनी तो चरित्रग्रंथच वाचावा. माझ्या या ‘आत्मवृत्त’ ग्रंथात अवश्य तितकाच त्यांचा त्रोटक परिचय काय तो खाली देत आहे.

कच्छ संस्थानातील मांडवी या गावी भनसाळी समाजातील एका सच्छील परंतु निर्धन कुटुंबात दि. ४-१०-१८५७ ला शामजी कृष्ण वर्मा यांचा जन्म झाला. त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षाचे आतच त्यांची मातापितरे निवर्तली. संबंधीयांच्या साहाय्याने इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी ते मुंबईस आले. प्रशाळेत (हायस्कुलात) इंग्रजी शिकत असतानाच काही आश्रयदात्यांच्या इच्छेवरून जुन्या परंपरेप्रमाणे संस्कृतशिक्षण देणाऱ्या एका पाठशाळेत त्यांनी संस्कृत शिकण्यास आरंभ करून त्या विद्येत प्रवीणता संपादली. परंतु त्यांचे इंग्रजी शिक्षण मॅट्रिक परीक्षेसही न बसता त्यांना त्यावेळी सोडावे लागले. याच संधीस आर्यसमाजाचे संस्थापक श्री स्वामी दयानंद सरस्वती हे प्रचारकार्यार्थ मुंबईस आले असता त्यांच्या उपदेशाची नि व्यक्तित्वाची छाप पडून श्यामजी त्यांच्या दर्शनास गेले आणि थोडेच दिवसांत त्यांना आर्यसमाजाची दीक्षा देण्यात आली. मुंबईचे शेठ छबीलदास लल्लुभाई या धनाढ्य गृहस्थांच्या भानुमती नावाच्या मुलीशी सन १८७५ ते शामजी यांचा विवाह झाला. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत संस्कृतचे प्राध्यापक असलेले मॉनिअर विल्यम्स हे त्यावेळी मुंबईस आलेले होते. त्यांना जुन्या परंपरेने संस्कृत भाषेचे नि विद्येचे अध्ययन केलेला नि इंग्रजीही शिकलेला असा एक हस्तक ऑक्सफर्डला न्यावयाचा होता. हे कळताच त्या कामी आपली निवड व्हावी म्हणून श्यामजींनी खटपट चालविली. त्या आधी आपल्या संस्कृत प्राविण्याची छाप मॉनिअरवर पाडणे शामजींना आवश्यक वाटले. आर्य- समाजाचे प्रचारकार्यही करावयाचे होतेच. अशा उभय हेतूंनी सन १८७७ ते आर्यसमाजाच्या पाठबळावर शामजींनी संस्कृत विद्येची आणि थोर थोर समाजनेत्यांची आगरे समजल्या जाणाऱ्या नाशिक, पुणे, कर्णावती (अहमदाबाद), काशी, लाहोर, इत्यादी

मोठमोठ्या नगरांना भेटी दिल्या. तेथील पंडितांना प्रकट सभांतून संस्कृतमध्ये केलेल्या भाषणातील आपल्या संस्कृत वाक्पटूत्वाने प्रसन्न केले. त्या त्या ठिकाणच्या मोठमोठ्या पंडितांनीच त्यांना पंडित म्हणून गौरविले. पुणे येथील प्रशस्तिपत्राचेच एक उदाहरण पुरे. त्यावर प्रा. कुंटे, सार्वजनिक सभेचे कार्यवाह जोशी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, प्रा. काथवटे, महादेव गोविंद रानडे अशा अशा थोरांच्या सह्या होत्या. रावबहादुर गोपाळ हरी देशमुखांचा तर ह्या उदयोन्मुख तरुणावर विशेष लोभ असे. स्वामी दयानंदांनाही आपल्या ह्या तरुण शिष्याचा हा गौरव पाहून फार आनंद झाला आणि त्या भरात त्यांनी शामजींचा मुख्य हेतू जो इंग्लंडला जाणे त्यालाही अनुमती दिली. तथापि नंतर विचारांती, विलायतेस आपला एक पट्टशिष्य म्हणून जर जावयाचे तर प्रथम आपल्याकडे येऊन वेदांचा अर्थ शामजींनी शिकला पाहिजे अशी अट दयानंद सरस्वतींनी घातली. परंतु शामजींचा सर्व ओढा होता इंग्लंडला जायचा. आर्यसमाजाला वाहून घेण्याची त्यांची इच्छा केव्हाच नव्हती. त्यामुळे दयानंदजींच्याकडे गुरुमुखाने वेद शिकण्यास ते गेले नाहीत. शामजी त्यांच्याकडे वेद शिकण्यास येत नाहीत असे दिसताच दयानंदजीनी शामजींना एक खडखडीत पत्र लिहिले की, "ज्या अर्थी वेदांचा अर्थ शामजींनी गुरुमुखाने समजावून घेतलेला नाही त्या अर्थी त्यांनी ऑक्सफर्डला जाताच ही वस्तुस्थिती सर्वांना स्पष्टपणे कळवावी. शामजींनी एक हिंदुस्थानी विद्यार्थी याच भूमिकेवरून काय ते परदेशात वर्तावे. स्वामी दयानंदांचे शिष्य किंवा आर्यसमाजाचे अधिकृत वैदिक प्रचारक म्हणून नव्हे!"

पण मध्यंतरी ज्या मॉनिअर साहेबांनी रावबहादूर गोपाळराव देशमुखांच्या अनुरोधामुळे (शिफारशीमुळे) शामजींना ऑक्सफर्डला नेण्याचे मान्य केले होते ते मॉनिअर साहेबही, शामजी वेळेवर निघू शकले नाहीत म्हणून, विलायतेस एकटेच निघून गेले. तथापि त्यांच्या मागोमाग ऑक्सफर्डला जाऊन पिच्छा पुरवायचाच असा शामजींनी निर्धार केला. द्रव्यसाहाय्य मिळण्याचे इतर मार्ग खुंटल्यामुळे ऋण काढायचे म्हणून ठरविले. पण तेही कोणी पुरते देईना. शेवटी श्रीमंत मातापितरांकडून ज्यांना उदंड स्त्रीधन मिळाले होते त्या स्वतःच्या पत्नीकडूनच शामजी यांनी ऋण म्हणून रक्कम काढली नि थोडेसे इतर साहाय्य मिळवून शामजी मार्च १८७९ मध्ये एकदाचे मुंबईहून निघाले आणि एप्रिलमध्ये इंग्लंडला पोचले. लगोलग ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या कालेजात नाव घालून त्यांनी अभ्यास आरंभिला. त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेची नि विशेषतः संस्कृत साहित्य-विशारदत्वाची छाप तेथील प्राध्यापक मंडळींवरही पडू लागली. प्रा. मॉनीअर विलियम्स म्हणतात त्याप्रमाणे पाणिनीचे व्याकरण मुखोद्‍गत असलेला तरुण भारतीय पंडित असतो तरी कसा तो त्या युनिव्हर्सिटीने हा पहिल्यांदाच पाहिला. शामजींनी ग्रीक नि लॅटिन भाषांचाही चांगला अभ्यास केला होता. मुंबईच्या गव्हर्नरने विशेष अनुरोध केल्यामुळे कच्छ संस्थानने शामजींना शिष्यवृत्तीही चालू केली. दोन वर्षांच्या आतच सन १८८१ ते रॉयल एशियाटिक सोसायटीने त्यांना माननीय आमंत्रित म्हणून भाषण देण्यास बोलावले. त्यावेळी अनेक पाश्चात्त्य पंडितांचा जो अपसमज होता की वेदकाली आर्यांना लेखनकला माहीत नव्हती त्याचे शामजींनी आपल्या 'भारतीय लेखनाचा मूलारंभ' या विषयावरील व्याख्यानात सयुक्तिक खंडन केले. त्यांचे तेथील यश पाहून त्याच वर्षी स्वतः भारतमंत्र्यांनी (Secretary of State for India) शामजींना भारताचे प्रतिनिधी म्हणून बर्लिन येथे पौर्वात्य ज्ञानविदांच्या परिषदेला धाडले. तेथे शामजींनी ठासून प्रतिपादन केले की संस्कृत ही ग्रीक किंवा लॅटिनसारखी मृतभाषा नसून ती भारतामध्ये विद्वद्मंडळांतील विचारविनिमयाची आजही प्रचलित असलेली जिवंत नि खरी खरी राष्ट्रीय भाषा

आहे. ह्याच संस्थेच्या लंडन येथे १८८३ ते भरलेल्या त्याच्या पुढच्या अधिवेशनालाही प्रतिनिधी म्हणून जाण्याचा मान भारतमंत्र्यांनी पं. शामजींनाच दिला. त्याचे आधीच Empire Club ह्या प्रतिष्ठित संस्थेने शामजींना आपले सन्मान्य सभासद करून घेण्याचा मान दिला. ह्या संस्थेत इंग्रजी साम्राज्यातील गर्व्हनर, गव्हर्नरजनरल, सरसेनापती असे अधिकारीही सभासद असत नि त्यांना येताजाता गौरविण्याचे समारंभही थाटले जात. पंडित शामजी या संस्थेतील भोजनसमारंभाची उंची वर्गणी भरूनही त्यांच्या पंगतीना जात असत. कारण, मोठमोठ्या इंग्रजलोकांचा दाट परिचय होण्यास, निदान तोंडओळख होण्यास, तीच संस्था अधिक सहाय्यकारक होत होती.

सन १८८३ ते शामजी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा उतरले. काही जणांच्या मते पंडित शामजी हेच ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाचे पहिले भारतातील पदवीधर होते. त्यांनी प्रा. म्याक्समुल्लर, प्रा मारिसन, डॉ. जावेट, भारताचे भूतपूर्व व्हाइसराय लॉर्ड नॉर्थब्रुक अशा कित्येक धेंडांकडून प्रशस्तिपत्रे नि अनुरोधपत्रे (शिफारसपत्रे) मिळविली. त्या प्रत्येकातील अनुरोधाचा विशेष एका वाक्यात सांगायचा तर तो लॉर्ड नॉर्थब्रुक यांच्या वाक्यात सांगता येईल. “He (Mr. Shamji) is eminently qualified for a high post in Govt. Service” (सरकारी सेवा विभागातील एखाद्या उच्च अधिकारपदावर नेमले जावे अशी यांची उत्कृष्ट योग्यता आहे. ) शामजींनाही हवे होते ते हेच. त्याच वेळी इग्लंडचे पंतप्रधान असलेल्या प्रख्यात ग्ल्याडस्टन साहेबांशीही पंडित शामजींनी या ना त्या निमित्ताने पत्रव्यवहार चालू ठेवलेला असावा असे दर्शविणारे शामजींचे ११-४-८३ चे एक महत्वाचे पत्र उपलब्ध आहे. लॉर्ड रिपन त्यावेळी हिंदुस्थानातील शिक्षित वर्गात पुष्कळच लोकप्रिय झालेले होते. त्याविषयी ग्ल्याडस्टनसाहेबास शामजी ह्या पत्रात लिहितात, “आपण लॉर्ड रिपन ह्यांना हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयचे पदावर नेमून माझ्या देशबांधवांवर जो महान उपकार केलात त्यासंबंधी वाटणाऱ्या उत्कट कृतज्ञतेस मजकडे येणारी पत्रे एकमुखाने व्यक्तवीत आहेत.” सुप्रसिद्ध देशभक्त दादाभाई नवरोजी ह्यांच्याशीही त्यांचा परिचय होता, पत्रव्यवहारही होता. पण याज्ञिकांनी लिहिलेल्या शामजींच्या चरित्रात स्पष्ट सांगितले आहे की, त्यात धंद्याच्या नि व्यापाराच्या उलाढालीवाचून विशेष असा कशाचाही उल्लेख नाही. विलायतेत दादाभाई चालवीत त्या राजकारणातही शामजींनी इकडची काडी तिकडे केली नाही. शेवटी ब्यारिस्टरची परीक्षा उतरून पं. शामजी हे सन १८८५ च्या जानेवारी महिन्यात हिंदुस्थानला स्थायिक होण्याचा निश्चयाने परतले. पंडित शामजींच्या चरित्राच्या या कालखंडावरून हे स्पष्ट होत आहे की, त्यांच्या उण्यापुऱ्या तिसाव्या वर्षापर्यंत राजकारणी अशा कोणत्याही चळवळीशी त्यांनी दुरूनसुध्दा कोणताही संबंध ठेवलेला नव्हता. इतकेच नव्हे, तर त्या काळापावेतो ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांच्या प्रशस्तिपत्राच्या वशिल्याने शासकीय सेवाविभागातील उच्च अधिकारपदे मिळवून स्वतःचा भाग्योदय कसा करता येईल याच एका महत्वाकांक्षेने पंडित शामजी भारलेले होते.

हिंदुस्थानात पाय ठेवताच गोपाळ हरी देशमुख यांच्या अनुरोधाने आणि मोठमोठ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची जी प्रशस्तिपत्रे शामजींनी आणलेली होती, त्यांचे प्रभावाने थोड्याच अवधीत पं. शामजींना रतलाम संस्थानचे दिवाणपद मिळाले. तेथील महाराजांची नि ब्रिटिश एजंटाची कृपा इतक्या कौशल्याने पंडितजीनी संपादिली की जेव्हा प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळे सन १८८८ ते ते दिवाणपद त्यांनी सोडले तेव्हा रतलामच्या त्या उदार महाराजांनी शामजींना भर पगार देऊनही बत्तीस सहस्त्र रूपये निवळ भेट म्हणून अधिक दिले. त्यानंतर त्याच वर्षी शामजींनी अजमीरच्या ब्रिटिश कोर्टात ब्यारिस्टरीचा व्यवसाय चालू केला. त्यासहच तेथील गिरण्यांतही, मिळवलेली संपत्ती

गुंतवून नित्याचे भरगच्च उत्पन्न मिळेल अशी व्यवस्था केली. ब्यारिस्टरीच्या व्यवसायातही त्यांना भरपूर प्राप्ती होतच होती. परंतु शामजींना नुसत्या संपत्तीपेक्षा संपत्ती नि सत्ता यांचे जोडवैभव ज्यायोगे उपभोगिता येते असे कोणत्याही मोठ्या संस्थानचे दिवाणपद हवे होते. त्या दिशेने त्यांचे दीर्घ प्रयत्न चालले होते. मध्यंतरी अजमीर नगरपालिकेमध्ये ते निवडले गेले. तिथे लोकहितकारक असे कोणतेही काम त्यानी केल्याचे जरी दिसत नसले तरी त्यांचे व्यापारी हितसंबंध बळकट करण्याकडे त्या सभासदत्वाचा त्यांनी उपयोग करून घेतला. अजमीरला अशी चार वर्षे घालविल्यानंतर त्यांना हवी असलली संधी आली आणि उदेपूरच्या महाराजांनी आपल्या दिवाणपदावर सन १८९२ च्या डिसेंबरमध्ये पंडित शामजींची नेमणूक केली. ह्या प्रख्यात संस्थानचा कारभारही त्यांनी इतक्या दक्षतेने चालविला की तेथील महाराजांनी त्यांचा प्रसन्न मनाने गौरव केला.

आपल्या ह्या वाढत्या प्रतिष्ठेस काहीही धक्का लागू नये म्हणून ते रात्रंदिवस जपत आणि ह्याच कारणामुळे त्यांनी आपल्या दिवाणगिरीच्या काळात त्या त्या संस्थानामध्ये राजकीय तर राहोच पण सामाजिक किंवा शैक्षणिक किंवा धार्मिक अशा कोणत्याही सार्वजनिक स्वरुपाच्या सुधारणा करण्याचे किंवा करविण्याचे धाडस केले नाही.

तथापि, हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, पंडित शामजींनी त्या त्या संस्थानच्या प्रतिष्ठेला कोणताही बाध येऊ दिला नाही, त्याची आर्थिक वा अधिकारिक बळकटी जी होती ती घटू दिली नाही. इकडे संस्थानाची एकनिष्ठ सेवा करीत असतानाही तिकडे ब्रिटिश एजंटाकरवीसुद्धा 'कार्यक्षम नि करता दिवाण ' म्हणून प्रशस्तिपत्रे मिळविली. केवळ वैयक्तिक दृष्टीने बघितले असता हे कर्तृत्वही काही सामान्य म्हणता येत नाही.

उदेपूरला दोन अडीच वर्षे दिवाणगिरी केल्यानंतर त्यांना जुनागड संस्थानचे दिवाणपद देऊ करण्यात आले. ते एकंदरीत अधिक लाभदायक आहे असे पाहून शामजींनी तिकडे जाण्याचे ठरविले. उदेपूरच्या उदारमनस्क महाराजांनी त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला कैंव्हाहि परत आल्यास आपल्याला येथे दिवाणपद पुन्हा स्वीकारता येईल असे आश्वासनही दिले.

जुनागडच्या नबाबाची दिवाणगिरी स्वीकारून शामजी सन १८९५ ते तिथे गेले. पण थोड्याच दिवसांत त्यांच्या ध्यानात आले की, तरुण नबाब एका जुन्या कारस्थानी गटाच्या हातचे बाहुले बनलेला आहे. शामजींनी त्या गटाच्या म्हणण्यास होस हो मिळवून रहावयाचे तर रहावे. नाहीतर येनकेन प्रकारेण त्यांना दिवाणगिरी सोडण्यास भाग पाडावयाचे असे त्या गटाचे कारस्थान शिजलेले होत. ह्या कारस्थानाच्या बुडाशी कोणतेही जातीय वा धार्मिक वा तात्विक कारण नव्हते. त्या गटात हिंदूही होते, मुस्लीमही होते. त्याच मूळ होते केवळ वैयक्तिक नि स्वार्थी हेवेदावे. त्याच वेळी म्याकानकी नावाच्या एका इंग्रजी अधिकाऱ्याची नेमणूक शामजींनी त्या संस्थानात भरपूर वेतनावर केली होती. म्याकानकी साहेब हा शामजींच्या आक्सफर्डचा स्नेही म्हणून शामजींनी त्याच्या विनंतीप्रमाणे हे उच्चपद त्याला दिले. पुन्हा शामजींनाही कोणी वजनदार इंग्रजी अधिकारीच आपला हस्तक नि समर्थक असा असल्यास हवाच होता. प्रसंगी त्याचाच उपयोग अधिक होता. परंतु लवकरच त्या म्याकानकी साहेबाशी त्या कारस्थानी गटाचेच सूत्र जमले आणि त्या साहेबाने शामजींना उखडून आपणच संस्थानचा कारभार आटोपावा असा कपटी घाट घातला. शामजींविरुद्ध नाना प्रकारची किटाळे उभारून नि कागाळ्या करून गुप्तपणे म्याकानकी साहेबाने एकीकडे ब्रिटिश रेसिडेंटचे मत कलुषित केले तर दुसरीकडे त्या संस्थानी गटाने नबाबाचे मन

शामजीविरुद्ध भडकवून दिले. हे प्रकरण शेवटी इतके चिघळले की, अवघ्या सात आठ महिन्यांचे आतच एक दिवस नबाबाने शामजींना अचानकपणे कळविले की, "तुम्हास तुमच्या 'दुर्वर्तनासाठी' दिवाणगिरीच्या अधिकारावरून पदच्युत (बडतर्फ) केलेले आहे! तुम्ही जुनागड संस्थान सोडून तत्काळ बाहेर चालते व्हा!" 'दुर्वर्तन' म्हणजे तरी कोणते तेही स्पष्टपणे सिद्ध केलेले आढळत नाही.

नबाबाची ही आज्ञा अकस्मात हातात पडताच शामजी केवळ सुन्न होऊन गेले. आपल्या संपादिलेल्या साऱ्या लौकिकाची शेवटी अशी धूळधाण व्हावी याचे त्यांना फार वाईट वाटले. संतापही आला. त्यांना आज्ञेप्रमाणे जुनागड सोडणे भागच होते. तसे त्यांनी ते सोडले; पण जाताना पुन्हा एकदा त्या विरोधी गटास धमकी दिली की, "माझे रेसिडेंटपासून व्हाइसराय नि इंग्लंडचे सेक्रेटरी ऑफ स्टेटपर्यंत वजन आहे. माझ्यावर केलेल्या या अन्यायास सरकार दूर करीलच करील. ब्रिटिश सरकार म्हणजे अंधेरनगरी नव्हे. जर नबाब हट्टास पेटतील तर त्यांचे संस्थानाचाच या वादात बळी पडल्यावाचून राहणार नाही!" यानंतर पं. शामजींनी उलट मागणी केली की संस्थानाने त्यांना पगाराची भरपाई म्हणून चाळीस हजार रुपये द्यावेत, पण तेही नाकारण्यात आले. तेव्हा धमकीप्रमाणे पं. शामजींनी तेथील ब्रिटिश पोलिटिकल एजंटकडे धाव घेतली पण त्या साहेबाने म्याकानकी साहेबाचाच पक्ष घेतला. शामजींनी त्याचेवर 'चीफ सेक्रेटरी टु गव्हर्नरकडे ' प्रकरण नेले. आपली सारी ब्रिटिश नेत्यांकडून मिळविलेली प्रशस्तिपत्रे, प्रमाणपत्रे परिचयपत्रे पणास लावली. पण व्यर्थ! त्यांनी मुंबई सरकारकडे नि शेवटी लंडनमधील सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया (ब्रिटिश सरकारचे भारत मंत्री) ह्यांच्याकडेही न्याय मिळावा म्हणून इंग्लंडमधील व्हाइट हॉलपर्यंत पत्रव्यवहार केला. पण जुनागड संस्थानवरील ब्रिटिश पोलिटिकल एजंटने जो निकाल दिला तो फिरवण्याचे कोणीही मनातसुद्धा आणले नाही.

जुनागडहून नबाबाने सप्टेंबर १८९५ मध्ये त्यांना सीमापार (हद्दपार) केल्यानंतर लगोलग शामजी उदेपूरच्या महाराजांकडे गेले. त्या उदारमनस्क महाराजांनीही आपले पूर्वीचे वचन स्मरून त्यांना पुन्हा दिवाणपद दिले. पण राजामहाराजांवरही सत्ता चालविणारा त्या त्या संस्थानावरील 'पोलिटिकल एजंट' म्हणून जो ब्रिटिश अधिकारी असे त्याची अनुमती त्या नेमणुकीला अवश्य होती. त्यावेळी तिथे कर्झन वायली हे पोलिटिकल एजंट होते. ह्या कर्झन वायली साहेबांशी आपली गाठ पुन्हा एकदा ह्याच ग्रंथात मदनलाल धिंगराचे प्रकरणी पडणार आहे. त्यांनी शामजींना ८-१०-१८९५ ला कळविले की "ज्याअर्थी जुनागड संस्थानातून तुमच्या दुर्वर्तनामुळे तुम्हांस पदच्युत करण्यात आलेले आहे त्या अर्थी तुमच्या चारित्र्यावरील त्या कलंकाला तुम्ही जोवर ते आरोप खोटे आहेत हे सिद्ध करून धुऊन टाकू शकत नाही तोवर मला तुमच्या दिवाणपदास मान्यता देता येत नाही!" ब्रिटिश सरकारच्या गोऱ्या अधिकाऱ्यांनी असा जिकडून तिकडून शामजींचा कोंडमारा केला. अपमानाचा कडेलोट झाला.

राजकीय व्यवहारात साहब तेथून सारा एक, एकमेकांस उचलून धरणार. हे पूर्वी न पटलेले सत्य शामजींना तव्हा एकदाचे पटले. 'ब्रिटिश सरकार म्हणजे अंधेरनगरी नव्हे' ही जी शेखी शामजींनी मिरविली होती ती फोल ठरली. ब्रिटिश सरकारच्या न्यायबुद्धीवर असणारा त्यांचा विश्वास, त्यांचा स्वतःचाच जेव्हा त्यापायी विश्वासघात झाला तेव्हा त्या स्वानुभूतीनेच उन्मळून पडला!

आता आपल्यावर झालेल्या अन्यायाचा सूड उगविण्याचा एकच मार्ग शामजींना उरला होता. तो म्हणजे हा सर्व प्रश्न स्वतःचे नाव पुढे न करविता दुसऱ्या कोणाकडून जनतेपुढे मांडून सरकारचे ते कृष्णकृत्य उघडकीस

आणणे आणि सार्वजनिक दडपण सरकारवर आणणे हा. शामजींविरुद्ध मुंबईच्या टाईम्सने मागे एक लेख लिहून जुनागडवरील ब्रिटिश अधिकाऱ्यांचे समर्थन कलेले होते. ह्या सरकारी वृत्तीय टीकेला तोंड देऊन शामजींचे समर्थन करणारा धुरंधर नि विश्वासार्ह संपादक टिळकांवांचून दुसरा कोण होता? पूर्वी कोल्हापूर प्रकरणात नि नंतर अलिकडेच बडोद्याच्या बापट प्रकरणात संस्थानातून होणाऱ्या सरकारी अन्यायांविरुद्ध लढणारा पुढारी म्हणून केसरीकार टिळक यांचा लौकीक राजेरजवाड्यातून आधीच दुमदुमत होता. तेव्हा संस्थानी राजकारणात आपणासही इंग्रज विरोधी टिळकांचा उपयोग कधीकाळी होईल, तसेही एक साधन संग्रही असावे, असे हेरून शामजींनी टिळकांना मुंबईस भेटून किंवा पत्रव्यवहाराने टिळकांची ओळख जुनागडमध्ये जाण्यापूर्वी करून ठेवली असावी. थोरामोठ्यांच्या ओळखी नि त्यांची प्रशस्तिपत्रे संग्रही ठेवण्याचा शामजींचा परिपाठच असे. त्या ओळखीच्या आधारावर म्हणा किंवा नवीनच परिचय करून म्हणा पण शामजींनी टिळकांना जुनागड प्रकरणात आपल्यावर झालेल्या अन्यायाविषयी ब्रिटिश शासनावर सडकून टीका करावी नि तो दूर करण्याविषयी सरकारवर जनमताचे दडपण आणाव अशी गळ घातली असावी. ही गोष्ट टिळकांनी सन १८९६ मध्ये शामजींना टाकलेले जे एक पत्र उपलब्ध आहे त्यावरून संभवनीय वाटत. त्या पत्रात टिळक लिहितात की तुमच्या पद्च्युतीसंबंधी जो लढा चालू आहे त्यासंबंधी महत्वाचे कागदपत्र इकडे धाडून द्यावे. टिळकांच्या ह्या पत्राप्रमाणे शामजींनी कागदपत्र टिळकांकडे धाडले होते. टिळकांचे शामजींना गेलेले दुसर एक पत्र जे आहे तेही १८९६ जानेवारीतलच आहे. म्हणजे ही दोन्ही उपलब्ध पत्रे शामजींना जुनागडमधून पदच्युत केल्यानंतरचीच आहेत. या दुसऱ्या पत्रात टिळकांनी शामजींना विचारले आहे की एका ब्राहमण तरुणास संस्थानी सैन्यांत भरती होऊन किंवा अन्य रीतीन सैनिकी शिक्षण घेता येईल का? शामजी तेव्हा उदेपूरच दिवाण होते. पण त्यांनी त्या तरुणास तसे बोलावून घेतले की नाही त्याचा काहीच पत्ता लागत नाही. हा तरूण म्हणजे चापेकर असावेत असा केवळ तर्क केला तरीही शामजींनी त्यना सैनिक चाकरीत घेतले नाही किंवा ते गेले नाहीत हे सिद्धच आहे. एकंदरीत ह्या टिळकांच्या उपलब्ध अशा दोन्ही पत्रांवरून आपल्या जुनागडच्या वैयक्तिक प्रश्नापुरताच शामजींचा टिळकांशी संबंध आला होता, यापलीकडे काहीच सिद्ध होत नाही. राजकारणाच्या किंवा सार्वजनिक अशा कोणत्याही कार्याच्या ओढीने शामजींनी टिळकांशी त्यावेळी संबंध जोडला किंवा टिळकांच्या राजकीय चळवळीत शामजी त्यावेळी कोणताही हस्ते परहस्ते भाग घेत होते असे मानण्यास लवलेशही आधार उपलब्ध नाही. सार्वजनिक कार्यात कोणत्याही प्रकार लिप्त न हता आपण आपल्यापुरते पहावे हेच शामजींचे त्यावेळेपर्यंत जीवनसूत्र होते. ते उदेपूरचे दिवाणपद उपभोगीत होते नि बहुधा तसेच उपभोगीत रहातेही.

**शामजी एकाएकी इंग्लंडला निसटून जातात!**

परंतु इतक्यात चापेकर-रानड्यांच्या प्रकरणा-मुळे सन १८९७ ते सारा देश हादरून गेला. राजद्रोहाच्या आरोपावरून टिळकांना धरले गेले तर नातूबंधूना विनाआरोप नि विनाचौकशी उचलून जे कोठे धरून नेल त्याचा कित्येक दिवस कोणाला पत्तासुद्धा कळू दिला नाही. ह्या बातम्या यताच पंडित शामजींचे मन चिंताक्रांत झाले. जुनागड प्रकरणापासून ते ब्रिटिश राज्यकर्त्यांना अप्रिय झालेल होते. आणि हिंदुस्थानातील ब्रिटिश न्यायावरील शामजींचा विश्वासही पार उडाला होता. तेव्हा त्यांच्या मूळच्या दीर्घसूत्री नि अतिसंशयी स्वभावास जी संभवनीय वाटावी अशा एका गोष्टीची धास्ती त्यांना वाटू लागली. राजकीय नसला तरी टिळकांसारख्या ब्रिटिशांना अप्रिय

झालेल्या पुढाऱ्यांशी त्यांचा जुनागड प्रकरणी पत्रव्यवहार झाला होता. तोही शामजीवर अँग्लो-इंडियन सत्ताधिकाऱ्यांनी केलेल्या अन्यायासंबंधी, गोऱ्या शासकवर्गावर टिळकांनी टीका करावी अशी खटपट करणारा! टिळकांच्या घराच्या झडतीत जर आपली ही पत्रे ब्रिटिश शासनाच्या हाती पडली असली तर त्यामुळे आपणावर आधीच पिसाळलेली ही अँग्लो-इंडियन मंडळी, त्या पत्रात राजकीय आरोप करण्यासारखे काही नसताही नातूबंधूंप्रमाणे विनाआरोप आणि विनाचौकशी अकस्मात आपलीही उचलबांगडी कशावरून करणार नाहीत अशा चिंतेने त्यांच्या मनात पक्के घर केले. आणि तसा प्रसंग येण्याच्या आधीच या बेबंदशाही हिंदुस्थानातून आपण तडाकाफडकी निसटून जिथे अद्याप व्यक्तिस्वातंत्र्य आणि निर्बंधाचे राज्य (Rule of Law) नांदत असा शामजींचा त्यावेळी विश्वास होता त्या इंग्लंडमध्ये जावे, ह्यातच शहाणपणा आहे असा शामजींनी निर्धार केला. त्याप्रमाणे आपला हा अंतस्थ हेतू कोणालाही कळू न देता त्यांनी एकाएकी उदेपूरच्या दिवाणपदाचही त्यागपत्र दिले आणि पत्नीसह ते सन १८९७ च्या उत्तरार्धात इंग्लंडला सत्वर निघून गेले.

**पण ते प्रखर राजकारण करता यावे यासाठी नव्हे!**

पंडित शामजी असे अचानकपणे इंग्लंडमध्ये का निघून गेले याचे खरे कारण आम्ही वर दिले आहे तेवढेच होते. काहीजण अशी जी कल्पना करतात की केवळ देशसेवेला वाहून घेण्यासाठी आणि इंग्लंडमध्य स्वतंत्र वातावरणात टिळकांपेक्षाही प्रखर राजकारण करता यावे यासाठी शामजींनी दिवाणगिरीवर स्वार्थत्यागपूर्वक पाणी सोडले आणि ते इंग्लंडला चालते झाले ती कल्पना निराधार आहे. तिला आधार देणारा लेशमात्रही पुरावा उपलब्ध नाही. पुढे त्या थोर देशभक्तीशी आमचा जेव्हा दाट परिचय झाला तेव्हा हा विषय मधूनमधून निघाला असताही पंडित शामजींनी 'स्वदेशसेवेला सर्वस्वी वाहून घेण्यासाठी मी हिंदुस्थान अचानकपणे सोडले' असा बहाणा केव्हाही केला नाही. त्यांनी पुढे जुलै १९०७ च्या त्यांच्या 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट'च्या अंकात याविषयी स्वतःच प्रकटपणे जे सांगून टाकल आहे तेवढा उतारा इथे दिला की पुरे आहे :- " There is a saying in Sanskrit that it is better not to put your foot in the mud at all than to put it in the mud and then to wash it. In other words it is folly for a man to allow himself to be arrested by an unsympathetic government and thus be deprived of action when by anticipating matters he can avoid such results. Just ten years ago when our friend Mr. Tilak & the Natu Bros. were arrested we decided to leave India and settle in England."

अर्थात् "संस्कृतमध्ये असे एक सुभाषित आहे की चिखलात पाय टाकून मग तो धुवीत बसण्यापेक्षा चिखलात पाय न टाकणेच अधिक शहाणपणाचे आहे. त्याच न्याये आपल्यावर कुटिल राजसत्तेची वक्रदृष्टी आहे हे कळल्यानंतरही दूरदर्शीपणाने ते संकट न टाळता त्या राजसत्तेला आपणास पकडण्याची संधी आपण होऊन देणे मूर्खपणा होय. एवढ्यासाठीच दहा एक वर्षांपूर्वी जेव्हा आमच मित्र श्री. टिळक नि नातूबंधू यांना पकडल गेले तेव्हा आम्ही हिंदुस्थान सोडून इंग्लंडमध्य स्थाइक झालो. " इंग्लंडमध्ये गेल्यानंतरही पंडित शामजींनी पुरेपूर चार वर्षेपर्यंत कोणत्याही हिंदुस्थानविषयक अशा राजकीय तर सोडाच पण तदेतर सार्वजनिक चळवळीतही कोणताही प्रत्यक्ष नि प्रगट भाग घतला नाही. यावरूनही केवळ दशसेवेला सर्वस्वी वाहून घेण्यासाठीच शामजींनी हिंदुस्थान सोडल होते ही कल्पना फोल ठरते.

**शामजींच्या जीवनध्येयाचा कायाकल्प**

तथापि हिंदुस्थान सोडताना नसले तरी ब्रिटनमध्ये गेल्यानंतर मात्र शामजींच्या जीवनध्येयाचा विकास होऊ लागला. हिंदुस्थान सोडण्यापूर्वी पंडित शामजींनी इंग्लंडसारख्या परदेशातही आपला प्रपंच वाटल्यास श्रीमंत थाटान सुद्धा चालविता यावा इतकी संपत्ती मिळवून सुरक्षित ठेवली होती. त्यावाचून इंग्लंड, फ्रान्स प्रभृती परदशात जिथेजिथे त्यांना निवसणे भाग पडले तिथे तिथे स्कंधविनिमय (स्टॉकएक्सचेंज) प्रभृती क्रयविक्रय व्यवसायात ते घरी बसल्या बसल्या सहस्रावधी रुपये मिळवीत असत. ह्या स्वतंत्र नि संपन्न व्यवसायामुळे ते आता इंग्लंडमध्ये आल्यानंतर आर्थिक दृष्ट्या कोणाचेही मिंढे राहिले नव्हते. त्यांच्या पायातील परराज्यसेवेच्या म्हणा वा संस्थानी सेवेच्या म्हणा, पण साऱ्या आर्थिक शृंखला आता तुटून गेलल्या होत्या. हिंदुस्थानातील अँग्लो-इंडियन राजसत्तेच्या बेबंदशाहीचे भयही त्यांना आता वाटत नव्हते. कारण त्या वेळी आणि त्यानंतरही कित्यक वर्षांपर्यत, ब्रिटनमध्ये जगातील कुठल्याही राष्ट्रापेक्षा व्यक्तिस्वातंत्र्य अधिक सुरक्षित असून निर्बंधाचे राज्य (Rule of Law) असे तिथेच नांदत आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती!

पुन्हा, काही झाले तरी अगदी तरुणपणी स्वामी दयानंदजींचे प्रभावाने त्यांच्या मनोभूमिकेत स्वराज्यीय नि स्वराष्ट्रीय स्वाभिमानाची बीजे रुजलली होती. त्यांचे जीवनाचे ध्येय जोवर वैयक्तिक महत्वाकांक्षेच्या, म्हणजेच एका अर्थी आकुंचित स्वार्थाच्या कक्षेतच मर्यादिलेले होते तोवर ती निःस्वार्थी राष्ट्राभिमानाची भावना त्या स्वार्थी प्रवृत्तीच्या दाबाखाली मनाच्या तळाशी निश्चेष्ट होऊन पडली होती. परंतु वर उल्लेखिलेल्या राजकीय भीतीच्या, आर्थिक दास्याच्या नि ब्रिटिश निष्ठेच्या बेड्या त्यांच्या पायातून नि मनातून तुटून गेल्यामुळे त्यांच्या हृदयातील स्वराष्ट्राभिमानाच्या, परार्थाच्या नि न्यायप्रवणतेच्या उदात्त भावना सचेतन होऊन मोकळेपणी फोफावू लागल्या. ब्रिटनमध्ये गेल्यावर मिळालेल्या प्रापंचिक स्वास्थ्याचा काल शामजींनी हर्बर्ट स्पेन्सर या सुप्रसिद्ध तत्वज्ञाच्या विस्तीर्ण वाङ्मयाच्या अभ्यासात घालविल्यामुळे त्या तत्वज्ञाची (Agnosticism) अज्ञेय वादादिक तात्त्विक मते जशी त्यास पूर्णपण पटली तशीच त्याच्या नीतिशास्त्रावरील ग्रंथातून त्याने हिंदुस्थावरील ब्रिटिश साम्राज्याविषयी नि त्यामुळे हिंदुस्थानचा जो आर्थिक रक्तशोष ब्रिटिशांनी चालविला होता त्याविषयी केलेल्या कडक पण साधार टीकेमुळे त्या ब्रिटिशांच्या राजकीय दास्यातून आपल्या मातृभूमीची मुक्तता करण्यास्तव आपणही आपल जीवन यथाशक्ती पणास लावले पाहिजे अशी निष्ठा त्यांचे मनात बळावत गेली.

सुरेंद्रनाथ बानर्जींना शासनीय सेवा विभागातील अधिकारावरून पदच्युत करण्यात ब्रिटिशसत्तेने जो अन्याय केला त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक महत्वाकांक्षेच उदात्तीकरण होऊन ती राष्ट्रीय महत्वाकांक्षेत कशी रूपांतरित झाली किंवा वासुदेव बळवंतांच्या मातोश्रीचे निधनप्रसंगी गोऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्यांची हेळसांड नि मानखंडना होताच त्यांना आलेल्या वैयक्तिक संतापाच्या ठिणगीन त्यांच्या हृदयातील तोवर नुसते धुरकटत रहाणारे राष्ट्रीय क्रोधाच कोठारच कोठार कसे अकस्मात भडकून उठले ते ह्या आत्मचरित्राच्या 'पूर्वपीठिका' खंडात आम्ही सांगितलच आहे. कित्येक साधुसंतांच्या चरित्रांतही असे प्रसंग आढळतात की प्रथम वैयक्तिक प्रपंचात ते आसक्त असता त्यांच्यावर कोसळणाऱ्या कोणत्यातरी प्रापंचिक संकटाच्या फटकाऱ्यामुळेच त्यांच्या हृदयात अकस्मात पारमार्थिक विरक्तीचा उदय झाला. अंती ते साधू झाले. त्याच मानसिक प्रक्रियेन राजकीय क्षेत्रात शामजींचही मतपरिवर्तन झाल. जुनागड प्रकरणापासून ब्रिटिश शासनाने केलेल्या त्यांच्या वैयक्तिक

मानखंडनेसरशी ब्रिटिशनिष्ठेची झापड त्यांच्या डोळ्यांवरून बहुतांशी अडून त्यांना हळूहळू स्वराष्ट्रनिष्ठेचा पकाशमय मार्ग दिसू लागला. अंती स्वतःच्या व्यक्तिगत हितालाच आजवर वाहून घेतलेल्या त्यांच्या मनाने आता निरपेक्ष स्वदेशसेवेला वाहून घेतले. त्यांच्या जीवनध्येयाचा असा कायाकल्प झाला.

कांग्रेसच्या ब्रिटिशनिष्ठ राजकारणाला त्यांचे मन आधीच पूर्णपणे विटले असल्यामुळे ते दादाभाईंच्या नेतृत्वाखालील 'ब्रिटिश इं.नॅ.कांग्रेस कमिटीत' किंवा 'लंडन इंडियन सोसायटीत' शिरले नाहीत. हिंदुस्थानविषयक त्यांची जी जी 'स्वदेशनिष्ठ' राजकीय मते बनत चालली त्यांचा प्रबळ पुरस्कार आणि ब्रिटिशांची हांजी हांजी करणाऱ्या जुन्या राजकीय पुढाऱ्यांचा प्रखर निषेध आपल्या बैठकीत येणाऱ्याजाणाऱ्या भारतीय पुढाऱ्यांत, स्नेह्यांत नि विशेषतः हिंदी तरुणांत पं. शामजी व्यक्तिगतपणे करू लागले. हळूहळू त्यांच्या भोवती त्यांच्या मताने भारलेले असे एक मित्रमंडळही संघटित होऊ लागले. सन १९०२ पर्यंत त्यांच्या मनातील ही वैचारिक क्रांती चांगलीच आकारली जाऊन ब्रिटिशांच्या दास्यातून हिंदुस्थानची सुटका ज्यायोगे करता येईल असा त्यांचा स्वतःचा एक कार्यक्रमही त्यांनी आखला आणि त्याची क्रमशः कार्यवाही करण्यासाठी सक्रिय राजकारणाच्या आखाड्यात स्वतः उतरण्याचा त्यांनी निर्धार केला.

## हर्बर्ट स्पेन्सर यांचा मृत्यू

इतक्यात सन १९०३ च्या डिसेंबरमध्ये जगद्‌विख्यात ब्रिटिश तत्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर ही मृत्यू पावले. त्यांना मराठीत कोणी कोणी आवडीने हरभट पेंडसे असे म्हणत असत. त्यांच्याविषयीचे ममत्व महाराष्ट्रालाही वाटत असे. त्यांच्या अनेक ग्रंथांची मराठीत भाषांतरे झालेली होती. टिळक-आगरकरांदी त्या वेळच्या तरुण पिढीवर त्यांच्या पुष्कळ विचारांची छाप पडलेली असे. विद्यार्थीदशेत मीही त्यांच्या मराठीत भाषांतरिलल्या पुस्तकांचे यथाबुद्धी अध्ययन करी. पुढे पुढे तर त्यांचा ग्रंथ नि ग्रंथ मी कसा अभ्यासून टाकला ते यथाप्रसंगी सांगण्यात येईलच. पंडित शामजींचे तर हर्बर्ट स्पेन्सर ही आदर्श पुरुषच होते, वैचारिक गुरू होते. त्यांचे काही उतराई व्हावे म्हणून लंडनमध्ये निघालेल्या हर्बर्ट स्पेन्सरांच्या स्मशानयात्रेचे प्रसंगी पंडितजीही उपस्थित होते. स्मशानातील शोकसभेतच शामजींनी अनाहूतपणे उठून कृतज्ञतेने भारलेले एक छोटेस भाषण दिले आणि त्याचे शेवटी हर्बर्ट स्पेन्सर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ एक सहस्र पौंडांची (त्या वेळच्या उण्यापुऱ्या पंधरा सहस्र रुपयांची) देणगी देण्याचा आपला संकल्प प्रकटपण सोडला. त्याप्रमाणे ती देणगी ऑक्सफर्ड विद्यापीठाने पुढे स्वीकारली आणि त्या रकमेतून प्रतिवर्षी हर्बर्ट स्पेन्सरांच्या तत्वज्ञानावर त्या विद्यापीठात कोणातरी नामांकित विद्‌वानाचे व्याख्यान करविले जाई. पंडितजींच्या दानाचे अनपेक्षित वृत्त सर्व ब्रिटिश आणि हिंदुस्थानी पत्रातूनही प्रसिद्ध होताच या एका भारतीय विद्‌वानाच्या ब्रिटिश तत्वज्ञानाविषयीच्या आदराचे आणि त्याच्या दातृत्वाचही ब्रिटिश जनतेला मोठे कौतुक वाटले. या निमित्ते शामजींचे नाव ब्रिटिश मुद्रापीठात (Press मध्ये) प्रथमच झळकले. ज्या ब्रिटनमध्ये स्वदेश सोडून ते स्थायिक झालले होते तेथील जनतेची सदिच्छा संपादिण्याचा दुय्यम लाभही पंडितजींच्या पदरांत त्या वेळेपुरता तरी, पडल्यावाचून राहिला नाही.

## पंडितजींचे पहिले प्रकट राजकीय कृत्य

ही योजना होताच त्यांनी मनात आखलेल्या राजकीय कार्यक्रमाचे पहिले पाउल टाकून राजकारणाच्या क्षेत्रात प्रकटपणे प्रवेश कला. सन १९०४ च्या ८ डिसेंबरला हर्बर्ट स्पेन्सरची पहिली पुण्यतिथी पडत होती. त्या

दिवशी ‘ग्रॅज्युएट ‘ झालेल्या पाच हिंदी नागरिकांना देण्यासाठी प्रत्येकी दोन सहस्र रुपयांच्या असणाऱ्या अशा पाच ‘Herbert Spencer Travelling Fellowship’ ‘हर्बर्ट स्पेन्सर प्रवासी शिष्यवृत्त्या ‘ देण्याचा संकल्प त्यांनी सोडला. शिष्यवृत्तीची पहिली अट अशी होती की त्या वृत्तिधरांनी इंग्लंडला येऊन स्वतंत्र व्यवसाय करता येईल असा कोणतातरी शिक्षणक्रम पुरा करावा. दुसऱ्या अटी पुढ दिल्या आहत. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांचे नावे एक शिष्यवृत्ती ते पुढेमागे देणार होत. ह्या पाच शिष्यवृत्त्यांची प्रसिद्धी, त्यांचे राष्ट्रीय महत्व वाढाव या हेतूने, कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतरच प्रथमतः केली जावी अशी त्यांची इच्छा होती. त्या वर्षी कॉंग्रेसचे अधिवेशन मुंबईलाच डिसेंबरमध्ये भरणार होते. त्या अनुरोधे ब्रिटिश इंडियन नॅशनल कमिटीच एक प्रमुख सूत्रचालक वेडर्बर्न ह्यांनाच आापल्या वरील योजनेविषयी सविस्तर पत्र पंडित शामजींनी लिहिले आणि ते पत्र कॉंग्रेसमध्ये वाचून दाखवून या शिष्यवृत्त्यांच्या योजनेची प्रसिद्धी करावी असे विनविले. ह्या पत्राचे एक विशेष महत्व आहे. कारण ते पत्र म्हणजे पंडित शामजींच्या जीवनातील राजकीय मतांची नि कार्यक्रमाची पहिली लेखी नि जनिक (पब्लिक) घोषणा होती. यास्तव त्यातील मुख्य भाग खाली जसाचे तसाच देत आहो.

“. . . या माझ्या शिष्यवृत्तीविषयीचे अवांतर नियम नंतर प्रसिद्धिले जातील. परंतु माझ्या योजनेतील एक अट मात्र इथेच सांगून टाकतो की ही शिष्यवृत्ती घेणाऱ्या हिंदी ग्रॅज्युएटाने हिंदुस्थानात परतल्यावर ब्रिटिशराज्याचे अंकित असलेले कोणचेही पद, अधिकार, वेतन किंवा चाकरी स्वीकारता कामा नये. ही अट मी ह्यास्तव घालीत आहे की साक्रेटिस म्हणतो त्याप्रमाणे ज्याला राज्यसंस्थेच्या अनेक बेबंद नि अन्याय्य कृत्यांना प्रामाणिकपण विरोधावे लागते नि सत्यासाठी झुंजावे लागत त्यान त्या राज्यसंस्थेच्या सेवाचाकरीत न गुंतता समाजात आपले स्वतंत्र स्थान राखले पाहिजे.

“हिंदुस्थानने हर्बर्ट स्पेन्सरविषयी कृतज्ञता का बाळगिली पाहिजे याविषयी दोन शब्द सांगण्याची मी अनुज्ञा घेतो. . . . कित्येक वर्षांपूर्वीपासून हर्बर्ट स्पेन्सरनेच ‘आपल्या हाताखालील नेटिव्ह सैन्याच्याच हाताने नेटिव्हांना जिंकून दास्यांत डांबून ठेवणाऱ्या सत्तेचा, मिठावरील त्रासदायक कराचा, बापड्या बिचाऱ्या प्रजेला पिळून काढून तिच्या भूमीच्या उत्पन्नाचा अर्धा भाग हिसकून घणाऱ्या कारभाराचा’ कडक निषेध केलेला आहे. हर्बर्ट स्पेन्सरनेच अनेक पुरावे गोळा करून दाखवून दिले की ‘इंग्लिशांनी विशेषतः हिंदुस्थानात जे जे प्रदेश जिंकले किंवा हिसकून जोडून घेतले ते सर्व दुष्ट नि स्वार्थी हेतूपायीच होत. ब्रिटिश राष्ट्र हे एखाद्या समाजभक्षक राक्षसाप्रमाणे अन्य समाजांना ग्रासीत नि गिळीत चालले आहे.’ अंती हेही सांगणारा हर्बर्ट स्पेन्सरच होता की ‘ब्रिटिशांच परदास्याचे जोखड मानेवरून फेकून देण्याचा प्रयत्न जर हिंदुस्थानने केला तर तो अपराध ठरणार नाही.’ हिंदुस्थानच्या अशा निःस्वार्थी आणि प्रामाणिक हितचिंतकाची स्मृती प्रत्येक कृतज्ञ हिंदी देशभक्ताने सन्मानिली पाहिजे.”

हे पत्र पंडितजींच्या विनंतीप्रमाणे कॉंग्रेसच्या अधिवेशनात नुसते वाचण्यासही त्यावेळच्या कॉंग्रसला तोंड नव्हत. स्वतः वडर्बर्न, ह्यूम, कॉटन प्रभृती कॉंग्रेसचे सूत्रचालक ही त्या ‘समाजभक्षक ‘ ब्रिटिश वर्गातील अग्रणीच होते. आणि तिच्या हिंदी पुढाऱ्यांतील नि अनुयायांतील शतावधी देशभक्त ‘ब्रिटिश शासनाच्या हाताखालील पदे, पदव्या, अधिकार नि चाकऱ्या स्वतः स्वीकारून तशी अधिकाधिक स्थाने हिंदी लोकांना दिली जावीत म्हणून कॉंग्रसमध्ये ठराव करीत होते. अशा या शामजींच्या पत्रास त्या कॉंग्रेसने पुरस्कारणे किंवा नुसते प्रसिद्धीणे म्हणजे

आपल्या निषेधाचा ठराव आपणच पुढे मांडून संमतविण्यासारखे होते. ब्रिटिश राज्य आमच्या कल्याणासाठीच आमच्यावर हवे आहे अस शपथेवर सांगणाऱ्या काँग्रसला ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याची चिथावणी देणारे हे पत्र ब्रिटिश शासनाला वाटे त्याहूनही अधिक राजद्रोहाचे नि देशद्रोहाचे वाटावे हे सहाजिकच होत. अर्थात काँग्रसने ते पत्र सरळ रद्दीचे टोपलीत फेकून दिले. शामजींनी पुढे नेटच धरला तेव्हा, वेडर्बर्नने १९ फेब्रुवारी सन १९०५ ला, त्यांना व्यक्तिगत उत्तर धाडले, त्यांतील मुख्य वाक्ये अशी -". . . The second paragraph (of your letter) contained such a severe denunciation of the Indian Govt. that it seemed inexpedient for me to read that part publicly in the Congress, considering how important it is for the Congress to maintain its character for loyalty and moderation" सारांश, "तुमच्या पत्रात हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्याची इतकी कडक निंदा कलेली होती की ते काँग्रसमध्ये वाचणेसुद्धा मला अयोग्य वाटल. काँग्रसने तिची राजनिष्ठतेची (ब्रिटिश निष्ठतेची) नि नेमस्तपणाची भूमिका नि प्रतिष्ठा अढळ राखली पाहिजे!"

**'इंडियन सोशिओलॉजिस्ट' पत्र काढले!**

काँग्रसच्या तोंडून आपल्या मतांची घोषणा करण्याचा हा प्रयत्न फसल्यामुळे आपल्या विचारांना स्वतंत्रपण प्रतिपादिणारे आपले स्वतःचे एक वृत्तपत्र असले पाहिजे असे पंडित शामजींना वाटू लागले. त्याप्रमाणे १९०५ च्या जानवारीत 'इंडियन सोशिओलॉजिस्ट ' (Indian Sociologist) असे काहीशा स्पेन्सरीय थाटाच नाव असलेले इंग्रजी मासिकपत्र त्यांनी काढले. त्यांच्या ह्या पहिल्या अंकावर त्यांचे उद्देश-सूत्र असे छापलेले होते! "An Organ of Freedom and of Political, Social and Religious Reform" अर्थात "स्वातंत्र्याचे आणि राजकीय, सामाजिक नि धार्मिक सुधारणांचे मुखपत्र." Indian Sociologist म्हणज भारतीय समाजशास्त्रवादी. ह्या मूळ उद्देशाप्रमाणे नि 'समाजशास्त्रवादी' ह्या नावाप्रमाणे पहाता हे मासिक केवळ राजकरणालाच वाहून न टाकता त्यात समाजाची सर्वांगीण नि शास्त्रीय चर्चा करण्याचा शामजींचा हेतु असावा. किंवा तसा भास उत्पन्न करण्याचा यत्न असावा. तसेच ते मासिक होते पण मासिक पुस्तक नव्हते. मासिक पत्र सुद्धा नव्हते. तर एक मासिक मतपत्रक होते असेच म्हणणे यथार्थ होईल. इतके आकाराने लहान, अवघे एक कागदी फटकूर. परंतु हिंदुस्थानातील कोणत्याही दहापानी वृत्तपत्रापेक्षा किंवा शंभरपानी मासिकापेक्षा देशीविदशी वर्तुळांमध्ये ते एक कागदी फटकूरच कित्येक वर्षे गाजून गेले खरे! तथापि ह्या पत्राला जे महत्व आले ते पुढे. ती पुढची गोष्ट.

पहिल्या अंकापासूनच त्या पत्रावर जे खणखणीत ब्रीदवाक्य छापले जाई ते होते स्पेन्सरच एक प्रसिद्ध नीतिसूत्र "Resistance to aggression is not simply justifiable but imperative. Non resistance hurts both ultruism and egoism" अर्थात "आक्रमणाचा प्रतिकार हा केवळ समर्थनीय आहे इतकेच नव्हे तर ते एक अपरिहार्य कर्तव्य आहे! अप्रतिकाराने स्वार्थाचीच नव्हे तर परार्थाचीही हानी होते."

तथापि, ह्या पहिल्या अंकात आपल्या पत्राचा विशेष काय ते सांगताना मात्र शामजींनी कोणतीही क्रांतिकारक किंवा स्वातंत्र्यवादी भूमिकाही घेतलेली नव्हती हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्या राजकीय विचारांचा पल्ला तेथपर्यंत तोवर पोचलेलाच नव्हता, त्याचा हाच पुरावा होय. ते लिहितात "हिंदुस्थानचे आणि इंग्लंडचे राजकीय हितसंबंध ध्यानी घेता ब्रिटिश सत्तेखाली हिंदी लोकांची काय स्थिती आहे नि त्यांना काय वाटते हे ब्रिटनमध्ये असणाऱ्या कोणा तरी हाडाच्या हिंदी प्रवक्त्याने व्यक्तवावे हे आता अवश्य झाले आहे. आजपर्यंत

हिंदी जनतेची दुःखे, मागण्या किंवा आकांक्षा ब्रिटिश जनतेसमोर स्वतः हिंदी लोकांनी स्वतंत्रपणे मांडलेल्या नाहीत. यास्तव ते कर्तव्य आता आम्ही करू इच्छितो. ज्यांचा पक्ष आजपर्यंत कोणीही घेतलेला नाही, त्या हिंदुस्थानातील कोट्यवधी लोकांचा पक्ष घेऊन त्यांच्या वतीने ग्रेट ब्रिटन नि आयर्लंडच्या जनतेच्या न्यायासनापुढे आम्ही त्याचे समर्थन करणार आहोत. "It will be our duty and privilege to plead the cause of India before the Bar of Public Opinion in Great Britain and Ireland."

वरील उताऱ्यात शामजींनी अप्रत्यक्षपणे, त्यावेळी हिंदुस्थानच्या वतीने म्हणून ब्रिटनमध्ये काम करणारी काँग्रसची ब्रिटिश कमेटी, लंडन इंडियन सोसायटी नि त्यांचे इंडिया हे पत्र ह्या तिन्ही संस्था निर्लेपपणे हिंदी नसून त्या ह्यूम प्रभृती अँग्लो-इंडियनांच्या दाबात आहेत, ह्यास्तव त्या हिंदीपक्षाचे खर मनोगत स्वतंत्रपण व्यक्तवू शकत नाहीत असे नावे न घेता सुचविले आहे. आपले स्वतःचे हे नवे 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट पत्र मात्र कोणत्याही ब्रिटिश माणसाचे नि विशषतः अँग्लो-इंडियनाचे दाबाखाली नसल्यामुळे त्याला मात्र हिंदी मनाचे खरेखुरे प्रतिनिधी नि प्र-मुख (Mouth Piece) असे म्हणवून घेता येईल. असे आपले वैशिष्ट्य दिग्दर्शिले आहे. ते पुष्कळ अंशी खरे होते.

पण अँग्लो इंडियनांच्या दाबाखाली होती म्हणून जर काँग्रेसची ब्रिटिश कमेटी हाडाची हिंदी (Genuinely Indian) होऊ शकत नव्हती तर त्याच न्यायाने त्याच अँग्लो-इंडियनांच्या दाबाखाली असलेली जे स्वतः हिंदी काँग्रेस तीही 'हाडाची हिंदी ' असू शकत नव्हती. ती बोलून चालून 'ब्रिटिशनिष्ठ ' होती. तथापि आश्चर्य हे की त्याच लेखात शामजी पुढे आश्वासितात की 'आमचे हे पत्र हिंदी काँग्रसच्या ध्येयास नि धोरणास पाठिंबा देत राहील!!'

दुसरी ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही की शामजी या लेखात ब्रिटिश जनतेच्या मताला 'न्यायासनाचा' मान देत आहेत! त्या न्यायासनासमोर हिंदुस्थानचा पक्ष हाडाच्या हिंदी प्रवक्त्याने मांडण्याचे तेवढेच कार्य जणू उरले होत. तेवढे केले की ती ब्रिटिश जनतेची न्यायबुद्धी जागृत होऊन ती हिंदुस्थानवर होणारे सारे अन्याय दूर करून त्याला दास्यमुक्त करणार होती! हिंदुस्थानचा न्याय करणारा न्यायाधीश- ब्रिटिश जनता! सावाचा न्याय करणारा न्यायाधीश- स्वतः चोर! त्यांच्या ह्या 'इंडियन सोशिओलॉजिस्ट'च्या पहिल्या अंकावरून तरी असे दिसते की शामजींच्या लिखाणात तोवर ठामपणा आलेला नव्हता. ते चाचरत बोलत होते. मूलभूत भूमिका घेण्याइतकी पंडित शामजींची राजकीय विचारसरणी त्या काळी तर्कशुद्ध सुसंगत नि विवेकपूत झालेली नव्हती. तथापि भोंगळ ब्रिटिशनिष्ठेचा भ्रम झडून ती झपाट्याने ब्रिटिशविद्रोही बनत चालली होती.

## 'होमरूल सोसायटी' ची स्थापना

ब्रिटिशांशी उघड उघड वैर मांडून आयरिश होमरूलची निकराची चळवळ कित्येक वर्षांपूर्वी करीत आलेल्या आयरिश देशभक्तांप्रमाणे आपणही 'इंडियन होमरूल'ची मागणी करावी अशी काँग्रेसी ब्रिटिश निष्ठेला विटलेल्या पंडित शामजींना नि त्यांच्या सहकाऱ्यांना उत्कट इच्छा व्हावी हे सहाजिक होते. त्या काळी हेही धाडसाचेच होते. कारण ब्रिटिश निष्ठतेवर आधारलेल्या काँग्रसचे पुढारी ब्रिटिशविद्रोही म्हणून गाजलेल्या आयरिश होमरूलवाल्या पक्षाशी हिंदी राजकारणाचा कोणताही संबंध ठेवीत नसत. परंतु शामजींच्या पक्षाने तशा आयरिश पक्षाशी घनिष्ठ संबंध उघडपणे जोडला. त्यांच्या प्रेरणेने काँग्रसपासून अगदी स्वतंत्र असलेला आणि काँग्रेसप्रमाणे राज्यकारभारात

किरकोळ सुधारणा मागत न बसता हिंदुस्थानचा सारा राज्य-कारभारच आमच हाती द्या, हिंदुस्थानला होमरूल द्या, अशी मागणी करणारा आणि त्यासाठी तत्काळ चळवळ हाती घेणारा आपला एक नवा पक्ष काढावयाचा असा शामजींनी निश्चय केला. आयरिश होमरूलवाद्यांनीही ह्या कामी शामजींना मनःपूर्वक पाठिंबा देण्याचे वचन दिले. परंतु येथे हे ध्यानात घेतले पाहिजे की होमरूलची मागणी ही जरी त्यावेळच्या काँग्रेस राजकारणाच्या एकाच पाउलाने नव्हे तर एकशे एक पाउलानी पुढचा टप्पा गाठणारी होती तरी होमरूलची घोषणा म्हणजे काही हिंदुस्थानच्या सार्वभौम स्वातंत्र्याची, Sovereignty ची, Independence ची घोषणा नव्हती! तशी 'स्वातंत्र्याची ' मागणी करण्याइतके किंवा त्या ध्येयाची प्रकट घोषणा करण्याइतके स्वतः शामजींचे राजकीय मानसच विकालले किंवा निडर बनलेले नव्हते. आणि तशी घोषणा ब्रिटनमध्ये सुद्धा निर्बंधांच कक्षेत (Legal scope मध्ये) सहसा सामावणारी नसल्यामुळे त्यांच्या पक्षाला ती झेपणारी नव्हती. परंतु होमरूलचा अर्थ म्हणजे ब्रिटिशसाम्राज्यांतर्गत देशीय स्वायत्तता. आयर्लंडच्या राजकारणात कित्येक वर्ष रुळता रुळता Home Rule ह्या शब्दाने इंग्रजी राजकीय परिभाषेत हा विशिष्ट अर्थ तेवढा व्यक्तविला जाई. त्या अर्थी सुद्धा हिंदुस्थानमध्ये त्या काळात राज्यकारभारात तो होमरूल शब्दही जरी राजद्रोहीच ठरता तथापि ब्रिटिश राजकारणात ब्रिटनमध्ये तो नैर्बंधिक कक्षत मोडत असे. म्हणून ब्रिटनमध्ये रहाणाऱ्या शामजींना आणि त्यांच्या हिंदी सहकाऱ्यांना निर्बंधाच्या कक्षेत राहूनही होमरूल चळवळ प्रकटपणे करता येण्यासारखी होती, असे करण्याचा त्यांनी संकल्पही सोडला.

त्याप्रमाणे सन १९०५ फेब्रुवारी दिनांक १८ ह्या दिवशी वरील संस्थेच्या स्थापनेसाठी पंडित शामजींनी लंडनमधील हायगेट विभागात स्वतः विकत घेतलेल्या आपल्या नव्या घरी अनेक निवडक गृहस्थांना आमंत्रिले. त्यांच्यापैकी वीसएक गृहस्थ त्या सभस उपस्थित होते. त्यात बॅरिस्टर राणा, डॉक्टर सी. मुथ्थु, बॅरिस्टर पारेख, जे. सी. मुकर्जी, एम. आर. जयकर, सुर्हावर्दी इत्यादी काही त्यावेळी तरुण असलेली तथापी पुढे प्रख्याती पावणारी आणि काही तेव्हाही प्रौढ असलेली मंडळी आलेली होती. त्या सभेत एकमताने 'इंडियन होमरूल सोसायटी' ही संस्था स्थापण्याचे ठरले. तिची आवश्यकता अशी प्रतिपादिली गेली की, "हिंदुस्थानविषयक ज्या संस्था सध्या ब्रिटन आयर्लंडमध्ये काम करीत आहेत त्या ब्रिटिश भृत्यशाहीच्या (British Beaurocracy च्या) हातांतील बाहुला बनल्या आहेत. यासाठी भारतीय लोकांच्याच स्वतंत्र नेतृत्वाखाली चालणारी आणि जिचे ध्येय 'लोकांची, लोकांसाठी नि लोकांनीच चालविलेली राज्यसत्ता असणे' हा जो हिंदुस्थानचा अविनाश्य अधिकार आहे तो संपादिण्याच आहे अशी ही नवी संस्था ब्रिटनमध्ये काढणे अपरिहार्यच झाल आहे." तिचा उद्देश होता : हिंदुस्थानला 'होमरूल' मिळवून देणे; त्यासाठी व्यवहार्य अशा सर्व साधनांनी 'By all practical means' ब्रिटन आयर्लंडमध्ये प्रचार करणे आणि राष्ट्रैक्यापासून (Unity) नि स्वतंत्रतेपासून (Freedom) जे लाभ होतात ते हिंदुस्थानी जनतच्या मनावर ठसविण्यासाठी शक्य ते प्रयत्न करणे. संस्थेचा मुख्य उद्देश नि कार्यक्रम अशा प्रकारे ठरल्यानंतर तिचे पहिले कार्यकारी मंडळ निवडण्यात आले : अध्यक्ष, पं. शामजी, उपाध्यक्ष बॅ. राणा, गोदरेज नि सुर्हावर्दी इत्यादी आणि अवैतनिक कार्यवाह श्री. जे. सी. मुकर्जी.

## 'इंडिया हाऊस'ची स्थापना

आपल्या या नवीन पक्षाची संघटना बळकट करण्यासाठी पंडित शामजींनी भारतीय विद्यार्थ्यांना, प्रवासी गृहस्थांना किंवा पुढाऱ्यांना स्वतंत्र नि स्वदेशाभिमानी वातावरणात एकत्र निवसता यावे या हेतूने एक स्वतःचे

वसतिगृहही काढण्याच ठरविल. त्या वसतिगृहासाठी त्यांनी आपले एकट्याचे सहस्रावधी रुपय खर्चून लंडनमधील हायगेट या विभागात एक प्रशस्त नि शोभिवंत भवन विकत घेतले. शासनीय आरोग्य विभागाच्या मते High gate चा हा भाग लंडनमधील अत्यंत आरोग्यप्रद भाग म्हणून गणला जात होता. साऱ्या ग्रेटब्रिटन नि आयर्लंडच्या संयुक्त राज्यात ह्या हायगेट विभागांतील मृत्युप्रमाण न्यूनतम असे. त्या भवनाचे नवे नाव 'इंडिया हाउस' (भारत भवन) असे ठेवण्यात आल. ट्राम, आगगाड्यांची स्थानके तेथून अगदी जवळ होती. त्या High gate भोवताली असणारी वाटर्लु पार्क, हायगेट वुड्स नि क्वीन्स वुड्स ही रम्य उद्याने नि उपवनही त्या भवनापासून काही मिनिटांच्या अंतरावर होती. त्या भवनाभोवती व्यायामशाळेला किंवा टेनिसप्रभृती करमणुकीच्या खेळांच्या क्रीडांगणास पुरेसे रुंद अंगण होते. भवनात पंचवीस जणांना रहाता येईल इतक्या खोल्या होत्या. त्यामध्ये खालच्या तळावर (तळ मजल्यावर) भाषणालय, वाचनालय नि पुस्तकालय हे विभाग सलग ठेवून निवासी मंडळींना अभ्यासाची नि परिसंवादाची सोयही केलेली होती. त्या वसतिगृहाची व्यवस्था केवळ भारतीय मनुष्यांच्याच हाती असावी असा मूळ नियमच होता. मद्यपानास बंदी असे. इतर सर्व गृहक्रम ऑक्सफर्ड येथील रस्किन महाशाळेच्या प्रमाणे आखलेला होता. शामजींच्या शिष्यवृत्तिधरांना भोजन नि निवासाचा (Boarding & Lodging चा) व्यय विशेष सुविधा म्हणून आठवड्याला १६ शिलींगप्रमाणे ठरविलेला होता. इतर निवाश्यांना भर आकार पडे.

ह्या भारत भवनाचा उद्घाटन समारंभ १ जुलै १९०५ ला थाटामाटाने झाला. पंडितजींच्या मते जे हिंदुस्थानचे खरेखुर हितचिंतक होते असे ब्रिटिश नि आयरिश गृहस्थही त्या समारंभास उपस्थित होते. त्यामध्ये ज्यांचा परिचय मागे करून दिला आहे ते सोशल डेमोक्राटिक पक्षाचे अध्वर्यु मि. हाइंडमन, पॉझिटिव्हिस्ट सोसायटीचे मि. स्विनिक, जस्टिस पत्राचे संपादक मि. क्वेल्च, आणि दोनतीन नामांकित आयरिश होमरूल पक्षाचे धुरीण त्या सभेस उपस्थित होते. भारतीय समाजापैकी स्वतः दादाभाई नवरोजी, लाला लजपतराय, माडाम कामा इत्यादी प्रमुख पुढारी उपस्थित असून हिंदी विद्यार्थ्यांचाही बराच भरणा होता. पंडितजींच्या प्राथमिक भाषणानंतर मि. हाइंडमन यांच्या हस्तेच भारत भवनाचे उद्घाटन झाले. त्यावळी त्यांनी जे हिंदुस्थानविषयक भाषण केले ते हिंदी पुढाऱ्यांतील काँग्रेसवादी देशभक्त दादाभाई नवरोजींनाच नव्हे तर होमरूलवादी पंडित शामजी ह्यांनाही झणझणीत वाटल्यावाचून राहिल नाही. त्यांतील काही वाक्य पहा :-

**ब्रिटिशनिष्ठता म्हणजेच भारतद्रोह!**

"As things stand, loyalty to Great Britain means treachery to India. I have met many Indians and the loyalty to British rule, which the majority have professed, has been disgusting. Either they were insincere or they were ignorant. But of late, I rejoice to see that a new spirit has been manifested. Thus there are men & women here this afternoon from different provinces of India and of different schools of thought; but the ideal final emancipation is the same with all."

"Indians have uptill now hugged their chains. From England itself there is nothing to be hoped."

"It is the immoderate men, the determined men, the fanatical men who will work out the salvation of India by herself."

"The institution of this India House is a great step in that direction of Indian growth and Indian Emancipation."

"Some of these who are here this afternoon, may live to see the first fruit of its triumphant success."

ह्याचा भावार्थ की "ब्रिटन नि हिंदुस्थान ह्यांचे आजच संबंध पहाता ब्रिटनशी राजनिष्ठपणे रहाणे म्हणजेच हिंदुस्थानशी देशद्रोह करणे होय. असे असतानाही मला पुष्कळ हिंदी लोक असे भेटलेले आहत की त्यांनी व्यक्तविलेली ब्रिटिशसत्तेविषयीची राजनिष्ठा पाहून तिटकारा यावा. एक तर ते त्या लोकांचे ढोंग असावे नाही तर अज्ञान असावे. तथापि अलीकडे एका नवीन चैत्यन्याचा उदय झालला पाहून मला आनंद वाटतो. हेच पहा की आज ह्या सभेत जे ही स्त्री-पुरुष जमलेले आहत ते विभिन्न प्रांताचे आणि पंथाचे असले तरी हिंदुस्थानला दास्यमुक्त करण्याच्या एकाच ध्येयाने ते आज प्रेरित झालेले आहेत. हिंदी लोकांनी आजपर्यंत त्यांच्या शृंखलांनाच भूषण मानून कवटाळलेले होते. . ."

". . . स्वतः इंग्लंडकडून तुम्ही कशाचीही आशा धरू नका."

"(नमस्त नव्हे तर) जे उच्छृंखल आहत, हटवादी आहत, अतिरेकी आहत तेच लोक हिंदुस्थानला स्वपराक्रमे स्वतंत्र करू शकतील."

"ह्या 'इंडिया हाउस' सारखी संस्था ही हिंदुस्थानच्या दास्यमुक्ततेच्या मार्गातील बरेच पुढचे पाउल आहे."

"आज येथे जमलल्या मंडळींपैकी काहीजण तरी त्यांच्या आयुष्यात त्या यशाची प्राथमिक फळ पाहू शकतीलही."

**पण तुमचा नवा कार्यक्रम कोणता?**

पंडित शामजींच्या ह्या होमरूलच्या किंवा स्वायत्ततेच्या इंग्लंडमधील चळवळीने हिंदुस्थानातील राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडवून दिली. जे स्वदेशनिष्ठ, अर्थात 'जहाल' त्यांनी तिच उत्कटपणे स्वागत केले. कॉँग्रेसमधील ब्रिटिशनिष्ठ, अर्थात 'मवाळ' धुरीणांनी तिला तुच्छतने हेटाळले. परंतु पायोनिअर प्रभृती अँग्लो-इंडियन पत्रे नि संस्था ह्यांनी मात्र शामजींच्या होमरूलच्या उघडउघड मागणीने नि हाइंडमनसारख्यांच्या भाषणांनी चिडून जाऊन सरळपण बजावले की "होमरूलच्या मागणीसारखी राजद्रोही मागणी नि अशी ब्रिटिशद्रोही भाषण नि लेख जर हिंदुस्थानात कोणी करते नि लिहिते तर त्याला काळपाण्यावर किंवा फाशीच जावे लागते. म्हणूनच तर 'इंडियन सोशिऑलाजिस्ट' पत्राचा हा भ्याड संपादक प्रथम हिंदुस्थानातून पळून गेला आणि आता आमच्या ब्रिटनमधल्या उदार अशा विचार नि प्रचार स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून हिंदी लोकांत ब्रिटिशराज्याचा द्रोह सुरक्षितपणे फैलावित आहे! होमरूलवाद्यांनी ध्यानात ठेवावे की त्यांची ब्रिटिश तलवारीशी गाठ आहे! त्यांना रक्तपात हवा आहे का? नाही तर होमरूल आम्हा ब्रिटिशांचे हातून ते कोणत्या साधनांनी घेऊ इच्छितात?" कॉँग्रसी नेमस्त पत्रेही जरा निराळ्या सुरात पण तोच प्रश्न सर्वच 'जहालांची' तोंड बंद पाडण्यास कुचेष्टेने विचारू लागली की, "कॉँग्रेसच्या अर्ज विनंत्या ठराव इत्यादी साधनांना टाकाऊ म्हणणे सोपे आहे. पण त्या साधनांवाचून तुमच्यापाशी तरी अशी कोणती अमोघ साधने आहेत? नुसत्या मागण्यांचे काय! होमरूलचीच काय, स्वर्गाचीसुद्धा मागणी करता येईल! पण तो मिळवायचा कसा? नुसता शिवराळपणा सोडला तर तुमच्यापाशी तरी तसा काही कार्यक्रम आहे काय?" स्वपक्षीयांनासुद्धा हाच प्रश्न सचिंत करी की होमरूल म्हटला, स्वायत्तता म्हटली, तरी ती मिळवायची कोणत्या साधनांनी, त्याचा स्वदेशीयांना झेपेल असा नवा कार्यक्रम कोणता?

वरील आक्षेपांना नि पृच्छांना उत्तर देण शामजींना भागच होते. आणि ते उत्तर शोधण्यास शामजींना फार लांब जावयासही नको होते. ज्या आयरीश राजकारणातून त्यांनी 'होमरूल'चे ध्येय उचलले होते त्याच आयरीश राजकारणात ब्रिटिशविरोधी असा 'सीनफीन' नावाचा जो पक्ष त्यावेळी गाजत होता त्याचा 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' नावाचा, म्हणजे अप्रत्यक्ष प्रतिकाराचा, धूमधडाक्याने चाललेला कार्यक्रम हा शामजींच्या पुढेच होता. त्यातच काही न्यूनाधिक आलटापालट करून शामजींनी आपला नवा कार्यक्रम आखला आणि 'होमरूल सोसायटी'च्या स्थापनेनंतर तीन चार महिन्यांच्या आतच त्यांनी तो उघडपणे प्रसिद्धिला. त्यावेळची माहिती आमच्या आजच्या आठवणी प्रमाणे सांगण्यापक्षा शक्यतो त्यावेळच्या प्रलेखांच्या (Documents च्या) आधारेच व्यक्तविण्याचा प्रयत्न या ग्रंथातून करावयाचा आमचा उद्दश असल्याने शामजींच्या त्यावेळच्या लेखांतील दोनतीन उतारेच खाली देत आहे :-

सन १९०५ च्या आक्टोबरच्या इंडियन सोशिओलॉजिस्टच्या अंकात शामजी लिहितात :

"Now in order to put an end to the pernicious system of the government of one country by another, such as obtains in the case of India, there seem to be only three ways in which this can be accomplished, viz. :

(१) The voluntary withdrawal of English occupation.

(२) A successful effort on the part of Indians to throw off the foreign yoke.

(३) The disinterested intervention of some Foreign power in Favour of India.

The last expedient is obviously out of the question in the present political and moral condition of the world.

As to the second expedient, Mr. Meredith Townsend in his work 'Asia and Europe' asks 'Will England retain India'? Although he haughtily believes that 'the British dominion over the great peninsula of Asia is a benefit to mankind!' he holds that 'the empire which came in a day will disappear in a night. ' In his opinion it is not necessary for Indians to resort to arms for compelling England to relinquish its hold on India. He neatly expressed himself and enforces his argument in the following words:

"There are no white servants, not even grooms, no white struck for a week, the Empire would collapse like a house of cards, and every ruling man would be a starving prisoner in his own house. He could not move or feed himself or get water."

"If anyone refuses to buy or sell any commodity, or to have any transactions with any class of people, he commits no crime known to the law. It is therefore plain that Indians can obtain emancipation by simply refusing to help their foreign master without incurring the evils of a violent revolution."

मतितार्थ असा :- "हिंदुस्थानला इंग्रजांच्या राजकीय दास्यातून सोडवण्याचे तीन मार्गच काय ते उपलब्ध आहेत. पहिला, इंग्रजांनी आपण होऊन हिंदुस्थान सोडावा. दुसरा, इंग्रजांचे हे परकीय जू हिंदुस्थानने स्वतःच्या यशस्वी प्रयत्नांनी फेकून द्यावे. तिसरा, कोणातरी इतर प्रबल राष्ट्राने इंग्रजांच्या हातून हिंदुस्थानची मुक्तता करण्यासाठी निःस्वार्थ बुद्धीने धावून यावे.

या तीन मार्गांपैकी शेवटचा मार्ग सध्याच्या जागतिक, राजकीय नि नैतिक परिस्थितीकडे पाहाता उघडउघड असंभव आहे.

www.savarkarsmarak.com

दुसऱ्या मार्गासंबंधी मेरिडिथ टाउनसेंड आपल्या एशिया नि युरोप या ग्रंथात काय म्हणतो ते पहा. यद्यपि हिंदुस्थानावर ब्रिटिशांची अधिसत्ता चालण्यातच मनुष्य जातीचे हित आहे, असे तो हटातटाने लिहितो, तथापि इंग्लंडला हिंदुस्थान हाती ठेवता येईल का? हा प्रश्न चर्चिताना तो ग्रंथकार उत्तरतो की एका दिवसात इंग्लंडच्या हाती पडलेले हे साम्राज्य एका रात्रीत निसटून जाईल! हिंदुस्थानने शस्त्र उपसण्याची सुद्धा काही एक आवश्यकता नाही. तिथे गोरा चाकर मिळणे नाही, गोरा घोडाखरारी नाही. गोरा आरक्षक नाही, गोरा टपालवाला नाही, गोऱ्या जातीचे असे काहीच नाही. जर ह्या काळसर लोकांनी एक आठवडाभर नुसता कामबंदीचा संप केला तर हे साम्राज्य पत्त्यांच्या एखाद्या तंबूसारखे कोसळून जाईल. आणि सत्ता चालविणारा प्रत्येक गोरा आपल्या घरातच बंदी होऊन भुकेन तडफडत पडेल. त्याला सहाय्याचे अभावी न हालता येईल न खाता न पिता.

कारण जर कोणी वस्तू खरीदणे वा विकणे नाकारले किंवा कोण्या वर्गाशी कसलीही देवघेव करण्याचे सोडून दिले तर तो निर्बंधाला (कायद्याला) ठाउक असणारा असा कोणताही दंड्य अपराध करीत आहे अस म्हणता येणे शक्य नाही. यावरून ही उघड आहे की सशस्त्र क्रांतीच्या भयावह मार्गाचा अवलंब न करताही हिंदुस्थानला परदास्यातून स्वतःची मुक्तता करून घेता येईल. परकीय सत्ताधिकाऱ्यांना सहाय्य म्हणून द्यावयाचे नाही असा सोपा निर्धार तेवढाच हिंदुस्थानने केला की पुरे!"

शामजींनी पुरस्कारिलेल्या ह्या Passive Resistance च्या प्रकट कार्यक्रमावर टीकेचा भडिमार करताना 'Pioneer' या प्रमुख अँग्लोइंडियन पत्राने होमरूलवाद्यांवर 'ते अंततः सशस्त्र बंडखोरीच्याच बेतात आहेत' असा ठपका ठेवला. तेव्हा ते निमित्त साधून असा भलतासलता आरोप आपल्या चळवळीवर केव्हाही लादता येणार नाही असे निक्षून सांगताना पंडितजी आपल्या पुढच्या लेखात लिहितात, "We have never advocated the use of Force as a part of our political programme! We are thoroughly convinced that the existence of the feeling of common nationality creating a notion that it was shameful to assist the foreigner in maintaining his dominion- to quote Professor Sir J. R. Seeley- is the best remedy for the existing evils, and that Indians have no need to take up arms in order to free their country from the present foreign domination."

अर्थातः- "आमच्या कार्यक्रमातील एक अंग म्हणून आम्ही शस्त्राचारास केव्हाही पुरस्कारिलेल नाही. आमची अशी पूर्ण निश्चिती झाली आहे की एकराष्ट्रीयत्वाच्या जिवंत भावनेने भारतीय लोकांना असे वाटावयास लागले की या परकीयांना त्याची सत्ता टिकविण्याचे कामी कोणतही सहाय्य करणे ही अत्यंत घृण्य नि लज्जास्पद गोष्ट आहे आणि भारतीयांनी तसे सहाय्य देण्याचे बंद केले की पुरे. सर. जे. आर. सीले आपल्या ग्रंथात म्हणतात त्याप्रमाणे हिंदुस्थानवरील सध्याच परदास्याचे अरिष्ट नष्टविण्याचा हा निःशस्त्र मार्गच सर्वोत्तम उपाय आहे. ब्रिटिशांच्या परदास्यांतून आपल्या देशाला मुक्त करण्यासाठी हिंदुस्थानला शस्त्र उपसण्याची मुळीच आवश्यकता नाही."

आपल्या ह्या 'Principle of Dissociation' अर्थात असहकाराच्या तत्वाचे स्फुट विवरण करताना पंडितजी पुढील क्रमांकवार उपांगांचा प्रचार करू लागले. (१) कोणत्याही भारतीयाने ब्रिटिश शासनाच्या रोख्यात आपली रक्कम गुंतवू नये. (२) ब्रिटिशांनी भारतावर जे तथाकथित राष्ट्रीय ऋण (Public Debt) आकारलेले आहे ते आमूलात नाकारावे. (३)ब्रिटिश शासनाच्या नागर नि सैनिक सेवा विभागावर (Civil & Military Services)

भारतीयांनी कडक बहिष्कार घालावा. कोणतीही शासनीय चाकरी कोणीही करू नये. (४) ज्या अर्थी सर्व शासनीय (Governmental) शाला, प्रशाला, महाशालांमधून ब्रिटिशनिष्ठतेचेच शिक्षण दिले जाते त्याअर्थी भारतीयांनी या सर्व ब्रिटिश शिक्षण संस्थांवर कडक बहिष्कार घालावा. आपली मुले धाडू नयेत. (५) भारतीय सॉलिसिटर्स, बॅरिस्टर्स प्रभृतींनी हिंदुस्थानातील ब्रिटिश शासनीय न्यायालयांवर कडक बहिष्कार घालावा. आणि व्यावहारिक (Civil) प्रकरणांचा न्याय करण्यासाठी राष्ट्रीय न्यायालये उघडावी.

**तथापि पहिला मान आहे बिपिनचंद्र पाल यांचाच!**

या ग्रंथाच्या या प्रकरणात ब्रिटनमधल्या काय त्या हिंदी राजकारणाचा पूर्व वृत्तांत देण्याचा हेतू असल्यामुळे तिकडे होमरूलच्या ध्येयाची आणि Passive Resistance च्या, अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या कार्यक्रमाची घोषणा प्रथमतः पंडित शामजींनीच कशी केली ते येथपर्यंत सांगितले. परंतु, सत्याचा विपर्यास होऊ नय म्हणून येथेच हेही सांगणे अवश्य आहे की एकंदर प्रकट अशा हिंदी राजकरणाविषयी बोलायचे झाले तर काँग्रेसच्या पुढे पाऊल टाकून ह्या नव्या स्वायत्ततेच्या ध्येयाची नि अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या कार्यक्रमाची उघड घोषणा शामजींच्याही आधी धडाडीने करण्याचा मान बंगालचे बिपिनचंद्र पाल यांचाच आहे. साधारणतः सन १९०३ पासून हिंदुस्थानचे त्यावेळचे व्हाइसराय लॉर्ड कर्झन यांच्या मदांध अरेरावीमुळे साऱ्या देशात राजकीय असंतोष जेव्हा वणव्यासारखा भडकत चालला तेव्हा त्यात अनेक देशभक्तांप्रमाणेच प्रसिद्ध लाला लजपतराय नि बिपिनचंद्र पाल यांच्याही अंतःकरणांत तोवर मूळ धरून बसलेली ब्रिटिशनिष्ठता जळून राख झाली. पैकी बिपिनचंद्र पाल हे एकदा ब्रिटनमध्ये जाऊन ब्रिटिश जनतेच्या मनोवृत्तीची नि काँग्रेसच्या 'पार्लमेंटरी आघाडी' प्रभृती तोडग्यांचीही पाहणी करून आलेल होते. त्यामुळे काँग्रेसच्या ध्येयशून्य नि भिक्षांदेहिप्रवण चाकोरीतून हिंदी राजकारणाचे उद्धरण करून त्याला नव्या मूलभूत ध्येयाच्या नि स्वावलंबनाच्या पायावर उभारले पाहिजे अशी त्यांची निश्चिती झाली. शामजींप्रमाणेच पालबाबूंनीही त्यावेळच्या आयरिश राजकरणातील 'होमरूल नि सीनफीन' ह्या पक्षांच्या आंदोलनाचेच न्यूनाधिक अनुकरण करून आपला एक कार्यक्रम आखला. त्यानंतर त्यांनी स्वतःच नवीनच काढलेल्या New India ह्या इंग्लिश साप्ताहिकात आणि नंतर जे 'वंदमातरम्' नावाचे इंग्लिश दैनिक त्यांनी नि अरविंद घोष प्रभृतींनी काढले त्यातून जी मूलभूत घोषणा उघडपणे केली तिचा आशय असाः

"आता ब्रिटिशांना अस स्पष्टपणे सांगण्याची वेळ आली आहे की तुम्ही हिंदुस्थान सोडून चालते व्हा. आता आमच्यापुढे बंगालची फाळणी तुम्ही करावी की न करावी, राज्यकारभारात ही सुधारणा हवी की ती सुधारणा हवी, हा प्रश्न उरला नसून आम्हाला आता हिदुस्थानावर राज्य करण्याचा मूलभूत अधिकारच हवा आहे! आम्हांस Autonomy, स्वायत्तता हवी आहे. ती तुम्ही ब्रिटिश आपण होऊन देणार नाही हे आम्ही जाणतो. आणि म्हणूनच तुमच्या दाराशी भीक मागत बसण्याचा नाद सोडून देऊन तुमचा हिंदुस्थानातील राज्यकारभार अशक्य करून टाकण्यासाठी आणि तुम्हांस हिंदुस्थानातून निघून जाणे भाग पाडण्यासाठी आम्ही हे Passive Resistance चे, हे निःशस्त्र प्रतिकाराचे अमोघ शस्त्र उपसीत आहो"! वर शामजींनी दिलेल्या Passive Resistance च्या उपांगांचा जो उतारा दिलेला आहे जवळजवळ त्याचप्रमाणे पालबाबूंनीही त्यांच्या कार्यक्रमाची उपांगे शामजींच्या आधीच दिलेली होती.

गुप्त क्रांतिकारकांचा पक्ष सोडला तर- कारण त्यांना 'निःशस्त्र प्रतिकाराचे अमोघ शस्त्र' अपुसणारी वरील विरोधाभासी प्रतिज्ञा ऐकून हसूच कोसळले असेल!- उघड नि सामुदायिक अशा हिंदी राजकारणाचे क्षेत्रात कोणत्याही राजकीय संस्थेने, जहाल वा मवाळ पक्षाने वा वृत्तपत्राने अशी सडेतोड स्वावलंबी नि इतकी पुरोगामी घोषणा तोवर केली नव्हती. त्यातही बंगालच्या फाळणीच्या चळवळीत सुरेद्रनाथांच्या खालोखाल बिपिनचंद्र पालांच्या वक्तृत्वाचा नि लेखनाचा प्रभाव पडत होता त्यामुळे त्यांच नाव हिंदुस्थानात गाजू लागले होते. अशा नामवंत पुढाऱ्यांची वरील मूलभूत घोषणा हिंदुस्थानभर दुमदुमून जावी हे साहजिकच होय. इंग्रजांना बोचेल अशी काहीतरी धार असलेला बिपिनबाबूंचा हा नवा Passive Resistance चा कार्यक्रम सामान्य जनतेपुढे ठेवला जाताच राष्ट्रीय क्रियाशक्तीला नवे स्फुरण चढले, नवी प्रेरणा मिळाली. काही अंशी त्याच प्रेरणेमुळे पुढे दीडएक वर्षांचे आतच वर वर्णिल्याप्रमाणे सन १९०५ मध्ये शामजींनी ब्रिटनमध्ये आपली होमरूल ससायटी काढून तोच Passive Resistance चा कार्यक्रम राष्ट्रापुढे ठेवला.

शामजींची इच्छा सहाजिकपणेच अशी होती की हिंदुस्थानातील सर्व पुढाऱ्यांनीही होमरूलचे ध्येय राष्ट्रीय ध्येय म्हणून उद्‌घोषावे आणि त्यांचा अप्रत्यक्ष प्रतिकाराचा, ब्रिटिश शासनाशी सर्वंकश असहकार, Dissociation करण्याचा, वरील कार्यक्रम देशभर धडाक्याने चालू व्हावा. परंतु काँग्रेसचे तर नावच सोडा पण जहाल म्हणविणाऱ्या प्रकट चळवळींच्या पुढाऱ्यांपैकीही कोणी होमरूलची शाखा उघडण्यास किंवा तो कार्यक्रम तत्काल अंगीकारण्यास पुढे आले नाही. अपवाद होता बिपिनचंद्र पालांचाच काय तो. कारण वर सांगितल्याप्रमाणे तेच त्याचे आदिम प्रवर्तक होते. त्यांनी New India पत्रात शामजींचा सर्वतोपरी पाठपुरावा केला. पण संघटित पक्ष असा त्यांच्यामागे केव्हाच नव्हता, पक्षसंघटनेची कला त्यांना पुढेही कधी साधली नाही. संघटन सामर्थ्य असणारे जहालांतील प्रख्यात पुढारी म्हणजे टिळक! त्यांच्याशी पंडित शामजींचा त्या काळी राजकीय पत्रव्यवहारही अधूनमधून चालू झालेला होता. शामजींच्या इच्छेप्रमाणे टिळकांनी 'केसरी' त होमरूल सोसायटीवर तिची माहिती देणारा, नेमस्तांच्या लोचट ब्रिटिश-निष्ठतेची बाधा नसलेल्या शामजींच्या स्वदशनिष्ठ राजकारणाची भलावणी करणारा, परंतु त्या चळवळीशी आपले संपूर्ण तादात्म्य सुचवील असा कोणताही आंगलट शब्द नसलेला एक लेख लिहिला. तथापि होमरूलची तशी चळवळ स्वतः आपणास तत्काळ हाती का घेता येत नाही तेही मजक्या शब्दांत टिळकांनी दि. १४ जुलै १९०५ ला शामजींना एक वैयक्तिक पत्र धाडून सूचित केले. त्या पत्रात टिळक लिहितात, 'आपल्यासारखे आणखी काही कार्यकर्ते जर इंग्लंडमध्ये असते तर आज होते आहे त्याहून कितीतरी अधिक देशकार्य साधता आले असते. ज्या स्वार्थत्यागी बाण्याने आपण ह्या संस्था काढल्या आहेत त्याविषयी मी आपणास मनःपूर्वक अभिनंदीत आहे. खेदाची गोष्ट इतकीच की मला इंग्लंडमध्य येण्याचे अजून जमत नाही आणि इंग्लंडातील (विचार, आचार प्रचारादी क्षेत्रांतील) स्वतंत्र वातावरणाची जी अनुकूलता आपणास लाभली आहे ती इकडे आम्हांस लाभण्याची मुळीच आशा नाही.'

पण दादाभाईही 'Self Govt.' ची भाषा आधीपासूनच बोलू लागले होते.

तसे पाहिले तर शामजींनी सन १९०५ त होमरूल सोसायटी काढली त्याचे दीड दोन वर्ष आधीपासूनच दादाभाई स्वतःच्या व्याख्यानांतून अधून मधून Self Government ची, स्वशासनाची मागणी करू लागले होते. हिंदुस्थानात कर्झनशाहीमध्ये त्यावेळेच्या मानाने 'अपूर्व' वाटावी अशी राजकीय जागृती नि तीव्र असंतोष देशभर

चेतत चालला होता तो पाहून दादाभाईंसारख्या खऱ्या हाडाच्या काँग्रेसी देशभक्तांनाही मनोमन आनंद वाटल्यावाचून आणि राजकारणाचा पुढचा टप्पा गाठण्याचे अवसान आल्यावाचून राहिले नव्हते. हिंदुस्थानातील लॉर्ड कर्झनच्या प्रपीडक कृत्यांचा पाढा ब्रिटिश जनतेपुढे वाचण्यासाठी नि तिला हिंदी जनतेत पसरत चाललल्या तीव्र असंतोषाची जाणीव देण्यासाठी ब्रिटिश काँग्रेस कमेटीच्या वतीने सन १९०४ मध्येच आणखी एक हिंदी शिष्टमंडळ गोखले यांच्या पुढारीपणाखाली ब्रिटनमध्ये आणविण्यात आले होते. त्यात नवोदित पुढारी लाजपतरायही होते. ह्या शिष्टमंडळाच्या ब्रिटनमध्ये ज्या सभा भरविल्या गेल्या त्यात स्वतः दादाभाईंनीच सांगितले होते की "हिंदुस्थानचा प्रश्न किरकोळ सुधारणा करून सुटण्याचा काळ निघून गला. आता कॅनडा, ऑस्ट्रेलिया प्रभृती उपनिवेशांप्रमाणेच हिंदुस्थानालाही 'सेल्फ गव्हर्नमेंट'चा स्वशासनाचा अधिकार देऊन टाकणे हिंदुस्थानच्या नि ब्रिटनच्याही हिताचे आहे." दादाभाईंच्या आसऱ्याने, गोखल्यांनीही ब्रिटिश साम्राज्यांतर्गत सेल्फ गव्हर्नमेंट हीच आमची राजकीय आकांक्षा आहे म्हणून सांगितले. लाजपतरायांची पुरोगामी आकांक्षा तर काही निराळीच दिसली. पुढे लाजपतराय नि दादाभाई शामजींच्या इंडिया हाउसच्या उद्‌घाटनसभेसही उपस्थित होते. इतकेच नव्हे, तर त्या इंडिया हाउसमध्ये पहिला सशुल्क अतिथी -Paying Guest- म्हणून जे गृहस्थ रहावयास आले ते लाला लाजपतराय हेच होत. शामजी ह्या गोष्टीचा नेहमी अभिमानाने उल्लेख करीत. दादाभाई नि गोखल्यांनी केलेली 'सेल्फ गव्हर्नमेंट'ची ही नवीन पुरोगामी मागणी आणि त्या शिष्टमंडळातील काही सभासदांची शामजींच्या संस्थाशी ही लगट पाहून ब्रिटिश काँग्रेस कमेटीतील कॉटन, वेडर्नबर्न प्रभृती अँग्लो-इंडियन 'दादा' पुन्हा संतापून गेले. त्यांनी दादाभाई, गोखले, लाजपतराय ह्यांना दटावले की "प्रत्यक्ष काँग्रेसने अधिकृतपणे 'Self Government' सारखे अतिरकी ध्येय कव्हाही पुरस्कारिले नसता तिचे शिष्टमंडळ म्हणून ब्रिटिश जनतेपुढे मिरवणाऱ्या तुम्ही शिष्टांनी अशी भाषा का उच्चारली? काँग्रेस विरोधी संस्थांशी (अर्थात शामजींच्या) संबंध का ठेवलात? याचे स्पष्टीकरण करा! ब्रिटिश जनतेचे मत अशा तुमच्या कृत्यांनी हिंदी काँग्रेसविरुद्ध कलुषित होईल." ह्या दटावणीपुढे दादाभाई नि गोखले यांनी नेहमीप्रमाणे नमते घेऊन वेळ मारून नली. पण त्या मंडळात ह्यावेळी जो एक नवा शिष्ट आलेला होता त्या लाजपतरायाशी ब्रिटिश काँग्रेस कमिटीच्या अँग्लो-इंडियन 'दादां'ची ही पहिलीच गाठ होती. त्याने मात्र नमते न घेता ताडकन उत्तर धाडले की मला काँग्रेसने शिष्टमंडळात बोलावले म्हणून मी आलो. पण ह्याचा अर्थ जर असा असेल की माझ्या मनोदेवतेच्या आज्ञे प्रमाणे न वागता आपण शिकवाल तितकेच बोलावे नि तसेच वागावे तर मी या काँग्रेसी शिष्टमंडळाचे म्हणाल तेव्हा त्यागपत्र देण्यास सिद्ध आहे!'

### 'होमरूल' शब्द मात्र वापरण्याचे नाकारले! का?

वर लिहिल्याप्रमाणे Self Government ची मागणी करणाऱ्या दादाभाईंनी त्याच अर्थाचा निदर्शक शामजींनी उपयोजिलेला होमरूल शब्द मात्र वापरण्याच कटाक्षाने नाकारल. पालबाबूंची Autonomy काय, होमरूल काय, सेल्फ गव्हर्नमेंट काय या साऱ्या शब्दांचा त्यावेळी राजकीय परिभाषत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत्तता असा एकच अर्थ होत होता. पण तरीही 'होमरूल शब्द' जो त्यावेळी बहुतेक हिंदी पुढाऱ्यांना इतका भयंकर वाटला तो त्यातील अर्थापेक्षा ज्या राजकीय परंपरेचा तो बोधचिन्ह झालेला होता त्या आयरिश राजकारणाच्या भीतिप्रदतेमुळे होय. आयरिश लोकांच्या चाललेल्या सशस्त्र निःशस्त्र दंगेधोपे बहिष्कार प्रभृती चळवळीच्या

उपद्रवाने ब्रिटिश जनतेला आयरिश राजकारणाची अगदी चीड आलली होती. जे आयरिश लोक ब्रिटिश पार्लमेंटमध्ये अगदी माननीय सभासद, M. P. म्हणून निवडून येत त्यांनी सुद्धा सारे शिष्टाचार सोडून पार्लमेंटमध्ये नुसता धुमाकूळ घालीत असावे, प्रसंगी गुद्दागुद्दीवर यावे. जे ब्रिटिश लोक "आयर्लंडला होमरूल देऊन टाका" म्हणत, तेही न्यायाच्या नि प्रेमाच्या ओलाव्यापेक्षा एकदाची मिटून जाऊ द्या ही कटकट अशा मनोमन संत्रस्ततेनेच तस करावयास सिद्ध होत. ब्रिटिश जनतेला ज्याची अशी चीड आलेली असे त्या आग्यावेताळी आयरिश राजकारणाशी आपल्या सोज्वळ नि सौम्य हिंदी राजकारणाचा शारीरिक तर सोडाच पण शाब्दिक संबंधही जुळता कामा नये असा काँग्रेसी पुढाऱ्यांचा कटाक्ष असे. कारण नाहीतर ब्रिटिश जनता त्यांच्यावरही चिडती आणि त्यांचा सारा आधार तर ब्रिटिशजनतेच्या कृपादृष्टीवर! यास्तव जरी आयर्लंडला होमरूल द्यावा असे प्रकटपण म्हणणाऱ्या काही ब्रिटिश लिबरल पक्षाच्या पुढाऱ्यांचे आधारे दादाभाईही तसे म्हणत तथापि हिंदुस्थानलाही होमरूल हवा अशी घोषणा शामजींनी करताच दादाभाईंनी ती उचलून धरण्याचे नाकारले. त्यावेळच्या प्रक्षुब्ध आयरिश राजकारणाचा बोधचिन्ह झालेला तो 'होमरूल' शब्द ते हिंदी राजकारणात कटाक्षाने टाळू लागले.

**राजकारणातील एक गंमत**

अशा रीतीने निरनिराळ्या कारणांसाठी काँग्रेसमधील जहालपक्षाग्रणी टिळकांनी आणि नेमस्ताग्रणी दादाभाईंनी सन १९०५ मध्ये 'हिंदुस्थानला होमरूल!' या शामजींच्या घोषणेस प्रत्यक्षपणे स्वतः उचलून धरले नाही , पण थोडी पुढच्या कालातली असली तरी एक गमतीची गोष्ट इथेच सांगून टाकली पाहिजे की पुरेपूर नऊ-दहा वर्षांनंतर ह्याच दोघा पुढाऱ्यांत, टिळक नि दादाभाईंत, अशी अहमहमिका लागली की 'हिंदुस्थानला होमरूल' 'Home Rule for India' ही घोषणा आपली स्वतःची म्हणून कोण अधिक मोठ्याने करतो- तुम्ही की आम्ही! पुरपूर नऊ-दहा वर्षांनी- सन १९१५ मध्य इकडे ॲनी बेझंटने स्वतःची संस्था म्हणून एक 'होमरूल लीग' काढण्याचे ठरविले आणि तिचे अध्यक्षपद स्वतः राष्ट्रीय पितामह दादाभाई नवरोजींनी स्वीकारले : तर तिकडे राष्ट्रीय पक्षाने स्वतःची म्हणून दुसरी एक 'होमरूल लीग' काढली नि तिचे नेतृत्व स्वीकारल स्वतः लोकमान्य टिळकांनी!

'होमरूल' शब्दाने, त्याला प्रथमतः बहिष्कारू पहाणाऱ्यांवर शेवटी असा गमतीचा सूड उगविला. ह्या घटना घडत असताना सन १९१५ मध्ये जर पंडित शामजी म्हणाले असते की 'माझे राजकारण इतर हिंदी पुढाऱ्यांच्या दहा-पंधरा वर्षांनी पुढे असते, अग्रसर असते! मला जे सन १९०५ मध्ये समजले ते इतरांना उमजण्यास दहा-पंधरा वर्षे लागली! पंधरा वर्षांपूर्वीपासून मी होमरूलची चळवळ करण्याचे धाडस करून ती रूळवून टाकली, म्हणूनच आता तिचे पुढारीपण करण्यास यांना भय वाटत नाही.' -तर तो त्यांचा आत्मगौरव अगदी समर्थनीयच ठरता ना!
आणि ह्या होमरूलची प्राप्ति करून घेण्यासाठी पालबाबू नि पंडितजी ह्यांनी सन १९०५ मध्ये जो Passive Resistance' चा, 'Dissociation' चा म्हणजे असहकाराचा वर दिलला कार्यक्रम आखून राष्ट्रापुढे ठेवला होता, जवळजवळ त्याच कार्यक्रमाला पुढे पंधरा एक वर्षांनी अहिंसेचे बेगड तेवढ चिकटवून गांधीजींनी Non violent non-cooperation ह्या अगडबंब नावाने, जणु काही तो कार्यक्रम आपणच शोधून काढला आहे अशा थाटाने, एका वर्षांत- नि शेवटी तर -एका महिन्यात स्वराज्य मिळविण्याचे अमोघ साधन म्हणून राष्ट्रापुढे ठेवला.

वरील संदर्भावरून ही स्पष्ट होत आहे की ज्या ब्रिटिश विरोधी राजकारणास प्रकटपण अंगीकारण्याचे साहस- अर्थातच सशस्त्र क्रांतिकारक वगळता- इतर कोणत्याही हिंदी पक्षांना नि पुढाऱ्यांना पुढे पंधरावीस वर्षे

उलटून जाईतो करवले नाही त्या प्रखर नि प्रकट राजकारणाचा सूत्रपात सन १९०५ या वर्षीच लंडनमध्ये पंडित शामजींनी केला. आणि त्याच्या प्रचारासाठी संघटित प्रयत्नही चालविला. तोपर्यंत अशी कोणतीही संघटना ब्रिटनमध्ये नसल्यामुळे ब्रिटिशनिष्ठेस मनातून विटले असताही ब्रिटनमधले जे हिंदी गृहस्थ नि विद्यार्थी दादाभाईंच्या, ब्रिटिश काँग्रेस कमिटी वा लंडन इंडियन सोसायटीसारख्या ब्रिटिशनिष्ठ संस्थांतूनच काम करीत होते त्यांच्यातील अनेकजण पंडित शामजींच्या या नव्या इंडियन होमरूल सोसायटीच्या पक्षास मिळाले. एका वर्षाच्या आतच पंडितजींच्या या नव्या पक्षाच्या तेजापुढे दादाभाई प्रभृतींचा काँग्रेसी पक्ष निष्प्रभ होत चालला.

**बॅ. सरदारसिंगजी राणा**

ह्या नव्या पक्षातील शामजींच्या सहकाऱ्यांत बॅ. सरदारसिंगजी राणा ह्यांची प्रामुख्याने गणना होत होती. त्यांचा जन्म काठेवाडच्या एका लहानशा पण प्राचीन संस्थानिकांच्या वंशात झाला होता. सन १८९८ मध्ये ते बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी लंडनला आले. लवकरच तेथील राजकीय कार्यात काही तरी भाग घ्यावा अशी ओढ त्यांना लागली. त्यामुळे ते प्रथम दादाभाईंच्या लंडन इंडियन सोसायटीचे आजीव सभासद झाले आणि ब्रिटिश काँग्रेस कमेटीतही काम करू लागले. तेवढ्यात शामजींशीही त्यांचा परिचय झाला. पुढे ते पॅरिस येथेच वास्तव्य करू लागले. तेथे हिऱ्यामोत्यांच्या व्यवसायात त्यांचा चांगलाच जम बसला. तेथील तो व्यवसाय संभाळून ते लंडनलाही वारंवार भेट देत. शामजींच्या राष्ट्रीय विचारसरणीशी ते इतके सहमत नि समरस होऊन गेले की जेव्हा शामजींनी होमरूल सोसायटी काढली तेव्हा राणाजी त्या संस्थेचे उपाध्यक्षपद स्वीकारून तिच्या सर्व कार्यक्रमात प्रमुखपणे भाग घेऊ लागले. त्याच वर्षीच्या म्हणज सन १९०५ च्या डिसेंबर महिन्याच्या इंडियन सोशिआलॉजिस्टच्या अंकात बॅ. राणा यांनी एक पत्र धाडून प्रसिद्धिले की शामजींच्या योजनेप्रमाणे कोणतीही ब्रिटिश शासनाची चाकरी न करणे इत्यादी मागे वर्णिलल्या अटींवर प्रत्येकी २००० (दोन सहस्र) रुपयांच्या तीन 'भारतीय प्रवासी शिष्यवृत्त्या' देण्याचा त्यांनीही संकल्प सोडला आहे. पहिली राणा प्रतापसिंह शिष्यवृत्ती नि दुसरी शिवाजी शिष्यवृत्ती होती. तिसरी कोणातरी हिंदुस्थानच्या हितकर्त्या मुसलमानाचे नावे देण्यात येणार होती. पण तसे नाव तेव्हा किंवा पुढे कुणी सुचविलेले किंवा ठरविण्यात आलेले आढळत नाही. ह्या पत्राचे शेवटी राणाजी प्रांजलपणे लिहितात की 'पूर्वी माझ्या शिक्षणासाठी माझ्या काही भारतीय मित्रांनी आर्थिक सहाय्य दिले होते. आता तसे करण्याची माझी पाळी आली असल्याने देशबांधवांपैकी निदान दोघा तिघांना तरी स्वतंत्र देशांचा प्रवास करून राजकीय स्वतंत्रतेच्या लाभाचा आस्वाद घेता यावा यास्तव मीही आर्थिक सहाय्य करावे हे माझे अवश्य कर्तव्य आहे.'

राणाजींची हीच शिष्यवृत्ती केसरीकार टिळकांच्या नि काळकर्त्या परांजप्यांच्या अनुग्रहाने मला कशी मिळाली, त्या निमित्ताने आणि माझ्या श्वशुरांच्या नि जव्हारच्या राजांच्या आर्थिक नि आशीर्वादिक पाठिंब्याचे बळावर माझा इंग्लंडला जाण्याचा योगायोग कसा जुळून आला ते वृत्त या ग्रंथाच्या तिसऱ्या 'पुणे-मुंबई ' भागातील कालखंडात पडत असल्यामुळे त्यात दिले जाईलच.

**दादाभाईंच्या पार्लमेंटरी आघाडीची इतिश्री!**

आता सन १९०६ हे वर्ष उगवले होते. जानेवारीतच ब्रिटिश पार्लमेंटच्या नव्या निवडणुका झाल्या. पार्लमेंटमध्ये स्वतः निवडून येऊन नि पार्लमेंटात अनेक वर्षे नानाप्रकारची खटपट करूनही हिंदुस्थानचे लेशमात्र

हित साधता येत नाही हे दादाभाईंच्या कसे प्रत्ययास आले होते ते वृत्त ह्याच प्रकरणात मागे आम्ही दिले आहे. तथापि या निवडणुकीतही वयाच्या अँशीव्या वर्षाजवळ आलेले आमचे वयोवृद्ध पुढारी दादाभाई लिबरल पक्षाचे वतीने इच्छुक म्हणून पुन्हा उभे राहिलेच! प्रत्यक्ष ब्रिटिश लिबरल पक्षातच त्यांना निवडून देऊ नये असे उघडपणे म्हणणारांचा फार मोठा वर्ग होता. आयरिश सभासदांचा पार्लमेंटला जो असह्य उपसर्ग होत होता तोच ब्रिटिशांना नकोनकोसा झाला होता. त्यात आता ह्या परक्या हिंदी माणसांना 'These Black men' ना आपणच निवडून देऊन एक दुसरे उंटाचे पिल्लू पार्लमेंटात घुसडवून घण्याची घोडचूक करण्याच्या, लिबरल मतदारांची बहुसंख्यासुद्धा अगदी ताठ विरुद्ध होती. शेवटी जन्मभर वेड्या आशेपायी ज्या लिबरलांची हांजी हांजी केली त्याच लिबरल पक्षीय मतदारांपैकी अनेकांनी दादाभाईंविरुद्ध मते दिली. इतर ब्रिटिश पक्षीयांनी तर विरुद्ध दिलीच दिली. आणि दादाभाईंचा सपशेल पाडाव झाला. हिंदी लोकांनी पैसा पाण्यासारखा व्यय केला होता. हिंदी लोकांनी नेमस्त वा जहाल पक्षबिक्ष न पाहता केवळ 'आपला हिंदी पुढारी' म्हणून दादाभाईंसाठी शक्य ती खटपटही केली होती. त्यातही आश्‍चर्य हे की ह्या निवडणुकीत लिबरल पक्षाचाच विजय झाला होता. स्वतः लॉर्ड मोर्ले निवडून आले. फार काय ब्रिटिश काँग्रेस कमिटीतील तर हेन्री कॉटन हेही निवडून आले. पण त्या लिबरलांचेच कुंकू लावून उभे असलेले हिंदी गृहस्थ दादाभाई हेच तेवढे नेमके ब्रिटिश मतदारांकडून पाडण्यात आले!

याविषयी हिंदुस्थानातील ब्रिटिशनिष्ठ काय, देशनिष्ठ काय दोन्ही पक्षांच्या बहुतेक वृत्तपत्रांनी खेद व्यक्तविला. सभासभांतून दुःख प्रदर्शन झाले. पण शामजींनी त्यांच्या 'इंडियन सोसिआलाजिस्ट' च्या लेखामध्ये दादाभाईंच्या ह्या पराभवाचे अभिनंदन करून आनंद प्रदर्शविला. कारण व्यक्तिशः दादाभाईंचा तो प्रश्‍न नव्हता. तर राष्ट्रीय दिशाभुलीचा तो प्रश्‍न होता. पार्लमेंटरी आघाडीची जी दुधखुळी समजूत बहुतेक काँग्रेस पुढाऱ्यांच्या मनात घर करून बसलेली होती तिला दादाभाईंच्या या सपशेल पराभवाचा सणसणीत टोला बसताच ती लुळीपांगळी होऊन गेली हा मुख्य लाभ होता. यासंबंधी शामजींनी लिहिले, "पार्लमेंटरी आघाडी लढविणाऱ्या या दुधखुळ्या समजुतीपायी काँग्रेस नि इतर काही स्वतंत्र हिंदी इच्छुकांनी (Candidates) मिळून हिंदुस्थानचे न्यूनतम पंधरावीस लक्ष रुपये गेल्या वीसएक वर्षांच्या निवडणुकीतून ब्रिटनमध्ये उधळून टाकले होते. इतक्या अफाट रकमेची अशी उधळपट्टी करण्यापेक्षा तीमधून शतावधी हिंदी विद्यार्थ्यांना युरोप अमेरिकेतील स्वतंत्र देशांतून वैज्ञानिक, यांत्रिक नि तांत्रिक शिक्षणार्थ धाडता आले असते. इतर अनेक प्रत्यक्ष फलदायी देशकार्ये करता आली असती."

ते काही असले तरी यापुढे दादाभाईंनीच नव्हे तर काँग्रेसनेही पार्लमेंटरी निवडणुकीचे नाव पुन्हा काही काढले नाही. आणि देशाच्या प्रयत्नांची दिशाभूल करणाऱ्या भ्रमाचा हा एक तरी भोपळा फुटला.

**मोर्लेसाहेब भारतसचिव झाले ! !**

पण इतक्यात ब्रिटनमध्ये ह्या नव्या निवडणुकीप्रमाणे लिबरल पक्षाच्या हाती सर्व राज्यकारभार आल्यावर लिबरल प्रधानमंडळाने, स्पेन्सर नि मिल ह्यांसारख्या उदार तत्वज्ञांचा प्रत्यक्ष परिचय असलेले, त्यांचे शिष्य म्हणवून घेणारे, उदारमतवादावर मोठेमोठे ग्रंथ लिहिणारे, काँझर्व्हेटिव्ह प्रधान मंडळाच्या हिंदुस्थानावरील दडपशाहीविरुद्ध नित्य टीका करीत आलेले जे मोर्लेसाहेब त्यांचीच भारतसचिवपदावर (Secretary of state for India म्हणून) नेमणूक केली. ही बातमी येताच दादाभाईंच्या निवडणुकीतील पराभवामुळे झालेले दुःख पूर्णपणे

विसरून जाऊन काँग्रेसमधील बहुसंख्य असलेल्या हिंदी नेमस्तपक्षाच्या पुढाऱ्यांनी नि वृत्तपत्रांनी मोर्ले यांचा उदोउदो चालू केला. काँग्रेसच्या मागण्या पदरात पडण्याची पूर्वी कधीही न आलेली हीच सुसंधी होय. 'आपल्या' मोर्लेसाहेबांच्या हातीच सत्ता आली! आता मोठमोठ्या अधिकारांची स्थाने आम्हा हिंदी लोकांना मिळतील, विधिमंडळांतून व्यापक प्रतिनिधित्व मिळेल, बंगालच्या विभागणीसारखे अन्याय दूर केले जातील इत्यादी मनोरथांचे मजल्यावर मजले काँग्रेसचे हे ब्रिटिशनिष्ठ पुढारी उभारू लागले. तथापि, काँग्रेसमधील स्वदेशनिष्ठ पक्षाच्या अल्पसंख्य पुढाऱ्यांनी नि वृत्तपत्रांनी मात्र राजकीय असंतोषाचा जो अग्नी जनतेत पेटत चालला होता तो तसाच पेटवीत ठेवला आणि जोपर्यंत अशा सुधारणा हिंदुस्थानच्या पदरात प्रत्यक्षपणे पडल्या नाहीत तोपर्यंत स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय-शिक्षण प्रभृती प्रतिकारक चळवळी तशाच पुढे रेटण्याचा चंग बांधला. जनताही मोर्ले यांचे नावही न घेता ह्या स्वदेशनिष्ठ पक्षाच्या टिळक, पाल, लाजपतराय- ज्यांना अनुप्रासलोलुप लोकसमूहाने 'लाल, पाल, बाल!' ह्या आपल्या आवडीच्या पाणिनीय सूत्रांत गोवून टाकलेले होते- त्यांच्याच जयजयकारात मग्न होती.

क्रांतिकारक पक्षाला तर मोर्ले आले काय नि गेले काय ह्याचे काहीच सोयरसुतक नव्हते. त्याने जनतेतील ह्या वाढत्या असंतोषांत ज्वालावर्धक पेटतेल ओतण्याचा आणि त्या राजकीय असंतोषाने पुरेशा पेटलेल्यांना आपल्या सशस्त्र क्रांतिपक्षाची दीक्षा देऊन क्रांतिकारक गुप्त संघटन वाढविण्याचा सपाटा चालविला. ह्या सन १९०५-१९०६ च्या कालात महाराष्ट्रामध्ये अभिनव भारताचा नि इतर स्थानिक लहानसहान क्रांतिकारक गटांचा व्याप कसा झपाट्याने वाढत गेला आणि त्याची झळ बंगालला लागून श्री. अरविंद घोष, बॅ. पी. मित्र प्रभृती थोरथोर पुढाऱ्यांच्या अप्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली 'युगांतर', 'अनुशीलन समिती' इत्यादी सशस्त्र क्रांतिवाद्यांच्या गुप्त संघटना बंगालभर कशा फैलावत गेल्या, पंजाबलाही त्याची झळ कशी लागत चालली, ह्याचा वृत्तांत ह्या 'इंग्लंडमधील हिंदी राजकारणाच्या' प्रकरणात विस्तारशः देता येत नाही. तरीही अनुसंधानापुरता त्याचा हा नुसता उल्लेख केला आहे.

## होमरूल सोसायटीची प्रथम वार्षिक सभा

ब्रिटनमध्ये पंडित शामजींनीही मोर्लेसाहेबांचा उदोउदो करणाऱ्या ब्रिटिश काँग्रेस कमिटीच्या ह्या प्रयत्नांचा आपल्या 'इंडियन सोशिऑजिस्ट' पत्रांतून खरपूस समाचार घेतला. 'इंडियन होमरूल सोसायटीचा' प्रथम वार्षिक वाढदिवस साजरा करण्यासाठी त्या संस्थेची सर्वसाधारण सभा २४ फेब्रुवारी सन १९०६ या दिवशी भरली होती. तीतही "मोर्लेसाहेबांसारखे 'चांगले' किंवा कर्झनसारखे 'वाईट' ब्रिटिश राज्यकर्ते नुसते आले काय नि गेले काय सारखेच! हिंदुस्थानला होमरूलचा, स्वायत्ततेचा अधिकार हा ब्रिटिशांच्या औदार्याने मिळणारा नसून त्यासाठी ब्रिटिश शासनसंस्थेवर सर्वतोमुखी कडक बहिष्कार घालण्याने, Passive Resistance ने, निःशस्त्र प्रतिकारानेच मिळू शकेल" असे ठरावातून नि त्यावरील भाषणातून ठासून सांगण्यात आले.

## सुरेंद्रनाथ बानर्जींना अटक नि दंड

काँग्रेसच्या दुबळ्या आशावादावर जहालपक्षाने केलेल्या वरील टीकेचे सगळ्यात क्षोभकारक नि प्रत्यक्ष प्रत्यंतर म्हणजे बंगालचे त्यावेळचे अत्यंत लोकप्रिय नि विख्यात पुढारी जे सुरेंद्रनाथ बानर्जी यांची, मोर्लेसाहेब भारत सचिव होतात न होतात तोच, दिनांक १४ एप्रिल सन १९०६ ला झालेली धरपकड ही होय. वंदेमातरमची

घोषणा करणे हेही राजद्रोहात्मक कृत्य समजून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी बंगालमध्ये त्या घोषणेवर बंदी घालावी, हा अपमान न साहून ती बंदी मोडून बारिसाल येथे एक मोठी मिरवणूक सुरेंद्रनाथांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली काढली. आणि स्वतः वंदेमातरमच्या गर्जना करीत चालले. त्यासाठी त्यांना पकडून अपमानून अधिकाऱ्यांनी दंड ठोठावला. वास्तविक पाहता सुरेंद्रनाथ बानर्जी हे काँग्रेसमधील ब्रिटिशनिष्ठ किंवा नेमस्त पक्षाचे अग्रणी म्हणून समजले जात. स्वतःलाही ते तसेच म्हणवीत. हिंदी काँग्रेसचे ते दोन वेळा अध्यक्ष झालेले होते. यासाठी वस्तुतः त्यांची धरपकड होताच त्याचा निषेध ब्रिटिश काँग्रेस कमिटीनेच लंडनमध्ये सार्वजनिक सभा घेऊन प्रथमतः करावयास पाहिजे होता. परंतु मोर्लेसाहेब हे भारत सचिव झाल्यामुळे ते अनेक मोठमोठ्या अधिकारांची स्थाने हिंदी राज्ययंत्रात हिंदी लोकांना दिल्यावाचून राहणार नाहीत ह्या भोळ्या आशेने पछाडलेल्या आणि अँग्लो-इंडियनाच्या कच्छपी लागलेल्या ब्रिटिश काँग्रेस कमिटीतील दादाभाईंसारख्या देशभक्तांनी सुद्धा ब्रिटिश शासनाचा तसा निषेध करण्याचे कर्तव्य केले नाही. जर हिंदी राज्यकारभारात अशी उच्च अधिकारस्थाने देण्याचे ब्रिटिश शासनाने ठरविले तर ती स्थाने काँग्रेसमधील आपल्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी पुढाऱ्यांनाच दिली जाणार, होमरूलवादी किंवा टिळकांसारख्या स्वदेशनिष्ठ पक्षाच्या चळवळ्या लोकांना ब्रिटिश शासन ती स्थाने केव्हाही देणार नाही हेही काँग्रेसमधील ह्या ब्रिटिशनिष्ठ पुढाऱ्यांना चांगले ठाउक होते. त्या वैयक्तिक नसल्या तरी पक्षीय मोहापायी ब्रिटिश शासनाच्या आणि त्यातही मोर्ले यांच्या राजवटीत चाललेल्या दडपशाहीच्या विरुद्ध अवाक्षरही बोलणे हे त्यांना राजकीय दृष्ट्या अनुचित वाटू लागले होते. यास्तव ब्रिटिश काँग्रेस कमिटीने, ब्रिटिश शासनाने सुरेंद्रनाथ बानर्जींना पकडण्यात केलेल्या दुष्कृत्याच्या निषेधाची सभा घेतली नाही. परंतु होमरूल सोसायटीने मात्र ४ मे सन १९०६ ह्या दिवशी सुरेद्रनाथांना पकडल्याविषयी निषेध करणारी सार्वजनिक सभा लंडनमध्ये भरविली. पंडित शामजी हेच तिचे अध्यक्ष होते. लंडनमधील बहुतेक हिंदी मंडळी तिथे उपस्थित होती. त्यांत विठ्ठलभाई पटेल (त्यावेळचे एक तरुण) आणि त्यावेळी लंडनला असलेले भाई परमानंद यांची नावेही आढळतात. पंडित शामजींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की ब्रिटिश काँग्रेस कमिटीने स्वतः तर अशी सभा घेतली नाहीच पण होमरूल लीगने बोलविलेल्या ह्या सभेचे निमंत्रण गेले असताही दादाभाई नवरोजी, किंवा त्यावेळेस लंडनलाच असलेले गोखलेही या सभेला आलेले नाहीत.

## हिंदी राजकारणाची पॅरिसमधील पहिली सभा
## हिदुस्थानच्या परराष्ट्रीय राजकारणाचा 'हरिःओम्'!

लंडनमधील वरील निषेधाची सभा होताच पॅरीस येथील बॅ. राणा आणि श्री. गोदरेज ह्या 'होमरूल सोसायटी'च्या जोड उपाध्यक्षांनी पॅरिसमध्ये राहाणाऱ्या हिंदी लोकांची सुरेंद्रनाथांना पकडल्याविषयी ब्रिटिश शासनाचा निषेध करणारी सभा ५ मे सन १९०६ ला भरविली. आणि त्या सभेत अनेकांची आवेशपूर्ण भाषणे होऊन तसा ठराव संमतीला गेला. या सभेचा विशेष उल्लेख अशासाठी केला आहे की त्या काळापर्यंत ब्रिटनमध्ये हिंदी राजकारण असे काँग्रेसच लढवीत असे. ब्रिटिश साम्राज्याला ती 'आपले' साम्राज्य मानी त्यामुळे ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेरील कोणत्याही परदेशांत हिंदुस्थानवर ब्रिटनकडून होणाऱ्या अन्यायाविषयी ब्र काढणे म्हणजे 'आपल्या'च साम्राज्याची परराष्ट्रात दुष्कीर्ती करण्यासारखे, देशद्रोह करण्या-सारखे, आपणा राजनिष्ठ प्रजाजनांना न शोभणारे आणि ब्रिटिश जनतेचा राग ओढवून घेणारे अपराधी कृत्य होय अशी काँग्रेसी ब्रिटिशनिष्ठ

नेत्यांची समजूत असे. अर्थात् ह्या काळापर्यंत ब्रिटनबाहेरच्या कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रांत हिंदी राजकारणाचा स्वतंत्रपणे सार्वजनिक उल्लेख असा झालेलाच नव्हता. हिंदुस्थानचे गाऱ्हाणे हिंदी लोकांकडून जगाचे वेशीवर टांगले गेलेलेच नव्हते. परंतु काँग्रेसच्या दाबाखाली नसलेली नि उघडउघड ब्रिटिशसत्ता विरोधी अशी 'होमरूल सोसायटीची संस्था निघाल्यापासून' पंडित शामजींनी ब्रिटिशसाम्राज्यविरोधी पक्षांशी आणि ब्रिटनेतर हिंदी राष्ट्रांशी हिंदी राजकारणाचा संबंध जोडण्याचा पायंडा प्रथम पाडला. ब्रिटिशविरोधी आयरिश पक्षांशी नि सोशल डेमॉक्रेट यासारख्या ब्रिटिशसाम्राज्याविरोधी पक्षाच्या हाइंडमनसारख्या पुढाऱ्यांशी त्यांनी प्रकट संबंध ठेवलेलेच होते. परंतु आता होमरूल सोसायटीच्या पॅरीसमध्ये भरलेल्या नि ब्रिटिशांच्या हिंदुस्थानावरील दडपशाहीचा प्रकट निषेध फ्रान्ससारख्या परराष्ट्रात जाऊन करणाऱ्या या सभेने हिंदी राजकारणाचा ब्रिटनेतर राष्ट्रात पहिला हरिःॐ केला. ह्या ५ मे सन १९०६ या दिनांकी पॅरिस येथे भरलेल्या हिंदी राजकारणाच्या छोट्याशा का होईना पण प्रकट सभेचा दुसराही एक ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा विशेष आहे. ती सभा जरी निःशस्त्रवादी होमरूलवाद्यांचीच होती,तथापि तिच्या हस्ते त्या दिवशी पॅरिसमध्ये हिंदी राजकारणाचे जे प्रस्थान ठेवले गेले त्याचाच व्याप वाढत वाढत उणीपुरी दहा वर्षे पॅरिस हेच 'अभिनव भारता'च्या सशस्त्र क्रांतिकारक संघटनेचे नि क्रांतिकारक पुढाऱ्यांचे मुख्य केंद्र बनलेले होते. बॅ. राणा, मादाम कामा, नंतर पंडित शामजी, लाला हरदयाळ प्रभृती 'अभिनव भारती'य अग्रगण्य क्रांतिकारक पुढाऱ्यांची पॅरिस हीच 'काशी' झालेली होती! पुढे जेव्हा फ्रान्सचा नि ब्रिटनचा जर्मनीविरुद्ध तुल्यारिमित्र संधी होऊन सन १९१४ चे जर्मन महायुद्ध चालू झाले तेव्हाच काय ते हिंदी क्रांतिकारकांना आपले हे काशीक्षेत्र पॅरिसहून बर्लिनला न्यावे लागले! माझ्या स्वतःच्या क्रांतिजीवनाचा तर पॅरिस नि फ्रान्स देश ह्यांच्याशी किती घनिष्ट संबंध येत गेला ते ह्या आत्मवृत्ताच्या ओघात पुढे स्पष्ट होईलच.

पॅरिसमध्ये त्यावेळी असलेल्या हिंदी लोकांत बहुतेक भरणा हिंदी व्यापाऱ्यांचा असे. त्यांत हिरे-माणिक-मोत्यांचा व्यापार करणारे बरेच सधन असत. तो व्यापारीवर्ग काँग्रेसच्या तोपर्यंतच्या केवळ बौद्धिक असणाऱ्या राजकारणापासून बहुधा अलिप्तच होता. परंतु बॅ. राणा नि मादाम कामा हे त्या वेळचे 'होमरूल सोसायटी'चे प्रमुख कार्यकर्ते पॅरिसलाच स्थायिक झालेले असल्यामुळे त्यांच्या प्रयत्नानी तेथील त्या व्यापारीमंडळीतही हिंदी राजकारणविषयक जागृती होऊ लागली. वरील दोघा पुढाऱ्यांपैकी बॅरिस्टर राणा महाशयांचा प्रथम-परिचय ह्या प्रकरणात मागे करून दिलाच आहे. दुसऱ्या ज्या मादाम कामाबाई त्यांचा, माझी लंडनला पोचल्यानंतर त्यांची माझी ओळख होईपर्यंतचा प्राथमिक परिचय इथेच करून देत आहे.

श्रीमती कामाबाई (मादाम भिकाजी रुस्तुम कामा) यांचा जन्म मुंबईच्या एका श्रीमान पारशी कुटुंबात झाला. तशाच एका श्रीमान पारशी कुटुंबातील रुस्तुमजी कामा या नावाच्या गृहस्थांशी त्यांचे लग्न झाले. रुस्तुमजी कामा हे बॅरिस्टरीचा व्यवसाय करीत. माहेरचे नि सासरचे, अशी त्यांची दोन्ही कुटुंबे मुंबईतील उच्च श्रेणीच्या नागरिकांत गणली जात. त्यामुळे त्यांना राजमान्यताही लाभलेली असे. मुंबईच्या ब्रिटिश गव्हर्नराचे वतीने जे सणसमारंभ साजरे होत त्यांतही सुप्रतिष्ठित नागरिक म्हणून ह्या कामा दांपत्याला कधी कधी आमंत्रिले जाई. अशा प्रसंगी कामाबाईंनाही आपल्या यजमानासमवेत गव्हर्नरांच्या आतिथ्याचा सन्मान लाभे. कामाबाईंना मुलेबाळेही होती. अशा प्रकारे संतती,संपत्ती, समाजप्रतिष्ठा,राजमान्यता लाभलेली असूनही कामाबाईंना त्या केवळ वैयक्तिक संसारात गुंतून राहणे रुचत नसे. त्यामुळे स्थानिक कक्षेत येतील त्या लहानमोठ्या सामाजिक

कार्यात त्या भाग घेऊ लागल्या. पुढे मुंबईत जेव्हा प्लेगची साथ पहिल्यानेच आली तेव्हा त्या संसर्गजन्य रोगाने मोठाच कहर उसळविला. एखाद्या चाळीतील एखाद्या घरात एक मनुष्य प्लेगने पछाडला की त्या संसर्गाने कुटुंबचे कुटुंब नि चाळची चाळ त्या साथीच्या तावडीत सापडे. त्या नवीन भीषण रोगावर तोवर औषधही सापडलेले नव्हते. प्रतिबंधक लसीचाही पक्का शोध लागलेला नव्हता. प्लेगच्या रोग्यांनी भरलेल्या रुग्णालयांतून डॉक्टराचे किंवा परिचारिकेचे काम करणेही धोक्याचे झाले होते. अशा वेळी जे परोपकारी नि धाडसी पुरूष प्लेगच्या तडाख्यात सापडलेल्या शतावरी रोग्यांची शुश्रुषा करण्यासाठी उभारलेल्या स्वयंसेवक पथकांतून प्रविष्ट झाले त्यात कामाबाईंनीही आपले नाव नोंदविले. स्वतःचा सुखाचा संसार सोडून प्लेगच्या रुग्णालयात त्यांनी स्वतःच्या जिवाकडे न पाहता रोग्यात मिसळून त्यांची विनावेतन इतक्या तन्मयतेने सेवा केली की शेवटी त्यांच्याच जीवावर बेतली. त्यांनाच प्लेगने पछाडले. सुदैव इतकेच की तशाही जीवावरच्या संकटातून त्या कशाबशा वाचल्या. परंतु त्यांची प्रकृती त्या प्लेगच्या आजारात इतकी क्षीण झाली की हिंदुस्थानच्या प्लेगदूषित वातावरणातून अगदी दूर जाऊन त्यांनी काही वर्षे तरी युरोपमध्ये रहावे असा त्यांच्या डॉक्टरानी आग्रहाचा समादेश (सल्ला) त्यांना दिला. मध्यंतरी त्यांचे नि त्यांच्या यजमानांचे काही कौटुंबिक कलहापायी अगदीच पटेनासे झाल्यामुळे त्यांनी एकमेकाशी रीतसर संबंध विच्छेद (Separation) करून घेतला होता. त्यांची स्वतःची आर्थिक स्थितीही मूळची चांगली होती शेवटी प्रकृती अगदीच ढासळल्यामुळे त्या युरोपमध्ये स्वतंत्रपणे प्रकृती सुधारेतो तरी रहावयास गेल्या. तिकडे लवकरच त्या पॅरिस येथे स्थायिक झाल्या. मनावर कोणच्याही चिंतेचा किंवा गंभीर कार्याचा ताण पडू नये आणि त्यायोगे शरीरस्वास्थ्य त्वरित सुधारावे या हेतूने त्या पॅरिसमध्ये फ्रेंच लोकांतील संभावित स्त्रीपुरुषांनी काढलेल्या क्रीडामंडळे, आल्हादमंडळे इत्यादी मनोविनोदक संस्थात भाग घेत. हळूहळू पॅरिसमधील काही संपन्न, प्रतिष्ठित, विद्वान अशा समाजाच्या अभिजात श्रेणीतील (Society people मधील) स्त्रीपुरुषांशी त्यांचा चांगला परिचय झाला. अशा अभिजात फ्रेंच स्त्रीपुरुषांच्या गीतनृत्यादि मनोविनोदक संस्थातही उठून दिसावी अशी त्यांची त्यावेळी वेषभूषाही आकर्षक असे. फ्रेंच महिलांप्रमाणे फ्रेंच वेष जरी बहुधा वापरीत तथापि विशेष प्रसंगी मुंबईतील पारशी पद्धतीच्या उंची साड्या नेसून त्या फ्रेंच महिलामंडळातून मिसळत. त्यांची ती हिंदी पद्धतीची साडी नि नेसण्याची पद्धत फ्रेंच महिलांना फार आवडते असे त्या कौतुकाने स्वतःच आमच्याशी बोलताना सांगत असत. काही काळ अशा निश्चिंत नि मनोरंजक दिनक्रमात गेल्यानंतर त्यांचे शरीरस्वास्थ्य पुष्कळ सुधारले. परंतु त्यायोगे त्यांच्या मनाला मात्र अधिकच अस्वस्थता वाटू लागे. काहीतरी परोपकार, काहीतरी सार्वजनिक कार्य करण्याची त्यांच्या मनाची मूळची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना. त्या स्वतः पार्शीच असल्यामुळे पार्शी समाजातील जे विख्यात पुढारी दादाभाई नौरोजी, त्यांचा परिचय कामाबाईंनी युरोपमध्ये येताच करून घेतलेला होता. लंडनला त्या जेव्हा जेव्हा जात तेव्हा तेव्हा तेथील हिंदी राजकीय पुढाऱ्यांत त्या वावरू लागल्या होत्याच. त्यामुळे आपल्या देशातील राजकीय परदास्याचे शल्य त्यांच्या मनालाही तीव्रतेने बोचू लागले. दादाभाईंच्या नेतृत्वाखाली ज्या काही राजकीय चळवळी ब्रिटनमध्ये चालत त्यात हळूहळू त्याही भाग घेऊ लागल्या दादाभाईंच्या पार्लमेंटरी निवडणुकीच्या वेळी तर कामाबाईंनी स्वतः स्वयंसेविका होऊन पडेल ते काम केले. तथापि हिंदुस्थानात कर्झनशाहीचा धुमाकूळ चालू होऊन साऱ्या देशाच्या अंगात राजकीय असंतोष नि क्षोभ घुमू लागला तेव्हापासूनच कामाबाईंचाही कल जहाल राजकारणाकडे झुकू लागला होता. त्यामुळे पंडित शामजींच्या

कट्टर राष्ट्रीय बाण्याच्या होमरूल चळवळीचा उदय होताच कामाबाई होमरूल लीगच्या चळवळीत हिरिरीने भाग घेऊ लागल्या. त्यांचा स्वभावच धीट, जे प्रामाणिक मत असेल त्याप्रित्यर्थ पडेल तो त्याग करण्यास न कचरणाऱ्या, जे मनात असेल ते मोकळेपणे नि मोजक्या शब्दात सांगून टाकणाऱ्या असल्यामुळे त्यांनी जेव्हा राजकीय प्रचारास वाहून घेतले तेव्हा त्यांची भाषणे आणि लेख ह्यांतून त्या सडेतोडपणे सांगू लागल्या की, ब्रिटिशांच्या हातून हिंदुस्थानचा राज्यकारभार आम्ही छिनावून घेणार. आम्ही राज्यक्रांती करणार! पण हिंदुस्थानातील ही आमची राज्यक्रांती शस्त्रशील नसून शांतिशील होणारी आहे. शोणितमय नव्हे, शांततामय ! 'Our Revolution will be a bloodless and peaceful one'! अर्थात् पंडित शामजींच्या निःशस्त्रवादी कार्यक्रमा-पर्यंतच श्रीमती कामाबाईंच्या राजकीय निष्ठेचा विकास ह्या वेळेपर्यंत झालेला होता हे उघड आहे.

**ब्रिटनमधील त्यावेळचे हिंदी तरुण**

मी मागे सांगितलेच आहे की ब्रिटनमध्ये जाण्यात माझा एक प्रमुख हेतु असा होता की तिकडे हिंदुस्थानांतील सर्व प्रांतातून जाणाऱ्या शेकडो बुद्धिमान, श्रीमान, नि पुढे हिंदी शासनीय मोठीमोठी अधिकारपदे ज्यायोगे मिळत अशा आय्. सी. एस; आय्. एम्. एस्. इत्यादी परीक्षा देण्यासाठी अभ्यास करणाऱ्या तरुण हिंदी विद्यार्थी वर्गाला सहजासहजी एकत्र गाठता येईल, वारंवार भेटता येईल आणि त्यांच्यात तीव्र देशस्वातंत्र्य-लालसा संचरवून सशस्त्र क्रांतीचा प्रचार करता येईल आणि ते हिंदुस्थानात परतल्यानंतर जेव्हा प्रांतोप्रांती बॅरिस्टर, डॉक्टर, संपादक, पुढारी, मॅजिस्ट्रेट, कलेक्टर, न्यायाधीश, क्वचित् कोणी सैन्यांतील अधिकारी अशी अशी अनेक उच्चपदे पटकावतील तेव्हा साऱ्या देशातील प्रातोप्रांतीची तितकी शक्तिकेंद्रे क्रांतिकारकांच्या हाती पडतील.

ब्रिटनमध्ये ज्या हिंदी तरुण विद्यार्थिवर्गाच्या बळावर मला हा हेतू साध्य करावयाचा होता, त्या तरुण वर्गाची मनःप्रवृत्ती नि चारित्र्य मी ब्रिटनला गेलो त्यावेळी कसे होते?

**माझ्या हेतूला बव्हंशी प्रतिकार!**

त्यावेळी ब्रिटनमध्ये हिंदी विद्यार्थ्यांची संख्या किती होती ते मला आता नक्की सांगता येत नाही. तथापि ती दोन सहस्त्रापर्यंत तरी असावी. त्यात शेकडा दहाचा अपवाद सोडला तर उरलेले बहुतेक हिंदी तरुण राजकारणापासून कटाक्षाने दूर रहाणारे होते. इतकेच नव्हे तर स्वदेशभक्तीचा जाणता नि जिवंत असा संस्कारही त्यांचे मनावर झालेला नसे. त्यांतही ते शिक्षणाच्या नि कामाच्या सोयीप्रमाणे निरनिराळ्या नगरातून पांगलेले असत. कुठे कुठे चार पाच तर कुठे कुठे दहापाच. ऑक्सफर्ड, केंब्रिज, मांचेस्टर, एडिंबरो ह्या नगरांतून त्यांची बरीच संख्या असे. पण त्यांचा मुख्य भरणा लंडनच्या महानगरातच सामावलेला होता. तोही व्यक्तिशः सोयीप्रमाणे इतस्ततः निवसणारा. ब्रिटनभर विखुरलेल्या ह्या साऱ्या हिंदी विद्यार्थ्यांमध्ये देशबंधुत्वाच्या भावनेची एकात्मता संचरविणारे सामुदायिक प्रसंगच सहसा येत नसत. त्यांच्यात तशी एकात्मता संचरविण्यात राजकीय नसली तरी सामाजिक वा सांस्कृतिक अशी कोणतीही संघटित संस्था यशस्वी झालेली नव्हती. त्यातही, ह्यांतील बहुतेक विद्यार्थी हे हिदुस्थानातील छोट्यामोठ्या संस्थानिकांची, लाखो रुपये उपार्जिणाऱ्या नि पूर्णपणे इंग्रजाळलेल्या भूस्वामी (जमिनदार ), बॅरिस्टर, डॉक्टर, दिवाण, सरदार प्रभृती श्रीमंत लोकांची मुले असत. त्यामुळे त्यांना 'साहेबी' विलासाचे नि ब्रिटिश निष्ठतेचे बाळकडू जन्मापासूनच पाजलेले असे. आपल्या मुलांवर बालपणापासूनच सर्वतोपरीचे विलायती संस्कार घडावे नि तो अंतरबाह्य 'साहेब' बनवा म्हणून हिंदुस्थानातील कित्येक श्रीमंत नि

नामवंत लोक आपल्या मुलाला बाळंतखोलीतच विलायती गोऱ्या दाईच्या स्वाधीन करीत. नि तो बारा चौदा वर्षाचा होतो न होतो तोच त्यास ब्रिटनमध्ये धाडून 'हॅरो'सारख्या तिकडच्या प्राथमिक शाळांतून इंग्रजी शिक्षण देण्यासाठी कोणातरी इंग्रजी कुटुंबात किंवा इंग्रजी वसतिगृहात ठेवीत. अशा मुलांसाठी शिक्षण शुल्क, खाणावळ नि देखरेख महिलांसाठी म्हणून हे ब्रिटिश-खुळे लोक सहस्त्रावधी रुपये इंग्रजांच्या खिशात 'साभार' ओतीत. 'थेट साहेब' बनण्यासाठी हे बहुसंख्य हिंदी तरुण आपसात सुद्धा इंग्रजीतच बोलत आणि आपली जी कोणाची बंगाली, पंजाबी इत्यादी प्रादेशिक मातृभाषा असेल 'मी विसरलो बुवा ती!' असे ऐटीत सांगण्यात ते भूषण मानीत. ब्रिटिश गायन शिकू पहात. ब्रिटिश नृत्यवर्गातून कोण्यातरी भटक्या गोऱ्या मुलीं (Street Girls) समवेत का होईना पण ब्रिटिशांसारखे नाचावयास शिकण्यात हवे तितके पैसे ते उधळीत. आपले लग्न आधीच घरी झालेले आहे हे सांगितले तर गोऱ्या स्त्रिया-पुरुष 'इतक्या लहान वयात!' असे आपणास हिणवतील यास्तव हे हिंदी तरुण आपण अविवाहितच आहोत म्हणून चापून खोटे बोलत. उच्छृंखल ब्रिटिश तरुणतरूणी वर्गापेक्षा आपण उनाडपणांतसुद्धा मागासलेले नाही हे दाखविण्यासाठी छछोरपणाच्या रंगाढंगातही ते पाय मागे घेत नसत. श्रीमंत ब्रिटिश विद्यार्थ्यांनाही खाली पहावयास लावतील अशा उंची कापडांचे नि उंची शिवणाचे पँट, कोट, टाय ह्यांचे अनेक 'सूट' ते वापरीत. आणि ब्रिटिश अभिजात पद्धतीप्रमाणे दिवसातून जेवणाचा, फिरण्याचा, नाचण्याचा, झोपण्याचा असे निरनिराळे वेष दिवसातून चारचारदा पालटीत. वसतिगृहात रहाण्यापेक्षा ब्रिटिशांच्या कुटुंबातच अधिक पैसे देऊनसुद्धा, मिसळून रहाण्याकडे त्यांचा ओढा असे. ह्या कामी त्यांना ब्रिटिशलोकांतील मध्यमवर्गात रूढ असलेली 'paying guest' ची पद्धत फार उपयोगी पडे. ती पद्धत अशी की अगदी उघड उघड 'खानावळ' हे किंचित हीनतादर्शक नाव न देता ब्रिटिश मध्यम वर्गातील अनेक कुटुंबे आपल्या राहत्या घरी कुटुंबातच दोनतीन परक्या माणसांना रहाण्यास नि जेवण्यास पैसे घेऊन ठेवतात आणि त्यांना 'paying guests' म्हणजे 'सशुल्क अतिथि' असे शब्दार्थशः हास्यास्पद असले तरी तिकडे 'खाणावळी' हून किंचित सभ्य समजले जाणारे नाव देतात. त्यावेळी अशी ब्रिटिश कुटुंबेसुद्धा हिंदी लोकांना सशुल्क अतिथी म्हणून कुटुंबात ठेवण्याचे बहुधा कटाक्षाने टाळीत. तथापि अगदी अडलेली निर्धन ब्रिटिश कुटुंबे हिंदी लोकांनाही सशुल्क अतिथि म्हणून घरात ठेवू लागली होती. पुढे अनुभवाने त्यांतील काही कुटुंबे तर हिंदी सशुल्क अतिथीच आर्थिकदृष्ट्या अधिक लाभकारक ठरे म्हणून निवडू लागली. कारण गोऱ्या कुटुंबातील मुलांमाणसांत सरमिसळ रहाण्यात, बोलण्यात, एकाच टेबलाभोवती खुर्चीसखुर्ची लावून जेवावयास बसण्यात ह्या वर्गाच्या हिंदी तरुणांना इतका आनंद होई, धन्यता वाटे, की ते अवाच्यासवा भाडे त्या कुटुंबास देत. त्या गोऱ्या कुटुंबाचा सिगारेटचा नि मद्याचा प्रत्यहीचा होणार व्ययही असे हिंदी सशुल्क अतिथी मिळताच अनायासेच वाचे. कारण उंची सिगारेट्स नि उंची मद्ये वापरणारे हे हिंदी सशुल्क अतिथी आपल्यासमवेतच आपल्या यजमानांच्या गोऱ्या कुटुंबातील मंडळीना प्रसन्नविण्यासाठी त्या त्या वस्तूची भेट त्यांना देत असत. अशा नाना प्रकारच्या लाळघोटेपणाने गोऱ्या साहेबांनी आपल्यालाही त्यांच्या समाजात त्यांच्यातलाच एक सुधारलेला गृहस्थ म्हणून समानतेने सामावून घ्यावे ह्यास्तव ह्या तरुण हिंदी वर्गाने पराकाष्ठेचा प्रयत्न केलेला असला आणि आपली मूळची रहाणीसहाणी पालटून विलायतेतील साहबांची स्वीकारली असली तरी त्यांच्या हिंदीपणाची एक गोष्ट तेवढी पालटणे त्यांना काही केल्या साधत नसे. ती गोष्ट म्हणजे त्यांचा काळा रंग! गोरे लोक वापरीत ते ते सर्व विलायती उंची साबण त्यांनी वापरून पाहिले परंतु काही केल्या त्या काळ्या

रंगाचा गोरा रंग होईना. त्यायोगे 'थेट साहेब' बनण्यासाठी केलेल्या त्यांच्या इतर सर्व विलासविहारावर नि रंगरंगोटीवर पाणी पडे. उच्चपदस्य गोऱ्या लॉर्ड लोकांसारखे अगदी टॉपहॅट नि टेलकोट घालून जरी ते बाहेर पडले तरी मार्गात काय, नृत्यगृहात काय, नाट्यगृहात काय, किंवा चहाच्या साध्या दुकानात काय त्यांच्याकडे तिरस्काराने पहात'. ब्ल्याकी', 'निगर', 'नेटिव्ह' असे अपशब्द गोरे लोक कुजबुजताना त्यांना आढळत. तथापि, आपण इतका लाळघोटेपणा करूनही ब्रिटिश समाजात आपली केवळ हिंदी म्हणून अशी हेटाळणी होते ह्यांची त्यांना काहीएक खंत वाटत नसे. उघडच आहे. यत्ने कृते यदि न सिंध्यति कोत्र दोषः!!

वरील प्रत्येक विधान प्रत्येक हिंदी विद्यार्थ्याला लागू आहे असे नाही. त्या वर्गास मात्र सामान्यतः ते लागू आहे. त्यातही ब्रिटिश लोकांची अशी स्वाभिमान-शून्य हांजीहांजी काही हिंदी विद्यार्थी व्यक्तिशः करीत असते किंवा वैयक्तिक उच्छृंखलपणापायी किंवा विकृत आवडीनिवडीपायी ते असे वागत असते तर तशा वैयक्तिक गोष्टींचा नामनिर्देश असा सार्वजनिकपणे करणे हे मी अप्रशस्तच मानले असते. परंतु ह्या हिंदीवर्गातील त्या सर्व वैयक्तिक उनाड किंवा लघाळ कृत्यांचा उगम एका दास्यप्रवण अशा अराष्ट्रीय प्रवृत्तीतून झालेला होता. यासाठी व्यक्तिशः नसला तरी वर्गशः या गोष्टींचा उल्लेख करणे हे सार्वजनिक कर्तव्य आहे. आपली जात, आपले राष्ट्र, आपली संस्कृती-जर तिला संस्कृती म्हणायचे असेल तर, रहाणी सहाणी ही सर्व हीन आहेत, लज्जास्पद आहेत. म्हणूनच टाकाऊ आहेत असे ह्या हिंदी विद्यार्थी वर्गाचे मन त्यांना खास असे. त्यांच्या पालकांनी तसे बाळकडूच त्यांना पाजलेले होते. त्यातही इंग्लंडमध्ये येताच इंग्लिश साम्राज्याचे ते वैभव पाहून त्यांचे डोळे दिपून जात. इंग्लिश भाषा, त्यांचे वाङ्मय, त्यांची संस्कृती, त्यांचे रूप, त्यांचा रंग, त्यांची रहाणी ह्यांची, ह्या मूळातच स्वाभिमानाचा जीवनरस ज्यांच्या मनातून पिळून टाकलेला आहे अशा कोवळ्या हिंदी तरूणांवर सकृतदर्शनीच अशी काही प्रबळ मोहिनी पडे आणि पाडली जाई की त्यांना ब्रिटिश लोक म्हणजे कोण्या देवयोनीतलीच एक दैवी जात आहे की काय असे भासू लागावे! त्यांच्या ह्या स्वत्वशून्य भावनेचे हे आमच्या शब्दात केलेले वर्णन क्वचित अतिशयोक्त होऊ नये ह्यासाठी त्याच काळातीलच एका हिंदी लेखकाचा एक उतारा येथे खाली देऊ. त्यातही हा लेखक परधार्जिणे पणाची उपजत खोड असलेला कोणी अर्वाचीन हिंदु नाही, तर मुसलमान आहे. त्यांचे नाव सय्यद अहमद. जे पुढे 'सर' सय्यद अहमद म्हणून प्रसिद्ध झाले, ज्यांनी अलिगडचे मुसलमानी शिक्षण केंद्र मूलतः प्रस्थापिले आणि ज्यांनी हिंदूचा पाडाव करण्यासाठी ब्रिटिशांच्या राजसत्तेचा उदोउदो करण्याचे बाळकडु मुसलमान समाजास पाजले!! सय्यद अहमद जेव्हा इंग्लंडमध्ये त्यांच्या तरूणपणी वास्तव करीत होते तेव्हा ते आपल्या हिंदुस्थानातील इष्टमित्रांना तिकडचे वर्तमान कळविणारी पत्रे लिहीत असत. त्यांतील सन १८६९ च्या एका पत्रात ते लिहितात की :-"The English have reasons to believe thet we in India are imbecile brutes. What I have seen and daily seeing is utterly beyond imagination of a native in India. All good things, spiritual and worldly which should be found in man have been bestowed by the Almighty on Europe and especially on the English. (Nehru's Autobiography page 461)

भावार्थ की "आम्हा इंडियनांना दुबळया नि पशुतुल्य लोकांचा समाज असे इंग्लिश लोक जे समजतात ते काही उगीच नव्हे. मी इकडे जे काही पाहिले आहे नि प्रत्यक्षही पहात आहे त्यांची इंडियातील नेटिव्ह लोकांना कल्पना सुध्दा करवणार नाही. आत्मिकदृष्टया आणि भौतिकदृष्टया ज्या ज्या सर्व गोष्टी त्या सर्व शक्तिमान ईश्वराने युरोपला देऊन टाकल्या आहेत. त्यातही विशेषतः इंग्लिश लोकांना!"

ब्रिटनमध्ये गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांची नव्हे तर तत्रस्थ बहुतेक हिंदी नागरिकांची स्वाभिमानशुन्यता किती हीनतम अवस्थेत पोहचली होती हे सिद्ध करणारे हे वरील सय्यद अहंमदचे एकच पत्र उपलब्ध आहे असे नव्हे. अगदी दादाभाईंच्या नि सुरेंद्रनाथांच्या ब्रिटनमधल्या प्राथमिक वास्तवाच्या जुन्या काळापासुन तो थेट मी लंडनला पोचेपर्यंत त्या आमच्या तिकडे गेलेल्या बहूसंख्य विद्यार्थ्यांची नि गृहस्थांची मने अशीच पूर्णपणे कशी इंग्रजाळलेली होती हे त्या त्या वेळच्या लेखांचे काही उतारे देऊन आम्ही यापूर्वीच 'पूर्वपीठीका' ह्या खंडात नि ह्या चालू प्रकरणातही वारंवार दाखविलेलेच आहे.

गांधीजी हेही निर्बंध शिक्षणाकरिता त्यांच्या तरूणपणी इंग्लंडमध्ये होते तेव्हा त्यांची मनःप्रवृत्तीही अगदी वरील विद्यार्थीवगार्सारखीच इंग्रजाळलेली झाली होती. 'टॉप हॅट', 'टेल कोट' नवनवीन 'टाईज' अशा थेट वरच्या वर्गातल्या इंग्लिश 'जंटलमन ' च्या वेषात ते नटलेले असत. त्यावेळच्या त्यांच्या ह्या इंग्लिश पद्धतीच्या नटण्यामुरडण्याचे नि इंग्लिश लोकांच्या स्तोमाने भारलेल्या संभाषणांचे वर्णन केलेले आहे. मोतीलाल नेहरूंचेही मन, अरविदांच्या वडिलांप्रमाणेच इंग्लिश संस्कृतीच्या स्तोमाने इतके भारलेले होते. की आपल्या मुलाला जवाहर नेहरूला अगदी लहानपणापासूनच इंग्लिश संस्कतीच्या बरणीतच मुरविले जावे असे वाटून त्यांनी जवाहरलाल नेहरूंनाही अगदी कोवळया वयात इंग्लंडमध्ये धाडून दिले होते. तेथल्या जवळजवळ प्राथमिक शाळेतील वसतिगृहात आणि जातिवंत इंग्लिश संस्कारात जवाहरलाल वाढत गेले यामुळे इंग्लिश विद्यापीठातील शिक्षण आणि विधिशास्त्राचा अभ्यास पूर्ण करून, बॅरिस्टर होऊन हिंदूस्थानात येईपर्यंत ब्रिटनमध्ये त्यावेळेस भडकुन राहिलेल्या भारतीय राजकारणाच्या कोणत्याही सौम्य अथवा दाहक चळवळींची त्यांना लवलेशही आच लागली नाही. याविषयी ज्यांना विशेष वृत्त हवे असेल त्यांनी गांधीजीचे, पं. नेहरूचे, चारूचंद्र दत्तांचे , नि माझ्या आधी ब्रिटनमध्ये गेलेल्या इतराची जी आत्मवृत्ते प्रसिद्ध झालेली आहेत त्या बहुतेकावरून वरील वर्णनाला यथेष्ट पुष्टी मिळते. जिज्ञासूंनी त्यांचेही अनुभव वाचावेत.

ब्रिटिशांनी आपल्या लोकांना पशुतुल्य म्हणताच ज्यांच्या अंगाचा तिळपापड न होता जे उलट प्रामाणिकपणे त्यांचे आभार मानीत म्हणत "अगदी खरे! साहेब, आम्ही आहोतच तसे! म्हणून तर आम्हास सुधारण्यासाठी आपणा ब्रिटिशांसारख्या देवकोटींतील लेकांचे राज्य आमच्यावर प्रस्थापिले जावे ही आम्ही ईश्वरी कृपा समजतो!" अशा मी लंडनमध्ये गेलो त्यापूर्वीच्या आणि त्यावेळच्या बहुसंख्य तरूण हिंदी विद्यार्थ्यांच्या मनात, तेच ब्रिटिशांचे राज्य सशस्त्र क्रांतीने, उलथुन पाडण्याची इच्छा नि अवसान लगोलग संचरावे! मुसळाला लगोलग अंकुर फुटतील! किती असंभाव्य ही अपेक्षा!

**पण तीच माझ्या मनात उफाळू लागे खरी !**

कारण एकतर, हा आमचा तरूण वर्ग मुळातच अकर्मण्य नव्हता. ज्या जातीय खाणीत आम्ही जन्मलो तीतच तेही जन्मले होते. जे जातीय रक्त आमच्या धमन्यांतून सळसळत नसले तरी, वहात होते. त्यांच्यातील कित्येकांची बुद्धिमत्ता वाखाणण्यासारखी होती. राष्ट्रीय नसली तरी कित्येकांची वैयक्तिक थोरवीच आकांक्षा प्रबळ असे. आणि त्यासाठी ते ब्रिटिश विद्यापीठातील उच्च परीक्षा ब्रिटिश विद्यार्थ्यंपेक्षाही चांगल्या प्रकारे उतरत. नंतर हिंदुस्थानात परत जाऊन 'I. C. S. , I. M. S.' सारखी विविध विभागातील अधिकारपदे ते पटकावीत. ज्या श्रीमंत वर्गातून ते पुष्कळजण आलेले असत, त्या वर्गातील मुलांना लहानपणापासूनच गाद्यागिरद्यांवर

लोळण्याचे नि गोऱ्या साहेबांपूढे लाळ घोळण्याचे बाळकडूच मिळत असे, म्हणून ते विलायतेतही तसेच वागत हे खरे; पण त्यांचे कारण असेही असू शकेल, की भोगलोलुपतेहून उच्चतर नि वैयक्तिक महत्वाकांक्षेहून महत्तर असे दुसरे स्वराष्ट्राच्या किंवा मानवाच्या हितार्थ स्वार्थत्याग करण्याचे दिव्य ध्येय त्यांच्यापुढे ठेवून, त्यांच्या तरूण आत्म्यांना तोवर कोणी आवाहनच दिले नव्हते. दैहिक भोगसुखांपेक्षा कोण्या दिव्य ध्येयार्थ त्याग करताना जे त्यागाचे आत्मिक सुख मिळू शकते, त्याचा स्वादुत्तर मधाचे बोट त्यांच्या जिभेस तोवर कोणी लावले होते का? ही भरतभूमी तुझी मातृभूमी आहे आणि ज्या ह्या ब्रिटिशांनी तिला बळाने आपली बटकी बनविलेली आहे ते हे ब्रिटिश तुझे शत्रू आहेत अशी जळजळीत स्पष्ट भाषा त्यांना तोवर कोणी ऐकविली होती का? त्यांना पटवून दिली होती का? नाही! जीवनाचा तसा उदार अर्थ, त्यांना कोणी तोवर ऐकविलाच नव्हता. स्वार्थी महत्वाकांक्षेपेक्षा अशा एखाद्या महत्तर महत्वाकांक्षेचा प्रकाशझत त्यांच्या अंधारलेल्या अंतःकरणावर टाकून त्यांना कोणी तेजाळलेलेच नव्हते. त्यांचीच कथा कशाला? दादाभाई नवरोजी, सुरेंद्रनाथ, बिपिनचंद्र, पंडित शामजी, लजपतराय अशा अशा कितीतरीजणांनी त्यांच्या वयाची तिशी उलटतो प्रचलित राजकारणाला स्पर्श सुद्धा केलेला नव्हता, तेही सर्वजण ब्रिटिशांचे राज्य ही ईश्वरी कृपा आहे असेच मानीत होते. हे मागच्या नि ह्या प्रकरणातून आम्ही वर्णिलेलेच आहे. तथापि त्यांची जशी ह्या वा त्या निमित्ते राजकीय कायापालट झाली आणि ते आज देशभक्त म्हणून गाजत आहेत तसेच आज जे हे विलायतेतील केवळ स्वार्थपलंट नि राजकीयदृष्ट्या निकामी विद्यार्थी आहेत, प्रयत्नच केला तर त्यांतील कोणी त्याप्रकारचे तरी देशभक्त होणार नाहीतच कशावरून? त्याच्याहीपुढे जाऊन त्यांच्यातूनच एखादा तरी क्रांतिकारक हुतात्माही निघू शकेल!

दुसरे असे की, हिंदुस्थानच्या त्यावेळच्या परिस्थितीत हे ब्रिटनमध्ये येणारे जाणारे बहुसंख्य तरूण ज्या वर्गातून येत तोच वर्ग हिंदी समाजात सुसंपन्न, कर्ता, धर्ता, अधिकारपदे गाजविणारा नि सर्वश्रेष्ठ असा वस्तुतःही होता नि समाजाकडून तसा मानलाही जात होता. त्यावर्गात ह्या साधनसंपन्न तरूणांतील प्रयत्नांती एकजण जरी क्रांतिपक्षाला मिळता तरी साधनहीन असे शंभर सामान्य तरूण क्रांतिपक्षाला मिळाल्याने कार्याचा जो उठाव होऊ शकता ना तितका उठाव होऊ शकता. काही प्रकरणी तरी असा प्रत्यक्ष अनुभव आल्याने ह्याविषयी माझी निश्चिती पटली होती. एखादा तरूण संस्थानिक किंवा युवराज किंवा एखादा कलेक्टर किंवा त्याचा तरूण मुलगा केवळ 'सहानुभूतिक सभासद' म्हणून जरी गुप्तपणे क्रांतिकारकांस मिळाला तरी प्रसंग सहस्रावधी रूपयांचे एकमुठी सहाय्य मिळू शके, जे क्रांतिकारक धरपकड टाळण्यासाठी भूमिगत होत त्यांना त्याच्या आधारे छपून राहता येई, आश्रय मिळे, शस्त्रांचेही काही सहाय्य होऊ शके. अशा अनेक उदाहरणांपैकी वानगीपुरती तरी उदाहरणे कालानुक्रमाप्रमाणे पुढे देण्यात येतीलच.

अशा महत्वाच्या वर्गातील बहुसंख्य तरूण जरी वर वर्णन केल्याप्रमाणे वैचारिक नि आचारिक अधोगतीला गेलेले होते. तथापी जर काही क्रांतिसंघटणा करायची तर त्यांच्यातही तिचा प्रयत्न करणे भाग होते. रिव्हाल्वर्स किंवा बॉम्ब देशात मिळत नव्हते म्हणुन तशी साधने परदेशांतुन आयात करता येत होती. पण स्वदेशातील तरूणच स्वाभिमानशुन्य नि निकम्मी आहेत म्हणून परदेशीय तरूणांचा तांडा थोडाच परदेशांतूनच आयात करता येणार होता! देशात जी नि जशी माणसे होती त्यांतूनच जो काय क्रांतिप्रवृत्त पक्ष निर्मिता येईल तो निर्मिणे भाग

होते. ह्याच न्याये भागच होते म्हणून विलायतेत गेलेल्या ह्या वरिष्ठवर्गीय पण अधोगत हिंदी तरूणांतही जे काय क्रांतितेज संचारविता येईल ते संचरविण्याचा प्रयत्न करून पहाणे हेही कर्तव्यच होते.

तिसरे असे की परदेशातील ह्या राजकीयदृष्टया अगदी टाकावू भासणा-या तरूण वर्गाहूनही अधिक भ्याड, अधिक स्वाभिमानशून्य, स्वार्थ लंपट आणि ब्रिटिश राज्याला नि राजाला अक्षरशः देवराज्य नि विष्णूचा अवतार मानणारे अनेक पंडित धर्मगुरू आणि असंख्य लाळघोटे लोक प्रत्यक्ष हिंदुस्थानातच पडलले होते. ही वस्तुस्थिती ह्या ग्रंथाच्या मागच्या भागांतून अनेकवार वर्णिलेली आहे. त्याचप्रमाणे तशा लोकांशी वादविवाद करून त्यांतील अनेकांना जाज्वल्य क्रांतिकारक बनविण्यात आम्हाला नि मला स्वतःला जे यश येत गेले त्यांची व्यक्तिशः सर्व उदाहरणे नसली तरी वानगीपुरती कित्येक उदाहरणेही ह्या ग्रंथात मागे दिलेली आहेत आणि ह्यापुढेही कालक्रमानुरोधाने पुढेही मी त्या व्यक्तींच्या प्रकरणी देणारच आहे. वादविवादाच्या प्रसंगी अशा स्वाभिमानशून्य ब्रिटिशपुजक माणसाच्या त्या त्या शंकांना उच्छेदिणारी माझी ती ती नि अप्रतिविधेय उत्तरे महाराष्ट्रातील मुरलेल्या अनुभवांचे बळावर मी लंडनला गेलो तेव्हा तेथे असलेल्या छंदीफंदी नि ब्रिटिशपूजक बहूसंख्य विद्यार्थिवर्गातही केवळ देशभक्तीचीच नव्हे तर सशस्त्र क्रांतिचीही चेतना संचरविण्याची संकृतर्शनी असंभाव्य वाटणारी अपेक्षाही काही अंशी तरी संभाव्य करून दाखविता येईल अशी माझी मला निश्चिती वाटली. म्हणून त्या दिशेने प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा मी निश्चय केला होता.

**शेकडा दहांचा अपवाद**

मी वर लिहिले आहे की मी ब्रिटनला गेलो तेव्हा तेथे असलेल्या हिंदी विद्यार्थ्यात शेकडा दहाचा अपवाद सोडला तर बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजाळलेले होते. त्या बहुसंख्याकाविषयी इतका वेळ विवेचन केले. परंतु क्रांतिकार्याच्या दृष्टीने पहाता त्या शेकडा दहा असणा-या अपवादाचेच महत्व अधिक होते. कारण हे अल्पसंख्य विद्यार्थी इंग्रजाळलेले नव्हते इतकेच नव्हे, तर त्यांची हृदये स्वाभिमानाच्या नि स्वराष्ट्राभिमानाच्या तेजाने आधीच उजळलेली होती. हे विद्यार्थी बहुतेक मध्यमवर्गीय होते.

हिंदुस्थानच्या त्यावेळच्या परिस्थितीत वरिष्ठवर्ग एकंदरीत इंग्रजाळलेला होता म्हणून क्रांतिदृष्टया टाकाउ होता. आणि समाजाचा कोटीकोटी लोकांचा जो अगदी खालचा वर्ग होता तो राजकीयदृष्टया लुळापांगळा होता; म्हणून क्रांतिदृष्टया टाकाऊ होता. उरलेला जो समाजातील मध्यम वर्ग तोच काय तो त्यावेळी भारतीय राजकारणाचा मुख्य आधार होता. स्वदेशाच्या कल्याणासाठी त्याचाच आत्मा तळमळत होता. त्या पुण्यकार्यी पडेल तो स्वार्थत्याग करण्याची धमक असणारे देशभक्त बहुधा ह्याच मध्यमवर्गातून पुढे येत असत. राज्यक्रांतीची आच ज्यांच्या हृदयाला सर्वांआधी पेटवू शकेल अशी स्फोटक देशभक्तीने भारलेल्या हृदये ह्याच वर्गात सापडू शकणारी होती. अधूनमधून तसे देशवीर, धर्मविर नि हुतात्मे जे १८५७ नंतर राजकारणात तळपून गेले, ते बहुधा ह्याच वर्गातले होते. त्यातही सन १९०३ ते १९०६ मध्ये काँग्रेसमधील ब्रिटिशनिष्ठ अशा जुन्या धोरणाच्या विरूद्ध जो राष्ट्रनिष्ठ पक्ष टिळक पाल, अरविंद प्रभृती पुढाऱ्यांच्या नेवृत्वाखाली प्रबळ होऊन स्वदेशी, बहिष्कार इत्यादी ब्रिटिशविद्रोही हाच मध्यम वर्ग आघाडीवर होता. अर्थातच ह्या काळातले जे मध्यमवर्गीय तरूण, विलायतेत आले होते ते बहुधा ह्या ब्रिटिश विरोधी राष्ट्रनिष्ठ चैतन्याने ह्या वा त्या प्रमाणात भरलेली होते. तथापि त्या राष्ट्रनिष्ठ, ज्याला लौकीक भाषेत त्यावेळी जहाल म्हणत, त्या पक्षाप्रमाणे मताने राष्ट्रनिष्ठ होते तरी

क्रांतिकारक नव्हते, सशस्त्र क्रांतिकारक तर नव्हतेच नव्हते. मध्यमवर्गातील वळणाप्रमाणे ते बहुधा आचरणात संयत, विलायतेतील शाळांतून, गृहातून, बैठकी तून ब्रिटिशलोकांत शक्यतो मनमिळाऊपणाने वागून त्यांच्यातील जे काय चांगले ते शिकण्यात तत्पर असले तरी लाळघोटेपणाने गोऱ्यांची हाजीहाजी करणारे नसत. स्वदेशसंबंधी किंवा आपल्या स्वराष्ट्रीय अस्मितेविषयी कोण्याही ब्रिटिश माणसाने पाणउतारा करणार शब्द वापरला तर त्यास हटकण्यास ते सोडीत नसत.

अर्थात, संपूर्ण स्वातंत्राच्या ध्येयाची नि सशस्त्र क्रांतीची बीजे पेरावयास त्यातल्या त्यात ज्यांची मनोभूमिका मला लगोलग अनुकूल होण्यासारखी होती असा हा एवढाच अगदी अल्पसंख्य तरूणांचा आणि होमरूल सोसायटीतील काही प्रौढांचा वर्ग लंडनमध्ये गेलो तेव्हाही अस्तित्वात होता.

**सारांश**

ह्या प्रकरणात ब्रिटनमध्ये, ५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर, हिंदी राजकारणाचा विकास कसा होत गेला ह्याचा मला अवश्य वाटला तेवढा येथेवर जो आढावा घेतलेला आहे त्यावरून हे स्पष्ट होईल की सन १९०६ च्या जुलै महिन्यात मी लंडनला पोचला तेव्हा तिकडच्या हिंदी राजकारणाच्या क्षेत्रात मुख्यतः तीन हिंदी संस्था कार्य करीत होत्या. पहिल्या दोन म्हणजे दादाभाईंच्या ब्रिटिशनिष्ठ पक्षाच्या ‘लंडन इंडियन सोसायटी’ आणि ‘ब्रिटिश कॉंग्रस कमिटी’ या संस्था होत. तिसरी संस्था ज्याला ‘स्वदेशनिष्ठ’ किंवा सामान्य जनता ‘जहाल’ म्हणून म्हणत त्या पक्षाची पंडित शामजींची ‘इंडियन होमरूल सोसायटी’ ही होय.

ह्या तिन्ही संस्थांची ध्येय त्यांच्या सेल्फ गर्व्हमेट ऑटोमनी, होमरूल इत्यादी निरनिराळ्या नावात नि आशयात कितीहि भिन्नता असली तरी ‘ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वदेशीय स्वायत्तता’ ह्याच नावाच्या चौकटीत बसणारी होती. त्यांचा मतितार्थ असाच होता.

त्यांच्या साधनांविषयी पाहता ब्रिटिशसत्तानिष्ठ सहकारापासून तो ब्रिटिश सत्ताद्रोही असहकारापर्यंत कितीहि भिन्नता असली तरी त्यांतील कोणत्याहि संस्थेच्या कार्यक्रमात शस्त्राचाराचा समावेश कोणीही केलेला नव्हता. हेही वर त्यांच्या पुढाऱ्यांच्याच लेखांचा नि भाषणांचा प्रलेखीय पुरावा (Documentary Evidence) देऊन आम्ही दाखविले आहे.

तथापि आत्यंतिक अहिंसेचे नैतिक खूळ मात्र कोणीही माजविले नव्हते !

त्या दोन्ही पक्षांपैकी कोणी समजत सशस्त्र प्रतिकार हा हिंदुस्थानच्या परिस्थितीत अशक्य आहे, कोणी म्हणत तो अनिष्ट आहे तर पंडित शामजी प्रभृती त्यावेळी म्हणतात की तो अनावश्यक आहे. औपनिवेशिक स्वायत्तता (Colonial Self Govt. ) काय किंवा होमरूल काय-हिंदुस्थानला शस्त्राचाराचा अवलंब केल्यावाचून प्राप्त होऊ शकेल, इतकेच काय ते त्या निःशस्त्रवादी सर्व पक्षांचे म्हणणे असे. पण शस्त्राचार, सशस्त्र प्रतिकार, हा मूलतःच पापमय आहे, अनैतिक आहे, तो हिंसात्मक असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शक्य असले, अनिवार्य असेले तरीसुद्धा ब्रिटिशांविरूद्ध शस्त्र उचलणे हे नीतीदृष्ट्याच गर्ह्य असल्यामुळे तसे अधर्म्य कृत्य आम्ही केव्हाही करणार नाही. मग त्यापायी हिंदुस्थान ब्रिटिशांच्या दास्यात सतत खिचपत राहीला तरी चालेल. इतकेच नव्हे तर सशस्त्र क्रांतीने हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले तरीही तसले हिंसादूषित स्वातंत्र्य आम्ही स्वीकारणार नाही अशी भ्रमिष्ट विधाने त्या वेळच्या कोणत्याही ब्रिटिशनिष्ठ किंवा ब्रिटिशविद्रोही पक्षाने वा पुढाऱ्याने केली नाहीत. स्वतः

कट्टर ब्रिटिशनिष्ठ असणाऱ्या काँग्रेसमधील फिरोजशहा, वाच्छा प्रभृती पुढाऱ्यांनीसुद्धा अशा अर्वाच्या दंभिक पणाची, भ्याडपणाची किंवा भ्रमिष्टपणाची मते केव्हाही उपदेशिली नाहीत. इकडेच नव्हे तर दादाभाई, गोखले, सुरेंद्रनाथ ते थेट फिरोजशहा वाच्छपर्यंत काँग्रेसच्या सर्व पुढाऱ्यांनी एकमताने काँग्रेसच्या तोपर्यंतच्या बहुतेक अधिवेशनातून ब्रिटिश शासनाने हिंदी लोकांना निःशस्त्र करून दुबळे बनविण्याविषयी तीव्र निषेध करणारे आणि हा शस्त्रबंदीचा हिंदी प्रजेवर लादलेला निर्बंध ब्रिटिश शासनाने तत्काल रद्द केला पाहिजे अशी मागणी करणारे ठराव संमत केलेले आहेत. आत्यंतिक अहिंसेच्या आत्यंतिक खुळास त्यावेळेपर्यंत ब्रिटिशनिष्ठ काँग्रेससुद्धा बळी पडलेली नव्हती. मग श्रीकृष्ण शिवाजींचे पूजक असलेल्या, माझिनी, ग्यारिबाल्डी प्रभृती युरोपियन सशस्त्र क्रांतिकारकांना गौरविणाऱ्या नि तत्कालिन आयरिश प्रभृती क्रांतिकारकांशी हातमिळवणी करू इच्छीणाऱ्या टिळक, पाल, पंडित शामजी प्रभृती ब्रिटिश सत्ताविद्रोही ‘जहाल’ पक्षाच्या पुढाऱ्यांविषयी तर बोलणीच नको!

आपल्या सर्वतोपरी निःशस्त्र नि असहाय्य परिस्थितीत सशस्त्र क्रांती त्याला अशक्य वाटे म्हणूनच काय तो तो जहाल पक्ष निःशस्त्रवादी होता. सशस्त्र क्रांती ही अधर्म्य आहे, आत्यंतिक अहिंसा हीच काय ती धर्म्य आहे, म्हणून नव्हे. ह्या आत्यंतिक अहिंसेच्या खुळाने झपाट्यात काँग्रेस पछाडली जाणार होती, पण ती पुढे, पंधरावीस वर्षांनी, गांधी-गोंधळाच्या काळात!

**संपूर्ण स्वातंत्र्यवादी सशस्त्र क्रांतिकारक पक्षाचा मागमूस सुद्धा नव्हता.**

मी लंडनला पोचलो तेव्हा वरील तीन निःशस्त्रवादी नि ब्रिटिशसाम्राज्यांतर्गत स्वायत्तावादी संस्था सोडत हिंदी राजकारणी अशी इतर कोणतीही संस्था किंवा पक्ष तिकडे प्रकटपणे अस्तित्वात नव्हता. यद्यपि ब्रिटिश सम्राटाचे उच्चाटन करून, ब्रिटिशसाम्राज्याचे जू झुगारून देऊन हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्य (Absolut Political Independence ) संपादिण्याचे ‘ध्येय’ असणाऱ्या आणि ते ध्येय साध्य करण्यासाठी सशस्त्र क्रांती अपरिहार्य असल्यामुळे ब्रिटिशांशी तशी सशस्त्र टक्कर देण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या क्रांतिकारकांच्या गुप्तसंघटना त्या सन १९०६ मध्ये हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या होत्या. महाराष्ट्र नि बंगालमध्ये भरभराटही होत्या. तथापि, त्यांचा संपर्क ब्रिटन, अमरिका प्रभृती कोणत्याही परराष्ट्रातील हिंदी निवासीयांना म्हणण्यासारखा झालेला नव्हता. कारण सन १९०० ते १९०६ पर्यत हिंदुस्थानातील गुप्तसंस्था, अंतर्गत प्रचार नि संघटन या प्राथमिक कोणचेही प्रकट नि स्फोटक क्रांतिमय ‘कृत्य’ असे झालेले नव्हते की ज्यांच्या बातमीसरशी परराष्ट्रात असलेल्या हिंदी जनतेतही सशस्त्र क्रांतीशीलतेचा संचार व्हावा. हिंदुस्थानातून गुप्तसंस्थांचे प्रचारकही तोवर संघटीत प्रचारासाठी म्हणून तिकडे गेले नव्हते. अवघे दोन तरूण की ज्यांची हिंदुस्थानात असतानाच गुप्तसंस्थात सशस्त्र क्रांतीची शपथ घेतली होती असे काय ते ब्रिटन फ्रान्समध्ये, मी लंडनला पोचण्याच्या आधी दहाबारा महिन्यापूर्वी गेलेले होते असे मी तिकडे गेल्यानंतर माझा त्यांचा परिचय झाला तेव्हा मला कळले. तोवर त्यांचाहि एकमेकांशी क्रांतिकार्यास्तव संबंध जुळलेला नव्हता. क्रांतिसंघटनेचा सूत्रपात तर मुळीच झालेला नव्हता. ते दोघेजण म्हणजे श्रीयुत पां. म. (आजचे सेनापति) बापट आणि बंगालचे हेमचंद्रदास. पैकी बापट हे काही क्रांतीसंस्था स्थानण्याच्या उद्देशाने गेलेलेच नव्हते. तसा कोणता उपक्रमही त्यांनी तोवर केलेला नव्हता. पण हेमचंद्रदास मात्र बंगालच्या माणिकतोळा संस्थेतून बॉम्बची विद्या शिकण्याच्या विशिष्ट उद्देशानेच फ्रान्समध्ये आलेले होते. तिकडे माझी त्यांची ओळख झाल्यानंतर मी त्यांना ‘अभिनव भारत’ संस्थेची शपथ दिली. तेव्हापासून आम्ही तिघेही ‘अभिनव भारत’

संस्थेतच कार्य करीत होतो. त्याचा उल्लेख लवकरच जेव्हा खाली करावा लागेल तेव्हाच थोर क्रांतिकारांचा अवश्य तो पुर्व परिचयही करून देऊ.

अर्थात मी लंडनला पोचलो तेव्हा कोणतीही क्रांतिकारक संस्था तेथे कार्य करीत नव्हती. इतकेच नव्हे तर अठराशे सत्तावनच्या क्रांतियुद्धानंतर मी लंडनला जाईतोपर्यंत मध्यंतरीच्या दिर्घ काळातसुद्धा संघटीत क्रांतिकार्य तिकडे केव्हाही आरंभिले गेले नव्हते असे आजवर उपलब्ध झालेल्या वृत्तावरून स्पष्टपणे दिसते. यापुढे नवीन वृत्त उपलब्ध झाल्यास न कळे.

**अरविंदबाबूंविषयी उल्लेख**

तथापि ह्याविषयी ज्या तुरळक अपवादाची पुसट वृत्ते आता इतरत्र उल्लेखिली गेली आहेत तीही येथे सांगुन टाकतो. पहिली गोष्ट अरविंदबाबूंची. अरविंदबाबूंच्या श्रीमंत जनकावर इंग्रजी जीवनाची एवढी छाप पडली कि, आपली मुले लहानपणापासूनच त्या इंग्रजी वातावरणात वाढविली जावीत अशी त्यांना उत्कट इच्छा झाली. त्याकाळी बंगाल इत्यादी प्रांतात अनेक आंग्लशिक्षित गृहस्थांची अशीच धारणा झालेली असे. जशी मोतिलाल नेहरूचीहि झालेली होती. त्यांनीही काळानंतर त्यांच्या मुलाला, पुढे सुप्रसिद्ध झालेल्या जवाहरलाल नेहरूला, तसेच अगदी लहानपणापासूनच इंग्लंडच्या प्राथिमक 'पब्लिक स्कूल' मध्ये धाडलेले होते. अरविंदबाबू अगदी लहानपणी प्राथमिक शिक्षणापासून इंग्लंडमध्ये शिकत आय. सी. एस. च्या परिक्षेपर्यंत शिकले. त्यांचे वडील बंधूही तिकडेच होते. अरविंदबाबू आय. सी. एस. चे शेवटचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या घोड्यावर बसण्याच्या परिक्षेत मात्र शेवटी उतरले नाहीत. त्यामुळे त्यांना ते प्रमाणपत्र मिळाले नाही. तेव्हा त्यांच्यावर त्यांचे वडील बंधू नी वडीलही फार रागावले. परंतू अरविंदांचे मन त्यावेळी ह्या परिक्षेत आलेल्या अपयशाने जे विटले ते विटलेच. त्यांनी तेव्हा इंग्लंडातच एक Lotus and Sword किंवा The Sword and Lotus अशा काहीशी नावाची क्रांतिकारक संस्था स्थापन्याचा प्रयत्न केला म्हणून म्हणतात. परंतू अगदी लवकरच युरोपात त्यावेळी असलेल्या सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या गुणज्ञ कानावर अरविंदबाबूंच्या विलक्षण बुद्धिमत्तेची किर्ती पोहचली. आणि त्यांनी अरविंदांना आपल्या संस्थानातील एक मोठ्या अधिकारावर नेमण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे अरविंदबाबू बडौदे संस्थानात सेवा पत्करून हिंदुस्थानात निघून गेले. ह्यापेक्षा अधिक त्या त्यांच्या नावाच्या गुप्त संस्थेची काही एक वार्ता उपलब्ध नाही. तिचा उपजतच मृत्यु झाला.

**चारूचंद्र दत्तांचा उल्लेख**

त्याप्रमाणे मी इंग्लंडला पोहचण्याच्या दहाएक वर्ष आधि तसाच एक अल्पजीवी का होईना पण क्रांतिकारक गुप्त संस्था स्थापण्याचा प्रयत्न एका तरूणाने एकदा केलेला होता. असे अगदी अलिकडे पुण्याच्या मराठा या इंग्रजी पत्राच्या ०१ ऑगस्ट १९५२ च्या दिवंगत क्रांतिकारक चारूचंद्र दत्त आय. सी. एस. ह्यांच्या आत्मवृत्तातील जो एक उतारा छापलेला आहे त्यावरून दिसते. त्याचाही तात्पुरता उल्लेख म्हणून इथेच करू. दिवंगत चारूचंद्र लिहीतात की, त्यांचा जन्म १८७६ च्या सनात झाला. १८५७ च्या योद्ध्यांच्या वार्ता ऐकुण त्यांच्या मनात येई कि, आपणही तसा काही क्रांतिकारक सैनिक पराक्रम करावा. त्याकाळी आय. सी. एस. विश्वास नावाचे एक साहसी बंगाली गृहस्थ ब्राझीलमध्ये जाउन, त्या देशाच्या सैन्यात शिरून एक पराक्रम सेनानी म्हणून प्रसिद्धिला आलेला होते. त्या प्रसिद्ध बंगाली सेनानी विश्वास यांच्याकडे ब्राझीलमध्ये जाउन आपणही तसे सेनानी

व्हावे आणि नंतर हिंदुस्थानात एउन सशस्त्र क्रांतिचा उठाव करावा असा चारूदत्तांचा मानस होता. परंतू लहान वय असल्यामुळे त्यांना त्यांच्या वडीलांच्या आग्रहामुळे इंग्लंडमध्ये जाउन आय. सी. एस. चा आभ्यास करावा लागला. त्यासाठी ते सन १८९६ मध्ये इंग्लंडमध्ये गेले. तिथेही ब्राझीलकडे गुप्तपणे निघून जाण्याचा त्यांचा बेत होता. पण इतक्यात सेनानी विश्वास हे वारल्याची बातमी आली. परंतू सँढर्स, उलीच प्रभुती ब्रिटनमध्ये कोणत्याही उच्च सैनिकी शाळांतून भारतीय विद्यार्थ्यांना सक्त मज्जाव होतो असे त्यांना आढळून आले. तेव्हा तो नाद सोडून ते ब्रिटीश शासनीय सेवा विभागाच्या आय. सी. एस. चाच अभ्यास करू लागले. तथापि गुप्तपणे सशस्त्र क्रांतिचा प्रचार करण्याची खटपटही करीत होते. प्रसिद्ध आयरिश क्रांतिकारक मायकेल डेव्हीड, इंग्लंडमन हाइंडम यांच्या त्यानी भेटी घेतल्या. ह्यानी त्यांना गुप्त क्रांतीसाठी उत्तजन दिले पण जेव्हा दादाभाई नौरीजीकडे गेले तेव्हा त्यानी वरील पुढाऱ्यांसारखा दुष्कीर्त माणसांच्या (Disreputanle People) नादी लागू नका म्हणून बजावले. आणि पुन्हा काही क्रांतियोजनेविषयी ते जेव्हा दादाभाईंकडे गेले तर दादाभाईंनी “I have no time for boys to waste. Go away.” असे चक्क सांगून त्यांना परतवून दिले. यानंतरच्या त्यांच्या आठवणितील वीस एक ओळी नाव, घटना, दिनांकसुद्धा अतथ्य आहेत. कारण त्या मुळातच विसंगत आहेत. त्यांत तथ्य इतकेच दिसते की चाफेकरांनी रँडला मारल्याची बातमी लंडनला येताच त्यामुळे उत्स्फुर्त होऊन शेवटी चारूचंद्रांसह पाच हिंदी तरूणांनी सन १८९७ मध्ये एकत्र जमून शपथ घतली की We shall never rest till we have freed India from the thraldom of Britain. आम्ही हिंदुस्थानला ब्रिटिशांच्या दास्यातुन मुक्त केल्यावाचून कधीही स्वस्थ बरणार नाही. पण त्यांची ही पहीली बैठकच शेवटची ठरली. जे चार साथीदार त्या दिवशी त्यांना मिळाले होते तेहि लवकरच कामाच्या दृष्टीने नाहीसे झाले. (They were no Longer with me)- चारूचंद्रही परीक्षेच्या आभ्यासात गुंतून गेले. लवकरच आय. सी. एस. होऊन हिंदुस्थानात परतून ते सन १९०० मध्ये ब्रिटिश शासनाच्या चाकरीत शिरले. तथापी त्या आय. सी. एस. च्या उच्चाधिकारावर चाकरी करीत असतानाच त्यांनी पुढे प्रछन्नपणे श्री. अरविंद घोष यांच्या वैयक्तिक नेतृत्वाखाली ‘युगंतर’ गुप्तसंस्थेत पुष्कळ साहसी क्रांतिकृत्यात भाग घेतला. पण त्यांच्या त्या साऱ्या चळवळी हिंदुस्थानात घडल्या. यास्तव ब्रिटन इत्यादी परराष्ट्रीय हिंदी क्रांतिकारक आंदोलनाच्या ह्या वृत्तकथन प्रकरणाशी त्यांचा काही संबंध येत नाही, म्हणून या प्रकरणात ते वृत्त देण्याचे कारण नाही. तथापि त्यांच्या क्रांतिविषयक आठवणी १९४७ सनानंतर लिहिलेल्या असल्यामुळे एका चुकीच्या उल्लेखाचे तेवढे निरसन येथेच करून टाकतो. श्री. चारूचंद्र दत्त कर्णावतीला (अहमदाबादला) सन १९०८ मध्ये ब्रिटिश शासनी अधिकारी असता त्यावेळच्या काही क्रांतिकारक उलाढालीसंबंधी लिहितात की, “ Little dynamic groups (of revolutionaries) were springing up all over the county, who made their own plans and carried them out. Their local leaders, men like Chidambaram of tutikorin and Babu Khare of Nasik decided on their own lines of work. I remember that in 1908 and emissary of Babu Khare came to me in Ahmedabad and pressed me to supply them with a couple of revolivers from Calcutta. Vinayak Savarkar, a follwer of Khare had prmised to send them weapons from Europe but had so far failed to do so. It may be mentioned here that Savarkar did send later on, some Browning Automatic plstols, that with one of them Kanhere, a young Bramhin shot Jackson the District Magistrate of Nasik.” त्यांनी दिलेली माहिती काही अंशी चुकलेली आहे. चिदंबरम् पिल्ले हे कोण्या ‘लहानसहान’ स्थानिक गटाचे नव्हते. ते ‘अभिनव भारत’ या विशाल गुप्त संस्थेचे सभासद होते. सुरतला झालेल्या सन १९०७ च्या काँग्रेस अधिवेशनाचे वेळी त्यांनी अभिनव भारताची शपथ घेऊन नंतर तुतिकोरीनला त्याची शाखा स्थापिली.

दुसरी चुक ही की नाशिकच्या ज्या पुढाऱ्याचे नाव त्यांनी 'बाबू खरे' असे दिले आहे तिथे 'बाबासाहब खरे' असे नाव हवे. तिसरी चुक की प्रस्तुत कै. बाबासाहेब खरे (B. A. LL. B. ) विविज्ञ ह्यांच्या मी अनुयायी (Follower) होतो हे विधान विपर्यस्त आहे. बाबाराव खऱ्यांसारखा थोर क्रांतिकारकांचा मी "Follower" जरी असतो तरीही ती गोष्ट मला अभिमानास्पद वाटली असती. परंतु वस्तुस्थितीचा विपर्यास होऊ नये आणि जे पुढे क्रांतिकारक झाले त्या थोर पुरूषांची मतेही त्याकाळापूर्वी किती ब्रिटिशनिष्ठ असत हे जाता जाता दिग्दर्शिले जावे यासाठी एक लहानशी आठवण येथे देत आहे. बाबाराव खरे हे मजहून मोठे, उणेपुरे चाळीस वर्षांचे असताना नि मि अठरा एकोणीस वर्षांचा असताना त्यांना क्रांतिपक्षास मिळण्याविषयी जेव्हा मी नाशिकला प्रथम विनंती केली तेव्हा त्या चर्चेत ब्रिटिश साम्राटासंबंधी, मी रचलेल्या पोवाड्यातील 'घरात शिरला चोर-तयासी मानियला राजा!' हा चरण मी उच्चारला, तेव्हा देशभक्त परंतू त्यावेळी ब्रिटिशनिष्ठ असलेल्या, श्री. बाबाराव खरे यांच्या सांगण्याचा मतितार्थ असा, " तात्या, तुमचे इतक्या वेळचे संभाषण मला जरी पटत आले होते तथापि प्रत्यक्ष आपले ब्रिटिश सम्राट किंवा सम्राज्ञी ह्यांच्याविषयी असे अराजनिष्ठ उद्गार मला सहन होणार नाहीत. अरे, 'ना विष्णुःपृथ्वीपतिः' हे आपण हिंदुचे धर्मवचन आहे. सम्राटाला चोर म्हणायचे? ब्रिटिश अधिकारी, ही भृत्यशाही (Beaurocracy) चोर असेल, पण ब्रिटिश सम्राट हा आपला सम्राट! विष्णूचा अवतार!" त्यावेळी त्यांच्याप्रमाणेच अशी भाबडी समजूत असणारे शेकडो लोक आम्हाला भेटत. यासाठी ना विष्णः पृथ्वीपतिः या वचनाच्या खऱ्या अर्थाविषयी स्वतः 'काळ कर्ते परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली मला एक प्रकट व्याख्यान द्यावे लागले. इथे इतके सांगणे पुरे आहे की बाबाराव खरे हे इतके कट्टर ब्रिटिश साम्राज्य निष्ठ होते! ती त्यांची भाबडी मनःस्थिती माझ्या नि विशेषतः माझे जेष्ठ बंधू बाबाराव सावरकर यांचे प्रयत्नाने पालटून त्यांनी स्वतः माझ्या हातून पुढे एकदोन वर्षांतच सन १९०५ ला अभिनव भारताच्या झालेल्या नाशिक येथील पहिल्याच संमेलनात अभिनव भारताची दिक्षा घेतली. आणि ते संपूर्ण स्वातंत्र्यवादी नि सशस्त्र क्रांतिकारक झाले. पुढे त्यांनी क्रांतिकार्यांत विशेषतः १९०७ ते १० प्रतिष्ठित नि प्रौढ पुढारी म्हणून ते कसे पकडले गेले, त्यांची 'मोकासा' प्रभृती मत्ताही कशी राजहृत(जप्त) केली गेली, ब्रिटिशांनी केलेल्या त्यांच्या बंदीवासातील छळापायी त्यांची प्रकृती कशी ढासळली आणि देशस्वातंत्रास्तव हळहळत झिजून झिजून ते कसे मरणी मरून गेले ते हृदयक्षोभक नि हृदयद्रावक वृत्त ह्या माझ्या ब्रिटनमधील कथा भागाशी असंबंधित म्हणून जरी इथे देता येत नाही तरीही क्रांतिवीर बाबाराव सावरकरांचे श्री. द. न. गोखले यांनी लिहिलेले चरित्र आणि डॉ. वि. म. भट यांनी लिहिलेला नि १९५० मध्ये प्रसिद्धिलेला 'अभिनव भारत' हा ग्रंथ ह्या मधून जिज्ञासूंनी ते अवश्य वाचावे.

एवीतेवी मी लंडनला गेलो तेव्हा भारतीय स्वातंत्र्यवादी सशस्त्र क्रांतिकारक पक्षाच्या कोणत्याही प्रकट वा गुप्त संघटनेचे तर सोडाच पण लहानसहान अनौपचारिक गप्पागाराचे सुद्धा ब्रिटनप्रभृती परराष्ट्रातून नाममात्रही अस्तित्व नव्हते.

प्रकरण तिसरे

# शत्रूच्या शिबिरात

मागिल प्रकरणात मी लंडनला पोचला तेव्हा हिंदी राजकारणाच्या क्षेत्रात आपल्या हिंदी पक्षाची परिस्थिती काय होती ते समालोचिले. आता, आमच्या शत्रुस्थानी असलेल्या ज्या ब्रिटिशांशी आम्हास आपल्या मातृभूमीच्या विमोचनार्थ संग्राम छेडावयाचा होता त्या शत्रुपक्षाच्या त्या वेळच्या परिस्थितीविषयी आमच्या क्रांतिपक्षाची नि विशेषतः माझी काय मते होती त्यांचीहि अवश्य ती रूपरेखा इथे दिली पाहीजे.

त्याकाळीही ब्रिटिश जनता, जनता अशी, ब्रिटिशसाम्राज्य हिंदुस्थानावर राहीलेच पाहीजे अशा ठाम मताची होती. त्यांची मुख्य कारणे अशी.

प्रथमतः हिंदुस्थानातील प्रति वर्षी लुटून आणलेल्या अपरंपार संपत्तीचा प्रवाह ब्रिटीश साम्राज्याच्या राजवाड्यापासून तो ब्रिटनच्या खेड्यापाड्यापर्यंत झोपडी-झोपडीपर्यंत पाझरत जात होता. आणि त्यांची त्या झोपडी-झोपडीतील ब्रिटीश स्त्री-पुरूषाला पुरेपुर जाणीव होती. हिंदुस्थानातील ब्रिटीश भुदलात, नौदलात, भृत्यदलात सहस्त्रावधी ब्रिटीश माणसांची जी भरती चालु असे ती या ब्रिटीश खेड्यापाड्यांतील माणसांतुनच होत असे. ब्रिटीश कारखान्यांतुन काम करणाऱ्या सहस्त्रावधी कामकऱ्यांना, त्या लक्षाधिश कारखानदारवर्गा प्रमाणेच, हे पक्के ठाउक होते कि, हिंदुस्थानातील कापुस, कातडी प्रभृती कच्ची उत्पादीते जर ब्रिटीश सत्तेच्या बळावर स्वस्तात लुटून आणता आली नाहीत आणि त्यांच्या पासून पक्के बनविलेले पदार्थ परत त्या हिंदुस्थानी गिऱ्हाईकांनाच ब्रिटीश सत्तेच्या प्रभावाने महागात विकता आले नाहीत, तर ते त्यांचे ब्रिटीश कारखाने डबघाईस आल्यावाचुन राहणार नाहीत. ह्या शेतकरी, कामकरी नि व्यापारी वर्गाप्रमाणेच हिंदुस्थानात येणारे व्हाईसराय यांजपासून तो साध्या लेखनीत वर्गापर्यंतचे ब्रिटीशांच्या उच्च नि मध्यम वर्गातील सहस्त्रावधी लोकांचे पगारापोटी नि निवृत्तीवेतनापोटी हिंदुस्थानाचे कोट्यावधी रूपये ब्रिटनमधील त्या त्या वर्गाच्या खिशात ओतले जात होते हि गोष्ट हि प्रत्येक ब्रिटीश नागरीक जाणून होता. अशा प्रकारे रावापासून रंकापर्यंत ब्रिटनमधल्या सर्व वर्गातील नि घरातील जनतेचा विलासी चरीतार्थ ज्या हिंदुस्थानावर अवलंबुन होता आणि तो तसा अवलंबुन आहे ह्याची ब्रिटनमधील प्रत्येक स्त्री पुरूषाला स्वतःच्या अनुभवाने जाणीव होती तो हिंदुस्थान निव्वळ स्वार्थासाठीसुद्धा काही झाले तरी ब्रिटीशांच्या अधिराज्यातखाली ठेवलाच पाहीजे ह्याविषयी यच्चयावत् ब्रिटीश जनतेने एकमत झालेले असे. त्यांच्या प्रत्येकाच्या पोटापाण्याचाच प्रश्न होता तो!

**ब्रिटीश साम्राज्याचा परमोच्च बिंदु**

साधारणतः ख्रिस्ताच्या १९व्या शतकाच्या उत्तराधार्थ ब्रिटीश साम्राज्याने त्यांच्या प्रकर्षाचा नि प्रभुत्वाचा परमोच्च बिंदु गाठला होता. भुतकाळची गोष्ट सोडलीतरी तात्कालीन कोणतेही साम्राज्य विस्तृतेत, विशालत्वात, वैभवात, व्यवस्थेत किंवा दिग्विजयी बाहूबलात ब्रिटीश साम्राज्याच्या पासंगासही पुरते ना. ‘आमच्या साम्राज्यावर सूर्य कधिही मावळू शकत नाही’ ही ब्रिटिशांची दर्पोक्ती असली तरी त्यांनी ज्या स्पॅनिश साम्राज्याच्या दर्पोक्ती नुसार ती उचलली होती तिच्यापेक्षा शतपटीने ब्रिटिश साम्राज्याच्या प्रकरणी ती यथार्थोक्तिच होती. सीझरला नुसती ऐकून माहिति असलेली राज्ये नि राष्ट्रे तर काय परंतू ज्या राष्ट्रांच्या नि राज्यांच्या अस्तित्वाचा पत्तासुद्धा

सीझरला माहीत नव्हता- 'Which Ceazers never knew' अशा पाताल खंडातील कित्येक राष्ट्राचा नि राज्याचाही ब्रिटिश सम्राट हा अधिराट् झालेला होता. पृथ्वीच्या उभय गोलार्धातून वहाणाऱ्या सुवर्णाच्या अनेक नदनद्या आपआपल्या संपत्तीचे प्रवाह अंती ब्रिटिश राजकोषात ओतून आपआपले कारभार वहात होत्या. चारी खंडातील भूतलावर ब्रिटनची बलाढ्य सैन्य अजिंक्य ठरली होती. समुद्राची तर ब्रिटानिया स्वामिनीच होती. 'Mistress of the seas' ही तिची पदवी हिरावून घेण्याची नेपोलियनचीही छाती झाली नाही. 'Napolian could do everything but cross the English Channels-' पुन्हा अनेक उपजातीची आणि जातीची विलिनीकरणे आणि संघटना होता होता जी एकजीवी राष्ट्रे बनतात त्यांना त्यांना त्या बनावाचे आधी ज्या काळांतून जावे लागते त्या कालखंडातून ब्रिटिशराष्ट्र आधीच तावून सुलाखून निघालेले होते. कारण त्या राष्ट्रातील इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स प्रभृती जातीय वा प्रादेशीय घटकांची अंतर्गत युद्धे पूर्वीच होऊन चुकलेली होती. त्यांच्या धार्मिक पंथापंथातील कलह, राजसत्ता नि सामंतसत्ता आणि लोकसत्ता कलह इत्यादी त्यांचे अंतर्गत कलह पेटून, भडकून, जळत आधीच विझून गेलेले होते. पण त्यावेळी जर्मनी, रशिया प्रभृती युरोपातील इतर राष्ट्रांत ते अंतर्गत कलह धुमसत असल्यामुळे आणि आशियातील प्रचीन महाराष्ट्रे जीर्ण शीर्ण झाली असल्यामुळे त्या सर्वात ब्रिटन हेच एकंदरीत अधिक एकजीव एकरस, लोकसंमत घटनाबद्ध आणि अक्षरशः एकराट् असे बलवत्तर राष्ट्र झालेले होते. अंतर्गत कलहाच्या भयापासून विमुक्त झालेले असल्यामुळे त्यांची सारी राष्ट्रीय शक्ती नि बुद्धि ही त्या ब्रिटिशांना साम्राज्यीय दिग्वीजयावर एकवटता आली. त्या योगे हिंदुस्थानासारखे महाराज्य जेव्हा त्यांनी पादाक्रांत करून तेथे आपली अप्रतिहत सत्ता स्थापिली तेव्हा चहूकडे त्यांचा दरारा, बळ नि गौरव इतका वाढला की साऱ्या जगतात ब्रिटन हेच अग्रगण्य राष्ट्र समजले जाऊ लागले. ह्या आपल्या जागतिक प्रतिष्ठेचा गर्व ब्रिटनमधील स्वदेशाभिमानी जनतेच्या रोमरोमांतून सळसळत असे. ह्या आपलया मानबिंदूला यत्किंचितहि उणेपणा येऊ नये ह्यास्तव हिंदुस्थानावरील आपल्या ब्रिटिशसाम्राज्याच्या संरक्षणासाठी आपले धारदार खड्ग सदोदित अजिंक्य वीरश्रीने उपसलेले ठेवणे हे आपल्या देशाभिमानाचे सर्वोच्य कर्तव्य होय अशी ब्रिटिश जनतेची स्वयंस्फूर्त धारणा झालेली होती.

त्यातही, केवळ आपल्या स्वार्थासाठी किंवा आपल्या देशाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी किंवा त्याच्या संपन्नतेसाठी हिंदुस्थानसारख्या दुसऱ्या देशाच्या स्वातंत्राचा नि संपत्तीचा अपहार करणारा आततायी स्वदेशाभिमान हा सद्गण नसून एक अमानुष दुर्गुण होय अशी शंका इतर कोणास किंवा स्वतःसही येऊ नये म्हणून त्यांच्या हिंदुस्थानावरील पोलादी आक्रमणास त्यांनी परोपकाराचे सोनेरी पाणी चढविले होते. त्यांच्या शालेय शिक्षणातील धड्यांपासून तो 'पार्लमेंटा' तील सर्वोच्च मंत्रिमंडळाच्या वक्तव्यांपर्यंत ह्याच एका बहाण्याचा उद्घोष साऱ्या ब्रिटनभर चालू असे की आमचे ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानावर प्रस्थापिण्यात आमचा मुख्य हेतू हिंदुस्थानाचेच कल्याण करण्याचा आहे. त्या दारिद्र, दुष्काळ, दुराचार यांनी दुर्दशा झालेल्या कोटी कोटी संत्रस्त लोकांना त्यांच्यात शांतता, सुरक्षितता नि सुव्यवस्था प्रस्थापून उद्धारण्यासाठीच त्या हिंदुस्थानावर आमचे एकछत्री साम्राज्य चालविण्याचे उत्तरदायित्व आम्ही ब्रिटिशांनी स्वीकारले आहे. ब्रिटिश साम्राज्याचे जोखड हिंदुस्थानच्या मानेवर आम्ही लादलेले आहे असे म्हणण्यापेक्षा हिंदुस्थानचा उद्धार करण्याच्या भूतदयात्मक कर्तव्याचे जोखड ब्रिटनने आपल्या मानेवर स्वेछेने लादून घेतलेले आहे असे म्हणणेच अधिक योग्य होईल.

त्यावेळच्या ब्रिटिश वृत्तपत्रांचे लिखाण आणि ब्रिटिशांनी लिहिलेले हिंदुस्थानाविषयक राजकीय साहित्य चाळले असता ब्रिटिश जनता वरील उदघोषांच्या बुरख्याखाली आपल्या हिंदुस्थानवरील साम्राज्याचे वरील शब्दात कसे सतत समर्थन करीत होती त्याचा यथेच्छ पुरावा कोणालाही मिळू शकेल. ह्या सतत उद्घोषांना करता करता नि ऐकता ऐकता आपण हिंदुस्थानवर उपकार करण्यासाठीच हिंदुस्थानवर राज्य करीत आहोत ही भावना सर्वसामान्य ब्रिटिश जनतेत इतकी बळावली की प्रथमतः आपल्या काळ्याकुट्ट स्वार्थाला झाकण्यासाठी आपण तिचा सोनेरी बुरखा तोंडावर ओढलेला होता ह्याचीही जाणीव तिला राहीली नाही! अधूनमधून एखादा हरबर्ट स्पेन्सर किंवा हाइंडमन ती भावना हे मूलतः एक ढोंग होते म्हणून म्हणू लागला तर ती ब्रिटिश जनता, त्या एकट्याला एक वेडपट म्हणून तरी झिडकारी किंवा देशनिंदक म्हणून तरी फटकारी.

त्याहीपुढे जाऊन ब्रिटनमधले प्रत्येक 'चर्च' नि प्रत्येक मिशनरी हिंदुस्थानात ब्रिटिशांनी पहीले पाऊल टाकले त्या दिवसापासून ब्रिटिश जनतेस उपदेशीत नि उत्तेजित राहीला होता की हिंदुस्थानच्या केवळ ऐहिक कल्याणासाठी तुम्हा ब्रिटिशांनी तिथे तुमचे साम्राज्य चालविले पाहीजे. इतकेच नाही तर त्या हिंदुस्थानातील दगडधोंड्यांची पूजा करणाऱ्या, पापी, पतित नि असद्धर्मीय अशा कोटी कोटी लोकांना बायबलातील सत्य नि दिव्य धर्माच्या पवित्र जलाचे अमृत पाजून त्यांच्या आत्म्यांना परलौकिक सद्गती देण्यासाठीही तुम्हा ब्रिटिशांनी हिंदुस्थान वरील आपल्या ख्रिश्चन साम्राज्याची पोलादी पकड रेशमात्र ढिली होऊ देता कामा नये. ज्यांनी हिंदुस्थानात ब्रिटिश साम्राज्याचा पक्का पाया घातला आणि त्याचे धोरण आखले त्या पहिल्या पिढीपासूनच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या नि धर्मोपदेशकांच्या भाषणातून नि लेखांतून वरील आशयाचे अगणित उत्तरे विखुरलेले आहेत. दिग्दर्शनापुरते खालिल दोनच उतारे पहा.

इस्ट इंडिया कंपनीचे हाती जेव्हा साऱ्या हिंदुस्थानवरील ब्रिटिश साम्राज्यसत्ता एकवटली तेव्हा आपल्या राजकीय कारभाराच्या मूलभूत ध्येयांचे स्पष्टीकरण करताना त्या कंपनीच्या डायरेक्टरांचे चेअरमन असलेल्या मि. मॉगल्स (Maugles) ह्या प्रमुख राज्याधिकाऱ्याने भर पार्लमेंटच्या हाउस ऑफ कॉमन्समध्ये दिलेल्या आपल्या भाषणात सागितले की :

"Providence has entrusted the exensive empire of India to England in order that the banner of Christ should have trimphant from one end of india to the other. Every one must exert all his strength that there may be no idolatoriness on any account in comtinuing the grand ork of making all India Christ." (ह्या प्रमुख राज्यधिकाऱ्याच्या जोडीला ब्रिटनचा हा एक प्रख्यात धर्माधिकारी रेव्हरंड केनेडीही सन १८५६ चे आधीच काय म्हणतो पहाः

"Whatever misfortunes comes on us as long as our empire in India continues, our chief work is the propogation of Christianity in the land. Until Hindusthan from Cape-comorin to the Himalayas embraces the religion of Christ we must use all power and all the authority in our hands until India becomes a magnificiant nation, the bulwork of Christianity in the East."

भावार्थ की, 'आपल्या हिंदुस्थानावरील साम्राज्याच्या-महणजे शस्त्रबळाच्या शक्तीने यच्चयावत् हिंदूस्थान चे ख्रिश्चनस्थान बनविले पाहीजे! सबंध हिंदुस्थानला ख्रिश्चनिटीचा पूर्व दिशेकडील एक प्रचंड प्रकार, एक दुर्घर्ष दुर्ग बनवून सोडू तरच आम्ही खरे ब्रिटिश!" अशा ह्या राजकीय ठगांनी धार्मिक शपथा घेतलेल्या असत. फार काय आमचे बहुतेक भोळेभाबडे पुढारी, ज्यांना उदारधी म्हणून गौरवीत त्या मॅक्समुल्लर नि मेकाले

ह्यांच्याही छुपी मनिषा नि महत्वाकांक्षाही हीच असे हे सिद्ध करणारी त्यांची अंतस्थ पत्रे उघडकीस आलेली आहेत पण त्यांचा उल्लेख पुढे करू. हिंदी लोकांवर ख्रिश्चनिटी छळबळाने सुद्धा लादण्याचा ब्रिटिशांनी केवढा खटाटोप केला होता ह्या विषयी अधिक माहिती कोणाला विषयी अधिक माहीती कोणाला हवी असेल, तर त्यांनी आमच्या १८५७ चे स्वातंत्र्य समर ह्या पुस्तकातील प्रकरण 'आगीत तेल' अवश्य वाचावे.

परंतु हिंदुस्थानावर लादली जाणारी ही ख्रिश्चनिटी बायबली ख्रिश्चनिटि नव्हती तर ब्रिटिश ख्रिश्चनिटि होती. 'तुझ्या एका थोबाडीत कोणी मारले तर तू तुझा दुसरा गाल पुढे कर' असा आक्रमक साम्राज्यांचे वाटोळे करणारा उपदेश देणारे ते रडवे बायबल हा काही त्यांच्या ख्रिश्चनिटीचा धर्मग्रंथ नव्हता. तर 'आम्ही हिंदुस्थानचे साम्राज्य तलवारीने जिंकले आहे आणि ते तलवारीनेच राखणार आहो' अशी उघड गर्जना करणारे कडवे बाहुबल हा त्यांच्या ख्रिश्चनिटीचा धर्मग्रंथ होता. म्हणूनच ते एका हातात बंदूक नि दुसऱ्या हातात बायबल घेऊन बाहेर पडले होते. ख्रिश्चनिटीच्या प्रचारासाठी ते आपले आक्रमक ब्रिटिश साम्राज्य गाजवित होते असे ते निरंतर म्हणत आणि देवाच्या प्रर्थनेचे वेळी त्या कामी त्यांचे दैवी सहाय्यक याचीत. पण ठगांचीही एक देवता असे आणि गळेकापू वाटमाऱ्या करावयास निघण्याचे आधी ते ठगसुद्धा त्या देवतेची सहाय्य याचीत. ठगीला सहाय्य करी म्हणून जशी जी ठगांची देवता ठगांना आवडे तशीच ही त्यांची ब्रिटिश ख्रिश्चनिटी त्यांच्या हिंदुस्थानावरील साम्राज्याला बळकटी देणारी होती म्हणूनच की काय ती ब्रिटिशांना प्रिय होती नि हिंदुस्थानावर लादावयाची होती. त्यांना माहीत होते की जो जो हिंदू छळाने म्हणा, बळाने म्हणा, मनाने म्हणा, धनाने म्हणा, पण ख्रिश्चन होई तो अंती नि बहुधा वंशपरंपरा हिंदुत्वाला नित्याचा पारखा होई. त्याचे त्याचे धार्मिक, सांस्कृतिक, नि त्या परिस्थतीत बहुधा राजकीय जीवनही ब्रिटिशांशी समरस होई. आपण होऊन तो हिंदुचा शत्रू बने नि ब्रिटिशांना स्वेच्छांकित दास! त्या काळापावेतोहि ख्रिस्ती प्रचारकांनी लाखो हिंदू बाटविले होते. पिढीमागून पिढी ती बाटलेल्या ख्रिश्चनांची संख्या वाढत जाई. हिंदू राष्ट्राचे संख्याबळ त्याप्रमाणात घटत जाई. ती लक्षावधी हिंदी ख्रिश्चनांची जात, जात अशी, ब्रिटिश साम्राज्याला आपल्या धर्माचे राज्य म्हणून आपलेच राज्य समजे. हिंदु राष्ट्रालाच परधर्मिय म्हणून परपक्षीय मानी. ब्रिटिश साम्राज्यनिष्ठेची पाळेमुळे हिंदु राष्ट्राच्या अंतःप्रेरणांचीच शकले पाडून अशी खोलवर रूजवीत जाण्याचे कामी ह्या आक्रमक ब्रिटिश ख्रिश्चनिटीचा क्रूस हा त्यांचा कृपा-षाणाइतकाच परिणामकारक ठरे!

ख्रिश्चनिटीसाठी त्यांना ब्रिटिश साम्राज्य हवे होते असे नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यासाठी त्यांना ख्रिश्चनिटी हवी होती. आततायीपणालाच ईश्वरी धर्म कर्तव्य म्हणून मिरवू लागलेल्या ज्या ह्या ब्रिटिश जनतेची मनःस्थिती आधीच मर्कट तशातहि मद्य प्याला अशी झालेली होती. तीच ही ब्रिटिश जनता तिचे ते हिंदुस्थानवरील साम्राज जे अढळ नि अप्रतिहत ठेवू शकतील अशाच लोकांना आपले प्रतिनिधी म्हणून निवडून पार्लमेंटमध्ये पाठवी. आणि त्या लंडनधील पार्लमेंटच्या मंत्रिमंडळाकडून ते हिंदुस्थानचे साम्राज्य चालविण्यासाठी व्हाइसरायापासून तो अगदी खालच्या ब्रिटिश सैनिकांसेवकांपर्यचा प्रशासक वर्ग नियुक्तीला जाई. ह्या सर्व वर्गाला त्यावेळचा रूढ असलेला अँग्लो इंडियन हा शब्द थोडा लवचिक करून वापरला तर हिंदुस्थानचे राज्य प्रत्यक्षपणे चालविणारा हा अँग्लो इंडियन वर्ग स्वतंत्र नसून ब्रिटिश जनतेचा केवळ किंकर होता. जर त्याचे हिंदुस्थानातील एखादे कृत्य वा धोरण ब्रिटिश जनतेस आवडले नसते तर त्यातील व्हाइसरॉयसुद्धा त्या सर्वांची वा कोणाचीही त्या ब्रिटिश जनतेने तत्काल

हकालपट्टी केली असती. नवीन निवडणूका घेउन तिला असंमत अशा त्या पार्लमेंटातील ब्रिटिश मंत्रिमंडळालाच उलथून टाकले असते. आणि तिला रूचेल असे नवे मंत्रिमंडळ आणि हिंदुस्थानातील प्रशासक वर्ग त्या ब्रिटिश जनतेने स्थापन केला असता. ब्रिटनच्या साध्या घरगुती प्रश्नापायीसुद्धा ब्रिटिश जनतेने केवळ मतपेटीच्या (Ballot Box च्या) प्रभावाने मंत्रिमंडळाच्या अशा उलथापालथी केलेल्याही असत. परंतू हिंदुस्थानात हे अँग्लोइंडियन प्रशासक त्यांचे ब्रिटिश साम्राज्य गाजविताना अपहरण, अन्याय, अत्याचार, लूटमार, छळणूक, नि पिळवणूक जी प्रतिपदी करीत चालले होते त्यासाठी त्या ब्रिटिश जनतेने ह्या अँग्लोइंडियनांना एकदासुद्धा तसा दंड दिलेला नाही. उलटपक्षी हिंदुस्थानवर ज्यांनी ज्यांनी अधिक करडी सत्ता चालविली नि ब्रिटिश साम्राज्याचा अधिक दरारा गाजविला तो तो प्रपीडक ब्रिटिश प्रशासक, क्लाइव्ह, डलहौसी, कॅनिंग तो कर्झनपर्यंत त्या ब्रिटिश जनतेकडून राष्ट्रवीरासारखा गौरविला जात असे. अर्थात् ब्रिटिश जनता आणि हे त्यांच्यातीलच प्रशासक म्हणून हिंदुस्थानात धाडले जाणारे 'अँग्लो इंडियन' मुळात दोन नव्हतेच. ते सारे एकाच मालेचे मणी. "शेवटचा बिंदू गळेपर्यंत आम्ही हिंदुस्थानवरची आमची साम्राज्यसत्ता सोडणार नाही" अशा आशयाची लॉर्ड कर्झनने त्या सन १९०४/५ च्या मध्यंतरी अनेकवार घोषणा केली आणि हिंदी काँग्रेसने आपला 'माग्नाचार्टा' म्हणून पूजलेला ब्रिटिश राणीच्या १८५७ मधील घोषणापत्राला 'एक अशक्य नि वायफळ अधिपट' 'An impossible carter' म्हणून रद्दीत काढले. ते शब्द जरी लॉर्ड कर्झनचे होते तथापि त्या शब्दांतून निघालेली गर्जना ही साऱ्या ब्रिटिश जनतेचीच सामूहिक गर्जना होती.

शत्रूच्या शिबिरातील ही यथार्थ वास्तुस्थिती निर्भयपणे क्रांतिकारक पक्षाने आणि माझ्यापुरतेच बालावयाचे तर मी पुरती आकळलेली होती. कारण वस्तुस्थिती भेडसावणारी आहे. आपल्या आवाक्याबाहेरची आहे एवढ्यसाठी तिला निडरपणे जोखण्याचे टाळणे हे आत्मघातकी भित्रेपणाचे आहे. आणि त्यासाठी त्या वस्तुस्थितीचा तो भयंकरपणाच नाकारणे ही आत्मघातक आत्मवंचनाच आहे अशी आमची निश्चीती पटलेली होती.

तथापि बहुधा वरील विभीत वृत्तीमुळेच देशभक्त दादाभाईपासून तो देशभक्त गोखल्यांपर्यंत त्यावेळच्या काँग्रेसमधील नेमस्त पक्षाने आपली अशी आत्मवंदना कळत वा नकळत करून घेतली होती खरी. 'ब्रिटिश जनता', जनता अशी न्यायी निरपराध नि दडपेगिरीच्या साम्राज्यवादाचा तिटकारा करणारी आहे पण हिंदुस्थाना वरील साऱ्या अन्यायाविषयी नि दडपेगिरीविषयी उत्तरदायी आहे, अशी ह्या नेमस्तांनी आपली एक सोईस्कर पण सर्वथैव भ्रममूलक समजूत करून घेतेलेली होती. त्यामुळे ब्रिटिश जनतेची 'मनधरणी' करून ह्या अँग्लो इंडियन वर्गाला ताळ्यावर आणण्याचे त्यांचे सारे असफल ठरले त्यांची अवश्य तितकी विस्तृत चर्चा ह्या ग्रंथात मागे येऊन गेलेलीच आहे. इथे विषयानुबंधापुरते इतकी सांगणे पुरे आहे की अशा काही मूलभूत मतभेदामुळे, नेमस्त पक्षाच्या वरील पुढाऱ्यांविषयी माझ्या मनातील आदर नि त्यांच्या देशसेवेविषयी वाटत असलेली कृतज्ञता वारंवार व्यक्तवीत राहूनही त्यांच्यावरील राजकीय दिशाभूलीच्या धोरणावर नि कृत्यावर मला नि क्रांतिकारक पक्षाला सतत कडक टीका करावी लागे. तथापी ते आम्हा क्रांतिकारकांना जी शिव्याशापांची लाखोली वहात तसे मी केव्हाही केलेले नाही.

तीच गोष्ट, मी लंडनला पोचलो त्याकाळी भरभराटू लागलेल्या पाल बाबू, पंडीत शामजी प्रभृतींच्या 'असहकारवादी' पक्षाला नि कार्यक्रमाला लागू होती. त्यांना जरी नेमस्तप्रमाणे ब्रिटिश जनता ही निरपराध नि न्यायी वाटत नव्हती आणि तिची नुसती मनधणी करण्यापेक्षा तिला बोचेल असा काहीतरी सक्रीय प्रतिकाराचा कार्यक्रम हाती घेतला पाहीजे असे वाटे तथापि, आम्ही मागे सांगितल्याप्रमाणे तो सक्रीय कार्यक्रम केवळ नि सर्वथैव निःशस्त्र प्रतिकाराचाच असला पाहीजे असा त्यांचा सिद्धांत होता. कारण हिंदी लोकांनी असा केवळ निःशस्त्र प्रतिकारच केला तर आमच्यावर सशस्त्र आक्रमण करण्याचा अवैध 'illegitimate' नि अनैर्बंधिक 'unlawful' अत्याचार ब्रिटिश जनतेला केव्हाहि करता येणार नाही आणि ती तसे करणार नाही, करण्यास धजणार नाही असा त्यांना मनोमन विश्वास वाटे. ह्या विषयींचे पं. शामजीचे लेखी उतारे या प्रकरणात मागे दिलेच आहेत. म्हणजे शेवटी ब्रिटिश जनतेच्या न्यायीपणावरच नि निर्बंधशीलतेवरच ह्या जहालातील जहाल म्हणविण्याऱ्या पक्षाचाही एवीतेवी विश्वास असेच! तीही नेमस्ताहून निराळ्या प्रकारची ब्रिटिशनिष्ठाच होती. विरोधीपणे ब्रिटिशभक्तीच होती.

पण उलटीपक्षी ती ब्रिटिश जनता साम्राज्यप्रकरणी अत्याचारी अशा शस्त्रबळाने हिंदुस्थानावर राज्य चालविण्यास केव्हांही लाजणारी नव्हती, असमर्थ नव्हती, आणि तिचे सारे ब्रिटिश साम्राज्य अंतिमतः तलवारीच्या आणि बेयोनेटांच्या आधारावरच चाललेले होते ही आम्हा क्रांतिकारकांची, त्या आमच्या शत्रूच्या इतिहासाची नि स्वभावाची फोड करता करता अगदी निश्चिती पटलेली होती. त्यामुळे यद्यपि ह्या 'जहाल' पक्षाच्या स्वदेशी, बहिष्कार प्रभृती बहुतेक निःशस्त्र चळवळींच्या आघाडीवर राहून सशस्त्र क्रांतिकारक पक्ष, ह्या ग्रंथात मागे अनेकदा सांगितल्याप्रमाणे त्यांच्याशी सहकार्य करीत असे आणि त्यांच्या बहुतेक पुढाऱ्यांशी आमचे गुरूजन-निष्ठेचे नि वैयक्तिक ममत्वाचे संबंध असत मात्र ह्या त्यांच्या Passive Resistance च्या, निःशस्त्र प्रतिकाराच्या, कार्यक्रमावर मात्र राष्ट्राची दिशाभूल टाळण्यासाठी आम्हाला सडेतोड टिका करावी लागे.

### ब्रिटिशांच्या बलाढ्य शस्त्रबळाची
### खरी जाणीव क्रांतिकारक पक्षासच होती!

हिंदी राजकारणात त्या वेळेस प्रमुख असणाऱ्या नेमस्त नि जहाल ह्या पक्षांच्या अनुक्रमे ब्रिटिशांची मनधरणी किंवा ब्रिटिश शासनाचा निःशस्त्र प्रतिकार , ह्या दोन्ही साधनांत ब्रिटिशांच्या शस्त्रबळास बगल देऊनच हिंदुस्थानास स्वायत्तता प्राप्त करून घेता येतील अशी त्यांची मूलभूत निष्ठा अनुस्यूत असल्यामुळे ब्रिटिश शस्त्रबळाची यथार्थ जाणीव किंवा चिंता त्यांना तीव्रपणे वाटत नव्हती हे साहजिकच आहे. त्यांच्या दादाभाई ते पालबाबूपर्यंतच्या तत्कालीन अनेक पुढाऱ्यांच्या भाषणांची नि लेखनांची मोठी मोठी पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामध्ये 'ब्रिटिश शस्त्रबळाचा ब्रिटिशांकडून हिंदुस्थानविरूद्ध उपयोग केला गेला तर?' अशा शंकेचे करमणुकीपुरते सुद्धा कोठे प्रकट विवरण केलेले आढळत नाही. आणि गुप्त राजकारण असे करावयाचे नाही ही त्यांची प्रतिज्ञाच असे. त्या दोन्ही पक्षांचे कार्यक्रमात 'ब्रिटिश शस्त्रबळ' हा घटकच आमूलाग्र गणला जात नसे!

उलटपक्षी, क्रांतिकारकांच्या राजकारणाचा श्रीगणेशाच सशस्त्र प्रतिकारापासून आरंभत होता. त्या पक्षाच्या प्रत्येक अनुयायाला नसले तरी पुढाऱ्यांना तरी आपल्या पराक्रमी ब्रिटिश शत्रूच्या बलाढयतेला मोजण्यामापण्यावाचून गत्यंतरच नव्हते. कारण त्यांना तिलाच तोंड द्यावयाचे होते. ब्रिटिश शस्त्रबलाची

जाणीवच नव्हे तर त्याची चिंताहि क्रांतिकारकांना वाटे नि वहावी लागे. भारताच्या संपूर्ण स्वातंत्रास्तम ब्रिटिशांच्या बेयोनेटांना, गोळयांना नि फाशीला पहिले बळी पडावे लागणार होते त्या क्रांतिकारकांनाच! घरादारावर नांगर फिरणार होते त्यांच्याच! अर्थात् आपले शत्रू जे ब्रिटिश त्यांच्या शस्त्र सामर्थ्याला पुच्छ किंवा नगण्य लेखणे हे त्यांना परवडणारेच नव्हते.

परंतु आश्चर्य हे की आरामखुर्चीवर पडल्या पडल्या जे करता येते तेवढेच काय ते योग्य नि सभ्य राजकारण होय असे समजणारी बहुतेक नेमस्त पक्षीय मंडळी नि काही Passive Resistance वादी जहाल म्हणविणारी मंडळी सशस्त्र क्रांतिकारकांवर तुटून पडून जे ब्रिटिश वृत्तपत्रांपेक्षाही अनर्गल लेख लिहीत किंवा प्रसंगी वैयक्तिक संभाषणात क्रांतिकारक युवकांवर तोंड टाकून बोलत त्यांचे नेमके पालुपद हेच असे "मूर्ख आहेत ही माथेफिरू पोरेसोरे! काय म्हणे स्वातंत्र्य मिळविणार! नि त्यासाठी इंग्रजांच्या बलाढय शस्त्रशक्तीची कल्पना तरी आहे का ह्या अर्धवटांना? तुमच्या ह्या १० /२० लाठ्यांना नि फारतर २/४ रिव्हॉल्व्हरांना भिऊन इंग्रज हिंदुस्थानातुन पळून जाणार आहे होय? असे इंग्रज मनातच आणील तर तोफा डागून एका दिवसात हा सारा देश उडवून देईल! अशा अत्याचारी बडबडीने स्वतःच्या आयुष्याचा मात्र तुम्ही नाश करून घ्याल, फाशी जाल, माहीत आहे? आम्हाला मवाळ म्हणता, मूर्खात काढता. पण एकदा का अशा व्रात्यपणपायी इंग्रजी सार्जंटांच्या कैचीत सापडून त्यांच्या दहापाच फटक्यापायी तुमची पाठ सोलून निघाली ना की पाय चाटू लागाल ह्याच इंग्रजाचे पाय!! जर तुम्हाला खरोखरच देशसेवा करावयाची असेल तर आमच्या मार्गाने चाला!" म्हणजे नेमस्त म्हणत नेमस्तांच्या मार्गाने चला. निःशस्त्रप्रतिकारवादी म्हणत असहकाराच्या मार्गे चला. त्यावेळची ब्रिटिश, नेमस्त नि काही जहाल पक्षांची इंग्रजी वा देशी वर्तमानपत्रे सशस्त्र क्रांतिपक्षाला दिलेल्या 'माथेफिरू, अत्याचारी , आततायी, खुनी' अशा शिव्याशापांनी भरलेली असत. वाटेल त्याने ती पहावीत.

परंतू ह्या शिष्ट वर्गाच्या उपदेशावरून किंवा टीकेवरून इंग्रजांच्या शस्त्रसामर्थ्याविषयी क्रांतिकारक अगदी अज्ञानी असत हे सिद्ध न होता उलट जे सिद्ध होई ते एवढेच की सशस्त्र क्रांतिकारकांच्या कार्यक्रमाविषयी मात्र हे शिष्ट पूर्णपणे अज्ञानी असत. "दहावीस लाठ्यांनी नि दोनचार रिव्हॉल्व्हरांनी इंग्रज भिऊन पळून जाईल "असे क्रांतिकारक समजत हे ह्या शिष्टांना कोणी सांगितले? आणि सगळयात आश्चर्याची गोष्ट ही की जर तोफा लावून देश उडवून देण्याइतका इंग्रजी बलाढय आहे, हे ह्या शिष्टांना कळत होते तर ह्या नेमस्तांच्या किंवा जहालांच्या वर्तमानपत्रीय चिठोऱ्यांनी, कॉँग्रेसमधल्या शाब्दिक ठरावांनी किंवा 'आम्ही तुझ्याशी गट्टी फू केली आहे, चालता हो' म्हणून दिल्या जाणाऱ्या असहकाराच्या निःशस्त्र धमक्यांनी मात्र तोच इंग्रज ते सारे तोफखाने खाकोटीस मारून राज्य सोडून पळून जाईल हे तेवढे ह्या अजब राजनीतिधुरंधरांना अगदी विश्वासार्ह वाटे! ह्या त्यांच्या विश्वासावरून हे सिद्ध होते की, ब्रिटिश जातीच्या स्वभावाची, राजकीय आकाक्षंची नि बलाढय शस्त्रबलाची जर कोणाला यथार्थ जाणीव झालेली नसेल तर ती ह्या नेमस्त नि निः शस्त्र प्रतिकारवादी पक्षांनाच होय.

माझ्यापुरते तरी मी सांगू शकतो की ब्रिटिशांच्या शस्त्रसामर्थ्याला मी केव्हाही तुच्छ लेखलेले नाही. अगदी आरंभापासून जी जी तरूण वा प्रौढ मंडळी मी क्रांतिपक्षात शपथबद्ध करून घेतली त्या त्या सर्व लहानमोठ्या क्रांतिकारकाला कोणकोणते त्याग करावे लागतील ह्याची स्पष्ट जाणीव वारंवार देत असे. घरदार, सुखसंपत्ती, नावलौकिक ह्यांचा तर काय पण सशस्त्र क्रांतिपक्षातील प्रत्येकाल सगळया त्यागात कठीण असलेला प्रीती आणि

प्राण ह्यांचासुद्धा त्याग करावा लागेल हे अभिनव भारताच्या (मित्रमेळयातील दिवसापासून) प्रतिसप्ताह भरणाऱ्या बैठकीत, अनेक देशातील राज्यक्रांतिच्या इतिहासावरील माझ्या व्याख्यानांतून मी पूनःपुनः बजावीत असे. इंग्लडला जाण्यापुर्वीही महाराष्ट्रातील शतावधी गुप्तबैठकांत दिलेल्या माझ्या उपदेशाचा मतितार्थ हाच असे की "आततायी का होईना पण साम्राज्य स्थापू निघणाऱ्या कोणत्याही दिग्विजयी जातीत गुण म्हणा दुर्गुण म्हणा पण जे विशेष असावे लागतात ते ब्रिटिश जातीत आज उत्कटपणे वसत आहेत. हिंदुस्थानचे साम्राज्य त्यांनी जे जिंकले नि चालविलेले आहे ते उगाच नव्हे! मी तुम्हाला अनेकवार सांगतो की बाहुबल हेच त्यांचे बायबल आहे, पण बाहुबलाप्रमाणे बुद्धिबलातही त्यांचा हात धरणारा आजतरी कोणी नाही. म्हणूनच हिंदुस्थान सारख्या अवाढव्य देशावर आज त्याचे साम्राज्य पहा कसे एखाद्या घडयाळाप्रमाणे टापटिपीने चालले आहे. हे साम्राज्य चालविण्यासाठी जो त्यांचा प्रशिक्षित (Trained)वर्ग हिंदुस्थानात येतो, त्या अँग्लो-इंडियनांनी हिंदुस्थानच्या जिल्हावार भूभागांची, भाषांची, जातीची, इतिहासाची, माणसामाणसागणिक माहिती अभ्यासलेली असते. गर्व्हनर जनरलच्या मंत्रिमंडळापासून तो खेडयाखेडयांतील चावडीपर्यंत त्यांचा सारा राज्यकारभार तासनतास नि मिनिटासमिनिट टिपून ते राजकृत्य पार पाडीत 'अखंड सावधान' पणे चाललेला आहे. 'साहेब'च्या नावाचा दरारा त्यांनी आमच्या जनतेवर प्रथम बाहूबलाने असा बसविला की त्यांचा हा प्रशिक्षित (Trained) अँग्लोइंडियन कारभारी वर्ग आता केवळ बुद्धिबळावरीच त्या हिंदी जनतेकडून ते त्यांचे ब्रिटिश साम्राज्य एखाद्या स्वयंचल यंत्राप्रमाणे चालवून घेत आहे." ह्याच महत्वाच्या कारणामुळे ब्रिटनमध्ये 'ब्रिटिश जनता' अशी हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा चालला आहे ह्याची काही एक वास्तपुस्त करीत नाही. हा त्यांचा प्रशिक्षित अँग्लोइंडियन वर्ग त्यांचे हिंदुस्थानावरील साम्राज्य प्रबळपणे नि बिनधोक यंत्राप्रमाणेच चालवित आहे की नाही एवढेच काय ते ती ब्रिटिश जनता अधूनमधून पाहते. मग तो राज्यकारभार तसा प्रबळपणे चालविताना हिंदुस्थानात अन्याय होतो आहे की न्याय, हिंदी जनता दोन घास खाते आहे की दुष्काळाच्या खाईत तडफडून मरते आहे, तो कारभार प्रपिडक आहे की लोकभक्षक आहे की लोकरक्षक ह्याची लवलेशही क्षिती ब्रिटिश जनतेला वाटत नाही. ह्यासाठीच ब्रिटनमध्ये एखाद्या क्रिकेट सामन्याने किंवा, त्यांच्या खाणीतल्या लहानशा अपघाताने त्यांच्या जनतेत जितकी खळबळ उडते तितकी सुद्धा आमच्या काँग्रेसच्या मोठमोठ्या अधिवेशनांनी किंवा हिंदुस्थानात घडणाऱ्या भयंकर भूकंपानी किंवा पडणाऱ्या दुःसह दुष्काळांनी उडत नाही. ब्रिटिश जनतेला त्याची लवलेश चिंता वाटत नाही. जर ब्रिटिश जनतेला हिंदुस्थानचे प्रकरणी कशाची चिंता वाटतच असेल तर ती तिच्या शस्त्रबळाला प्रत्याव्हान देणाऱ्या सशस्त्र क्रांतीचीच काय ती होय. मग ती सशस्त्र क्रांती फडके-चाफेकरासारख्यांच्या स्थानिक उठावाची असो किंवा नुसत्या प्राथमिक क्रांतीकारकांची असो.

**लंडनमधील गुप्तचर विभागाकडे (C. I. D. कडे)**
**माझ्याविषयीचे पहिले गुप्त प्रतिवृत्तः**

अशा क्रांतिकारकांवर ब्रिटिश शासनीय अधिकारी कसे डोळ्यांत तेल घालून पहारा करीत याचे एक प्रत्यक्ष उदाहरण म्हणून माझ्याविषयीचाच अनुभव येथे सांगतो.

मी लंडनला सन १९०६ च्या जुलै महिन्यात गेल्याचे मागोमाग हिंदुस्थानातून निदान मुंबई शासनाच्या गुप्तचर विभागाने (Bombay C. I. D. ने)तरी लंडनमधील ब्रिटिश गुप्तचर विभागास महाराष्ट्रातील तोपर्यंतच्या

माझ्या राजकीय चळवळीचे काहीतरी गुप्त प्रतिवृत्त (Report) धाडून माझ्यावर डोळा ठेवण्यास सांगितले आहे असे त्यावेळी मला मुळीच वाटले नव्हते. सन १९१० मध्ये मला पकडून जेव्हा लंडनमध्ये खटला भरण्यात आला त्यावेळी वरील गोष्ट उघडकीस आली. म्हणजे माझे वय साधारणतः विशीबाविशीचे असतानाच ब्रिटिशांच्या गुप्तचर विभागात माझे नावाचा गुप्तविभाग उघडला जाऊन माझा खराखोटा इतिहास गुप्तपणे लिहून ठेवण्याचे ऐतिहासीक कार्य ब्रिटिश शासन स्वव्ययाने करू लागले होत आणि ते कार्य ब्रिटिश शासनाचा सन १९४७ मध्ये अंत होईतो त्यांच्या ब्रिटनमधील आणि हिंदुस्थानातील ठिकठिकाणच्या गुप्तचर विभागांनी (C. I. D. ) नी अव्याहत चालू ठेवले होते ! मी स्वतःच्या माझ्या ज्या लहानपणातील उलाढाली विसरून गेलो होतो त्यांचेही वृत्त कसे काही होईना पण इतक्या चिकाटीने नि पुढे चाळीस वर्षे अखंडपणे टिपून ठेवीत आलेली ब्रिटिशांच्या गुप्तचर विभागाची ही इतिहासप्रियता आभार मानण्याइतकी कौतुकास्पद जी काही प्रतिवृत्ते पुढे उघडकीस आली त्यांचा मला हे आत्मचरित्र लिहिताना कितीतरी उपयोग होत आहे.

**मांटगामेरी I. C. S. ह्यांचे प्रतिवृत्तः**

ह्या लहानमोठ्या शासनीय गुप्तचर प्रतिवृत्तापैकी जे आज त्यातल्या त्यात पहिले असे प्रतिवृत्त उपलब्ध झाले आहे ते सन १९०६ मध्ये नाशिकला असलेले फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट मि. मांटगामेरी I. C. S. ह्यांनी लिहिलेले आहे. माझ्या त्यावेळच्या राजकीय हालचालिंविषयी त्यांच्या हाताखालच्या नाशिक, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणच्या सटरफटर शासनीय हस्तकांनी जी किरकोळ गुप्त बातमीपत्रे धाडली होती त्यातील सारांश एकत्र करून नि त्यावर मांटगामेरी साहेबांनी माझ्याविषयीचे अधिकृत इंग्रजी भाषेतील प्रतिवृत्त म्हणून ते मुंबई प्रांत शासनाच्या वरिष्ठ गुप्तचर विभागाकडे धाडलेले होते. हे अधिकृत प्रतिवृत्त सन १९०६ च्या मार्च ते मे महिन्याच्या काळात केव्हातरी लिहिलेले असावे ही गोष्ट त्या प्रतिवृत्तात, "सावरकर सध्या मुंबईस एल. एल. बी. चा अभ्यास करीत आहेत." असा जो उल्लेख आहे त्यावरून उघड होते. ज्याअर्थी ह्या कालानंतर मी महिन्या दीड महिन्यातच लंडनला निघून गेलो त्याअर्थी लंडनमध्ये गुप्तचर विभागातील माझ्या तिकडे जाण्याचे मागोमाग माझा 'क्रांतिकारक संशयीत' म्हणून जो प्रथम परिचय मुंबई प्रांताच्या शासनीय गुप्तचर विभागाने करून दिला तो बहुतांशी ह्याच अधिकृत प्रतिवृत्ताच आधाराने असला पाहीजे. ह्यास्तव मी लंडनला पोचलो तेव्हा ब्रिटिश राज्याधिकाऱ्यांचे माझ्याविषयी गुप्तमत काय होते त्याचा एक प्रमूल पुरावा म्हणून त्या इंग्रजी प्रतिवृत्तातील इथे लागू असलेल्या भागाचे जे मराठी भाषांतर आज उपलब्ध आहे ते देत आहे. मांटगामेरीसाहेब आपल्या गुप्त प्रतिवृत्तात लिहितात :-

"व्ही. डी. सावरकर हे नाशिकचे रहाणारे असून लहानपणापासूनच त्यांना वादविवादाची हौस आहे. ते सध्या २२ एक वर्षांचे असतील नसतील पण आजच त्यांनी एका निष्णात वक्त्याचे स्पृहणीय स्थान पटकावले आहे. (He has already grown into an accomplished orator of an enviable rank.) श्री. शि. म. परांजपे यांच्या विचारांची छाप सावरकरांच्या मनावर पूर्णपणे उमटलेली असून त्यामुळे अल्पवयातच सावरकरांना महत्व प्राप्त झाले आहे. पण चकाकते ते सगळेच टिकाऊ नसते या म्हणीचा त्यांच्या विषयात अनुभव येईल असा माझा तर्क आहे. सध्या ते मुंबईत एल. एल. बी. चा अभ्यास करीत आहेत पण त्यांनी बी. ए. पदवी पुण्याच्या फर्ग्युसन

महाशाळेतून घेतली. या महाशाळेतून बाहेर पडणारे विद्यार्थी हे सद्यपरिस्थितीच्या विषयी असंतुष्ट असतात असे नेहमी दिसून आले आहे.

सावरकर महाशाळेत असतानाही त्यांचा म्हणून एक गट असे आणि त्यावरून त्यांची प्रकृती दिसून येते.

सावरकर फार भरभर बोलतात. ते अतिशय धीट आहेत. त्यांची बोलण्याची पद्धती अतिशय परिणाम कारक असते आणि बोलण्याच्या भरात श्रोत्यांकडून मिळणाऱ्या टाळ्यांमुळे ते जेव्हा उत्तेजित होतात तेव्हा त्यांना आपल्याभोवती गुप्त हेरांचा गराडा आहे याचेही भान ते विसरून जातात!

त्यांच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांची त्यांच्यावर तशी श्रद्धा आढळत नाही. कारण त्यांचे बोलणे नि करणे यात बरेच अंतर आढळते. कारण ते स्वतः स्वधर्माभिमानी विचाराचा पुरस्कार करतात पण स्वतः मात्र केस राखतात, शर्ट घालतात आणि आखूड कोटही घालतात.

महाशाळेत असताना त्यांनी प्रथम स्वदेशी चळवळीचा पुरस्कार केला आणि दसऱ्याचे दिवशी परदेशी कापडाची होळी करण्यास पुढाकार घेतला. ह्या औद्धत्यासाठी महाशाळाप्रमुखांनी त्यास दंड केला. पण तो भरण्याकरता वर्गणी गोळा करण्यात आली ती इतकी जमली की त्यातून दंड भरल्यावरही काही पैसे उरलेच. हे शेष पैसे काळे नावाच्या गृहस्थांनी काढलेल्या पैसा फंड संस्थेला दिले.

ह्या वेळेपासून सावरकरांकडे एक हुतात्मा या दृष्टीने लोक पाहू लागले.

या रँगलर परांजप्यांना पुण्यात फारसा मान दिसत नाही. केवळ काही थोड्या सुधारक लोकांत तेवढा त्यांना मान आहे.

श्री. शि. म. परांजपे यांनी सावरकरचा पक्ष उचलून धरला आणि आपल्या 'काळ' वर्तमानपत्रातून लिहून लोकांची सहानुभूती त्यांस मिळवून दिली. या वेळेपासून सावरकरांच्या सार्वतनिक जीवनास प्रारंभ झाला असे दिसते. या वेळेपासून सावरकरांच्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ झाला असे म्हणण्यास प्रत्यवाद नाही. माझ्या मते सावरकर हा अगदीच पोरसवदा असून तो आपल्या आयुष्याचे मातेरे करून घेत आहे. आपण कोणत्या विचाराचा प्रसार करतो याचा त्याला पोच नाही. एवढेच नाही तर कोवळ्या वयाच्या मुलांच्या मनात तो वेडेवाकडे विचार भरवून देत असून त्यांच्याही आयुष्याचे मातेरे करीत आहे. नाशिकच्या सन्मित्र समाजाशी या सावरकराचा बराच संबंध दिसतो. या समाजाने स्वदेशी चळवळीच्या पुरस्कारार्थ बरेच दौरे काढलेले दिसतात.

दि. २३ फेब्रुवारी १९०६ ह्या दिवशी सावरकरांनी पुण्यास एक सभा बोलविली होती. तिचे अध्यक्ष तेच होते. पुण्याचे काही विद्यार्थी स्वामी अगम्य गुरूंना भेटण्यासाठी गेले होते. त्या महात्माची अशी इच्छा होती की जबलपुरातल्याप्रमाणे पुण्यातील विद्यार्थ्यांनीही एक संस्था पुण्यात स्थापन करावी आणि तिच्या द्वारे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता चळवळ चालू करावी. (या अगम्य गुरूने एक इंडो-युरोपियन चळवळ प्रारंभिले होती.) विद्यार्थ्यांनी अशी संस्था काढण्याचे मान्य केले आणि आपण काय करावे असे त्यांना विचारले. तेव्हा त्यांनी पुण्याची प्रतिनिधिक म्हणून नऊ जणांची एक समितीशी आपण बोलणे करू असे सांगितले. पुढे ह्या नऊ जणांनी ते इतरांना सांगावे अशी ही योजना होती.

ह्या विद्यार्थ्यांनी सावरकरांना पुण्याला येण्याविषयी तार केली. त्याप्रमाणे ते आले त्यांनी अगम्य गुरूंची भेट घेतली. आणि संध्याकाळी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले. ते स्वीकारताना त्यांनी मराठीत भाषण केले. त्या तात्पयार्थ असाः

'मित्रांनो आपल्या देशात फार वाईट दशा झाली आहे. त्यामुळे आपल्यावर फार मोठे उत्तरदायित्व येऊन पडले आहे. म्हणून आपण एक झाले पाहिजे आणि संस्था स्थापन केली पाहीजे. आपल्यापैकी प्रत्येकाला उपदेश करणे गुरूजींना शक्य नाहीत त्यांच्या आज्ञने मी येथे आलो आहे.

आपण आता नऊ माणसांची एक समिती नेमूया. म्हणजे आपण काय काय आणि कसेकसे करावयाचे याची दिशा तिच्याजवळ ते सांगतील. म्हणून ह्या कामाला तुमच्या मते जे अगदी योग्य अशांची तुम्ही एक समिती नेमा.

यानंतर पांगारकर नावाच्या विद्यार्थ्याने एक कंटाळवाणा निबंध वाचला. त्यात अशा संस्थेचे महत्व वर्णन केले होते. सभेच्या शेवटी सावरकरांचे अतिशय प्रक्षोभक आणि आवेशयुक्त असे भाषण झाले. एखाद्या सेनापतीने रणांगणावर शत्रूसेनेवर तुटून पडण्याऱ्या सेनेला प्रोत्साहन देताना जसे भाषण करावे तसे सावरकर बोलत होते,ते ३५ मिनिटे बोलले.

ते म्हणाले,'मित्रहो, आपण आता जुन्या पिढीतील लोकांवर अवलंबून राहण्यात अर्थ नाही, ते व्यर्थ आहे.

देशबांधव हो, आज आपल्या देशाची किती विपन्नावस्था झाली आहे हे मी आपणाला सांगितलेच आहे. ही स्थिती आता सहन करणे शक्य नाही. ही परिस्थिती आता पालटलीच पाहीजे. जुन्या पिढीतील लोकांचे तेज आता नष्ट झाले आहे. ते आता काही करू शकतीलच असे रहिले नाही.

त्यांना जगाचा अनुभव आहे. त्यांनी तरूण पिढीवर आपल्या विचारांचे संस्कार करावेत म्हणजे पुरेसे आहे.

माझिनी म्हातारा होता आणि त्याचे अनुयायी तरूण होते. त्याने त्या अनुयायांना उपदेश केला आणि क्रांतिकार्याची शिकवण दिली आणि त्याप्रमाणे त्यांनी कार्य पार पाडले.

म्हातारी माणसे अनुभवशीर असली तरी स्वातंत्र्यलक्ष्मीला नव्या उमलत्या कमळांची माळ हवीशी असते. तिला सुकलेल्या फुलांची आवड नसते. निर्माल्य म्हणून ती विहिरीत टाकावयाची असतात. या देवीला ताजी कमळे अर्पण करावयाची असतात म्हणून आपण एक झाले पाहिजे आणि भारताच्या स्वातंत्र्यलक्ष्मीला आपण नव्या पिढीची शिरकमळे अर्पण केली पाहिजेत.

रामदास काय सांगतात? बहुत लोक मेळवावे । एका विचारे भारावे । मिळोनिया घसरावे । कोणावर? (म्लेंछावरी) मला शेवटचा शब्द आठवत नाही.

माझ्यासमोर गुप्तहेर दिसत आहेत. आनंद आहे की ते आले आहेत. ते जर आम्हाला आमच्या अंगीकृत कार्यात सहाय्य करतील तर देशाचे भाग्य उदयास येईल. गुप्तहेर आपल्यात आहे म्हणून सर्वांना आनंद होईल.

आपण रामदासांच्या शिकवणीची आठवण ठेवली पाहीजे. आणि त्यांची आज्ञा पाळलि पाहीजे. आपले सर्वस्व गमावले आहे. कष्ट हाच आता आपला मार्ग आहे. गेले त्याविषयी आपण रडण्याचे कारण नाही. पण गेले ते मिळविण्यासाठी आपणाला रूधिराचा सडा शिंपडावा लागणार आहे. आपण आपला धर्म गमावला आहे. आपण तो तुन्हा प्रस्थापित केला पाहीजे." इत्यादी.

साहेबांच्या वरील प्रतिवृत्तात गुप्तचरांच्या बहुतेक प्रतिवृत्तात अशी चुकीची माहिती विसंगती नी खऱ्या खोट्या विधानांची नि अभिप्रयांची हसू यावे अशी भेसळ झालेली आहे. उदाहरणार्थ त्यात म्हटले आहे की कॉलेजमध्ये सावरकरांचा असा एक स्वतंत्र गट असे, पण लगेच पुढे म्हटले आहे की त्याच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांची त्यांच्यावर श्रद्धा नसे. ते बोलत तसे चालत नाहीत. कारण ते स्वधर्माचा अभिमान धरा म्हणून उपदेशीतीत परंतू ते स्वतः डोक्यावर केस राखतात. आखूड कोट वापरतात, शर्ट घालतात. आता माझ्या बरोबरीच्या झाडून साऱ्या महाराष्ट्रातिल विद्यार्थ्यांची मजवर श्रद्धा किंवा लोभ नव्हता असे जर मांटगामेरीला वरील वाक्यात म्हणायचे असेल तर ती गोष्ट जगातील कोणत्याही पुढाऱ्याविषयी किंवा व्यक्तिवीषयी म्हणता येईल. पुढारी सुधारक असला तर सनातनी वर्गाची श्रद्धा त्याच्यावर तितकी राहणार नाही. तीच गोष्ट इतर प्रश्नी. परंतु मजवर कोणाही बरोबरीच्या विद्यार्थ्यांच्या गटाचे श्रद्धा वा लोभ नसे असा जो मांटगोमेरींच्या वाक्यांचा झोक आहे हे त्यांच्या स्वतःच्या पहील्या विधानानेच खोटा पडत आहे. कारण तेच म्हणतात की, सावरकरांचा म्हणून एक स्वतंत्र गट (महाशाळेत) कॉलेजमध्ये असे आणि त्या गटाच्या माझ्यावरील श्रद्धेमुळे नि लोभामुळे इतर विद्यार्थीवर्ग नि प्रध्यापकवर्गही त्या गटाला माझ्या नावानेच ‘सावरकर कँप’ म्हणून संबोधित असे. पुन्हा स्वधर्माभिमान धरणे, आखूड कोट न घालणे ही मांटगामेरी नी केलीली किंवा त्यांच्या कोण्या हिंदी गुप्तचर हस्तकाने सुचविलेली व्याख्याही मनोरंजक आहे ! त्याच्या पुढेच त्या प्रतिवृत्तात सांगितले आहे की अगम्य गुरूच्या सांगण्याप्रमाणे पुण्याच्या सर्वसाधारण विद्यार्थीवर्गाने आपला प्रतिनिधी कोण नेमावा म्हणून बैठक भरविली तेव्हा त्यांतील अनेकजण माझ्या विशिष्ट गटातील नसताही आणि त्यांमध्ये फर्ग्युसन कॉलेजच्या बाहेरच्या इतर प्रश्नाला नि महाशाला यांचे कित्येक विद्यार्थी असताही त्यांनी मला पुण्यातील विद्यार्थ्यांचा म्हणून पुढारी निवडले. मुंबईला मला तातडीची तार धाडून बोलावून घेतले आणि पुण्याच्या साऱ्या विद्यार्थी वर्गाच्या अशा भरलेल्या सार्वजनिक सभेचे अध्यक्षपदही मलाच दिले. हे सर्व त्याच प्रतिवृत्तात मांटगामेरी सांगतात. हे काय ‘माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांची माझ्यावर श्रद्धा किंवा लोभ नसे’ याचे द्योतक समजायचे? तथापि अशी ठळक विसंगत विधाने मांटगामरीसारख्या I. C. S. अधिकाऱ्यांचे ठोकून दिली आहेत. ब्रिटिश शासनीयदृष्ट्या महत्वाचा गुप्त वृत्तांत जो द्यावयाचा त्यातही अक्षम्यही ढिलेपणा आढळतो. उदाहरणार्थः मांटगोमरी अगदी गुप्तपणे ह्या प्रतिवृत्तातून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानात सांगतात की,” नाशिकच्या सन्मित्र समाजाने स्वदेशीच्या प्रचारार्थ बरेच दौरे काढलेले दिसतात.” आता सन्मित्र समाज ही संस्था नाशिकला नव्हती ती पुण्यास होती हे पोरासोरांनासुद्धा ठाऊक होते. पुन्हा सन्मित्र समाजाने स्वदेशी प्रचाराचे दौरे काढण्याचे कार्य कधीच हाती घेतलेले नव्हते. त्यांच्या कार्यक्रमाची कक्षा म्हणजे पुण्यात गणेशोत्सव करणे आणि एक दणदणीत मेळा प्रतिवर्षी काढणे!त्या मेळ्याची पदे फारच चेतनादायी नि लोकप्रिय झालेली असत पण त्यापलीकडे सन्मित्र समाज म्हणजे कोणतीही राजकीय उलाढालीची संस्था नव्हती. क्रांतिकारकांची तर नव्हतीच नव्हती ! अर्थात् तिच्याशी माझा ‘बराच संबंध’ तर काय पण मुळीच संबंध नव्हता ! खरी गोष्ट अशी दिसते की नाशिकच्या ज्या सुप्रसिद्ध अशा मित्रमेळा संस्थेशी माझा संबंध होता आणि जी तिच्या गुप्त नि उपांग म्हणून स्वदेशी प्रचारार्थ खळबळजनक दौरे काढी, महाराष्ट्रभर गाजणारे गणेशोत्सवी मेळे फिरवी, त्या नाशिकच्या संस्थेच्या ‘मित्रमेळा ‘या नावाचा नि पुण्याच्या ‘सन्मित्र समाज’ या नावाचा मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या डोक्यात घोटाळा उड्न त्यांनी ‘नाशिक सन्मित्र समाज’ असा नवाच

सामासिक शब्द पाडला. त्याहुनही आश्चर्याची गोष्ट अशी की सन १९०६ च्या ह्या अधिकृत प्रतिवृत्तात नाशिकला आम्ही स्थापलेल्या मित्रमेळा ह्या गुप्त संस्थेचा नामोल्लेखसुद्धा नाही ह्यावरून मी विलायतेस जाईतो मित्रमेळा किंवा अभिनव भारत या क्रांतिकारक गुप्त संस्थाविषयी, प्रत्यक्ष मुंबई शासनाच्या गुप्तचर विभागास काहीही अधिकृत माहिती नव्हती असे दिसतो-सविस्तर माहिती तर नव्हतीच नव्हती.

पुढे ह्या मांटगामेरीच्या प्रतिवृत्तात माझ्या ज्या पुण्यातील भाषणाचे प्रतिवृत्त दिलेले आहे त्यात माझ्या तोंडी 'माझिनी म्हातारा होता. पण त्यांचे अनुयायी तरूण होते' असे वाक्य घातलेले आहे! आता, या भाषणाचे पूर्वी माझिनीच्या चरित्रावर आणि तरूण इटली या गुप्त संस्थेवर माझी फर्ग्युसन महाशालेत प्रकट भाषणे झालेली होती. आणि मित्रमेळयात तर त्याविषयी अनेक गुप्त भाषणे मी दिलेली होती. त्यातुन तरूण इटलीचा संस्थापक माझिनी हा स्वतःच एक तरणाबांड क्रांतिकारक होता ही वस्तुस्थिती मी अट्टाहासाने सांगत असे. तेव्हा माझिनी म्हातारा होता तेव्हा त्याने तरूण इटालियन अनुयायांची क्रांतिकारक संस्था स्थापिली असे वाक्य माझ्या तोंडुन निघणेच अशक्य होते. अर्थात् मांटगामेरीसाहेबांना माझ्या महाशालेतील वा गुप्तसंस्थेतील त्या भाषणाचा तोवर पत्ताच लागला नव्हता असे तरी असावे किंवा त्यांचे माझिनीच्या चरित्राविषयी पूर्ण अज्ञान तरी असावे. किंवा बहुधा ही दोन्हीही कारणे खरी असावीत, म्हणून त्यंनी ह्या वाक्यावर डोळे मिटून, विश्वास ठेवून ते माझ्या तोंडी घातले. माझिनी म्हातारा झाला तेव्हा बहुतेक इटली स्वतंत्रही झालेली होती. आणि तरूणांच्या क्रांतिकारक संस्था स्थापण्याचे कार्यही समाप्त झाले होते, हे बिचाऱ्या मांटगामेरीला काय माहीत! अशा अगदी अस्ताव्यस्तपणे नि शिथिलपणे लिहिलेल्या ह्या गुप्तप्रतिवृत्तातही माझ्या पुण्याच्या भाषणांतील दोनचार उल्लेख यथावत् टिपले गेले आहेत. त्यांचा एक उपयोग तरी मी इथेच करुन घेतो. तो असा की ब्रिटिश द्रोही नि क्रांतिप्रणवता ह्यांचा जनतेमध्ये संचार करण्यासाठी जी प्रकट भाषणे मी देई त्यांमधूनही शक्यतो ब्रिटिशांच्या राजद्रोही निर्बंधाच्या पकडीत पक्केपणी सापडू नये म्हणून किती युक्त्या प्रयुक्त्या मी अचानक योजीत असे ते दिसून येईल. वरील भाषणात, ह्या प्रतिवृत्तात सांगितल्याप्रमाणे, रामदासांची जी ओवी मी भाषणाचे मुख्य सुत्र म्हणून विशदीत होतो तीमधील 'बहुत लोक मिळवावे। एक विचारे भारावे। कष्टें करून घसरावे ।" इतके तीन चरणे विशदिल्या नंतर मी चटकन् शेवटचे मुख्य शब्द जे 'म्लेंछांवरी ।।' हे उच्चारल्याचे टाळून म्हणालो " घसरावेः पण कोणावर? काय करावे? शेवटचा चरणच आता मला आठवत नाही ।" असे म्हणून संकटावरी असा नवाच चरण पाडून तिथे उच्चारला. वास्तविक तो चरण मला आठवत होताच. ती ओवी महाराष्ट्रात बहुतकांच्या तोंडी पक्की रूळलेली असल्यामुळे श्रोत्यांनाही तो 'म्लेंछांवरी ' हा चरण माहीतच होता. पण तो मी स्वःत उच्चारला असला तर इंग्रजांवरी असा त्याचा स्पष्ट अर्थ होता. ह्यास्तव तो चरण आयत्यावेळी आठवत नाही बुवा ।' असे म्हणताच त्या भरगच्च सभेतील श्रोत्यांनीही चमत्कृत हाऊन ती खूण पटली असे दर्शविणारा टाळयांचा एकच गजर केला. त्याप्रमाणेच त्या प्रतिवृत्तात दिलेल्या व्याख्यानातील शेवटच्या ओळीही अशाच केवळ माझ्या चलाखीच्या आहेत. "शासकीय गुप्तहेर व्याख्यानास झाले आहेत हे मला माहीत आहे, माझी व्याख्याने, माझे विचार त्यांच्या कानावर जावेत याचा मला आनंद वाटत आहे, कारण तेही आपले बंधुच आहेत. त्यांचे विचार पलटुन तेही आपल्याला आज उद्या मिळणारच" असे उघडपणे जरी मी हेतुतः सांगितले तरी मनात सावध राहून व्याख्यानाचे शेवटी ,"आपण जे गमावले आहे ते आता पुन्हा कमावले पाहिजे" असे म्हणालो आणि एका हुलकावणी सरशी सर्व व्याख्यानालाच

धार्मिक स्वरूप देण्यासाठी त्यांचा निष्कर्ष म्हणून एक द्व्यर्थी वाक्य घालून विचारले 'की पण आपण काय गमावले आहे ते ध्यानी आले ना? आपण आपला धर्म गमावला आहे तो पुन्हा प्रस्थापित केला पाहिजे. ' राज्य शब्द न घालता येथे द्व्यर्थी असा धर्म शब्द मी जो वापरला तो केवळ श्रोत्यांच्या मनावर क्रांतिप्रवणतेचा परिणाम तर व्हावाच पण त्यावेळच्या निर्बंधा च्या पकडीत शब्दाने सापडु नये म्हणुन होय.

ह्यावरून, ह्या प्रतिवृत्तात मांटगामेरीने आरंभी जे लिहिले आहे की सावरकर भाषण देताना इतके उत्तेजित होतात की सभेला गुप्तहेर आलेले आहेत याचेही त्यांना भान राहत नाहीः हे त्यांचे पहिले विधान त्यांनीच आपल्या शेवटच्या विधानाने कसे खोटे पाडलेले आहे हेही स्पष्ट होते. कारण त्या भाषणातच मी सभेला गुप्तहेर उपस्थित आहेत असे उघड सांगितले इतकेच नव्हे तर माझे भाषण ते लक्षपूर्वक ऐकताहेत याविषयी त्यांना अभिनंदिले ही गोष्टही त्याच प्रतिवृत्तात मांटगामेरी लिहितात!

तथापि आज मला उपलब्ध असलल्या गुप्तचर विभागाच्या माझ्या विषयीच्या ह्या अगदी पहिल्या मांटगामेरी प्रतिवृत्ताची मी जी वर इतकी छाननी केलेली आहे ती त्यातील चुका किंवा विसंगतीच्या गमती दाखविण्यासाठीच काही केलेली नाही. तर त्या प्रतिवृत्ताच्याच आधारावर, पुढे उणीपुरी बारा वर्षे लोटल्यानंतर सन १९१८ मध्ये ब्रिटिशविरोंधी सशस्त्र क्रांतिकारक आंदोलनाचा समग्र वृत्तांत एकत्र लिहून, परीक्षून, त्या चळवळीचा नायनाट करण्यासाठी काय काय उपाय योजावेत नि निर्बध (कायदे)करावेत ते सुचविण्यासाठी जी एक स्वतंत्र समिती नेमली तिने लिहिलेल्या प्रख्यात 'रौलट रिपोर्ट,' मध्ये माझ्याविषयी प्रारंभिक माहिती भ्रामक असताही साधार इतिहास म्हणून ग्रथित केली गेली!

**"रौलट रिपोर्ट"**

हा "रौलट रिपोर्ट" लिहिण्यासाठी ब्रिटनमधील एक वरिष्ठ न्यायाधीश रौलटसाहेब यांना हिंदुस्थान शासनाने त्या समितीचे अध्यक्ष नेमलेले होते. मद्रास आणि मुंबई येथील वरिष्ठ न्यायाधीश आणि इतर काही अधिकारी तिचे सभासद होते. त्या समितीचे नाव Sedition committee असे होते. तिचे काम अंतस्थपणे (In camera)चालले. ब्रिटिश शासनाच्या लेख्यालयात जितकी राजद्रोहविषयक कागदपत्रे, गुप्तचरांची प्रतिवृत्ते, क्रांतिकारकांवरील सगळया हिंदुस्थानात झालेल्या शतावधी खटल्यांचे वृत्तांत अधिकृत म्हणून संग्रहिलेले होते ते सर्व चाळून ह्या शासनीय समितीने शेवटी सन १९१८ मध्ये आपले दोनअडीचशे पृष्ठांचे प्रतिवृत्त लिहिले आणि हिंदुस्थानच्या मध्यवर्ती ब्रिटिश शासनाला 'राजद्रोह समिती प्रतिवृत्त' ह्या नावाने ते पुस्तक सादर केले – आणि हिंदुस्थान शासनाकडून ते छापून प्रकटपणे प्रसिद्धलेही गेले. ह्या अधिकृत प्रतिवृत्तालाच थोडक्यात 'रौलट रिपोर्ट' असे नाव पडले. ह्या पुस्तकात कितीही चुकीची नि भ्रामक विधाने इतस्ततः आलेली असली तरीही एकंदरीत सन १८९० ते १९१८ सनापर्यत हिंदुस्थानातील सशस्त्र क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यसंपादनार्थ केलेल्या पराक्रमी प्रयत्नांचा वृत्तांत ह्या रौलट रिपोर्टमध्ये जितका सविस्तर, साधार नि सानुक्रम गोवलेला आहे तितका तो त्यावेळच्या कोणत्याही पुस्तकात गोवलेला नव्हता हे मान्य केलेच पाहिजे. तथापि हा रौलट रिपोर्ट मुख्यतः ब्रिटिशांच्या हिंदुस्थानातील गुप्तचर विभागाच्या अंतस्थ प्रतिवृत्तांवरून लिहिलेला असल्यामुळे आणि हे गुप्तहेर अनेक भाकड कथाही आपल्या प्रतिवृत्तात दडपून देत असल्यामुळे ह्या हिंदुस्थान शासनाच्या अधिकृत रौलट रिपोटार्तही अनेक चुका नि निराधार माहीती अधिकृत म्हणून दडपली गेली. उदाहरणार्थ माझ्यापुरतेच बोलायचे तर ज्या सन

१९०६ च्या वर्षांचा वृत्तांत मी येथे लिहित आहे त्याच्या आधीची माझी माहिती ह्या रौलट रिपोर्टात पृष्ठ ५ (पाच) मध्ये दिलेली आहे. तीतच किती चुका झाल्या आहेत हे पहा-

वरील माहिती म्हणजे जे नाशिकच्या मॅजिस्ट्रेट मांटगामेरीने धाडलेले गुप्त प्रतिवृत्त मी मागे उतरून घेतलेले आहे त्याची रौलटसाहेबांनी प्रतीस प्रत (Copy to Copy) केलेली आहे हे उघड दिसते. रौलेट प्रतिवृत्त म्हणते, “Before living India Vinayak Savarker had been drawn into a movement initiated early in 1905 by a person styling himself as Shri. Agamya Guru paramhansa. As a part of this movement a namber of students early in 1906 started in Poona a society which elected Vinayak Savarkar as their leader.” आता माझ्या राजकीय चरित्राचा आरंभच ह्या अगम्य गुरूच्या सन १९०५ च्या यःकश्चित संबंधापासून करणे हीच कशी घोडचूक आहे ते माझ्या ह्या आत्मचरित्राच्या प्रसिद्धिलेल्या पहिल्या भागावरून आणि इतरांच्या ग्रंथावरून उघड झालेली आहे. सन १८९९ पासून क्रांतिकारक गुप्तसंस्थेची स्थापना करून, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी ह्या १९०६ सनातील अगम्य गुरूच्या किरकोळ संबंधापेक्षा अनेक पटीने महत्वाच्या किती विविध प्रकट नि गुप्त राजकीय चळवळी केल्या होत्या त्याचा ह्या अधिकृत रौलट रिपोर्टात लवलेश उल्लेख नाही. अगम्य गुरूची एक चळवळ, ‘मुव्हमेंट’ होती नि त्यांत मी ओढला गेलो असे म्हणणे ही दुसरी चूक. त्या अगम्य गुरूच्या मुव्हमेंट ची शाखा म्हणून पुण्यास एक संस्था काढली गेली असे म्हणणे ही तिसरी चूक. कारण अगम्य गुरूची मुव्हमेंट म्हणावी अशी कोणतिही चळवळ मुळातच नव्हती ! ज्या दिनांक २२ फेब्रुवारी १९०६ च्या सभेत मी दिलेले भाषण मांटगामेरीनी उतरून घेतले आहे, त्या सभेविषयी मांटगामेरी लिहितात. “The Mahatma Agamya Guru at this meeting advised the raising of funds.” ही चौथी चूक! कारण ते महात्मा त्या सभेला मुळी आलेलेच नव्हते! रौलट रिपोर्टातील पुढची माहिती तर अगदी हास्यास्पद आहे. ते प्रतिवृत्त म्हणते “After Savarkar left India in Kune 1906, the Society (started by Agamya Guru in poona) appears to have come an end. Certain of its members subsequently joined Abhinav Bharat Society, founded by Ganesha, Vinayak Savarker’s elder brother. At the time of his departure from India Vinayak Savarkar and his brother were the leaders of an association Known as the Mitra Mela, started about 1899, in connection with the Ganapati Celebrations” म्हणजे सावरकर विलायतेत गेल्यानंतर अगम्य गुरूच्या संस्थेची पुण्यातील विद्यार्थ्यांची शाखा मोडली-चूक! कारण अशी कोणतीही शाखा निघालेलीच नव्हती. ‘तिच्यातील काहीजण नंतर अभिनव भारत संस्थेत गेले.’ चूक! कारण अभिनव भारतात ते आधीपासूनच होते. ‘अभिनव भारत संस्था गणेश सावरकरांनी स्थापली होती’ चूक! मित्र मेळा हा गणपती उत्सवाकरिता काढला होता’ घोडचूक!

अशा चुकांनी भरलेल्या रौलट रिपोर्टाच्या ह्या मद्विषयक छेदकास कोण्या नवख्या वाचकाने वाचल्यास असा अभास निर्माण होता की माझे राजकीय जीवन, अगम्य गुरूशी सन १९०६ च्या फ्रेबुवारीत माझा संबंध जेव्हा आला तेव्हापासूनच काय ते चालू झाले. जणू काही तेच माझे पहिले राजकीय गुरू होते. त्यांच्या ‘संस्थेस मी मिळालो’ तेव्हापासूनच नि त्यांच्या कृपाप्रसादानेच काय तो मी क्रांतिकारक झालो. तोवर मित्रमेळ्यात नुसता गणपती उत्सव करीत बसलो होतो !

**अगम्य गुरूची भाकड कथा**

बहुधा भाकड कथांच्या मुळाशीसुद्धा एक तथ्यबिंदू असतो. रौलट रिपोर्टात नि मांटगामेरी रिपोर्टात अगम्य गुरूविषयींची वर दिलेली भाकड कथा आलेली आहे. तिच्या मुळाशीही जो एक तथ्यबिंदु आहे तो इतकाच की स्वतःला 'महात्मा श्री अगम्य गुरू परमहंस' म्हणविणारे एक स्वामी सन १९०६ च्या प्रारंभी पुण्यास आले. त्यांनी काही मधूनमधून राजकारणाचा जहाल-पक्षासारखा उल्लेख करणारी व्याख्याने दिली. ज्या तरूणांनी संघटितपणे देशकार्य करावयाचे असेल त्यांनी मला भेटावे असे ते सांगत. महात्मा किंवा भगवा स्वामी किंवा परमहंस किंवा स्वामी म्हटला की त्याचेभोवती चार लोक जमतातच. त्यातही ते राजकारणावर टीका करून काहीतरी बोललेले. त्यामुळे हा कोणीतरी प्रच्छन्न राजकारणी साधू दिसतो अशा भावनेने काही विद्यार्थी त्यांचेकडे जाऊ येऊ लागले. त्या भाविक विद्यार्थ्यांमध्ये, ह्या साधूंत काही खरे पाणी तरी आहे का जोखण्यासाठी, दोनतीन अभिनव भारताचे सदस्यही मिसळले. परंतू त्यांच्या राजकीय प्रश्नांविषयी अगदी मूग गिळून हे स्वामी एवढेच वारंवार साग्रह सांगत की तुम्ही आधी पैसे जमवून आणा. मग तुमची समिति नेमुन तिला नि तिच्या पुढाऱ्याला माझ्याकडे धाडा. मग मला जे महत्वाचे मार्गदर्शन करायचे ते मी त्याला सांगेन. स्वामींनी स्वतःभोवती हे गूढ वलय निर्मिल्यामुळे तर त्या भाविक विद्यार्थ्यांना वाटले हे काही रामदासी प्रकरण दिसते बुवा! तेव्हा त्यांनी माझे मित्र म्हणून त्यांना माहीत असलेल्या दोघातिघा तरूणांना गळ घातली की त्यांनी तार करून मलाच मुंबईहून विद्यार्थ्यांचे नेतृत्व करण्यास्तव बोलावून घ्यावे. माझ्या त्या मित्रांच्या नावे तार आल्यामुळे मी पुण्याला गेलो. तोवर ह्या अगम्य गुरूचे नाव सुद्धा मी ऐकलेले नव्हते. पुण्यास आल्याचे कळताच तेथील शाला-प्रशाला, महाशालातील अनेक विद्यार्थ्यांनी माझे एक व्याख्यान करावयाचे ठरविले. त्याप्रमाणे दिनांक २३-२-१९०६ इसवीला एक मोठी सभा झाली. स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ तरूणांची संघटना ह्याच विषयावर मी त्या सभेत बोललो. मांटगामेरीच्या वर उल्लेखिलेल्या प्रतिवृत्तात वर्णिली सभा ती हीच. सभेत श्रोत्यांची खूप दाटी झालेली आणि तेथील तरूण वर्गांत तुमल उत्साह भरलेला पाहून, त्या सभेतच अगम्य गुरूंना भेटण्यासाठी जी माझ्या पुढारीपणाखाली एक समिति नेमावयाची होती ती नेमली जावी असे काही विद्यार्थ्यांनीत वाकपीठावरून सुचविले. त्याप्रमाणे त्या सभेत नऊजणांची मी त्या समितीला घेऊन अगम्य गुरूंकडे गेलो. राष्ट्रीय राजकारणाचा असा कोणता कार्यक्रम, कोणते मार्गदर्शन आपण सुचविणार आहोत ते आता आपले योजनेप्रमाणे आलेल्या ह्या विद्यार्थ्यांच्या समितीला सांगाल का? अशी त्यांना मी विनंती केली. पण स्वामीजी जे बोलू लागले ते मधूनच काही योग प्राणायामादी शब्द, मधूनच काही त्यांच्या प्रवासाच्या निकाम्या कथा, मधूनच प्रथम भगवंताचे अधिष्ठान पाहिजे इत्यादी भारूडच सांगत चालले. राजकारणाचे असे सरळ नाव काढीनात. शेवटी सारा वेळ व्यर्थ चालला आहे असे पाहून मी त्यांना अगदी मधेच हटकून विचारले की आपण जे राजकीय चळवळीचे 'महत्वाचे' मार्गदर्शन ह्या विद्यार्थ्यांना करणार होते ते प्रथम स्पष्टपणे सांगा. तेव्हा तुच्छेतेने म्हणाले,"ह्या विद्यार्थीवर्गाला कसले मार्गदर्शन करू? अशांचे हातून काय होणार? मी त्यांना दहादा सांगितले पैसे जमवून आणा पण तेसुद्धा कोणी करीना. तुम्ही पण जा नी पैसे जमवून आणा मग काय ते बोलू. तोवर काही बोलणे नाही." अशा भावार्थाचे त्यांचे उत्तर ऐकताच एकंदरीतली त्यांची पातळी पारखून मी उठलो. विद्यार्थीही घरोघरी गेले. नंतर त्या समितीत निवडल्या गेलेल्या माझ्या दोघातिघा अभिनव भारतीय मित्रांना तेवढे निराळे घेऊन मी सांगतले की तुम्ही स्वतःच्या स्वाक्षरीने मला तार का धाडली?

तुमची स्वाक्षरी पाहून मी आलो. मी असे कितीक बुवा, महाराज नि माहात्म पाहन चुकलो आहे. हे बहुतेक लोक राज्यक्रांतीच्या नावालासुद्धा मनोमन थरकापत असतात. बहुतेक केवळ उकळणारे असतात. ह्या अगम्य गुरूचे पाणीही मी आता जोखले. तुम्ही त्या समितितून नावे काढून घ्या. मी परत त्यांच्याकडे जाणार नाही असे सांगून मी मुंबईस परतलो. तिकडे अगम्य गुरूंचे काय झाले त्याची विचारपूससूद्धा पुन्हा केली नाही. तेही पुण्याहून लगेच कुठे तरी निघून गेले म्हणून कळले.

वर दिलेली उणीपुरी अर्धाएक तास जी अगम्य गुरूशी माझी भेट झाली तेवढाच काय तो साऱ्या आयुष्यात त्यांचा माझा आलेला संबंध मांटगामेरी नि रौलट ह्यांच्या अधिकृत प्रतिवृत्तात जर अगम्य गुरूविषयींची मागे दिलेली भाकड कथा विश्वासनीय म्हणून आलेली नसती तर ह्या माझ्या आत्मवृत्तातही त्यांच्या नावाचा उल्लेख सुद्धा केला गेला नसता. कारण त्यांचे नावही माझ्या ध्यानात नव्हते. तो क्षुद्र नि क्षणिक प्रसंगही मी विसरून गेलो होतो. पुढे सन १९२४ मध्ये मी जेव्हा काळ्यापाण्याच्या शिक्षेतून सुटलो नि रत्नागिरीस स्थानबद्ध झालो तेव्हा रौलट प्रतिवृत्त मला वाचावयास मिळाले. आणि त्यात जेव्हा ही अगम्य गुरूविषयींची भाकड कथा मी वाचली तेव्हा काय ती, ती आठवण पुन्हा आली आणि त्या राईचा असा पर्वत झालेला पाहून मोठी गंमत वाटली.

येथेच हेही सांगून टाकणे भाग आहे की वर दिल्याप्रमाणे मी रत्नागिरीस सन १९२४ नंतर स्थानबद्ध असता टिळकांचे सहकारी असलेले सातारचे प्रसिद्ध पुढारी दादाराव करंदीकर हे मला भेटून गेले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की "त्यांच्याकडे सन १९०८ मध्ये, ते लंडनला असता वरील अगम्य गुरू जाऊन भेटले होते. आणि पुढे अगम्य गुरूंना एका इंग्लिश मुलीचा विनयभंग केला म्हणून इंग्लिश न्यायलयात खटला होऊन बंदीवासाची शिक्षा भोगावी लागली." दादाराव करंदीकरांनी लंडनहून धाडलेली काही पत्रे पुढे 'Letters from England' ह्या नावाने एका पुस्तकात प्रसिद्ध झाली. त्यातील सत्तावीस ऑक्टोबर १९०८ च्या पत्रात दादारावांनी हा उल्लेख केलेला आहे. आणि लिहिले आहे की "वरील खटल्यात झालेली चार महिन्यांची शिक्षा भोगून आल्यानंतर अगम्य गुरू मला (दादारावांना) भेटले. अगम्य गुरूच्या पहिल्या अंकाची इतिश्री झाली! आता त्यांचे पुढील कार्यक्रम ठरणार!" पण पुढे त्यांच्या कार्यक्रमांचा किंवा त्यांच्या नावाचा सुद्धा उल्लेख कुठेही आलेला आढळला नाही.

आणि जर पुण्यास झालेल्या त्यांच्या माझ्या अवघ्या एका तासाभराच्या भेटीत त्यांच्या नावाचा माझ्या नावाशी संबंध आला नसता आणि रौलट प्रतिवृत्तांसारख्या अधिकृत प्रतिवृत्तांत त्यांचा भाकड उल्लेख आला नसता तर त्यांचे नाव मुळातच कुठे ऐकू आले नसते. पण आता मात्र माझ्या चरित्राची आठवण जिवंत राहील तोवर तेवढ्या भेटीपुरती तरी त्यांच्या नावाचीही आठवण अगदीच पुसली जणार नाही खरी!

रौलट प्रतिवृत्तातील माझ्याविषयीची प्रारंभिक माहिती देताना विहार पत्रासंबंधीही जो उल्लेख आलेला आहे, तोही कसा भ्रांत आहे तो पहा. ते प्रतिवृत्त त्यांच्या पृष्ठ ४ वर म्हणते Another paper edited by Chitpawan Bramhins in Poona was the Vihari. Criminal proceeding were successfully taken against three successive editors for seditious artcles which appeared in it, in 1906,07,08 Years-

आता विहारी हे पत्र पुणे येथे निघत नव्हते, तर मुंबईस. त्याचे संचालक श्री. फाटक हे 'पुणेकर' नव्हते. त्याचे पहिले संपादक श्री. चिपळूणकर- ज्यांचा माझ्याशी परिचय झाल्यानंतर ते अभिनव भारताचे सभासद झाले- तेही पुणेकर नव्हते. त्यांच्या मागोमाग विहारी पत्र अंतस्थपणे मी लिहू लागलो आणि माझ्या निनावी लेखामुळे

त्याची महाराष्ट्रभर प्रसिद्धी आणि खप वाढला. पण मीही 'पुणेकर' नव्हतो. त्यातही आश्चर्याची गोष्ट ही की मी निनावीपणे हे पत्र चालवीत होतो ह्याचा रौलट प्रतिवृत्ताला पत्ताही नाही. पुढे मी लंडनला गेल्यानंतर श्री. फडके हे 'विहारी' चे उघड संपादक झाले. पण तेहि 'पुणेकर' नव्हते. त्यांना 'राजद्रोही' लेखाकरीता शिक्षा होताच श्री. मंडलिक हे उघड संपादक झाले. पण तेही पुणेकर नव्हते! त्यांनाही 'राजद्रोही' लेखाविषयी शिक्षा झाली. तेव्हाच काय ते पत्र बंद पडले. म्हणजे, रौलट रिपोर्टातील वरील उताऱ्यात ठोकून दिले आहे. त्याप्रमाणे शेवटपर्यंत त्या पत्राशी कोणत्याही 'पुणकरा'चा संबंधसुद्धा नव्हता. हां, आम्ही सर्वजण 'चित्पावन ब्राम्हण' होतो इतके मात्र खरे! जाता जाता हेही उल्लेखनिय आहे की श्री. फडके नि श्री. मंडलीक हे दोघेही 'अभिनव भारता'चे सदस्य झालेले होते. परंतू ह्या गुप्त गोष्टींचा गुप्तसंस्थांच्या वृत्तासाठीच नेमलेल्या ह्या रौलट प्रतिवृत्ताला पत्ताही नाही.

**क्रांतिकारक गुप्त संस्थाचे अभिमानास्पद क्रांतिकौशल्ये!**

वरील केवळ दिग्दर्शनार्थ केलेल्या दोनचार गोष्टींचा उल्लखावरून हे स्पष्टपणे दिसून येईल की रौलट प्रतिवृत्ताला अनेक क्रांतिकारक गुप्त गोष्टींचा थांगपत्तासुद्धा लागलेला नाही. त्याचप्रमाणे अनेक गोष्टींविषयी भ्रांत नि विपर्यस्त वृत्त देण्यात आलेले आहे. मद्विषयक माहितीसंबंधीच ही स्थिती नाही तर अभिनव भारताप्रमाणेच हिंदुस्थानात पुढे निघलेल्या अनेक गुप्तसंस्थांविषयी, गुप्तकटांविषयी नि क्रांतिकारक व्यक्तींविषयी अशीच कुठे तुटपुंजी, कुठे भ्रांत तर कुठे विपर्यस्त विधाने ह्या रौलट प्रतिवृत्तात शेवटपर्यत विखुरलेली आहेत ह्याचे जितके आश्चर्य वाटते तितकाच अभिमानही ! अभिमान अशासाठी की, रौलट प्रतिवृत्तात जी ही उणीव आहे तिचे मुख्य कारण हेच की ज्या ब्रिटिशांच्या भारतीय शासन यंत्राच्या गुप्तचर विभागाने रौलट समितीला क्रांतिकारका विषयची गुप्त माहिती पुरविली त्या गुप्तचर विभागाच्या हिंदुस्थानभर पसरलेल्या, पाठीशी प्रबळ राजसत्तेचा पाठिंबा आणि हाती अमर्याद साधने असताही सहस्राक्षदृष्टीत धूळ फेकून आमच्या भारतीय क्रांतिकारक गुप्तसंस्थानी आपली गुप्त कारस्थाने यशस्वी रीतीने अनेकदा पार पाडली! खुदिराम, मदनलाल धिंग्रा, कान्हेरे, भगतसिंगापासून अगदी ओडवायरचा वध भर लंडनमध्ये सन १९४० मध्ये करणाऱ्या उधमसिंगपर्यत गुप्त क्रांतिकारकांची रणकृत्ये यशस्वी पार पडेतो त्यांच्या कटाचा ब्रिटिशांच्या अवाढव्य नि जगभर नावजलेल्या स्कॉटलंड सारख्या गुप्तचर विभागासही थांगपत्ता लागलेला नव्हता! आम्हा भारतीय क्रांतिकारकांच्या ह्या गुप्त कारस्थानी कौशल्याचा कोणास अभिमान वाटणार नाही!

**ब्रिटिशांच्या गुप्तचर प्रतिवृत्तांच्या आधारावरच**
**भारतीय राज्यक्रांतीचा इतिहास लिहिला जाऊ नये !**

येथपर्यत मांटगामेरीच्या किंवा रौलट समितीच्या प्रतिवृत्तांचा मी जो माझ्यापुरता विस्तारशः उहापोह केला आहे तो एक उदाहरण म्हणून केवळ ह्याच सिद्धांताचे दिग्दर्शन करण्यासाठी केला आहे की ब्रिटिशांच्या हिंदुस्थानातील काय किंवा इंग्लंडातील काय शासनीय गुप्तचर विभागाची अधिकृत म्हणविणारी जी प्रतिवृत्ते आज प्रसिद्ध झालेली आहेत किंवा जी प्रतिवृत्ते त्यांच्या लेखालयात (Record) मध्ये पडलेली आहेत त्यात मी वर दाखविल्याप्रमाणे अनेक प्रकारणी नि अनेक प्रमाणे भारतीय क्रांतिकारकांच्या गुप्त चळवळींविषयी आणि रणकृत्याविषयी चुकीची माहिती भरलेली असल्यामुळे त्या ब्रिटिश शासनीय प्रतिवृत्तांच्या आधारावर काय तो

आमच्या ब्रिटिशभारतीय स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास लिहिला जाऊ नये. नाहीतर त्यांच्यातील चुकीची माहितीही सत्यघटना म्हणून इतिहासातही नित्याचे घर करून बसतील.

ह्याचे एक प्रत्यंतर म्हणून ह्या वर उल्लेखिलेल्या मांटगामेरी प्रतिवृत्तांताचेच देता येईल. हे प्रतिवृत्त वस्ततः एक अर्थी क्षुल्लक असताही, इथे माझ्यापुरते बोलायचे झाले तर, त्याचा किती दूरवर परिणाम होत गेला तो पहा. माझ्याविषयीची चुकीची माहिती देणाऱ्या ह्या सन १९०६ मध्ये मुंबई शासनाकडे धाडलेल्या मांटगामेरी रिपोर्टात साधार समजूत सन १९१८ च्या मध्यवर्ती हिंदुस्थान शासनाकडे धाडलेल्या रौलट रिपोर्टातही तीच चुकीची माहिती सत्य समजून माझा प्रारंभिक परिचय करून दिला गेला. पुढे हा रौलट रिपोर्ट हिंदुस्थानच्या मध्यवर्ती शासनानेच अधिकृत म्हणून प्रसिद्धीला. त्यामुळे श्री. याज्ञिक यांच्यासारख्या प्रामाणिक इतिहासकारांनीही सहज पणेच त्यास आधारभूत समजून त्यांची स्वतंत्रपणे इंग्लिश भाषेत सन १९५० मध्ये प्रसिद्धिलेल्या ‘पंडीत शामजी यांचे चरित्र’ ह्या ग्रंथात त्या रौलट रिपोर्टचा उतारा घेवून त्यातील शिवाजीपासून टिळक, परांजप्यापर्यंत कोणाचेही नाव न घेता माझे राजकीय गुरूपद कोण्या सोम्या-गोम्या अगम्य गुरूस अर्पून टाकले. तशीच दिशाभूल माझे चरित्र लिहिणाऱ्या इतर काही प्रमाणिक इतिहासलेखकांची झालेली आहे.

जी गोष्ट माझ्याविषयी तीच गोष्ट शतावधी इतर प्रख्यात भारतीय क्रांतिकारकांच्याही विषयी! आणि क्रांतीच्या समग्र इतिहासाविषयीही! इतिहासाचीच अशी दिशाभूल होऊ नये म्हणून सावधपणाची चेतावणी देण्यासाठी एक उदाहरण म्हणून ह्या मांटगामेरीच्या गुप्त प्रतिवृत्ताची इथे इतकी सविस्तर चिकित्सा केलेली आहे.

तथापि हेही विसरता कामा नये की ब्रिटिश शासनीय गुप्तचर विभागाची प्रतिवृत्तेही पुष्कळच महत्वाची आणि अंशतः आधारभूत धरण्यासारखी ऐतिहासिक माहिती देऊ शकतात. तितक्यापुरता त्यांचा एकमेव ऐतिहासिक आधार मानू नये. आता हिंदुस्थानातील अनेक क्रांतिकारक देशभक्त आपआपली आत्मवृत्ते नि त्या त्या क्रांतिकारक संस्थाचे इतिहास बंगालीत, मराठीत, इंग्रजीत, हिंदीत नि इतर भाषांतही प्रसिद्धित आहेत. त्यांच्या त्या ग्रंथाशी ती रौलट प्रतिवृत्तासारखे ब्रिटिश शासनीय गुप्त प्रतिवृत्ते ताडून, पडताळून पाहिल्यानंतर किंवा तसा दुसरा स्वतंत्र पुरावा मिळाल्यानंतर जो जो तथ्य भाग त्या ब्रिटिश प्रतिवृत्तात दिसेल तो तेवढा ह्या राज्यक्रांतीचा स्वतंत्र इतिहास लिहिताना आधारभूत समजला जावा.

प्रकरण चौथे

# जोसेफ माझिनीः आत्मवृत्त नि राजकारण

इंडीया हाउसमधील मंडळींच्या ओळखीपाळखी करून घेण्यात सात आठ दिवस निघून गेल्यानंतर एकदा बोलण्याच्या ओघात तेथील गृहचालक श्री. मुखर्जी यांना मी सहज विचारले की, “माझिनीचे आत्मवृत्त नि त्यांचे समग्र लेख यांचे इंग्रजीत भाषांतर झालेले आहे असे मी वाचले. परंतू मला तो ग्रंथ अजून वाचावयास मिळाला नाही. लंडनमधील मोठमोठ्या ग्रंथालयात आपल्या ओळखी आहेत, म्हणून आपण एकदा म्हणालात. तो ग्रंथ तिथे कुठे असल्यास माझ्यासाठी आपण आणू शकाल काय? “माझिनीचे आत्मवृत्त'? असे स्वतःशीच पुटपुटत असल्या लांब करड्या दाढीवरून तिच्या टोकापर्यंत दोनतीनदा हात फिरवीत आणि आढ्याकडे पहात मुखर्जी महाशय आपल्या डोक्यातच काही शोधत बसावे तसे किंचित स्तब्ध बसले. लगेच म्हणाले, “येथील पुस्तकांच्या कपाटात असे एक पुस्तक असावे. थांब ,पहातो” आत जाऊन त्यांनी मला ते दिले. तेच नाव त्या पुस्तकाचे आहे असे आढळताच मला खूप आनंद झाला. पण त्या एका साधारण तीनशे पानांच्या पुस्तकात मावण्याइतकेच का माझिनीचे सारे लेख नि आत्मचरित्र मिळून सामावले आहे, अशा शंकेने मला मनात हिरमुसलेही वाटले. म्हणून पुठ्यां आतील मुखपृष्ठ नीट वाचले. तो ‘भाग पहिला’ असे छापलेले. आत स्पष्टच लिहिलेले होते की प्रकाशकांनी तो ग्रंथ तशा सहा भागात छापलेला आहे. ते मुखर्जींना दिखविले तेव्हा ते म्हणाले “या, तुम्हीच आत चला. पाहू या त्या कपाटात आणखी काही भाग आहेत का? कपाटात पुस्तके कितीहि ओळीने लावली तरी हे लोक दोन दिवसांत त्याची उपसाउपस करीत खिचडी करून टाकतात. म्हणून आताशी कपाटे बंदच करून टाकली आहेत मी”. असे कोणाला तरी उद्देशून पुटपुटत ते पुढे नि मी मागे असे आत गेलो. कपाटात पुस्तके चाळता चाळता माझिनीच्या त्या लेखांचे अधूनमधून असे तीन भाग सापडले. ओळीने सहा असे काही सापडले नाहीत. पण ते सापडले त्यांना पाहूनच मला केवढा साश्चर्य आनंद झाला! जसे कोण्या जुन्या गडात खणताना मोहरांचा हंडा सापडावा! ते तिन्ही भाग मी एका आठवड्यात वाचून काढले. अधलेमधले जे नव्हते ते मिळवू देण्यासाठी मी मुखर्जींच्या मागे लागलो होतोच. अशी प्रौढ वाङ्‌मयीन पुस्तके वाचण्याची माझी उत्कंठा नि अध्यवसाय पाहून त्यांनाही माझे पुष्कळ कौतूक वाटू लागले होते. त्यांना मागणीचा त्रास तर वाटला नाहीच तर उलट ती पुस्तके कुठे मिळेनात म्हणून त्यांना खेदच वाटे. आठ-दहा दिवसांनी एका संध्याकाळी ते जे बाहेरून आले ते थेट माझ्या खोलीतच आले. माझ्या टेबलावर एक पुस्तकाचा गठ्ठ धापदिशी आपटीत नि हसत म्हणाले, “ही घ्या तुमची उरलेली पुस्तके, मिस्टर सावरकर!” माझिनीच्या आत्मवृत्त नि समग्र लेखसंग्रह या ग्रंथाचे क्रमवार सहाही भाग असे मिळवून दिल्याविषयी मी मुखर्जी महाशयांचे आभार मानले. तेही भाग मी लगोलग समग्र वाचून काढले.

**माझिनीच्या चरित्राचा हिंदी राजकारणावर प्रभाव ग्यारिबाल्डीविषयक एक आठवण**

सत्तावनच्या स्वातंत्र्य युद्धाचे आठनऊ वर्षेच आधी सन १८४८-४९ मध्ये माझिनी आणि ग्यारिबाल्डी यांचे नेतृत्वाखाली साऱ्या इटली देशात नि विशेषतः रोममध्ये इटलीच्या स्वातंत्रासाठी क्रांतीयुद्ध भडकले होते. पण त्या उठावणीत इटालियन क्रांतिकारकांचा पराभव होऊन माझिनी ग्यारिबाल्डी प्रभृती क्रांतिकारक नेत्यांना परदेशात निसटून जावे लागले. आपल्या इटलीप्रमाणे जो जो परतंत्र असेल त्याला त्याला स्वतंत्र होण्याचा अधिकार आहे

आणि त्याला त्याला आपण सक्रीय सहानुभूती दाखविली पाहिजे अशा तत्वाचे हे थोर देशभक्त पुरस्कर्ते असल्यामुळे हिंदुस्थानात जेव्हा सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध भडकले तेव्हा त्याच्या वार्ता ऐकून त्यांना हिंदी क्रांतिकारकांविषयी सहानुभूती वाटू लागली. इंग्रजांनी कितीही वार्ता दाबल्या किंवा विपर्यस्त बातम्या धाडल्या तरी कानपूर-काल्पी सारख्या घटनांनी आणि विशेषतः सेनापति तात्या टोप्यांनी वृकयुद्धात ज्या धावत्या पळत्या लढायामागून लढाया देऊन, दहाबारा ब्रिटिश सेनानींची तारांबळ उडवून दिली होती त्यांची वर्णने युरोपमधील फ्रेंच प्रभृती वृत्तपत्रात येतच होती. ती वाचून स्वदेशाचे स्वातंत्र्य संपादनार्थ झुंजणाऱ्या क्रांतिकारकांचेविषयी उत्कट सहानुभूती बाळगणारा वर्गही युरोपात उत्पन्न झालेला होता. त्यावेळी जनरल ग्यारिबाल्डी यांनी तर तात्या टोपे यांच्यासारख्या शूर क्रांतिकारक सेनापतिच्या खांद्याशी खांदा भिडवून ब्रिटिशांविरूद्ध हिंदी स्वातंत्र्ययुद्धात लढण्या साठी हिंदुस्थानात जाण्याची इच्छाही प्रकटविली होती; पण त्यावेळीच इटलीमध्ये पुन्हा एकदा क्रांतिकारक उठावणी करण्याचा बेत शिजू लागल्याचे सेनापती ग्यारिबाल्डी यास, दुसरा कोणताही विचार बाजूस सारून, इटलीच्या त्या लढ्यातच भाग घेणे त्याचे आद्य कर्तव्य म्हणून प्राप्त झाले.

पुढे सत्तावनच्या युद्धानंतर हिंदुस्थानात जे आंग्लशिक्षितांचे राजकारण चालू झाले त्यातील अगदी सुरेद्रनाथांच्या पिढीपासून अनेक हिंदी पुढाऱ्यांना माझिनीच्या चरित्रातूनही स्वदेशभक्तीची स्फूर्ती मिळत आली होती. दोन तीन ठळक उदाहरणेच पहा. ब्रिटिशांच्या सेवाविभागातून त्यांना काढून टाकल्यानंतर जेव्हा सुरेंद्रनाथांनी स्वदेशसेवेत स्वतःस वाहून घेण्याचा निश्चय केला तेव्हा त्यांनी माझिनीच्या चरित्राचा अभ्यास केला. त्याचा त्यांच्या मनावर इतका उत्कट परिणाम झाला की बंगालच्या तरूण पिढीत तशा तेजस्वी देशभक्तीचे तेज संचरविण्यासाठी सुरेंद्रनाथांनी तोच विषय निवडला आणि 'माझिनी नि त्याची तरूण इटलीची गुप्तसंस्था' या विषयावर बंगालमध्ये ठिकठिकाणी सन १८७५ ते १८७८ पर्यंत अनेक व्याख्याने दिली. त्यावेळी इटली स्वतंत्र होऊन नि माझिनीचा मृत्यू होऊन अवघी दहा-पाच वर्षेच उलटली होती. सुरेंद्रनाथांच्या या जळजळीत व्याख्यांनामुळे बंगालच्या त्या काळच्या शतावधी विशी-तिशीतील तरूणांचे हृदयात स्वदेशसेवेला सक्रीयपणे वाहून घेण्याची पहिली उर्मी उसळली. आणि तरूण इटलीप्रमाणे नसत्या तरी 'गुप्तसंस्था' स्थापण्याचीही त्यांच्यात अहमहमिक लागली.

याच मंडळीत बिपिनचंद्र पालही होते. त्यांचे वय तेव्हा तिशीचे आगेमागे असेल. त्या वेळेपर्यंत त्यांचा राजकारणाशी कोणताही संबंध नसला तरी त्यांनी ब्राह्मोसमाजात सामाजिक पुढारीपणाची कामे केलेली होती. ते त्यांच्या आत्मचरित्रात लिहितात की सुरेंद्रनाथांच्या माझिनीवरील ह्या व्याख्यानांपैकीच एक वक्तृत्वपूर्ण व्याख्यान मीही ऐकले आणि स्वदेशाच्या राजकीय मुक्ततेयसाठी आपणही राजकारणात भाग घेतला पाहीजे अशी भावना त्या दिवशीपासून माझ्या मनात उत्कटपणे संचारू लागली.

**रहस्यमयतेचा केवळ आस्वाद!**

परंतु सुरेंद्रनाथच आपल्या आत्मवृत्तात लिहितात की माझ्या माझिनीवरील व्याख्यानातून मी अगदी निक्षून सांगत असे की माझिनीप्रमाणे उत्कट देशभक्त बना, उत्कट त्यागी बना, मानवतेचे उपासक बना नि सर्व जीवन आपल्या मातृभूमीचे सेवेस वाहून द्या. परंतू माझिनीच्या सशस्त्र क्रांतिकारकाच्या मार्गावर मात्र चुकून सुद्धा पाऊल टाकू नका. 'I took care to tell the young men to abjure Mazzinis' revolutionary ideas.' ते मागे

इटलिच्या परिस्थितीत त्यांच्या इटलीला तारक झाले. पण हिंदुस्थान म्हणजे इटली नव्हे. हिंदुस्थानच्या परिस्थितीत ते आपल्या हिंदुस्थानला मारक होतील! आपल्या स्वदेशाच्या उन्नतीसाठी आपले सारे प्रयत्न नैर्बधिक नि घटनात्मक आणि संपूर्णतः शांततामय Legal and Constitutional and absolutely peaceful मार्गानीच झाले पाहिजे. ह्या मार्गानीच काय ती आपली उन्नती होऊ शकेल. पालबाबुही लिहितात की सुरेंद्रनाथांचे हेच प्रामाणीक मत होते. मग माझिनीवरील ह्या व्याख्यानामुळे स्फुरण पावलेल्या मंडळींनी ज्या अनेक 'गुप्त' संस्था स्थापल्या म्हणून आम्ही वर लिहिले आहे त्या 'गुप्त' कशाकरिता होत्या? ते कोडे सोडविण्या साठी पालबाबूंच्या आत्मचरित्रातील तद्विषयक स्वानुभवाच्या बोलांचाच उतारा खाली दिला आहे.

Between 1875-1878 after surendra Nath's lecture on Mazzini's Young Italy, young men (in Bengal) formed a number of secret societies, though without any revolutionary motive or plan of secret assassinations as the way to national exancipation. Surendra Nath was himself, I think the president of quite a number of these secret societies. These societies had no plan or policy of policital action to liberate their people from British Yoke. They only gave a Philip to patriotism. They never seriously meant to rise in revolt against the British. They practically did nothing and passed away like a fashion. (page. 248)

भावार्थ की, " सुरेंद्रनाथांच्या सन १८७५ ते ८८ मधील माझिनीच्या यंग इटली ह्या गुप्त मंडळावरील व्याख्यानामुळे बंगाली तरूणांनी अनेक गुप्त संस्था स्थापिल्या. परंतू त्यांचेपुढे तरूण इटलीप्रमाणे राज्यक्रांतीचा किंवा सशस्त्र उठावाचा असा कोणताही उद्देश नव्हता. ह्या गुप्त मंडळ्यांनी राष्ट्रस्वातंत्र्य मिळविण्याचा एक मार्ग म्हणून हत्याकांडाची एखादी योजनाही आखली नव्हती. हा गुप्त मंडळ्यांतील, मला वाटते,अनेक गुप्त मंडळ्यांचे अध्यक्ष स्वतः सुरेंद्रनाथच असत. तथापि ब्रिटिशांच्या दास्यातून आपल्या मातृभूमीस मुक्त करण्यासाठी राजकीय कार्यक्रम त्या संस्थांनी केव्हाही हाती घेतला नाही. मग दंड करून उठण्याची गोष्टच दूर! रसरशीत देशभक्तीची ज्योती अनेक अंतःकरणांतून पेटविण्यापूरताच काय तो त्याचा उद्देश होता आणि तेवढाच त्यांचा काय तो उपयोग झाला. त्यापलीकडे काहीही कार्य न करता एखादी टूम जशी तिचे नावीन्य संपताच नाहीशी होते तशा प्रकारे ह्या स्वतःस गुप्त संस्था महणविणाऱ्या गुप्त संस्था लवकरच आपोआपच मावळून गेल्या."

म्हणजे "तरूण इटलिची गुप्त संस्था" या शब्दसंघातील 'तरूण इटली' वजा जाता जो 'गुप्त' शब्द उरतो त्यातील रहस्यमयतेचा आस्वाद घेण्यापुरताच काय तो तो शब्द या गुप्तसंस्थांना लावला गेला होता. 'तरूण इटली' प्रमाणे त्या सशस्त्र क्रांतिकारक संस्था होत्या म्हणून नव्हे. किंबहुना माझिनीतील क्रांतिकारक माझिनी वजा जाता जो देशभक्त माझिनी उरतो त्यातच काय ती कार्यवाही ह्या गुप्त संस्थातून व्हावी हेही सहाजिकच होते!

अर्थातच, आम्ही पहील्या भागात बंगालची पहाणी करताना जे लिहिले आहे की बंगालमध्ये सशस्त्र क्रांतीची अशी कोणतीही चळवळ सन १८९५ पर्यत तरी अस्तित्वात नव्हती असे उपलब्ध पुराव्यावरून दिसते. त्या आमच्या विधानास ह्या केवळ 'नामवंत 'गुप्त संस्थांच्या टूमीमुळे बाध येत नाही. तसेच न्यायतः ही भविष्यकालीन योगायोग इथेच उल्लेखिला पाहिजे की सुरेंद्रनाथांनी माझिनीचे नि त्याच्या सशस्त्र क्रांतिकारक 'तरूण इटली' ह्या गुप्त संस्थेच्या शिकवणूकीचे जे विचार सन १८७५ मध्ये तत्कालीन बंगीय तरूण पिढिच्या मनोभूमिकेत पेरले ते सुरद्रबाबूंचा तसा हेतू असो वा नसो, इतर तशा स्फोटक विचारांशी संमिश्रण पावताच जवळ

जवळ पंचवीस तीस वर्षांनी अशा काही प्रकट वेगाने उगवून उठले की केवळ 'नामवंत'च नव्हेतर 'जातिवंत' गुप्तसंस्थांचे रानचे रान बंगालच्या भूमीला झाकाळून टाकते झाले. बंगभूमि म्हणजे स्वदेशस्वातंत्र्यवादी सशस्त्र क्रांतिकारकांचे एक सलग भुयार होऊन बसले. पण ते पुढे.

माझिनीच्या चरित्राचा सुरेंद्रनाथ, बिपीनचंद्र पाल नि तत्कालीन बंगीय तरूण पिढी ह्यांच्या मनावर किती नि कशा प्रकारचा स्फूर्तिदायक परिणाम झालेला होता ते दिग्दर्शिल्यानंतर आता पंजाबचे एक उदाहरण देऊ. ते म्हणजे स्वतः लाला लजपतराय यांचेच! वयाच्या जवळजवळ तिशीपर्यंत लालाजी साधारणतः ब्रिटिशनिष्ठ असल्याने राजकारणाशी फारसा संबंध त्यांनी तसा ठेवला नव्हता ते पहिल्या भागात दिलेलेच आहे. इकडे, काँग्रसच्या स्थापनेच्या थोडेसे आधीच सुरेंद्रनाथांनी बंगाल्यात जी 'नॅशनल लीग' ची संस्था स्थापिली होती, तिचा प्रसार करण्यासाठी सन १८८४त ते पंजाबमध्ये व्याख्याने देण्यास गेले. तेव्हा त्यांनी माझिनी नी यंग इटली या त्यांच्या आवडत्या विषयावरही एक भाषण केले. त्या भाषणास लजपतराय उपस्थित होते. त्या वक्तृत्वपूर्ण व्याख्यानाचा आणि माझिनीच्या राज्यक्रांतीमय चरित्राचा लालाजींवर इतका परिणाम झाला की आपणही आपल्या देशास राजकीय दास्यातून सोडविण्यासाठी राजकारणात उतरून माझिनीप्रमाणे लोकांमध्ये राजकीय चैतन्य चेतविले पाहीजे अशी त्यांच्या मनास त्या दिवसापासून उत्कट ओढ लागली असे ते आपल्या आत्मचरित्रात लिहितात. पुढे त्यांनी माझिनीचे चरित्र स्वतंत्रपणे अभ्यासिले! पंजाबातील तरूण पिढित स्वदेश स्वातंत्राची तीव्र आकांक्षा संचारून तिने माझिनी गारिबाल्डीच्या वेळच्या इटालियन तरूणांप्रमाणे सक्रीय आंदोलनास वाहून घ्यावे या अंतस्थ हेतूने लालाजींनी पुढे उर्दू भाषेत स्वतःच माझीनीचे एक स्फूर्तिदायक चरित्रही लिहून प्रसिद्धिले.

यद्यपि ५७ पासून महाराष्ट्रीय क्रांतिकारकांच्या ब्रिटिश विद्रोही 'उठावणी' ची परंपरा अखंडपणे चालू होती तथापि महाराष्ट्राला माझिनीचा परिचय बंगालपेक्षा पुष्कळ उशिराने झाला. कारण क्रांतिकारक राजकारणाची बीजे नि पाळेमुळे महाराष्ट्राच्या भूमीत मुळचीच रूजलेली होती. त्यांची लागवड कुठून परदेशांतून आणून करावयाची नव्हती. सन १८५७ तील महाराष्ट्रीय क्रांतिकारकांपासून तो अभिनव भारताच्या क्रांतिकारकांपर्यंत झाडून साऱ्या महाराष्ट्रीय क्रांतिकारकांची कुलदैवते आणि स्फूर्तिकेंद्रे होती श्रीराम, श्रीकृष्ण, शिवाजी! त्यांच्याच वीर चरित्रांच्या माध्यमातून ते आपले क्रांतिसंदेश प्रक्षेपित असत. माझिनीपुरतेच बोलायचे तर वासुदेव बळवंत नि चाफेकर यांच्या शस्त्राचारी उठावापर्यंत महाराष्ट्राला माझिनीची म्हणण्यासारखी ओळखही नव्हती. माझ्या आठवणीप्रमाणे मराठीत माझिनीचे पहिले चरित्र जे लिहिले गेले ते सन १९०० च्या आगेमागे श्री. घाणेकर यांनी जे लिहिले तेच होय. याच काळात, युरोपातील निरनिराळ्या राष्ट्रांनी स्वतंत्र होण्यासाठी केलेल्या अर्वाचीन क्रांतियुद्धाचे त्यातील गुप्तसंघटनांचा नि त्यात झुंजलेल्या क्रांतिविरांचे त्रोटक इतिहास देणारे आणि परांजप्यांच्या प्रक्षोभक लेखणीतून उतरलेले लेख पुण्याच्या 'काळ' पत्रातून प्रसिद्ध होत होते. त्यांत तरूण इटली वरही एक क्रांतिप्रवण लेख आलेला होता. श्री. घाणेकरांचे ते माझिनीचे संक्षिप्त चरित्र नि काळातील हा 'तरूण इटली' वरील जेख ह्यात आलेल्या इटालीयन क्रांतिविषयीच्या तुटपूंज्या वृत्तांतानेही माझी अशी निश्चिती पटली की इटलीच्या ह्या वीररसपूर्ण तत्वनिष्ठ नि अगदी अद्यावत् क्रांतीचा इतिहास आपल्या अभिनव भारतीयची क्रांतिप्रयत्नांनाही पुष्कळ अंशी मार्गदर्शक होऊ शकेल. कारण परतंत्र इटलीच्या परिस्थितीत आणि परतंत्र हिंदुस्थानच्या परिस्थितीत पुष्कळ साम्य आहे. यास्तव आमच्या गुप्त संस्थांतून, प्रशाला, महाशाळांतून आणि सार्वजनिक सभांतूनही मी इंग्लंडला

१९०६ मध्ये जाईतोपर्यंत इटलीच्या क्रांतियुद्धावर आणि माझिनीच्या तरूण इटलीवर कित्येक व्याख्याने देत आलो होतो. पुढे माझिनीचे एक इंग्रजी चरित्रही हिंदुस्थानात असतानाच माझे वाचनात आले. त्यात मला पहिल्यानेच माहित झाले की, माझिनींनी त्याच्या इटालियन भाषेत स्वतः लिहिलेल्या क्रांतिकारी लेखांचा नि आत्मवृत्ताचा इंग्लिश भाषेत भाषांतरिलेला संचच्या संच प्रसिद्ध झालेला आहे. तो हिंदुस्थानात तोवर दुर्मिळ होता असे मला शोधांती कळले. तथापि तो संच वाचून काढण्याची उत्कांठा वर दिल्याप्रमाणे इंग्लंडमध्ये येताच, तो सहा भागांचा समग्र संच मिळाल्यामुळे पुरविली गेली.

**माझिनीच्या लेखांचे मराठी भाषांतर करण्याचा मी निश्चय केला**

मी जसजसा तो ग्रंथ वाचीत गेलो तसतसे मला आढळून येत चालले की मी हिंदुस्थान सोडण्याचे आधी गुप्तसंस्थांतून जे जे क्रांतिकारक मार्गदर्शन माझ्या सहकाऱ्यांना करीत होतो त्यात आणि माझिनीने तरूण इटली साठी अगदी पहिल्यापासून जे जे मार्गदर्शनाचे लेख लिहिले होते त्यांत आश्चर्यकारक साम्य आहे. गुप्तसंस्थांचे कार्यक्रमाचे प्रचारक नि आचारक दोन विभाग असले पाहिजेत. प्रकट आणि गुप्त असे त्या विभागांना धरून दोन कार्यक्रम आखलेले पाहिजेत. शस्त्रचारास अवलंबिल्यावाचून केवळ निःशस्त्र मार्गाने पूर्ण स्वातंत्र्य मिळणे केव्हाही शक्य नाही. आणि तरीही जनतेत प्राथमिक जागृती करण्यासाठी निःशस्त्र चळवळीही कशा चालविल्याच पाहिजेत; ब्रिटनच्या शत्रुस्थानी असलेल्या आशिया, यूरोप, अमेरिकेतील परराष्ट्रांशी संबंध का नि कसे जोडले पाहिजेत; वृकयुद्धात रणनीतीने परशत्रुच्या प्रत्येक केंद्रावर, प्रत्येक अधिकाऱ्यावर छापे घालून, साधले तशी वैयक्तिक किंवा सामुदायिक कापाकापी करीत राहून, ब्रिटिश सत्तेने उभारलेल्या लाखो स्वदेशी सैनिकांना गुप्तपणे क्रांतीप्रणव करून शक्य ते स्थानिक नि वैयक्तिक उठाव, rising सैनिक उठाव, परराष्ट्रात ब्रिटनशी कोणाचे युद्ध जुंपताच तिकडे जाऊन त्यांना मिळून ब्रिटिश विद्रोही उठाव, एक उठाव फसला की संधी साधताच पुन्हा दुसरा उठाव अशी लांडगेतोड करून हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेला शस्त्राचारांच्या घणाच्या घावाखाली यथाशक्य कशी खिळखिळी खिळीखिळी करून टाकली पाहिजे; इत्यादी उपायांनी लढविल्या जाणाऱ्या सर्वकष क्रांतियुद्धाचा जो कार्यक्रम मी अभिनव भारतीय क्रांतिकारकांपुढे ठेवीत आलो होतो आणि सामान्य जनतेला ब्रिटिश सत्तेच्या तिटकाऱ्याने भडकावून देण्यासाठी उघड उघड सभांतील व्याख्यानांतून जे शक्यतो निर्बंधांच्या (कायद्यांच्या) पकडीत सापडू नये म्हणून आडपडद्याने कोटीक्रम करीत होतो; मला आश्चर्य वाटत गेले की त्याच कार्यक्रमांचा नि कोटीक्रमांचा प्रबळ पुरस्कार नि कोठे कोठे तर मी उच्चारी त्याच वाक्यांत नि उपदेशी त्याच सूत्रात माझिनीच्या त्या लेखातून केलेला आहे.

इटलीसारख्या देशातील यशस्वी युरोपीयन नि अद्यतन राज्यक्रांतीच्या माझिनीसारख्या एका प्रमुख उद्गात्याच्या,लढवय्याच्या नि युरोपभर मान्यता पावलेल्या विचारवंताच्या क्रांतिकारक विचारसरणीत नि कार्यसरणीत आणि मी पुरस्कारिलेल्या अभिनव भारतीय विचारसरणीत नि कार्यसरणीत इतके अनपेक्षित साम्य असलेले पाहून भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी मी जी राज्यक्रांतीची अखिल भारतीय योजना आखली होती तीवरील आणि अर्थातच माझा माझ्यावरलाही आत्मविश्वास शतपटीने वाढला.

आणि त्याच कारणासाठी, हे माझिनीचे लेख जर त्यांच्या वाचनात आले तर अभिनव भारतातील माझ्या शतावधी सहकाऱ्यांचाही माझ्या मार्गदर्शनावरील विश्वास आणि त्यांची स्वतःची आत्मनिष्ठाही वाढल्यावाचून

राहणार नाही हेही उघड होते. आमच्या गुप्त संस्थांतील मी नि माझे सहकारी त्या सन १९०६ मध्ये वीशी-बावीशीच्या वयाचे होते. त्यामुळे आमची केवळ लहान वये पाहून आमच्या क्रांतिकारक चळवळींना 'पोरकट' म्हणणारे अनेक 'थोरकट' नेते मवाळ पक्षातच नव्हे तर जहाल म्हणविणाऱ्या पक्षातही होते. पण समाजाचे त्यावेळी प्रस्थापित पुढारीही तेच होते. पण माझिनी-ग्यारिबाल्डीच्या तरूणपणी म्हणजे सन १८३० च्या आसपास त्याच्या पिढीतील प्रौढ नेत्यांनी नि लोकांनी त्यांच्याही 'तरूण इटली' प्रभृती चळवळीचा असाच 'पोरकट', 'वेडगळ' म्हणून उपहास करीत असावे, त्याला त्यांनी जी जळजळीत प्रत्युतरे त्यावेळी दिलेली होती ती या लेखातून आलेलीच होती. आणि त्यातही आमच्या तरूणपणाच्या म्हणजे इ.स. १९००-१९०६ च्या काळात, त्यांच्या तरूणपणी लोकांना पोरकट वाटलेले ग्यारिबाल्डी माझिनी त्यांच्या त्या पोरकट म्हणून उपहासिल्या गेलेल्या क्रांतिकारक चळवळीच्या बळावरच ती इटलीची राज्यक्रांती यशस्वी करून दाखविणारे 'थोर' राष्ट्रनिर्माते म्हणून गौरविले जात होत. आता त्यांना 'पोरकट' म्हणावयास धजणारा मायेचा पूत हिंदुस्थानातही त्यावेळच्या मवाळ जहाल पुढाऱ्यांत सापडणे अशक्य होते. यास्तव ग्यारिबाल्डी माझिनीच्या लेखाचा भक्कम आधार आमच्या चळवळीस आहे, ते ज्या मार्गाने जाऊन यशस्वी झाले त्याच मार्गाने. . . . . परिस्थितीच्या पायबंदामध्ये शक्य होईल तितक्या गतीने. . . आम्हीही जात आहो हे ह्या लेखाच्या वाचनात सिद्ध होऊन सर्वसामान्य जनतेतही क्रांतिकारक पक्षाविषयी दृढ श्रद्धा उत्पन्न झाल्यावाचून राहणार नव्हती.

असे बरेच लाभालाभ ध्यानी घेऊन मी माझिनीच्या आत्मचरित्राचे नि राजकीय लेखाचे मराठी भाषांतर करण्याचा निश्चय केला.

**मी भाषांतरणात अवलंबिलेले धोरण**

पण महाराष्ट्रात सर्व जनतेस ते क्रांतिकारक लेख निर्वेधपणे वाचावयास मिळावेत म्हणून जर ते मराठीत भाषांतर छापायचे तर ते शक्य तो निर्बंधाच्या (कायद्याच्या) कक्षेत राहूनच लिहिणे अवश्य होते. तशी नैर्बधिक मर्यादा सांभाळणाऱ्या दोनच युक्त्या होत्या. पहिली म्हणजे सुरेंद्रनाथांनी अवलंबिलेली. त्यांनी माझिनीचे चरित्र किंवा लेख छापलेले नव्हतेच. केवळ तोंडी व्याख्यानांतून ते माझिनीची स्फूर्तिदायक माहिती सांगत. पण तरीही प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटी अगदी निक्षून बजावीत की "इटालीच्या परिस्थितीत 'तरूण इटली' प्रभृती शस्त्रचारी संस्था आणि क्रांतिकृत्ये किती उपकारक जरी असली तरी तुम्हां हिंदुस्थानी तरूणांनी माझिनीच्या ह्या सशस्त्र क्रांतिकारक मार्गावर चुकूनसुद्धा पाय टाकता कामा नये. आपल्या देशाला ते घातक हाईल." पण मी त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत असे लिहिले म्हणजे वदतोव्याघात होता. कारण माझिनीच्या लेखातील सशस्त्र क्रांतिकारक लेखाचेच महाराष्ट्राने पारायण करावे आणि त्यांच्या सशस्त्र क्रांतिकारक मार्गांनाच आपल्या परिस्थितीनुरूप अनुसरावे हा तर माझा ते पुस्तक लिहिण्यात एकमेव उद्देश होता. त्यासाठी ही पहिली युक्ती सर्वस्वी त्याज्य होती. दुसरी युक्ती म्हणजे माझिनीचे लेख नि चरित्रभाग निवडून जे छापायचे ते जसेचे तसेच, स्वतःचे अक्षरही त्यांत न मिसळता एक निर्भेळ ऐतिहासिक ग्रंथ म्हणून छापावेत. ते तसे छापायचे तर मी ठरविलेच. तथापि एक पाऊल तरी पुढे टाकणे आवश्यक होते. तो ग्रंथ केवळ ऐतिहासिक नसून, केवळ वाचनीय नसुन, आपल्याही देशाच्या स्वातंत्र्य संपादनार्थ अनुकरणीय आहे हे त्याचे वैशिष्ट्य प्रत्यक्षपणे स्पष्ट जरी न सांगता आले तरी अप्रत्यक्षपणे सुचित तरी करणे भाग होते. नाहीतर सामान्य जनतेच्या डोळयात ते वैशिष्ट्य

सहजासहजी भरले नसते. यास्तव मी त्या ग्रंथाला स्वतःची अशी एक प्रस्तावना लिहिण्याचे ठाविले. हिंदुस्थानच्या परिस्थितीतही त्या इटालीय क्रांतिलेखातील जो जो तात्विक अशा क्रियात्मक भाग लागू पडत होता तो तो निवडून अशा पद्धतीने त्याची घडण जडण करावी आणि अधूनमधून अशी सूचक वाक्ये घालावी की ती प्रस्तावना वाचताना चाणाक्ष वाचकांची हृदये क्रांतिकारक स्फूर्तीने थरारून जावीत आणि हिंदुस्थानातही क्रांतिसंघटना नि क्रांतीचे सशस्त्र उठाव (Risings) कसे करता येतील ते मार्गदर्शन न सांगताही आपोआप केले जावे.

या धोरणेने मी ते सहाही भाग वाचून होताच सन १९०६ च्या जुलै महिन्याचे शेवटी शेवटी त्यांचे मराठी भाषांतर झपाट्याने करू लागलो. माझी पत्रव्यवहार, क्रांतिप्रचार, काळ - विहारीतील बातमीपत्रे, लेख इत्यादी तेथील कामे सांभाळूनही जवळजवळ तीनशे पृष्ठांचा तो ग्रंथ मी दोनअडीच महिन्यात लिहून काढला. त्याला वर सांगितलेल्या सूचक नि चेतक प्रकारची पंचवीस एक पानांची प्रस्तावनाही स्वतंत्रपणे लिहून जोडली. ह्या प्रस्तावनेचे शेवटी ती पुरी झाल्याचे स्थल नि काल असा छापलेला आहेः " लंडन, इंडिया हाउस, तारीख २८ सष्टेंबर सन १९०६."

मी ग्रंथ झपाट्याने लिहून काढला खरा पण तो छापून प्रसिद्ध करण्याचे कामही काही थोडे किचकट नि कठीण नव्हते. माझ्या सर्वच सार्वजनिक कार्याचा अर्ध्याहून अधिक भाग माझे जेष्ठ बंधु बाबाराव सावरकर यांचे वरच पडत असे. नाव नि मिळाल्यास श्रेय तेवढे माझे वाट्यास येई. कष्ट तेवढे त्यांच्या वाट्याला जात. आमच्या सामाइक मिळकतीच्या भाउबंदकीची विभागणी होई तेव्हा अशी होई. तसेच या प्रकरणीही झाले. मी ग्रंथ लिहून टपालाने हिंदुस्थानात बाबांकडे धाडला नि छापावे एवढे लिहिले. पण ग्रंथ असा कडक. आरक्षकांची नि अधिकाऱ्यांची आमची चळवळीकडे नि विशेषतः बाबांकडे आधीच वक्रदृष्टी झालेली. छापणावळ देण्यास सुद्धा जवळ दिडकी नाही. जो तो मोडा घाली. आम्हा सर्वांचे शेवटचे आधार असलेल्या लोकमान्य टिळकांकडेही जाऊन बाबांनी ग्रंथ दाखविला. थोरपणे त्यांनीहि त्यात लक्ष घातले. आणि 'असा ग्रंथ छापणे धोक्याचे आहे हे समजून काय करायचे ते करा' असा यथातथ्य समादेश (सल्ला)दिला. शेवटी धोका पत्करायचा असे निश्चयून महाराष्ट्रातील काही एकनिष्ठ सहकार्यांच्या पाठिंव्याबर बळावर बाबांनी ग्रंथ छापण्याची सारी सिद्धता केली. छापखाने सुद्धा छापण्याचे धाडस करीनात. पण पुण्याच्या सुप्रसिद्ध 'जगद्हितेच्छु' मुद्रणालयात असणाऱ्या काही अभिनव भारतीय सदस्यांच्या अंतस्थ खटपटीमुळे त्या मुद्रणालयाचे तो भार अंगावर घेतला. त्याप्रमाणे ते हस्तलिखीत १७ डिसेंबर सन १९०६ च्या दिनांकाला 'जगद्हितेच्छुत' छापावयास दिले. ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर शासनाची (सरासरी) टाच येण्याचे आधीच तडकाफडकी शक्य ती विक्री करून टाकावी या हेतूने बाबारावांनी त्या ग्रंथाची आगाऊ विज्ञापने वृत्तपत्रात दिली. सावरकरांनी लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध होणार एवढे कळताच पैसे पाठवून मागणी नोंदणाऱ्या आगाऊ ग्राहकांची रिघ लागली. 'अभिनव भारत' नावाची कोणतीही क्रांतिकारक गुप्त संस्था अस्तित्वात नसून ते एक उघड निर्बंधान्वये पुस्तके प्रसिद्धिणाऱ्या प्रकाशन संस्थेचे काय ते नाव आहे असा भास उत्पन्न करण्यासाठी 'लघु अभिनव भारत माला' नावाची पुस्तकमाला आधीच काढली होती आणि तीत माझा 'सिंहगडचा पोवाडा' नि 'बाजी देशपांड्यांचा पोवाडा', गोविंद कवीकृत 'अफझलखान वधाचा पोवाडा' आणि मेळ्याची पदे इत्यादी लहान पुस्तिका छापण्याचा क्रम आधीपासूनच चाललेला होता. आता त्या प्रकाशन संस्थेची मोठमोठे ग्रंथ प्रकाशणारी दुसरी शाखा 'थोरली अभिनव भारत माला' म्हणून काढली. नि तिचे पहीले पुष्प् म्हणून

हे माझे पुस्तक 'जोसेफ माझिनी आत्मवृत्त व राजकारण' असे नाव देऊन प्रसिद्धले. उण्यापुऱ्या ३०० पृष्ठांच्या त्या ग्रंथाचे मूल्य १।।(दीड रूपया)ठेवले. तो ग्रंथ केसरीकर 'लोकमान्य' टिळक नि काळकर्ते 'लोकमान्य' परांजपे ह्यांना अर्पिला होता.

**राजमान्य की लोकमान्य**

या वरील अर्पणपत्रिकेतील "लोकमान्य" शब्दाविषयीची माझी एक आठवण आहे. आठवण ठेवण्यासारखी व्यक्तिविशेषाना सन्मानपूर्वक उल्लेखिण्याची आपली महाराष्ट्रातील रूढ पद्धत म्हणजे व्यक्तींच्या नावामागे राजमान्य राजश्री ही उपपदे लावून मग त्या व्यक्तीचे नाव लिहिण्याची वा उच्चारण्याची. ह्या रूढीपद्धतीला उद्देशून शिवरामपंत परांजप्यांनी त्यांच्या काळमध्यें 'राजमान्य की लोकमान्य'अशा काहीशा मथळ्याचा एक चटकदार लेख लिहिला होता. लोकांच्या मनात राजकीय पारतंत्राची चीड उत्पन्न करण्यासाठी परांजपे कोणते निमित्त कुठून शोधून काढतील याची काही अटकळ कशी बांधता येत नसे त्याचे हा लेख एक उदाहरण होते. या लेखातील आशय आठवतो तो माझ्या आजच्या भाषेत सांगायचा म्हणजे असा होता की जेव्हा आपण स्वतंत्र होतो, आपले राज्य होते, आपला स्वकीय राजा होता तेव्हा कोणा व्यक्तीला 'राजमान्य' किंवा 'राजश्री' हे उपपद लावणे गौरवास्पद होते. पण आज ते स्वराज्य कुठे आहे? आज आपण सर्वजण आहोत परकीय राज्याचे दासानुदास! परक्यांचे दास झालेल्यांनी एकमेकांना 'राजमान्य' नि 'राजश्री' म्हणणे नि म्हणवून घेणे म्हणजे अन्योन्यांची विटंबना करणे आहे! आता आपण सर्व भारतीयांनी 'राजमान्य राजश्री' हे उपपद न लावता परस्परांनी 'देशबंधु' ह्या उपपदाने परस्परांना संबोधावे. त्यातही, जे आमच्या परकीय राज्याच्या डोळ्यांत खुपणारे आमचे लोकाग्रणी आहेत त्यांनाही, राजमान्य म्हणणे म्हणजे तर त्यांचा उपमर्द करण्यासारखे आहे. आपले लोकाग्रणी टिळक यांचेच उदाहरण घ्या. आज परराज्यात टिळकांना राजमान्य म्हणणे म्हणजे त्यांचे टिळकपणच छिनावून घेण्यासारखे आहे. यास्तव आपण यापुढे टिळकांसारख्या लोकाग्रणींना लोकमान्य टिळक असेच संबोधले पाहिजे.

काळकर्तीची हि सूचना इतकी लोकप्रिय झाली की विशेषतः त्या वेळच्या तरूण पिढिने पत्रव्यवहारातून, भाषणातून व लेखातून "रा. रा." (राजमान्य राजश्री) अमुक असे लिहिण्याचे जे सोडून दिले ते दिलेच. तेथुन पुढे तीसएक वर्षे तरी देशबंधु अमुक लिहिण्याची नि बोलण्याची पद्धत पडली होती जसे आता बहुधा श्रीयुत किंवा श्री हे उपपद लिहीले जाते. टिळकांना तर तेव्हापासून केवळ महाराष्ट्रच नव्हे तर हळूहळू सारे भारतखंडही 'लोकमान्य' या महनीय उपपदानेच संबोधू लागले-नव्हे, ते त्यांचे नित्याचे उपनावच पडले.

**माझिनीचे पुस्तक दोघांनाही का अर्पिले?**

माझे पुस्तक 'काळ' कर्त्यांना तर अर्पिण्याचे माझे मनात होतेच कारण त्यांनी 'काळ' मध्ये लिहिलेल्या 'तरूण इटली' या निबंधामुळेच माझ्या मनात माझिनीविषयीची विशेष जिज्ञासा जागविली होती. दुसरे असे की लोकांमध्ये आमच्या क्रांतिकारक पक्षाचे स्फूर्तिदाते म्हणून पराजप्यांचा यथार्थ लौकिक झालेला होता. त्यामुळे त्यांची प्रतिष्ठा जनतेत जितकी वाढेल तितकी आमच्या पक्षाची प्रतिष्ठाही वाढणारी होती. आमच्या पक्षास टिळकांविषयी जसा निरतिशय आदर वाटे तसे परांजप्यांविषयी उत्कट ममत्व वाटे. यासाठी आम्ही दोघांसही लोकमान्य हे उपपद लावीत असू. एकंदरीत काळातून येणाऱ्या क्रांतिकारक लेखांचे आणि ते आम्हास व्यक्तिशः जे महत्वपूर्वक उत्तेजन देत त्याचे उतरायी होण्यासाठी माझे माझिनीचे पुस्तक परांजपे यांना तर अर्पिणारच होतो.

याविषयी त्यांची संमतीही मिळाली होती. परंतु आद्य मान टिळकांचा, ही आमची भावना. यास्तव हे दोघांसही अर्पावे असे वाटले. तथापि बाबारावांनी जेव्हा ते पुस्तक टिळकांना दाखविले तेव्हा ते पुस्तक छापणे धोक्याचे आहे असे त्यांनी सांगितले. हे कळताच मनात शंका आली की टिळकांना आम्ही बळेबळे असे धोक्याचे पुस्तक अर्पिणे आवडेल का? त्यांना त्यांच्या महनीय कार्यात सशस्त्र क्रांतिकारकांचा उघड उघड उदोउदो करणाऱ्या अशा पुस्तकाचा संपर्क झाल्यास नसता अडथळा उत्पन्न होईल. बरे, टिळकांना न अर्पिता एकट्या परांजप्यांनाच अर्पावे तर 'सशस्त्र क्रांतिकारक पक्ष टिळकांविषयी फारशी पूज्यबुद्धी बाळगीत नाही' अशा कंड्या उठविणाऱ्या रिकामटेकड्या लोकांना विपर्यास करण्याची आणखी एक संधी दिल्यासारखे होईल. अशा पेचात असता बाबारावांनी मला कळविले की अर्पणाविषयी त्यांनी टिळकांनाच विचारले. तेव्हा ते म्हणाले 'तुम्हांला हवे तर करा तसे. माझी ना नाही.' हे कळताच हा प्रश्न मला हवा तसा सुटला. टिळकांना प्रथम उल्लेखून 'केसरीकर्ते लोकमान्य टिळक व काळकर्ते लोकमान्य परांजपे यांसी समर्पण' अशी अर्पणपत्रिका मी लिहिली.

डिसेंबर १९०६ मध्ये छापापयास टाकलेले हे पुस्तक जून १९०७ मध्ये छापून प्रसिद्ध झाले. लोकांमध्ये ते वाचण्याची इतकी उत्कांठा होती की ती दोन सहस्र (२०००) प्रतिंची प्रथमावृत्ती जुलैचे आत एक महिन्यातच संपून गेली. तरी मागणी चालूच होती. अनेकांनी पुढच्या दुसऱ्या आवृत्तीसाठीही मागणी राखून ठेवा म्हणून कळविले. त्यावेळेच्या मराठी पुस्तकाच्या खपाचे प्रमाण पहाता झटपट विक्रीचा त्या पुस्तकाने खरोखरीचा उच्चांक गाठला. विदर्भासुद्धा साऱ्या महाराष्ट्रातून बहुतेक वृत्तपत्रांनी पुस्तकावर विस्तृत अभिप्राय दिले. 'विहारी' प्रभृती राष्ट्रीय पक्षाच्या वृत्तपत्रांनी त्यावर अग्रलेख लिहिले. 'केसरी' नेही अग्रलेखच लिहिला. त्या पुस्तकाचे जनतेने ज्या स्फूर्तीने नि ममतेने हे उत्कट स्वागत केले तिचा प्रतिनिधिक उच्चारच काळातील अग्रलेखात व्यक्तविला गेला होता. यास्तव त्या काळातील अभिप्रायाच्या विस्तृत लेखामधील एक आंशिक उतारा खाली देत आहे.

" देशभक्त सावरकर यांची माहिती महाराष्ट्र वाचकांना पूर्वीच झालेली आहे. त्यांची नैसर्गिक तरतरी, त्यांची उज्ज्वल देशभक्ती, त्यांचे मुद्देसुद लेख आणि त्यांची वक्तृत्वपूर्ण भाषाशैली यांच्या योगाने ते महाराष्ट्रातील पुष्कळ लोकांच्या पूर्वीपासूनच परिचयाचे झालेले आहेत. मुंबईच्या विश्वविद्यालयातून बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर ते पुढील कायद्याच्या अभ्यास करून बॅरिस्टरची परीक्षा देण्याकरीता अलीकडे एक वर्ष दीड वर्ष विलायतेस जाऊन राहीले आहेत. . .

"दे. सावरकर हे जरी विलायतेस गेले आहेत तरी ते स्वदेशाला, स्वदेश बंधूंना आणि स्वभाषेला क्षणभरही विसरलेले नाहीत, हे त्यांच्या प्रस्तुतच्या कृतीवरून स्पष्ट होत आहे आणि असेच लोक सदोदित परदेशात जावयाला पाहिजे आहेत. परदेशातील भव्य इमारती, प्रचंड कारखाने आणि अगणित संपत्ती पाहून दिपून न जाता आपला गुलामगिरीत सापडलेला देश, या देशासारखा कसा होईल असा नित्यध्यास ज्या अंतःकरणामध्ये चाललेला असेल तीच अंतःकरणे परदेशात गेली तर त्यापासून स्वदेशाचा फायदा आहे. असली अंतःकरणे झाडांच्या मुळाप्रमाणे परदेशातील स्वातंत्र्यपोषक रस आकर्षून घेऊन त्या योगाने अतितापाने आपल्या देशातील करपत चाललेल्या झाडांना फिरून पालवी आणतात. परदेशात गेलेली स्वदेशभक्ती ही कधीही निष्फळ जात नाही.

“ दे. सावरकर यांनी इंग्रजी भाषेच्या जन्मभूमीच्या जागी जाऊन तेथे आपल्या जन्मभूमीची स्वभाषा जी मराठी त्या भाषेमध्ये ग्रंथ लिहून तो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. . . . लंडनमध्ये बसून खऱ्या स्वदेशोन्नतीच्या मार्गासंबंधाने मराठीमध्ये लिहिलेला हाच बहुधा पहीला ग्रंथ होय. . . .

“ माझिनीसारख्या स्वतंत्रतादेवीच्या निःसीम भक्तीचे स्वदेशाला स्वतंत्र करून सोडणारे स्वातंत्र्यभक्ति प्रचुर लेख, त्यांचे इंग्लंडसारख्या स्वतंत्र हवेमध्ये स्वदेशाभिमानी सावरकर यांनी केलेले भाषांतर, आणि ते वाचण्याकरीता उत्सुक झालेले हिंदुस्थानातील परतंत्र लोक हा त्रिवेणी संगम जमल्यानंतर त्याचे पाणी हिंदुस्थाना तील लोकांना सर्व क्लेशांपासून विमुक्त केल्यावाचून कधीही राहणार नाही. . . .

“ हे माझिनीचे लेख म्हणजे स्वतंत्रतेच्या अमृताचे झरे आहेत. या स्वतंत्रतेच्या वेदमंत्रामध्ये विलक्षण सामर्थ आहे. या मंत्राचे पुरश्चरण करून जर कोणी जुलमाच्या सापावर याचा प्रयोग चालवील तर त्या सापाचे विष ताबडतोब उतरेल. . . असल्या अद्भूत सामर्थ्याचे माझिनीचे जे महामंत्र ते दे. सावरकर यांनी आपल्या महाराष्ट्र देशभाषेत आणून त्यांना सर्व लोकांस परिचय करून दिला याबद्दल त्यांचे जितके आभार मानावेत तितके आभार मानावेत तितके थोडे आहेत. ज्याला वाचता येते त्यांनी असली पुस्तके वाचल्याशिवाय कधीही राहू नये. आणि ज्यांना वाचता येत नसेल पण कान आहेत त्यांनी असली पुस्तके ऐकल्यावाचून कधीही राहू नये. भगवद्‍गीतेचे श्रवण, मनन आणि निदिध्यास जसा आपल्या प्रत्येक भक्ताला जीवनमुक्तच करून सोडील. तसे अलौकीक सामर्थ यांत आहे.”

या पुस्तकाच्या माझ्या प्रस्तावनेतील काही उत्तरे इथे देत आहे. अशासाठी की ती प्रस्तावना नैर्बधिक कैचीत सहसा सापडू नये म्हणून माझिनीच्या सशस्त्र क्रांतिमार्गाना हिंदुस्थानने अनुसरावे असे स्पष्टपणे न लिहिताहि अपरिहार्यपणे सूचित करणारी तिची कुशल रचना कशी होती याचा आणि त्यावेळची माझी भाषा नि मनोवृत्ती यांचा त्याचवेळी लिहिलेल्या लेखांच्या या उताऱ्यांवरून जसा अचूक बोध होईल तसा केवळ आजच्या भाषेत सांगितलेल्या आठवणीवरून होणार नाही. प्रस्तावनेतील ते उतारे असेः

“. . . . . माझिनी विचारतो,’अहो धर्माधिकारी हो तुमचाही जन्म या भूमीतच झाला नाही का? हिच्याच दुधावर असता वाढला नाही का? मग ती जुलुमाखाली चिरडत असता तुम्ही स्वस्थ बसून स्वर्गात कसे चढाल! धर्म हा आता तुमच्या छावणीत नसून तो आमच्या छावणीत आलेला आहे. धर्माचा खरा जयजयकार व्हावा अशी जर तुमची इच्छा असेत तर तुम्ही आम्हांस मिळा. राजकारणाला धर्म आहे, धर्माला राजकारण आहे हे परमेश्वरी सत्य ओळखून जर माझ्या प्रिय देशभूमीचे दोन कोटी लोक आता स्वातंत्र्य मिळवायचेच असे म्हणून उठले तर त्यांना एक आस्ट्रिया तर काय पण असे तीन आस्ट्रिया एकत्र झाले तरी त्यांचा उच्छेद करून आपले स्वातंत्र्य परत मिळविता येईल.’ दोन कोटी देशबंधूंवरच माझिनीची ही केवढी उडी! मग जर त्यांच्या देशाची लोकसंख्या याहून दहापाच पट असती व त्याचा शत्रू जर आस्ट्रियाएवढाच असता तर त्याने स्वदेश-स्वातंत्र्य मिळवावयास एक क्षणही लागू दिला नसता! मर्दाची गोष्ट अशीच आहे.

“ माझिनी म्हणतो ‘इटलीचे स्वामित्व आस्ट्रियाकडे गेलेले आहे. पंचाहत्तर हजार आस्ट्रियन शिपाई इटलीवर राज्य करीत आहेत. इटली हा गुलामांचा बाजार आहे. येथे जी काही थोडीबहुत नेटिव्ह संस्थाने होती ती आस्ट्रियाच्या ताटाखाली मांजरे बनली आहेत. इटली हा एक भला मोठा तुरूंग बनला आहे. आणि त्यावर

आस्ट्रियन शिपायांना पहारा बसलेला आहे. इटलीचे नाव पुसून गेले आहे. इटलीचे निशाण फाटून गेले आहे. (अशा स्थितीत) तुम्हाला भिक्षा मागून स्वातंत्र्य मिळेल अशी आशा आहे का? आस्ट्रियाने जे आपणांस जिंकले आहे ते आपल्या अर्जाच्या चिठोऱ्याने आपणांस मुक्त करण्याकरीता नव्हे. (परदास्यातील) राष्ट्राच्या इतिहासात बहुशः आढळून येणारे हे भिक्षांदेहीचे व्यसन इटलीस लागले होते पण ते ताबडतोब सुटले. शंभर शंभर वर्षे परक्यांच्या दारी लाथा खात बसत असता व हजारो वेळा विश्वासभंग झाला असताही पुन्हा एकदा कटोरा घेऊन भिक्षा मागण्याइतका इटली देश राजनिष्ठ झालेला नव्हता. त्याचवेळेस पोलंड, स्पेन वगैरे देशांत राज्यक्रांतीची लाट उसळली होती. तीमुळेच इटलीतील लोकांत आत्मनिष्ठ उत्पन्न झाली. परंतु अशा भयंकर राज्यक्रांत्या (स्वातंत्रास्तव) आजूबाजूस चालत असताही त्यांच्याकडे पाहून ज्यांना आपल्या गुलामगिरीची नि भिक्षांदेहाची शरम वाटत नाही असे देश या भूमीवर काय थोडे आहेत! पण इटली इतकी मंदट नव्हती. . . . . नंतर इटलीमध्ये स्वदेश चळवळ सुरू झाली. आस्ट्रियाच्या तंबाखूवर विद्यार्थ्यांनी कडक बहिष्कार टाकला. रस्त्यारस्त्यांतून नाकेबंदी केली व कोणी आस्ट्रियाची बिडी ओढताना पाहिला की त्याला हाणमार करण्याचा सपाटा चालला. या स्वदेशी चळवळीला लवकरच पूर्ण राजकीय स्वरूप प्राप्त झाले. अमेरिकेतही स्वातंत्र्ययुद्धाचे आधी अशी स्वदेशीची चळवळ उत्पन्न झाली होती. इतिहासाची पुनरावृत्ती होते ती अशी. इतिहासात स्वदेश चळवळीचे पर्यवसान राज्यक्रांतीत नि स्वातंत्र्यप्राप्तित झाल्याची ही उदाहरणे काही आकस्मित रीतीने घडून आलेली नाहीत. ते काही अपघात नाहीत. त्यांच्या विलक्षण साम्याचे विवरण करता येणे शक्य आहे. स्वदेश चळवळ म्हणजे दुसऱ्याचे लुटारूपणास आळा घालून आपल्या हक्काचा बचाव करणे. आपले हक्क काय आहेत हे सामान्य लोकांस एकदम कळत नाही. त्यांच्या ग्राहक शक्तीला प्रथमतः इतकेच कळते की परक्यांच्या व्यापाराने आपण बुडत आहोत. म्हणून ते त्या परकीय व्यापारावर बहिष्कार घालण्यास तयार होत. अर्थातच उपाय योजीत. हा जुलूम सुरू झाला की सामान्य लोकांना हे कळू लागते की निर्जीव परदेशी कापडावर, तंबाखुवर किंवा चहावर बहिष्कार घालून काही उपयोग नाही. ह्या निर्जीव वस्तू! खरा राग या निर्जीव वस्तुंना ज्या सजीव वस्तूंचा आधार आहे त्यांच्यावरच उगविला पाहिजे. तंबाखूलाच नव्हे तर या आस्ट्रियन लोकांनाच आणि चहालाच नव्हे तर या इंग्रज लोकांनाच आपल्या देशातून हुसकून दिले पाहिजे. (अशा प्रकारे) 'भिक्षा मागून काही प्राप्ती होणार नाही व शेवटी शक्तिदेवीचीच उपासना करावी लागणार हे जरी सामान्य लोकांस अंधुकपणे वाटू लागले तरी राष्ट्राला सशस्त्र कसे करावे हे मात्र त्यांस सांगता येत नाही. माझिनी म्हणतो 'तशा स्थितीत गुप्त मंडळ्यांशिवाय परवशतून सुटण्याचा दुसरा उपाय नाही. जेथे सत्य प्रतिपादनाची (कोणत्याही) अधम सत्तेने बंदी केलेली नाही तेथे गुप्त मंडळ्या व गुप्त कट हा गुन्हा होईल. परंतु जेथे सत्य प्रतिपादनाची अधमांच्या जुलुमाने बंदी झालेली आहे तेथे गुप्त मंडळ्या ह्या पवित्रतम आहेत. नव्हे, नव्हे, सत्य प्रतिपादनाचा तो एकच मार्ग आहे. जेव्हा स्वदेश हा परक्यांनी एक भला मोठा तुरूंग बनविलेला असतो तेव्हा स्वातंत्राचे पवित्र वातावरणांत श्वासोंच्छवास करण्याचा इश्वरी हक्क शाबीत करण्यासाठी आम्हा कैद्यांना गुप्त कट हा एकच मार्ग आहे. आम्ही गुप्त मंडळ्या स्थापू, गुप्त कट करू. वेळ येताच त्या तुरूंगाच्या खिडक्या उखडून टाकू. त्यांच्या दरवाजांना लाथेसरशी फोडून टाकू. व त्या तुरूंगवाल्यांच्या छातीवर नाचत नाचत आम्ही मोकळ्या हवेत येऊ-आम्ही स्वतंत्र होऊ!' या गुप्त मंडळ्यांचा आधार युरोपातल्या बहुतेक स्वातंत्रोन्मुख राष्ट्रांनी घेतलेला आहे. गुप्त मंडळ्यांच्या योगाने स्वातंत्राचे शिक्षण फार सोप्या रीतीने देता

येते. वर्तमानपत्रातून उघड लिहून किंवा सार्वजनिक भाषेत करून ते अशक्य असते. व (लक्षणिक रीतीने लिहिले तरी) तरूण लोक व सामान्य वर्ग यांची ग्राहक शक्ती सूक्ष नसल्याने त्यांना वर्तमानपत्र किंवा सार्वजनिक भाषेत यांच्यातील तो लक्षणिक नि लपलेला अर्थ ग्रहण करता येत नाही. परंतु गुप्त सभा भरवून त्यात स्वातंत्राचे शिक्षण स्पष्टपणे देता येते. पुन्हा स्वातंत्र्य मिळवा इतकेच म्हणून स्वस्थ बसावयाचे नसते. तर त्या स्वातंत्र्य युद्धाची तयारी करणेही अशक्य असते. हे काम उघडरीतीने करणे अगदी अशक्य. ते गुप्त कटांनीच करावे लागते. ह्यास्तव माझिनीने तरूण इटली ही गुप्त संस्था स्थापना केली. . . . तरूण इटली दुहेरी कार्यक्रमाची योजना करीत आहे. लोकशिक्षण व युद्धशिक्षण, दास्यमुक्तता, राष्ट्रैक्य, समता व लोकसत्ताया तत्वाचतुष्ट्याचे शिक्षण तरूण इटलीतच दिले जाईल. स्वातंत्र्य मिळवायचे तर लढाईशिवाय ते मिळणार नाही. एखाद्या सत्याचा जयजयकार करावयाचा असतो किंवा एखाद्या असत्याचा विनाश करावयाचा असतो तेव्हा लढाई पवित्र असते. पण इटलीमध्ये ही लढाई करणे कठीण झाले होते. त्यांचेपाशी युद्धोपयोगी हत्यारे नव्हती किंवा ती बाळगण्याची परवानगी नव्हती. अशा स्थितीत इटलीशिवाय दुसरे एखादे राष्ट्र सापडले असते तर ते गर्भगळीत होते. लढाईचे नाव काढण्यासही भिऊ लागले असते. परंतू इटली असल्या संकटांना भीक घालणारे नव्हते. तिच्यातील शूर तरूण लोक हे स्पेन, अमेरिका, जर्मन व पोलंड वगैरे देशांत गेले व तिथे युद्ध कलेचे ज्ञान शिकले. ग्यारिबाल्डी, व्हिसीओटी वगैरे 'तरूण इटली' चे सभासद अशाच रितीने युद्धे प्रत्यक्षपणे लढविण्यात पटाईत झाले, सेनानी झाले. गुप्त मंडळ्यांनी इतर देशांत हत्यारे खरेदी करून ती मालाच्या जहाजातून लपवून धाडावी. पुष्कळ वेळा हे उघडकीस येई. उदाहरणार्थ एकदा माझिनीच्या फ्रेंच मित्राने शस्त्रे भरून जहाज हाकारले. परंतु ते इटलीला किनाऱ्याला लागायचे आधीच समुद्रात पकडले गेले. ते जहाज जप्त करून त्यावरची सर्व शस्त्रास्त्रे नि माल हिसकावण्यात आला. परंतू स्वातंत्र्य युद्धासारख्या महतकार्यात संकटे ही यावयाचीच. त्यांना भिऊन भ्याड लोक गुलामगिरीत तसेच फसतात व त्या संकटाशी टकरा देऊन मर्द लोक हे स्वातंत्र्य मिळवतात. . . या सर्व युक्त्यांहून त्या काळच्या इटलीय देशभक्तांनी मुख्य उपाय जो योजला तो सैन्य वळविण्याचा होय. परकीय सरकारला तद्देशीय सैन्य ठेवल्यावाचून कोणाच्याही देशावर राज्य करणे शक्य नसते. अशा स्थितीत लष्करी शिपायांना जर स्वदेशाकडे वळविता आले तर त्याचा दुहेरी उपयोग होतो. एकतर परक्यांचा विश्वास उडून जातो व आयत्यावेळी ते घाबरे होतात व दुसरे असे की राष्ट्रपक्षास आयते शिकलेले व सशस्त्र लोक मिळू शकतात. . . ही तयारी साधारण झाली म्हणजे युद्ध जे करावयाचे ते मोठमोठ्या लढाया देण्याचे नसून गनिमी काव्यानेच होय. ' परक्यांचे जोखड झुगारून देण्याची ज्यांची ज्यांची इच्छा असेल त्या त्या दलित राष्ट्रांना गनिमी काव्याच्या युद्धकलेचे विशेषसे ज्ञान लागत नसल्याने निश्चयी व करारी अशा देशभक्तांच्या मनात येताच त्याला आरंभ करता येतो. जसजसे युद्ध जुंपत जाते तसतसे त्या देशभक्तींना लढाईचा अनुभव मिळू लागतो. गनिमी काव्याने जंगी पराभवाचे भय नसते. गनिमी टोळ्या सुटसुटीत असल्याने त्या वाऱ्यासारख्या चहूकडून हिंडू लागतात. . . . 'इटलीत (गुप्त संस्थांच्या उठावण्यामुळे) सन १८३१ पासून ते १८७० पर्यंत दरसाल कोठे ना कोठे तरी एक बंड होतच असे. अशा कृतनिश्चयाने इटली अनंत अपजय आले तरी ती लढली. (माझिनी म्हणतो)'प्रत्येक अपजय ही जयाची एक पायरी आहे. १८२० साली पराजय झाला, १८३१ साली पराजय झाला, १८४८ साली पराजय झाला तथापि फिरून प्रयत्न करा. . . . रोममध्ये १८४८ साली (इटालियन क्रांतिकारकांनी) फ्रेंच लोकांशी लढाई चालली असता, ग्यारिबाल्डी सैन्यात उडी टाकून बेहोष लढत

होता. इतक्यात त्यास सिनेटचे (क्रांतिकारक राज्य मंडळाचे) बोलावणे आल्यामुळे तो तिकडे गेला. त्याला पाहताच सिनेटने टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. ग्यारिबाल्डीला प्रथम त्या जयनादाचे कारण कळेना. इतक्यात त्याने स्वतःकडे पाहिले. तो रक्ताच्या धारा नसानसातून गळत आहेत, शस्त्रांनी व निसटत्या लागलेल्या गोळयांनी कपडयांची जाळी झाली आहेत व हातातील तलवार वार करता करता इतकी वाकली आहे की म्यानात ती अर्धीसुद्धा शिरत नाही! अशा त्या तलवारीला अनंत प्रणाम असोत! जोपर्यंत अशी एकतरी तलवार जगात कायम आहे तोपर्यंत परतंत्र देशांनी स्वतंत्र होण्याची आशा धरण्यास हरकत नाही. (शेवटी फ्रान्स,आस्ट्रिाया आणि जर्मनी या तीन राष्ट्रांमध्ये जेव्हा युद्धे जुंपली तेव्हा आस्ट्रिया आणि फ्रान्स हे इटलीचे दोन्ही शत्रू या स्वतःवरच बेतलेल्या संकटात गुंतलेले असता)१८५९व्या वर्षी इटलीमध्ये राज्यक्रांतीची पुन्हा लाट उसळली आणि निम्मी इटली स्वतंत्र झाली. १८६६ साली व्हेनिस स्वतंत्र झाले,१८७०साली रोम स्वतंत्र झाले आणि रोममध्ये माझिनी प्रवेश करता झाला. . . साव्होनाचे तुरूंगात कोंडून ठेवलेला १८३१सालचा तरूण माझिनी व १८७१साली स्वतंत्र इटलीच्या, एकराष्ट्रीय इटलीच्या या स्वतंत्र राजधानीत रोममध्ये --प्रवेश करणारा माझिनी कोणी इटलीचा चित्रकार ही दोन चित्रे रंगवील काय?(एका वर्षाचे आतच माझिनीच्या देहांत झाला. जिनोवामध्ये माझिनीच्या देहाचा उत्तरविधी चालला असताना हजारो इटालीयन लोक आपल्या देशपित्यांच्या दर्शनासाठी दाटी करू लागले. शेवटचे दर्शन होताच अर्भकासारखे रडू लागले !!) परमेश्वराघरी प्रत्येक देशाकरिता एकेक माझिनी ठेवला असेल तर कोणालाच इटलीचा हेवा करण्याचे कारण नाही!

माझिनीच्या चरित्राला मी जोडलेल्या ह्या प्रस्तावनेतील वरील काही उतारे घेतले आहेत. आता माझिनीच्या लेखाच्या भाषांतरातील दोन उतारे त्याच पुस्तकातून वानगीसाठी खाली देत आहे.

तरूणहो, स्वदेशभूमीवर प्रेम करा! जेथे तुमचे पूर्वज स्वर्गीय निद्रा घेत आले ती भूमी म्हणजे तुमची स्वदेशभूमी होय! ज्या भाषेमध्ये तुमच्या प्रेमाची मूर्ती तुमच्याशी पहिले प्रेम -शब्द उच्चारली झाली ती भाषा जेथे बोलली जाते ती तुमचे स्वदेशभूमी होय! स्वदेश हे परमेश्वराने तुम्हाला दिलेले गृह होय! स्वदेश हा तुमचा अभिमान हे तुमचे वैभव , हे तुमचे चिन्ह आहे. त्या स्वदेशाला तुमचे विचार ,तुमचे रक्त अर्पण करा! त्या स्वदेशाला आपल्या पूर्वजांच्या भविष्याप्रमाणे भव्यतेला व सुंदरतेला न्या! आपण त्याला कोणाचाही काळिमा न लावता जगातून जात आहो असे म्हणता येईल अशा रीतीची काळजी घ्या!! तुम्ही अशा रीतीची काळजी घ्या की तुम्ही जाण्याच्या आधी स्वदेश स्वतंत्र होईल. तो स्वदेश एक (एकात्म) असला पाहिजे. त्याचे तुकडे पाडता कामा नयेत. परमेश्वराच्या उंगलीने तुमच्या राष्ट्राच्या मर्यादा आखल्या आहेत. परमेश्वराने आल्पसचा व समुद्राचा तुमच्याभोवती पहारा ठेवला आहे (पण त्याच्या ज्या आकाशाला)आज गुलामगिरीचा डाग पडला आहे त्या आकाशाखाली रहावयास तुमच्या अडीच कोट लोकांतील एकही मनुष्य नसला पाहिजे! तरी चला. . . . आधी स्वदेशाची मुक्ता करा! चला,आधी गुलामगीरीचा उच्छेद करू! इतर शब्द न उच्चरून रण घोषांचीच गर्जना करू.

मनुष्य जातीवर प्रेम करा! स्वदेश हा तुमचा पाळणा आहे व मनुष्य जाती ही तुमची माता आहे. . . . इतर राष्ट्रे गुलामगिरीतून सुटण्यासाठी धडपडत आहेत! त्यांनाही तुम्ही शक्य तेव्हा मदत करा. भूतदया ठेवा. तरूणांनो ध्येयावर अत्यंत प्रेम करून त्याला पूज्य माना! ध्येयासाठी स्वार्थत्याग करा, दुःखाला कंटाळू नका. संकटांना त्रासू नका. आयुष्य हे सुख नाहि तर आयुष्य हे कर्तव्य आहे!

एकदा मनुष्याने असा निश्चय केला की मी स्वातंत्र्य, स्वदेश व मानव्य (Humanity) यावर भक्ती करतो की मग त्याने स्वातंत्रासाठी, स्वदेशासाठी, मानव्यासाठी लढलेच पाहिजे, सर्व आयुष्यभर लढले पाहिजे. शक्य त्या त्या शस्त्रांनी लढले पाहिजे. द्वेषाला व निंदेला तोंड दिले पाहिजे. (लोकांनी केलेल्या) तिरस्कारापासून तो मरणापर्यंत सर्व संकटे तुच्छ मानली पाहिजेत. दुसऱ्या कोणच्याही फलाची आकांक्षा न करिता फक्त कर्तव्य म्हणून त्याचे तत्पर राहिले पाहिजे!

( माझिनीच्या राजकीय राज्यघटनाविषय कार्यक्रम) आमच्या अंतःकरणाची पहिली इच्छा आमच्या आयुष्याचे पहिले कर्तव्य दास्यमुक्तता हे होय. (आस्ट्रिया नि फ्रान्स) ह्या परक्यांचे हातून इटली पूर्ण स्वतंत्र करण्यासाठी आमचा पहिला प्रयत्न होईल. नंतर मग दुसरा हेतू राष्ट्रैक्य हा होय. (परकीय नि अनेक संस्थाने यामुळे ) आमच्या राष्ट्राचे आज शतको शतको पडलेले तुकडे संजीवनाने एकत्र केल्याशिवाय इटली एक राष्ट्र झाल्याशिवाय (खंडित स्वातंत्र्य मिळविले तरी) ते स्वातंत्र्य कधीही टिकणार नाही. अशा रीतीने देश स्वतंत्र नि अखंड होताच आमचे तिसरे लक्ष्य म्हणले लोकसत्ता हे होय. जर कोणी इटालीयन संस्थानिक राजा स्वातंत्राची व राष्ट्रैक्याची हमी घेत असेल तर आनंदाने माझी निष्ठा म्हणून नव्हे - कारण तसे होणे अशक्य आहे,. . . लोकसत्तेसाठी चाललेले माझे प्रयत्न तहकूब करीन, केले आहेत. हे मी प्रसिद्धपणे सर्वांना कळविले होतेच. इतकेच नव्हे तर आस्ट्रियाच्या नाशार्थ (लोकसत्ताक नि राजसत्ताक अशा सर्व इटालियन क्रांतिकारकांनी)एक व्हावे."

मझिनीच्या लेखापैकी बहुतेक लेखांचा संक्षिप्त भागच मी मराठी वाचकांकरिता उपयोगी पडेल तेवढा भाषांतरलेला होता. माझ्या तीनशे पानांच्या लहानशा ग्रंथात माझिनीच्या लेखांचे सहा विस्तृत भाग मावणेही अशक्य होते. तथापि त्यांच्या आत्मचरित्रातील एक प्रकरण मात्र मी सविस्तर भाषांतरिले आहे. त्या प्रकरणात सेव्हाय प्रांतातील इटालियन क्रांतिकारकांची उठावणी जेव्हा फसली, जेव्हा तरूण इटली या गुप्त संस्थेचा बहुतेक गुप्त संस्थाचा केव्हा तरी होतो तसा - भयंकर गौप्य स्फोट झाला, बंडात समाविष्ट झालेल्या सैनिकांची नि तरूण इटलीच्या सभासदांची प्रांतभर एकच धरपकड झाली, गुप्त आरक्षकांच्या छळामुळे नि शारीरिक अत्याचारामुळे शतावधी क्रांतिकारकांनी जेव्हा एकमेकांची केवळ दैहिक अवशतेने नावे सांगितली, इतर अनेकांनी तसा विश्वासघात स्वतःचे हातून घडण्याचे आधीच बंदिगृहात आणि बाहेर आत्महत्या करून घेतल्या, शतावधी कुटुंबाच्या घरदारावर नांगर फिरविला गेला, अनेकांना गोळया घालून मारण्यात आले, अनेकांना फाशी देण्यात आले, शतावधी क्रांतिकारक सीमापार होऊन युरोपभर दारोदार अन्नवस्त्रासाठी वणवण फिरू लागले. ह्यांच्यातच स्वतः माझिनी नि ग्यारिबाल्डीही काही काळ होते! त्या भयंकर काळाचे वर्णन माझिनीने त्या प्रकरणात दिले आहे. महाराष्ट्रात माझे हे भाषांतर प्रसिद्ध झालेल्या सन १९०७-१९०८च्या काळात 'अभिनव भारत गुप्त संस्थेच्या शेकडो लहानमोठया शाखा मराठवाडयापासून तो ग्वाल्हेरपर्यंत पसरलेल्या होत्या. देखीदेखी इतरही स्थानिक गटांच्या गुप्तसंस्था निघत होत्या. मी लंडनला जाण्याचे पूर्वीपासूनच ह्या आमच्या क्रांतिकारक सहकाऱ्यांना बजावीत असे की 'आज आपण आपल्या स्वदेशाचे स्वातंत्र्य संपादनाच्या आकर्षक ध्येयाने भारावलेले होऊन ह्या गुप्त संस्थांत प्रवेशीत आहोत. अशा गुप्तसंस्थांची प्रतिज्ञा घेताना उदात्त एक दिव्य उन्माद चढत असतो. परंतु त्या उन्मादातही प्रत्येक क्रांतिकारकाने त्या प्रतिज्ञेचे किती भयंकर परिणाम पुढे भोगावे लागणार आहेत याची स्पष्ट जाणीव जिवंत ठेवली पाहिजे. 'जगातील निरनिराळया इतिहासांतील अशी उदाहरणे देऊन मी त्यांच्या मनावर ही गोष्ट वारंवार

ठसवीत असे. इटलीच्या यशस्वी क्रांतीच्या इतिहासातही अनेक गुप्त संस्थांना आपल्या अशा प्रतिज्ञांसाठी किती भयंकर परिणाम, भयंकर छळ सोसावे लागले त्यांचे माझिनीने केलेल्या वर्णनाचे हे प्रकरण यास्तवच मी संपूर्ण भाषांतर केले. त्यात स्वतः माझिनीसारख्या धीरोदात्त महापुरूषालाही त्या असह्य जाचानी जवळ जवळ वेड लागण्याची पाळी कशी आली तेही त्या प्रकरणात माझिनीने प्रांजळपणे सांगितले आहे. स्वातंत्रार्थ आम्ही क्रांतिकारकांनी ज्या प्रतिज्ञा घेतल्या त्यांना ह्या भयंकर परिणामाची जाणीव प्रथमपासून अशी तीव्रतेने होती म्हणूनच आमच्यावरही जेव्हा तशी संकटे कोसळली तेव्हा अनेक वीरवर असे स्वतःला स्वतःच्या आप्तेष्टांना, सहकाऱ्यांना नि जगाला ठासून सांगू शकले की :-

**की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने ।**
**लब्ध प्रकाश इतिहास -निसर्ग माने ।।**
**जे दिव्य दाहक म्हणूनी असावयाचे।**
**बुद्ध्याची वाण धरिले, करी हे सतीचे।।**

माझ्या त्याच काळात लिहिलेल्या आणि आज उपलब्ध असलेल्या लिखितातील एका कवितेत वरील श्लोक आलेला आहे. मी क्रांतिकारकांना त्यावेळी प्रथमपासून जे बजावीत असे की गुप्तसंस्थेची प्रतिज्ञा घेण्याचे आधीच तिचे भीषण परिणाम जाणून घेऊन ते भोगण्याची मनाची सिद्धता करा नि तसे धारिष्ट्य असेल तरच प्रतिज्ञा घ्या. नाहीतर सशस्त्र क्रांतिमार्ग सोडून ‘नेमस्त’, किंवा ‘राष्ट्रीय’ पक्षाच्या सापेक्षतः सौम्य नि सुरक्षित असणाऱ्या मार्गाने जाऊन जी काय देशसेवा करिता येईल ती करा. कारण प्राथमिक असली तरी तीही प्रामाणीक देशसेवाच आहे. ती माझी आठवण यथातथ्य आहे याचा वरील त्यावेळचा श्लोक हा एक प्रलेखीय पुरावाच (Documentary evidence) आहे.

हे पुस्तक म्हणजे काही एखादी कादंबरी नव्हते. तरीही सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेने त्याला ज्या अपूर्व उत्कंठेने स्वागतिले त्यावरून अप्रत्यक्षतः राष्ट्रीय पक्षाच्या आणि प्रत्यक्षतः वर उल्लेखिलेल्या गुप्त संस्थांच्या चळवळीनी महाराष्ट्रीय जनतेची मनोभूमिका किती क्रांतिप्रणव करून सोडलेली होती त्याची कल्पना येते. ज्या क्रांतिमार्गदर्शनाची तिला उत्कट जिज्ञासा लागली होती तेच तिला ऐकावयास मिळाले. उन्हाळ्याचे शेवटी तृषाक्रांत झालेली भूमी जशी पावसाच्या पहिल्या सरी घटघट पिऊन टाकते तद्वतच स्वातंत्रोत्सुक परंतु त्यावेळच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत किंकर्तव्यमूढ झालेल्या महाराष्ट्रीय देशभक्तांच्या मनोभूमीने ह्या पुस्तकातून माझिनीच्या क्रांतिकारक उपदेशामृताचे आकंठ पान केले. एकेक प्रत विस पंचवीस जण वाचीत असे शासनीय गुप्त हेरांचीच प्रतिवृत्ते म्हणतात. हरिविजय, रामविजय प्रभृती धर्मग्रंथाना जसे पालखीतून मिरवीत नेतात तसे काही ठिकाणी या ग्रंथाला लोकांनी पालखितून मिरवीत नेले. अनेक तेजस्वी पालकांनी आपल्या मुलांमुलींकडून या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील भाग कसे तोंडपाठ करून घेतले ते श्री. केळकर प्रभृती क्रांतिकारकांनी त्यांच्या आठवणीतून सांगितलेलेच आहे.

अर्थातच, माझिनीच्या शब्दांतून का होईना राज्यक्रांतीची अशी उघड उघड शिकवण देणारा ग्रंथ ब्रिटिश शासनीय (सरकारी) अधिकाऱ्यांच्या वक्रदृष्टीतून सुटणे शक्यच नव्हते. तथापि ते सावध होऊन त्याला प्रतिकार करण्याची योजना आखत आहेत तोच दोन एक महिन्यांच्या आत त्याची पहिली आवृत्ती तर हातोहात उडाली

होती. पण दुसरी आवृत्ती लगेच छापण्याचे प्रसिद्धक बाबाराव सावरकरांनी वृत्तपत्राला दिलेले पाहून राज्याधिकाऱ्यांनी त्या प्रचाराला तत्काल प्रतिबंध करण्याचे ठरविले. हा प्रतिबंध त्यावेळच्या निर्बंधाप्रमाणे (कायद्याप्रमाणे) दोन रीतीने करता येत होता. एकतर राजद्रोहाच्या आरोपाखाली माझिनीच्या पुस्तकाच्या, लेखक, प्रकाशक, मुद्रक यांच्यावर खटला भरून त्यात ते पुस्तक न्यायालयात राजद्रोही ठरताच त्या त्रिवर्गांना शिक्षाही देता येतील आणि ते पुस्तकही राजहृत (जप्त)करता येते. परंतू अधिकाऱ्यांना हा मार्ग संशयास्पद वाटला. कारण वर सांगितल्याप्रमाणे माझ्या प्रस्तावनेत किंवा माझिनीच्या लेखात भाषांतरात हिंदुस्थानने ब्रिटिशांविरूद्ध ह्या मार्गांनी सशस्त्र क्रांती करावी असे स्पष्टपणे कुठेच सांगितलेले नव्हते. ब्रिटिशांचे नावसुद्धा त्यात आढळणे कठिण होते. मी प्रस्तावना नि पुस्तक लिहिताना ही जी सावधगिरी शक्यतो घेतली होती तिचा असा काहीतरी उपयोग झाला खरा. कारण न्यायलयात ते पुस्तक नि त्याचे लेखक, प्रकाशक राजद्रोही ठरतीलच अशी नैबंधिक निश्चिती राज्याधिकाऱ्यांना वाटली नसावी. आणि जर हे पुस्तक न्यायालयात राजद्रोही ठरले नाही तर ते राजहृतही करता येत ना? ह्या अडचणींमुळेच लेखक प्रकाशकांना कडक शिक्षा देवून त्यांची खोड मोडण्याची उत्कट खुमखुमी मनात असताही राज्याधिकाऱ्यांनी तो मार्ग अवलंबिला नाहि हे उघड आहे. पण बहुधा प्रस्तावना लिहिण्यातल्या माझ्या सावधगिरीमुळे आम्ही लेखक, प्रकाशक, मुद्रक, जरी खटल्याच्या संकटातून सुटलो तरी आम्ही पुस्तकाला काही वाचवू शकलो नाही. कारण त्या वेळच्या निर्बंधाप्रमाणे न्यायालयात न जाताही वाटेल ते पुस्तक राजहृत करण्याचा अधिकार राज्याधिकाऱ्यांना दिलेला होता. यास्तव शासनाने (सरकारने) अधिक निश्चितीचा नि परिणामकारकतेचा तो दुसरा मार्गच अवलंबिला आणि खटलाबिटला काही न भरता ते माझिनीचे पुस्तक पहिल्या आवृत्तीसुद्धा एकदम राजहृत (जप्त) केल्याचे राजपत्रकात (गॅजेटमध्ये ) प्रसिद्धिले.

राजहृतीची (जप्तची) ही राजाज्ञा सुटताच महाराष्ट्रभर त्या पुस्तकाच्या प्रती पकडण्यासाठी शेकडो ठिकाणी घरांच्या, दुकानांच्या नि व्यक्तींच्या झडत्या चालू झाल्या. लोकांनीही प्रतिकाराचा नि प्रती लपविण्याचा चंग बांधला. झडत्यात काही ठिकाणी पक्का सुगावा लागल्यामुळे आरक्षकांनी ज्या प्रती पकडल्या त्यांची गमतीची वर्णने वृत्तपत्रे शासनाची कुचाळकी करण्याकरीता हेतुतः छापीत. काही ठिकाणी कोनाड्यात दहापाच प्रती घालून ते कोनाडे सलग भिंत दिसेल असे बुजवून वर गिलावा करून टाकलेले आढळले. काही ठिकाणी जुन्या काळच्या आडातून आणि विहिरीतून जी गुप्त गव्हरे असत त्यात प्रति लपविलेल्या सापडल्या. अशा काही चारशे-पाचशे प्रती पकडल्या गेल्या. त्या सोडल्या तर उर्वरित सर्व प्रती लोकांनी उणीपुरी चाळीत वर्षे जुनाट निधीप्रमाणे संकटाला भिक न घालता महाराष्ट्रभर जतन करून ठेवल्या. पुढे जेव्हा अभिनव भारताच्या अनेक शाखांवर निरनिराळ्या ठिकाणी गुप्त कटाचे खटले चालू झाले तेव्हा अशी एखादी प्रत एखाद्याच्या घरात सापडणे हा तो मनुष्य क्रांतिकारक असल्याचा एक स्वयंसिद्ध पुरावाच धरण्यात येऊ लागला! तरीही लोकांनी त्या प्रति जतन केल्या. आणि लपून छपून निदान दोन पिढ्यांत तरूण वर्गातून त्या पुस्तकाचे पारायण अखंडपणे चालू होते.

ह्या पुस्तकावरील राजहृती (सरकारी जप्ती) उठविण्याचे प्रकट प्रयत्नही जनतेने अनेक वेळा केले. सभांतून त्यातील उतारे उघडपणे वाचून दाखवून निर्बधभंगही केला आणि त्यासाठी बंदिवासही भोगला. तथापि इंग्रजी शासनाने ती बंदी उठविली नाही.

कालक्रमाने फार पुढची असताही ह्या पुस्तकासंबंधी जी काय माहिती सांगावयाची ती इथे एकत्रच सांगून टाकावी हे इष्ट असल्याने विषयानुबंधाचाच अवलंब करून तीही सांगून टाकतो की हे पुस्तक राजह्रत झाल्यानंतर पुरेपूर तीस एक वर्षनी जेव्हा प्रांतिक स्वायत्तता हिंदुस्थानला मिळाली तेव्हा जनतेचे म्हणविणाऱ्या काँग्रेसचे मंत्रिमंडळ मुंबई प्रांतात अधिकारावर आले होते. परंतु त्या काँग्रेसच्या मंडळाचीही ह्या पुस्तकावरील बंदी उठविण्याची छाती झाली नाही. त्याला तशी इच्छाही नव्हती. कारण ह्या पुस्तकातील क्रांतिकारक कार्यक्रमाचा प्रचार जनतेत होऊ नये अशी त्यावेळच्या अहिंसक काँग्रेसी गोटाची इंग्रजांइतकीच धडपड चालू होती. वास्तविक पाहता त्यावेळेस जे काँग्रेस, हिंदुमहासभा, रॉयिस्ट, सोशालिस्ट प्रभृती पक्ष होते त्यापैकी अनेकजणांना देशभक्तीची, देशस्वातंत्राची आणि क्रांतिप्रणवतेची पहिली प्रेरणा त्यांच्या तरूण वयी अभिनव भारताच्या ह्या पुस्तकासारख्या प्रकट वाङ्ःमयानेच मिळालेली होती. त्यांच्यापैकी कित्येक पुढाऱ्यांनी तरूणपणात अभिनव भारत या संस्थेचे सदस्यत्वही स्वीकारलेले असून आमचे पोवाडे आणि ह्या पुस्तकातील निवडक भाग तोंडपाठ केलेले होते! तथापि एक हिंदुमहासभावाल्याचा आणि हिंदुत्वनिष्ठांचा अपवाद सोडल्यास त्यांच्यापैकी कोणताही पक्ष हे सर्व इंग्रजांनी राजह्रत केलेले क्रांतिकारक वाङ्ःमय मुक्त करण्याची मागणी करण्यास पुढे आला नाही.

तथापि काळ आणि राजकारण इतके झपाट्याने पुढे जात होते की माझिनीचे पुस्तक सन १९०७ मध्ये प्रसिद्ध होऊन जवळ जवळ चाळीस वर्षे गेल्यानंतर मुंबई प्रांतात जेव्हा काँग्रेसचे मंत्रिमंडळ पुन्हा आधिकारारूढ झाले त्यावेळेस त्याचे मुख्य प्रधान श्री. बाळाराव खेर जे त्यांचे तरूणपणी महाशाळेत(कॉलजात) असता अभिनव भारताचे प्रतिज्ञाबद्ध सदस्य झालेले होते. त्यांच्या त्या मंत्रिमंडळाने लोकांची ही सतत चालत असलेली मागणी पुरविली आणि ह्या पुस्तकावरील आणि एकंदर 'सावरकर वांग्मयावरील', बंदी शेवटी सन १९४६ मध्ये उठविली!

तेव्हा कुठे ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढणे शक्य झाले. पण जर जनतेने चाळीस वर्षे ह्या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रतीचे गुप्तपणे जतन करून न ठेवले तर दुसरी आवृत्ति छापण्यासाठी मूळ प्रतही मिळती ना. पण जनतेने तसे जतन केले होते त्यामुळे बंदी उठताच त्या जुनाट वाचून किंवा कुजत पडून जीर्णशिल झालेल्या अनेक प्रती पुरातन क्रांतिकारकांनी माझ्याकडे धाडून दिल्या. त्यावरून उतरवलेली आणि नवे लहानसे निवेदन जोडलेली ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती पहिल्या आवृत्तीनंतर उण्यापुऱ्या चाळीस वर्षांनी सन १९४६ मध्ये माझ्याच हाताने प्रसिद्धिण्याचा योग जुळून आला!

ह्या प्रकरणात 'माझिनीचे आत्मवृत्त' ह्या पुस्तकाचे हे छोटेसे आत्मवृत्त देण्याचाच प्रतिपाद्य विषय आसल्याने माझिनी विषयीचा उल्लेखच मुख्यत्वेकरून आलेला आहे. तथापि ज्याअर्थी इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धाचे तुरळक संदर्भ वर आलेले आहेत त्याअर्थी माझिनीप्रमाणेच ज्या तीन इतर थोर पुरूषांच्या कर्तृत्वामुळे इटली स्वतंत्र नि एकराष्ट्र होऊ शकली त्यांचाही नामनिर्देश तरी इथे केलाच पाहिजे. तसे न करणे हे क्वचित् सहेतूक पक्षापाताचे नि कृतघ्नपणाचे होईल. माझ्या क्रांतिकारक योजनांवर नि प्रयत्नांवर त्यांच्या इतिहासाचाही पुष्कळ परिणाम झालेला होता. सेनापती ग्यारिबाल्डी यांच्या खड्गाने अर्धी अधिक इटली दास्यमुक्त होऊ शकली. तसेच केवळ क्रांतिकारकांच्या मधूनमधून होणाऱ्या पराक्रमी उठावण्यामुळे इटली, आस्ट्रीया नि फान्स यांच्या संघटित सैन्यांच्या हातून इटली नित्याची स्वतंत्र होऊ शकली नाही. इटलीतील सारी इतर संस्थाने नि प्रदेश परतंत्र झाली असताही सुदैवाने एक पिडमांटचे संस्थान तेवढे नाममात्र का होईना पण स्वतंत्र राहिले होते. आपल्या इकडच्या

नेपाळप्रमाणेच त्यांची स्थिती होती. पण त्यामुळे एक संघटित, रणरक्ष, शस्त्रसज्ज नि संस्थानाचा स्वदेशाभिमानी राजा व्हिक्टर ईम्यानुअल ह्याने इटलीतील क्रांतिकारकांच्या साहसी उठावण्याचे पुढारीपण शेवटी उघडपणे स्वीकारले. आणि क्रांतिकारकांनी जो जो प्रांत तात्पुरता मुक्त करावा तो तो उघडपणे आपल्या राज्यास जोडून घेण्याचे साहस केले. आस्ट्रीयाशी त्यामुळे त्यांचे उघड युद्धही जुंपले. जर त्याचा शेवटी पराभव होता तर त्याचे स्वतंत्र होते ते पिडमांटचे छोटेसे संस्थानही बुडाले असते. पण न भिता त्याने ते क्षुद्र संस्थान, स्वतंत्र नि अखंड इटलीचा प्रोज्वल राजमुकुट मिळविण्याच्या राष्ट्रीय महत्वाकांक्षेपायी पणास लावले. साऱ्या इटलीचा त्याला सक्रीय पाठिंबा मिळत चालला. शेवटी समरदेवतेचा फासा त्याला अनुकूल पडला, फ्रान्स नि आस्ट्रिया या दोहोंचीही सैन्ये इटलीतून हुसकून दिली गेली आणि रोममध्ये त्या पिडमांटच्या संस्थानिकाला स्वतंत्र नि अखंड इटालियन राष्ट्राचा राजा म्हणून King of Italy म्हणून - राष्ट्रसंमतीने राज्यभिषेक करण्यात आला. तथापि राजाच्या ह्या राष्ट्रीय धाष्ट्यार्चे श्रेय जितके त्याचे त्याहूनही अधिक त्याच्या राष्ट्रभक्त, कारस्थानी नि निर्धारी प्रधानाचे होते. त्याचे नाव काऊंट काव्हूर! इटलीच्या बाजूला इंग्लंड प्रभृती युरोपियन राष्ट्रांची उत्कट सहानुभूती नि गुप्त सहकार्यही संपादून आस्ट्रिया नि फ्रान्स ह्यांना एकटे पाडण्याचे नि परस्पर युद्धात गुंतविण्याचे कार्य साधण्यात काव्हूरची राजनीतीपटुता इटलीचे स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी करण्यात माझिनी गारिबाल्डीच्या क्रांतिकार्याच्या खालोखाल सहाय्यभूत झाली होती. यास्तवच इटलीचे राष्ट्रनिर्माते म्हणून माझिनी, ग्यारिबाल्डी, काऊंट नि राजा व्हिक्टर ईम्यानुअल ह्या चारी महापुरूषांना इतिहासात मान आहे.

यास्तवच, माझिनीचे वाड्.मय अभ्यासिताना मी इटलीच्या राज्यक्रांतितील ह्या वरील चारी महापुरूषांच्या चरित्रांचे नि त्या इटालियन स्वातंत्र्ययुद्धाच्या संकलित इतिहासाचेही यथेच्छ वाचन केले. ट्राव्हेलिगनने लिहिलेले ग्यारिबाल्डी विस्तृत नि वीररसशाली चरित्र, काव्हूरचे चरित्र, एका प्रतिभाशाली महिलेने (तिचे नाव मला आता नक्की आठवत नाही) इंग्लीशमध्ये लिहिलेले 'Libeartion Itali' हे सुंदर पुस्तक, 'युनियन ऑफ इटली' हे पुस्तक; ही पुस्तके तर मला अजून स्पष्टपणे आठवतात. इंग्लीशमध्ये इटलीच्या त्या रोमहर्षक नि यशस्वी स्वातंत्र्य युद्धकालाविषयी त्यावेळी इंग्लिश भाषेत प्रकाशिलेले बहुतेक पुस्तके मी त्या सन १९०६/७ मध्ये वाचून काढलेली होती. इतकी मला त्या विषयाची आवड लागलेली होती. ज्या अर्थी त्या सर्व इतिहासाच्या नि विशेषतः वरील इटालियन तीन चार राष्ट्रपुरूषांच्या लढ्यात तसेच भगीरथ प्रयत्न नि तशीच महत्कार्य करण्यास आम्हा सहस्रावधी क्रांतिकारकांना नि सुरेंद्रनाथांच्या पिढीपासूनच्या भारतीय सुशिक्षित वर्गाला काही अंशी तरी उत्साह, क्षमता आणि मार्गदर्शन मिळाले होते त्या अर्थी त्यांचे त्या प्रमाणात उतरायी होण्यास्तव त्या माझिनी, ग्यारिबाल्डी, काव्हूर,व्हिक्टर इम्यान्युअल ह्यांना आणि सामुहिकरीत्या इटलीच्या त्या लढ्यातील सर्व स्वातंत्र्यविरांना मी येथे माझी मानवंदना देत आहे. आणि एका प्रसिद्ध इंग्लिश व्यक्तीने (त्याचे नाव नक्की आठवत नाहि पण,'मेरिडिथ' असावे) इटलीच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लिहिलेल्या लहानशा कवितेतील जो एक मर्मज्ञ श्लोक चुकतमाकत आठवत आहे त्याच्याच काव्यभय भाषेत स्वतंत्र इटलीस संबोधित आहे कीः

Italia, to vindicate thy name
Mazzini, Covour, Garribaldi three
Thy Soul, thy Brain, thy Sword, thy set thee free
From ruinous discord with one Iustrous aim!!-- May He bless Thee and them!!

प्रकरण पाचवे

# ‘फ्री इंडिया सोसायटी’ ची स्थापना
# आणि
# १८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर

लंडनला जाण्याचे आधि तेथील संभवनीय कार्याची रूपरेखा लक्षात घेऊन हिंदुस्थानात असतानाच मी ‘अभिनव भारत’ ही गुप्त क्रांतिकारक संस्था स्थापन केली होती हे ह्या आत्मवृत्ताच्या आधीच्या प्रकरणात सांगितले आहे. त्याप्रमाणे लंडनमध्ये पोचल्यावर तेथे शिकण्यासाठी आलेल्या तरूणांना संघटित करून त्यांच्या मनात सशस्त्र क्रांतीची प्रेरणा करण्यासाठी व्यक्तीगत संभाषणे, सार्वजनिक भाषणे, ग्रंथलेखन नि त्यांचा प्रचार, तसेच त्यावेळच्या बॉम्ब प्रभृती अत्याधुनिक नि इतर अवश्य त्या शस्त्रास्त्रांचे शिक्षण, संग्रह नि प्रसार इत्यादी सशस्त्र क्रांतिसाठी प्रत्यक्ष नि अप्रत्यक्षपणे उपयोगी पडणाऱ्या कार्यांना मी प्रारंभ केला. ह्या सर्व प्रयत्नात, मी अधिक भर इंग्रजांच्या सैन्यदलात जे भारतीय सैनिक होते त्यांच्यात राज्यक्रांतीचा प्रसार करण्यासाठी शक्य ती ती खटपट करण्यावर मुख्यतः देत चाललो.

जी कामे प्रकटपणे करणे आवश्यक होती ती करण्यासाठी लंडनला मी ‘फ्री इंडिया सोसायटी’ ह्या नावाची एक संस्था स्थापन केली. ह्या संस्थेसंबंधी विस्तृत माहिती पुढे योग्य स्थळी सांगूच. सध्यापुरते इतकेच सांगायचे की ह्या संस्थेच्या वतीने ज्या उघड अनेक चळवळी मी करीत असे त्यांपैकी एक म्हणजे प्रति आठवड्याला साधारणतः एक तरी व्याख्यान देत असे आणि त्यात माझिनीचे चरित्र सांगता सांगताच इटलीत जसा माझिनी निर्माण झाला, त्याने तरूण इटली हि संस्था काढून पुढे त्या देशातील सैनिकांची अंतःकरणे चेतवून आणि बाजूच्या संस्थानातील स्वातंत्र्यप्रेमी वीरांचे सहाय्य होऊन, सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून इटली जसा मुक्त केला त्याचप्रमाणे आपल्याही देशात सशस्त्र क्रांतीची संघटना उभारून सैनिकांची मने क्रांतीच्या विचारांनी प्रज्वलित करून आपणही परक्या ब्रिटिशसत्तेचे वर्चस्व झुगारून देऊन हिंदुस्थान स्वतंत्र केला पाहिजे अशी विचारसरणी ह्या भाषणातून मी मांडत असे.

**अनेकांना सशस्त्र क्रांती अशक्य वाटे**

पण माझे हे निर्धाराचे नि ऐतिहासिक निष्कर्षावर आधारलेले विचार मला भेटलेल्या तरूण नि प्रौढ भारतीयांपैकी बहुतेकांना एकदम पडत नसत. ते विचारीत की इटली नि हिंदुस्थान यांची तुलना आपण करता कशी? इटली हा युरोपातला एक प्रगत देश होता. त्याच्या आजूबाजूला सर्व देश स्वतंत्र असल्याने इटलीतही स्वतंत्राचे वारे वहात होते. तेथे असलेल्या लहानसहान संस्थानांतून त्यांची त्यांची स्वतंत्र सैन्ये होती आणि त्या सैन्याच्या हाती इटलीवर साम्राज्य गाजविणाऱ्या आस्ट्रीया व फ्रान्स ह्या राष्ट्राइतकी थोडीबहुत प्रगत अशी शस्त्रेही होती. तो देश स्वातंत्रोत्सुकही होता. म्हणून तेथील माझिनी, गॅरिबाल्डी आदीचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले. पण ह्या तुलनेत भारताचा विचार करून ते साशंक तरूण नि प्रौढ विचारीत की हिंदुस्थानात शस्त्रे आहेत कोठे? इंग्रजांच्या त्या तोफा नि बंदुकांपुढे आपला निभाव लागणार कसा? हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या हाताखाली जे भारतीय

सैन्य आहे त्यातील सैनिक भाडोत्री, अशिक्षित नि इंग्रजांशी स्वामीनिष्ठ असल्याने ते इंग्रजांविरूद्ध कधीही बंड करणे शक्य नाही. आणि हिंदुस्थानांतील जनता तर ब्रिटिशांनी पूर्णपणे निःशस्त्र करून टाकलेली! त्यामुळे हिंदुस्थानात सशस्त्र क्रांती करणे कसे शक्य आहे? असे प्रश्न विचारून त्यावेळचे बहुतेक सर्व तरूण नि प्रौढ भारतीय म्हणत की सशस्त्र क्रांतीचे नि त्या मार्गे बिटिश वर्चस्व झुगारून देण्याचे हे विचार म्हणजे केवळ एक स्वप्नरंजन आहे!

'फ्री इंडिया सोसायटी' मध्ये व्याख्याने ऐकण्यासाठी येणारे हे विद्यार्थी भारतातील निवडक नि बुद्धिमान तरूण होते. आणि त्यांची विचारांची दिशा ही अशी असे! अर्थात मला काही हे प्रश्न नि विचार नवीन नव्हते. भारतात असताना नासिक, पुणे,मुंबई आदी ठिकाणी मला भेटलेले बहुतेक सर्व तरूण विद्यार्थी नि प्रौढ नेते वरीलप्रमाणेच शंका प्रदर्शित करून सांगत की सशस्त्र क्रांतीचा मार्ग पूर्णपणे अव्यवहार्य, अशक्य नि हास्यापद आहे एवढेच नव्हे तर तो आत्मघातकही ठरेल.

हे विचार सांगणाऱ्या लोकांना माझेही ठाम उत्तर असे की इंग्रजांच्या हाताखाली असलेल्या ह्या आपल्या भारतीय सैनिकांच्या हाती जी शस्त्रे आहेत ती आपलीच आहेत. ते सैनिक शिक्षित नसले तरी त्यांच्यातही स्वातंत्र्याची इच्छा असलीच पाहिजे. ती त्यांच्या अंतःकरणात असलेली स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करा, त्या सैन्यात चेतना उत्पन्न करा नि मग पहा परक्या इंग्रजांवरच तीच शस्त्रें कशी उलटतील ते!

**सशस्त्र क्रांतीचे प्रत्यक्ष उदाहरण १८५७**

ही माझी विचारसरणी जनतेत आणि सैनिकांत पसरविण्यासाठी आणि वर सांगितलेल्या आक्षेपकांपुढे प्रत्यक्ष घडलेले उदाहरण ठेऊन त्यांची मने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध चेतवून ती क्रांतिप्रणव करण्यासाठी केवळ पन्नास वर्षापूर्वीच भारतात अशा प्रकारचे घडलेले जे उदाहरण म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्य समर त्याचा एक साधार नि स्फूर्तिपद इतिहास लिहिण्याचा विचार योजला आणि त्या दृष्टीने आवश्यक अशी साधने मिळविण्याचा प्रयत्न करण्यास, मॅझिनीचे चरित्र लिहिल्यानंतर थोड्याच दिवसात मी प्रारंभ केला. हा ग्रंथ साधार नि अभ्यासपूर्ण असावा ह्याकरिता त्या '१८५७ च्या संगरासंबंधी ब्रिटिशांनी काय लिहून ठेवले आहे ते पहावे, त्यांचे ग्रंथ मिळवून ते वाचावे असे ठारवून ते मिळविण्यासाठी मी प्रयत्न करू लागलो. ह्या कामी, मॅझिनीच्या चरित्रासाठी पुस्तके मिळवून देण्याची खटपट ज्यांनी केली त्या श्री. मुखर्जी महाशयांनाच भेटून विचारले की १८५७ मध्ये भारतात झालेल्या सैनिकांच्या उठावासंबंधीची काही पुस्तके पण देऊ शकाल का? विकत मिळाली तरी चालेल. त्यासंबंधी ग्रंथ लिहिण्याचा माझा विचार आहे. श्री. मुखर्जी हे अनुभवी गृहस्थ होते. 'फ्री इंडिया सोसायटी' मधील व्याख्यानांना ते उपस्थित असत. एवढेच नव्हे तर त्यांनी माझ्याच हातून अभिनव भारताची शपथही घेतलेली होती. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले की Kaye चें ह्या विषयावरचे एक पुस्तक मी पाहिले आहे. आपल्या वाचनालयातही ते असावे. दोन-चार दिवसांत शोधून देतो. त्याप्रमाणे त्यांनी ते पुस्तक आणून दिले. त्या पुस्तकात काय काय आहे याची त्यांना काही कल्पना नव्हती. कारण त्यांनी स्वतः ते वाचले नव्हते. १८५७ मध्ये आपल्या सैनिकांनी जो उठाव केला तो भारताच्या स्वातंत्रासाठी केलेला फार मोठा प्रयत्न होता ह्याची जाणीव एखादा अपवाद सोडता त्या काळात कोणीही भारतीयाला झालेलीच नव्हती. एवढेच नव्हे तर आपल्याकडील सुशिक्षित उलट असे म्हणत की १८५७ मध्ये शिपायांनी बंड करून फार मोठी चूक केली. ज्यांनी निरपराध इंग्रज बायका-

मुलांना क्रुरपणे ठार मारले. सुशिक्षित इंग्रज स्त्रियांवर अत्याचार केले असे ते शिपायी म्हणजे भारताच्या उज्वल नावाला कलंक लावणारे राक्षसच होते. त्यांच्या बंडामुळे भारताची मोठी हानी झाली. दयाळू, कष्टाळू नि पुढारलेल्या मायबाप इंग्रज सरकारने भारताची जी प्रगती घडवून आणली असती त्यात लुटारू,क्रुर नि धर्मवेड्या शिपायांच्या ह्या बंड करण्याचा मुर्खपणामुळे फार मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्यावेळच्या बहुतेक सुशिक्षितांची अशी प्रमाणिक समजूत असल्यामुळे १८५७ वरील पुस्तकांना ते मुळी महत्वच देत नसत ! त्यामुळे Kaye चे पुस्तक माझ्या हाती देताना मुखर्जी महाशयांनिही मला म्हटले की कशाला वाचता ही असली पुस्तके? आहे काय त्यात? मुखर्जी महाशयांचा 'आहे काय त्यात' हा प्रश्न त्यांनी आणून दिलेल्या The Sepoy Mutiny In India (Part I ) by Sir John William Kaye च्या ह्या ग्रंथापुरता तरी योगायोगाने खरा ठरला! कारण Kaye चा ग्रंथ वाचल्यानंतर मलाही वाटू लागले की १८५७ चा तो संग्राम तर इतकाच असेल तर त्यावर आपण लिहिणार काय? त्या ग्रंथात १८५७ मधील महान नि स्फूर्तिदायक अशा प्रसंगाचे, लढायांचे नि वीरांचे काहीच वर्णन नव्हते. १८५७ ची फारच थोडी माहिती त्या ग्रंथात होती. इतर सर्व वीरांचे सर्व भाग १८५७ पूर्वीच टिपूच्या मुलांसाठी शिपायांनी केलेले बंड नि इतर किरकोळ उठावण्या यांच्या माहितीने भरलेला होता. शेवटच्या एक-दोन प्रकरणात मीरतच्या उठावापर्यंतचा उल्लेख काय तो होता. अर्थात् त्यात नानासाहेब, तात्या टोपे, राणीलक्ष्मी, मौलाना अहमद शहा इत्यादी वीरांच्या पराक्रमाचा उल्लेखही आलेला नव्हता. अशा त्या ग्रंथाच्या वाचनाने क्षणभर असे वाटू लागले की नवीन सैनिकांना नि तरूणांना सशस्त्र क्रांतीची स्फूर्ती देणारी दिव्यशक्ती एवढ्याशा ह्या साधनांनी निर्माण करता येणारी कशी? शिपायांचे ते बंड का लहान होते? असे विचार मनात येऊन मी निराश होऊन गेलो. अशा मनस्थितीत त्या ग्रंथाचा अगदी शवटचा भाग वाचीत असताना त्या ग्रंथाच्या शेवटी अगदी बारकाईने पहाता एक लहानशी पण अत्यंत महत्वाची ठरलेली अशी एक प्रसिद्धकवजा टीप आढळली! त्यात लिहिले होते की ह्या नंतर ग्रंथाचे आणखी पाच खण्ड प्रसिद्ध करण्यात आले आहेत. के यांचे सहकारी श्री. मॅलिसन यांनी के यांनी लिहिलेल्या ह्या भागाचा अंतर्भाव करून त्यात पुढील सर्व वृत्तांताची भर घालून त्या सर्व लिखाणाचा ६ खण्ड असलेल एक विशाल ग्रंथ छापून तो के आणि मॅलिसन यांच्या नावाने प्रसिद्ध करण्यात आलेला आहे!

**के अँड मॅलिसनचे विस्तृत ग्रंथ**

शेवटच्या पानावरील ही लहानशी टीप वाचून निराश झालेले माझे मन पुन्हा थोडे उल्हासित झाले. श्री. मुखर्जी महाशयांना ते प्रसिद्धक दाखवून मी म्हटले की 'कसेही करा पण हे सहा खण्ड असलेला के-मॅलिसनचा तो समग्र ग्रंथ मला मिळवून द्या! चोर बाजारात जरी तो विकत मिळाला तरीहि शोधून घेऊन या. आपण येथे वावरलेले, अनेकांशी आपल्या ओळखी, सर्व बाजार आपणाला ठाऊक म्हणून आपणच काय ते हे काम करू शकाल.' माझी ही अशी कळकळीची विनंती ऐकून मुखर्जीमहाशयांनी मला ते ग्रंथ आणून देण्याचे आश्वासन दिले आणि त्याप्रमाणे सातआठ दिवसांत जुन्या बाजारातूनच त्यांनी मला सहा खण्ड असलेला Kaye नि Mallison चा Sepoy Mutiny १८५७ समग्र ग्रंथ विकत आणून दिला. हा समग्र ग्रंथ जसाजसा मी वाचू लागलो तसतसा १८५७ चा भारतीय सैनिकांनी मांडलेला तो प्रचंड रणयज्ञ आणि त्याचे आत अनेकांच्या आहुती देऊन त्याच्या ज्वाला प्रज्वलित करणारे नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मी, मौलवी अहमदशा, बिहारचे वयोवृद्ध वीर कुवरसिंग आदींच्या पराक्रमाची कृत्ये माझ्या दृष्टीसमोर तरंगू लागली. अर्थात हा ग्रंथ के आणि मॅलिसन ह्या इंग्रजी

इतिहासकारांनीच लिहिलेला असल्याने ह्या भारतीय वीरांच्या पराक्रमाची वर्णने निःपक्षपातीपणाने सांगितलेली नव्हती, एवढेच नव्हे तर, मोठमाठ्या इंग्रजी सेनापतींना खडे चारणाऱ्या त्या वीरांच्या असमर्थनीय निंदेनेच त्या ग्रंथाची पानेच्या पाने भरलेली आढळत. असे असले तरी एवढे खरे की ह्या ग्रंथावरून १८५७ मधील सैनिकांच्या उठावाचा व्याप केवढा प्रचंड होता त्याची बरीचशी यथार्थ कल्पना मला येऊ शकली. ह्या ग्रंथावरून मला आणखीही एक महत्वाची माहिती मिळाली. त्यात ज्या टिपा नि संदर्भ दिलेले होते त्यावरून लक्षात आले की ह्यासंबंधी इंग्रजांनी आणखी भरपूरच वाड्मय लिहून ठेवली आहे. ते वाड्मय वाचावयाचे असा निश्चय करून ते आता आपल्याला कसे नि कोठून मिळविता येईल याचा प्रयत्न मी करू लागलो.

**१८५७ संबंधीचे भरपूर साहित्य असलेले**

**'इंडिया ऑफिसचे ग्रंथसंग्रहालय'**

मुखर्जीमहाशयांना त्या ग्रंथातील टीपा नि संदर्भ दिलेल्या पुस्तकांची नावे दाखवून सांगितले की हे सर्व ग्रंथ संदर्भ पाहण्याची माझी तीव्र इच्छा आहे. ह्या माहितीची भर टाकल्यास माझा संकल्पित ग्रंथ अधिक साधार नि पूर्ण होऊ शकेल. तरी आपण हे साहित्य मला उपलब्ध कसे होईल याचा मार्ग दाखवाल का? ते म्हणाले पहातो प्रयत्न करून. त्याप्रमाणे थोड्याच दिवसात चौकशी करून मुखर्जीमहाशयांनी सांगितले की ब्रिटिश शासनाचे 'इंडिया ऑफिस' नावाचे राज्यकारभार पहाणारे जे महत्वाचे कार्यालय आहे त्याच्या विस्तृत नि अधिकृत ग्रंथसंग्रहालयात १८५७ संबंधीची अनेक कागदपत्रे तसेच ह्या के-मॅलिसनच्या ग्रंथानंतरही प्रसिद्ध झालेले अनेक ग्रंथ पहावयास नि वाचावयास मिळण्याची सोय केलेली आहे. पण तेथे प्रवेश मिळणे कठिण असते. त्यावर अनेक बंधने आहेत. तेथे प्रवेश मिळवून अभ्यास करावयाचा तर त्यासाठी मोठ्या लोकांची अनुरोध नि ओळखपत्रे देणे आवश्यक आहे.

मुखर्जीमहाशयांनी ही माहिती दिल्यावर पुन्हा प्रश्न पडला की आता कसे करावयाचे! पंडित शामजी कृष्ण वर्मा किंवा अन्य भारतीय मोठ्या पुढाऱ्यांशी ही गोष्ट काढून त्यांचा पाठिंबा मिळविणे जवळजवळ अशक्य होते. कारण एकतर त्यांच्याही मते १८५७ चा तो भारतीय सैनिकांचा उठाव धर्मवेड्या नि क्रूर शिपायांचा एक आत्मघातक उपद्व्याप होता. आणि दुसरे असे की पंडित शामजी किंवा त्यांच्या मताचे पुढारी हे भारतीय जनतेला अधिक अधिकार मिळावेत यासाठी चळवळ करणारे असल्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या दृष्टीने ते साम्राज्यद्रोही नि अविश्वासार्हच होते. त्यामुळे त्यांची ओळख त्या ब्रिटिश साम्राज्याच्या ग्रंथालयात प्रवेश मिळविण्यासाठी निरूपयोगी ठरणारी होती ! म्हणून पुन्हा मी मुखर्जीमहाशयांनाच हा प्रवेशाचा प्रश्न सोडविण्यासाठी काहीतरी उपाय शोधण्याची विनंती केली. ते लंडनमध्ये अनेक वर्षे राहत होते. त्यांनी एका ब्रिटिश स्त्रीशी विवाह केला होता. आणि त्यांच्यापासून तिला पुने नावाचा एक मुलगाही झालेला होता. मुखर्जीमहाशय रंगाने काळे होते. पण त्यांची पत्नी गोरी होती. ते शामजींच्या इंडिया हाउस चे व्यवस्थापक म्हणून काम पहात आणि त्यांची हि पत्नी शिक्षिका होती. त्यामुळे मुखर्जीदांपत्याचे इंग्रजी समाजात येणेजाणे नि ओळखीही भरपूर होत्या. त्याचा उपयोग करून मुखर्जीमहाशयांनी थोड्याच दिवसात इंडिया ऑफिस मध्ये जाऊन तेथील नियम नि अटीप्रमाणे लागणाऱ्या सर्व स्वाक्षऱ्या, ओळखपत्रे नि अनुरोधपत्रे मिळवून माझ्या नावाची त्या ग्रंथालयात बसण्याची अनुज्ञा मिळवून दिली. अनुज्ञेसाठी आवेदन करताच मुखर्जीमहाशयांना मी स्पष्टपणे बजावले होते की गंथ लिहिण्यामागे माझा उद्देश

काय याची वाच्यता त्यांनी कोणापाशीही करू नये. ही दक्षता घेतल्यामुळे तेथे प्रवेश मिळण्यास फार त्रास पडला नाही.

**इंग्रजांचा दीर्घ उद्योग नि सुव्यवस्था पाहून मन दडपून गेले.**

ती अनुज्ञा हाती पडताच, दुसऱ्या दिवशीच मुखर्जीमहाशयांसह मी त्या ग्रंथालयात गेलो. तेथील, प्रमुख ग्रंथपालांनी माझे अनुज्ञापत्र पाहिले. १८५७ वर पुस्तक लिहिण्याचा माझा विचार आहे, त्यासंबंधी मला ग्रंथ वाचावयाचे आहेत हे पाहून ते मला त्या भव्य ग्रंथालयातील १८५७ च्या ग्रंथ, तसेच पत्रव्यवहाराच्या नि कागदपत्रांच्या कक्षेकडे घेऊन गेले. तेथे व्यवस्थितपणे बांधून घेतलेल्या शेकडो धारिण्या (files) क्रमवार रचून ठेवलेल्या दिसत होत्या. हे एवढे सर्व साहित्य १८५७ च्या त्या उठावाविषयीचेच असेल ह्यावर माझा विश्वास बसेना. म्हणून मी ग्रंथपालांना विचारले की ह्यात १८५७ संबंधीचा भाग कोणता आहे तेवढा मला कृपा करून दाखवाल का? त्यावर ते ग्रंथपाल म्हणाले की ह्या कक्षेतील हे सर्व ग्रंथ नि धारिण्यातील कागदपत्र १८५७ मधील क्रूर शिपायांच्या पापानेच भरलेले आहेत. त्यांच्या ह्या शब्दाचा मला मनातून खूप राग आला. तसेच माझी निश्चिती पटली की हे सारे कागदपत्र १८५७ विषयीचेच आहेत. आपणाला हे सर्व अभ्यासावयाचे आहेत. ह्या विषयावरील एक पुस्तक मिळणेही कठिण वाटत असताना त्यासंबंधी एवढा प्रचंड साठा पुढे असलेला पाहून मला आनंद झाला त्याचप्रमाणे ह्या विषयावरील वाङ्मयाचा मोठा संग्रह करून तो व्यवस्थितपणे लावून ठेवून अभ्यासकांची सोय करून ठेवणाऱ्या इंग्रजांच्या राजकारभार विषयक सुयंत्रणेची कल्पना मनात येऊन त्याखाली माझे मन काहीसे दडपूनही गेले. असे उलटसुलट विचार मनात घोळत असतानाच मी त्या कक्षेतील विभाग पाहिले. ग्रंथपालाकडून तेथील व्यवस्थेची सर्वसाधारण माहिती करून घेतली, काय काय नियम आहेत ते विचारले आणि पहिल्या दिवशी ग्रंथसंग्रहालयातून बाहेर पडलो.

**ग्रंथपालाला चकविले**

दुसऱ्या दिवशी सकाळी भोजन आटोपल्यावर ठीक ११ वाजता ते ग्रंथालय उघडण्याच्या वेळीच मी तेथे जाऊन पोचलो. १८५७ च्या कक्षेतील ग्रंथांची नि टाचणाची सर्व सूची पाहिली. ग्रंथपालांनी मला काही ग्रंथ महत्वाचे आहेत असे सांगून ते आधी वाचण्याची सूचना केली. पण ते सर्व साहित्य वाचून काढायचा माझा निश्चय असल्याने तेथील एकामागून एक पुस्तके नि धारिण्या घेऊन त्या समग्र वाचून त्यांतील महत्वाची टिपणे घेण्याचा मी सारखा सपाटा चालविला. त्या अभ्यासात माझे मन इतके रमून गेले की ज्या निर्बंधशास्त्राच्या (बॅरिस्टरीच्या) अभ्यासासाठी म्हणून मी लंडनला गेलो होतो त्या अभ्यासाकडे त्या दिवसात माझे दुर्लक्षच होत राहिले. माझी ही चिकाटी, कळकळ नि अभ्यासू वृत्ती पाहून तेथील अनुभवी ग्रंथपालांचे मनातही माझ्याविषयी कौतुकाची भावना निर्माण झाली असावी. मी जे जे विचारी किंवा मागे ती ती माहिती नि ते ते सहाय्य तो ग्रंथपाल मला देत असे. माझ्याकडे येऊन ते गप्पाही मारी. १८५७ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध उठाव करणारे ते शिपाई कसे धर्मवेडे, क्रूर, राक्षसी नि 'निमकहराम' होते, त्यांनी इंग्रज बायकांमुलांची निर्घृण हत्या करून मानवतेला कसा कलंक फासला, त्यांनी जाळपोळ, लुटालूट, कापाकापी यांचा कसा धांगडधिंगा घातला आणि इतके करुनहि ते कसे पराभूत झाले यांचे वर्णन तो मला सांगे आणि माझ्या मनात स्वधर्म नि स्वराज्य ह्यासाठी प्राणपणाने ब्रिटिश साम्राज्याविरूद्ध लढणाऱ्या त्या शूर सैनिक, संस्थानिक नि लोकांविषयी अनादर नि द्वेष उत्पन्न करण्याचा सतत प्रयत्न करी. त्या

ग्रंथपालाला अशी आशा होती की माझ्यासारख्या अभ्यासू नि तरतरीत तरूणाने जर १८५७ च्या त्या शिपायांविरूद्ध त्यांच्या मनाप्रमाणे एखादा अभ्यासपूर्ण नि साधार ग्रंथ लिहिला तर अनायासेच भारतीय जनतेच्या मनात त्या शिपायांविषयी नि बंडाच्या मार्गाविषयी घृणा उत्पन्न होईल! ह्या दृष्टीने त्याची चालू असलेली ती बडबड मी निमूटपणे ऐकून घेत असे. माझ्या मनात संग्रमासंबंधी असलेल्या आदराच्या भावना मी त्या ग्रंथपालाला कधीच सांगत नसे. कारण त्याचा अधिकाधिक विश्वास संपादन करावयाचा आणि त्याच्याकडून गुप्त कागदपत्रही मिळवायचे असे धोरण मी आखले होते. त्यामुळे माझ्यावर त्या ग्रंथपालाचा इतका विश्वास बसला की त्याने मी तशी इच्छा दर्शविताच गुप्त म्हणून ठेवलेली त्यावेळची पार्लमेंटमधील चर्चेची समग्र प्रतिवृत्ते, भारतात त्यावेळी लढलेल्या मोठमोठ्या ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांनी नि नागरी अधिकाऱ्यांनी धाडलेली गुप्त पत्रे, विरोधी पक्ष नेत्यांची भाषणे आदी सर्व कागद जे सर्वसाधारण ब्रिटिश लेखकानाही मिळणे कठीण होते तेही त्या ग्रंथपालाने मला दाखविले. त्यांच्या वाचनाने १८५७-५८ मधील वेगवेगळ्या मताच्या नि पक्षाच्या राजकारण्यांना त्या संग्रामाविषयी काय काय वाटे याचे समग्र वृत्त समजू शकले.

अर्थात ही दुसरी बाजू मांडणाऱ्यापैकी एकाही ब्रिटिश लेखकाने, वक्त्याने, सेनापतीने वा सैनिकाने, १८५७ मध्ये त्यांचे भारतावरील साम्रज्य नष्ट करून, स्वधर्म नि स्वराज्य यांच्यासाठी लढणाऱ्या त्या शूर भारतीय सैनिकाचा गुणगौरव केलेला नव्हता. ते सैनिक भारतीय स्वातंत्र्यासाठी लढले असा केवळ उल्लेख, स्वतःला निःपक्षपाती इतिहासकार म्हणविणाऱ्या एकाही ब्रिटिशाने केलेला मला काही त्या एवढ्या प्रचंड संग्रहात कोठेही आढळला नाही! ते युद्ध कोठे कोठे, कसे कसे पेटत गेले, त्यात कोणत्या कोणत्या घटना घडल्या यासंबंधीची भरपूर माहिती मिळाली नि त्यासंबंधी ब्रिटिश सैनिक, नागरिक, नि समाजधुरीण यांना काय काय वाटे हे मला मात्र त्या ग्रंथालयातील साहित्य वाचल्याने कळू शकले. ते ते कागदपत्र वाचता वाचता माझी निश्चिती झाली की १८५७ मध्ये भारतीय सैनिकांनी, संस्थानिकांनी आणि प्रांताप्रातांतील जनतेने एकत्र येऊन, परक्या इंग्रजी सत्तेविरुद्ध प्राणपणाने केलेला तो उठाव आपल्या मुळातील कल्पनेपेक्षाही अधिक विस्तृत प्रमाणावर, विशिष्ट उच्च ध्येयाने प्रेरित होऊन नि त्यासंबंधी पूर्वयोजना आखून केलेला एक फार मोठा स्वातंत्र्य संग्रामच होता. त्यावेळी जरी तो संपूर्णपणे यशस्वी होऊ शकला नसला तरी त्या संग्रामाच्या योगाने इंग्रजांच्या साम्राज्याला फार मोठा हादरा बसला. त्या युद्धामुळे भारताची प्रगती तर खुंटली नाहीच पण उलट आपण इंग्रजांविरूद्ध फार मोठा उठाव कसा करावा याचा एक आदर्श भावी काळासाठी निर्माण केला गेला. ह्या विचाराच्या अनुषंगानेच मी पुढे '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' ह्या माझ्या ग्रंथाची रुपरेखा आखली.

### 'इंडिया ऑफिस' मध्ये जाण्यास बंदी

'इंडिया ऑफिस' मधील त्या ग्रंथालयात बसून, तेथील ब्रिटिश ग्रंथपालाचा विश्वास संपादून त्या ठिकाणी असलेली अगदी गुप्त अशी ब्रिटिश कागदपत्रेही मिळवून मी ज्या काळात ती वाचीत असे त्याच काळात त्याच वाचनाच्या आधारे 'इंडिया ऑफिस' बाहेर भरणाऱ्या भारतीय तरुणांच्या गुप्त सभांतून मी १८५७ मधील पराक्रमी नि राजनीतिज्ञ अशा भारतीय वीरांची चरित्रे नि कथा सांगून त्या तरुणांना तसाच उठाव पुन्हा करण्याची, त्यांच्याप्रमाणेच आत्मसमर्पणाला सिद्ध असण्याची चेतावणी देत असे. आणि त्याच माहितीच्या आधारे माझ्या उद्दिष्टाप्रमाणे '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्य समर' हा ग्रंथही मी लिहीत असे. त्याच काळात १८५७ चा ५० वा

स्मृतिदिन आम्ही लंडनमध्ये प्रकटपणे कसा साजरा केला त्याची माहिती त्यावेळी मी ‘काळ’मध्ये लिहिलेल्या आणि आता ‘लंडनची बातमीपत्रे’ ह्या नावे प्रसिद्ध केलेल्या माझ्या पुस्तकांत सापडेल. ह्या आत्मवृत्तातही ती योग्य त्या ठिकाणी सांगितली जाईल. सध्या इतकेच सांगतो की ह्या माझ्या व्याख्यानाची नि ग्रंथ लिहिण्याची वार्ता आमच्या त्या गुप्त बैठकीत ब्रिटिश गुप्तचरानी घुसविलेल्या एका हेराने त्यांच्या प्रमुखांना कळविली. मी लिहीत असलेला ग्रंथ कसा प्रक्षोभक नि साम्राज्यद्रोह पसरविणारा आहे याचे वर्णन त्याने त्या अधिकाऱ्यांना सांगितले असले पाहिजे एवढेच नव्हे तर त्या अधिकाऱ्याची निश्चिती पटविण्यासाठी त्याने त्यातील काही प्रकरणे चोरुन तीही त्यांच्या हाती दिली असली पाहिजेत. ती वाचून ब्रिटिश हेर विभागाची नि राजनीतिज्ञांची त्रेधा उडाली नि चिडून त्यांनी ह्या ग्रंथाकडे नि माझ्याकडे आपली वक्रदृष्टी वळविली. ‘इंडिया ऑफिस’च्या ग्रंथपालांना त्यांनी कळविले की मला तिथे प्रवेश देऊ नये! ती आज्ञा ऐकून तो ग्रंथपालही आश्चर्यचकित झाला पण ‘आज्ञे-प्रमाणे खेदाने मला प्रवेश देता येत नाही’ असे त्याने सांगितले!

त्यामुळे माझ्यापुढे पुन्हा एक पेच उत्पन्न झाला. त्यावेळेपावेतो मी माझा ग्रंथ मराठीत लिहून पूर्ण केला होता. त्या ग्रंथात भरपूर संदर्भही दिले होते. परंतु ते यथातथ्य आहेत की नाहीत याची निश्चिती मला पटवून घ्यायची होती. ते काम त्यावेळेचे माझे तेथील एक निष्ठावंत सहकारी नि माझ्याच हातून अभिनव भारताची शपथ घेतलेले पण पूर्वायुष्यात ब्रिटिश धार्जिणे असलेले श्री. व्ही. एस. अय्यर उपाख्य ऋषीजी यांनी अंगावर घेतले. त्यावेळेपर्यंत ब्रिटिश गुप्तहेरांच्या डोळ्यात ते आलेले नव्हते. ऋषीजींनी त्यांच्या ओळखीच्या आधारे त्या ग्रंथालयात प्रवेश मिळविला आणि मी जे जे संदर्भ दिले ते सर्व नीटपणे पाहून त्यांनी ते यथायोग्य करून आणले.

## ग्रंथ तर लिहून पुरा झाला. . . पण. . .

अशाप्रकारे १८५७ चे स्वातंत्र्य समर हा ग्रंथ लिहून पुरा केला. ब्रिटिश शासनाने १९०८ मध्ये हा ग्रंथ राजहृत (जप्त) केल्यापासून उण्यापुऱ्या ४० वर्षांनंतर भारतीय राज्यशासनाने त्यावरील बंदी उठविली आणि इंग्रजी भाषांतराची पहिली प्रकट आवृत्ती श्री. ढवळे यानी छापली. सहस्रावधी रुपये व्यय करून त्याच्या प्रती कशा देशोदेशी पाठविल्या, त्यासाठी कोणी कोणी अनंत यातना भोगल्या, त्या ग्रंथाच्या आवृत्या नंतर कोणी कोणी कशा कशा छापल्या या संबंधीची सर्व रोमांचकारी ऐतिहासिक सत्यकथा (प्रसिद्धीपूर्वीच) तेव्हा साधारणतः ख्रिस्ताब्द १९४७ मध्ये त्या आवृत्तीकरिता मी स्वतः इंग्रजीतच The Story of the History ह्या नावे लिहिली नि ती श्री. ग. म. जोशी यांच्या नावे प्रसिद्ध केली.

www.savarkarsmarak.com